# श्रीमद्भागवतकथा . ३



g~mY _amRs H Wmê n

A{dZme ZJaH a

# श्रीमद्भागवत

## संक्षिप्त गोष्टीरूप कथामृत

## खंड ३

(अध्याय १० ते १२)

अविनाश महादेव नगरकर

ई साहित्य प्रतिष्ठान

**श्रीमद्भागवत** (Shreemadbhagavat)

खंड तिसरा

अनुवादक : **अविनाश महादेव नगरकर**

nagarkaram@yahoo.com

12 kilbaaha Close,

Dannimora

Auckland 2013, Australia

फोन नंबर. 00649 2715555

प्रकाशक : **ई साहित्य प्रतिष्ठान**

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २७ जुलै २०१४ (श्रावण मासारंभ)

©esahity Pratishthan® 2014

निर्मिती सहाय्य : अलका पाटिल

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

• या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

## ||श्रीगुरु:शरणं||

संपूर्ण जगदेव नंदनवनं सर्वेऽपि कल्पद्रुमा: गाङ्गंवारि

समस्तवारिनिवहा: पुण्या समस्ता:क्रिया: |

वाच: संस्कृतप्राकृत: श्रुतिशिरो वाराणसी मेदिनी

सर्वावास्थितिरस्य वस्तूविषया दृष्टे परब्रह्मणि ||



हे परब्रह्मरुपी सद्गुरो, आपल्यासाठी संपूर्ण विश्व म्हणजे एक नंदनवनच आहे. सर्व वृक्ष आपणास कल्पवृक्षच आहेत. सर्व जलाशय गंगा आहेत व आपल्या सर्व क्रिया अत्यंत पवित्र आहेत. आपली वाणी संस्कृत असो कीं प्राकृत ती मला वेदासम शिरोधार्य आहे. सर्व भूमी आपल्यासाठी वाराणसीच आहे. कारण आपण सदैव ब्रह्मभावात असता.

**अनंत कोटी ब्रह्मांडनायक भगवान योगीराज सद्गुरू वामनरावजी गुळवणी महाराजांचे वर्णन श्रीमत् आद्य शंकराचार्यांच्या या सुयोग्य शब्दांखेरीज करताच येत नाही. त्यांनी घडवलेली हि कलाकृती त्यांच्याच चरणी सादर समर्पण .**

## विषयानुक्रम


| | |
|---|---|
| पुष्प १३० वे | कृष्णावताराची योजना ... अध्याय १ पूर्ण |
| पुष्प १३१ वे | ब्रम्हदेवकृत गर्भस्थ श्रीकृष्णस्तुती ... अ.२.पूर्ण |
| पुष्प १३२ वे | श्रीकृष्ण जन्म ... अ. ३ पूर्ण |
| पुष्प १३३ वे | कंसाचे अघोरी अत्याचार ... अ.४ |
| पुष्प १३४ वे | नंद-वसुदेव भेट ... अ. ५ पूर्ण |
| पुष्प १३५ वे | पूतना व शकटासुर वध ... अ.६,७ |
| पुष्प १३६ वे | यशोदेस विश्व दर्शन ... अ. ७ व ८ |
| पुष्प १३७ वे | उखळबंधन व यमलार्जुन उद्धार ... अ.९, १० पूर्ण |
| पुष्प १३८ वे | कृष्ण लीला ... अध्याय ११ पूर्ण |
| पुष्प १३९ वे | अघासुराचा वध ... अ.१२,१३ चालू |
| पुष्प १४० वे | ब्रम्हदेवकृत स्तुती ... अ.१३, १४ |
| पुष्प १४१ वे | धेनुकासुराचा वध ... अ.१४,१५ |
| पुष्प १४२ वे | कालिया मर्दन ... अ.१६ पूर्ण |
| पुष्प १४३ वे | प्रलम्बासुरवध ... अ.१७, १८ |
| पुष्प १४४ वे | शरदातले वृंदावन ... अ.१९,२०,२१ |
| पुष्प १४५ वे | चीर हरण ... अध्याय २२ पूर्ण |
| पुष्प १४६ वे | ऋषी पत्न्यांना श्रीकृष्णांचा आशिर्वाद ... अध्याय-२३पूर्ण |

| | |
|---|---|
| पुष्प १४७ वे | गोवर्धन पूजा ... अ.२४, २५ |
| पुष्प १४८ वे | कृष्णलीला ... अ.२६,२७व२८ |
| पुष्प १४९ वे | रासक्रीडा ... अध्याय २९ पूर्ण |
| पुष्प १५० वे | शोकमग्न गोपी व विरह् गीत ... अ.३०,३१ |
| पुष्प १५१ वे | पुनर्मिलन व रासक्रीडा ... अ.३२, ३३ |
| पुष्प १५२ वे | युगलगीत ... अ.३४,३५ |
| पुष्प १५३ वे | अक्रूराचे व्रज गमन ... अ.३६ |
| पुष्प १५४ वे | नारद-कृष्णस्तुती ... अ. ३७ |
| पुष्प १५५ वे | अक्रुरांना भगवद्दर्शन ... अ.३८,३९ |
| पुष्प १५६ वे | श्रीकृष्ण मथुरा प्रवेश ... अ.४०,४१ |
| पुष्प १५७ वे | धनुर्भंग ... अ.४२ व ४३ पूर्ण |
| पुष्प १५८ वे | कंसोद्धार ... अ. ४४पू. व ४५ चा |
| पुष्प १५९ वे | उद्धवाचे व्रजगमन ... अ.४५,४६ |
| पुष्प १६० वे | भ्रमर गीत ... अध्याय ४७ पूर्ण |
| पुष्प १६१ वे | कुब्जा, अक्रूर घरी श्रीकृष्ण ... अ. ४८,४९ |
| पुष्प १६२ वे | द्वारकेची स्थापना ... अ.५०,५१ |
| पुष्प १६३ वे | रुक्मिणीचे पत्र ... अ.५२ पू,५३ चालू |
| पुष्प १६४ वे | रुक्मिणी हरण ... अ.५३ व ५४ पूर्ण |
| पुष्प १६५ वे | प्रद्युम्न व शंबरासूर ... अध्याय ५५ पूर्ण |

पुष्प १६६ वे जांबवती,सत्यभामा-श्रीकृष्णविवाह ... अ.५६

पुष्प १६७ वे स्यमंतक मण्याचे अपहरण ... अ.५७.पूर्ण

पुष्प १६८ वे श्रीकृष्णांचे अन्य विवाह ... अ.५८ पूर्ण

पुष्प १६९ वे भौमासुराचा वध ... अध्याय ५९ पूर्ण

पुष्प १७० वे कृष्ण-रुक्मिणी संवाद ... अ. ६० पूर्ण

पुष्प १७१ वे रुक्मी वध,अनिरुद्ध-उषा ... अ.६१व ६२

पुष्प १७२ वे श्रीकृष्ण-बाणासूर युध्द ... अ.६३, ६४

पुष्प १७३ वे बलरामांचे व्रज गमन ... अ.६५, ६६

पुष्प १७४ वे द्विविदाचा उध्दार ... अ.६७, ६८

पुष्प १७५ वे श्रीकृष्णांचा गृहस्थाश्रम ... अ.६९, ७०

पुष्प १७६ वे श्रीकृष्णांचे इंद्रप्रस्थ गमन ... अ.७१,७२

पुष्प १७७ वे पांडवांचा राजसूय यज्ञ ... अ.७३,७४,७५

पुष्प १७८ वे शाल्वाचा उध्दार ... अ.७६,७७,७८

पुष्प १७९ वे कृष्ण-सुदामा ... अ.७९,८०

पुष्प १८१ वे द्रौपदी व कृष्णपत्नींचा संवाद ... अ ८२,८३,८४

पुष्प १८२ वे वसुदेवांना ज्ञानोपदेश ... अ.८५ व ८६

पुष्प १८३ वे वेदस्तुती ... अ. ८७ व ८८

पुष्प १८४ वे भृगुंची त्रिदेव परीक्षा ... अ. ८९

पुष्प १८५ वे भगवान श्रीकृष्णांचा लीला विहार ... अ. ९०

## श्रीमद्भागवत- अकरावा स्कंध


पुष्प १८६ वे यदुकुळास शाप व निमि जायन्त्य संवाद ... अ.१,२

पुष्प १८७ वे मायाब्रम्ह विवरण ... अ. ३

पुष्प १८८ वे भगवंताचे अवतार व पूजा विधी ... अ.४,५व६

पुष्प १८९ वे अवधूतोपाख्यान ... अध्याय ७ पूर्ण

पुष्प १९० वे उर्वरित गुरूंची कथा ... अ.८व९पूर्ण

पुष्प १९१ वे बध्द मुक्त भक्त लक्षणे ... अ.१०व११

पुष्प १९२ वे सत्संग व हंसोपदेश ... अ.१२,१३

पुष्प १९३ वे भक्तियोग, ध्यान व सिद्धी ... अ.१४,१५

पुष्प १९४ वे ईश्वराच्या विभूती व धर्म विवरण ... अ.१६,१७

पुष्प १९५ वे धर्म, ज्ञान, भक्ती, यम व नियम ... अ.१८,१९

पुष्प १९६ वे कर्म-ज्ञान व भक्ती योग ... अ.२० व२१

पुष्प १९७ वे श्रीकृष्ण बोध व भिक्षुगीता ... अ.२२, २३

पुष्प १९८ वे सांख्यशास्त्र, गुणकार्ये व आहार शुद्धी ... अ.२४,२५

पुष्प १९९ वे ऐल गीता व पूजा प्रकार ... अ.२६,२७

पुष्प २०० वे ज्ञान व भक्ती योग विवरण ... अ.२८, २९

पुष्प २०१ वे यादवांचा संहार व श्रीकृष्ण निर्याण ... अ.३०, ३१

## श्रीमद्भागवत- बारावा स्कंध

पुष्प २०२ वे वंश वर्णन व कलियुग ... अध्याय १, २ व ३

पुष्प २०३ वे ब्रम्होपदेश व सर्पसत्र ... अ.४, ५, ६

पुष्प २०४ वे १८ पुराणे व मार्कंडेय पुराण ... अध्याय ७, ८ व ९

पुष्प २०५ वे मार्कंडेयांचीशिवस्तुती,  भागवत महात्म्य

# लेखकाचा अल्पपरिचय



श्री अविनाश नगरकर हे बहुआयामी व्यक्तिमत्व आहे. सद्गुरूंवरच्या निष्ठेनी सर्व काही साध्य होते अशी त्यांची श्रद्धा आहे. भारतीय परंपरेतील सद्गुरूंचे स्थान त्यांनी जाणले आहे. अध्यात्मिक विचारांचा वारसा हा या कुटुंबाचा विशेष आहे. वडील व आजोबांकडूनच तो मिळाला असल्याचे ते मानतात. सर्वात महत्वाचे म्हणजे सन १९६७ मध्ये त्याना प्राप्त झालेला योगिराज प.पू. वामनरावजी गुळवणी महाराज, पुणे यांचा अनुग्रह. त्यांच्या मार्गदर्शनानुसार केलेल्या साधनेचे व अध्ययनाचे फळ म्हणजे त्यांचे आजचे यश असे ते ठामपणे सांगतात.

श्री अविनाश नगरकर हे ठाणे येथे मायर्स एँड वास्प या पंप बनवणाऱ्या कंपनीतून प्रोजेक्ट मॅनेजर म्हणून निवृत्त झाले. नोकरीवर असतानाच त्यांनी सामाजिक कार्य आणि लिखाण सुरू केले. अनेक संस्थांचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. यात ग्राहक पंचायत, विविध आध्यात्मिक आणि सांस्कृतिक संस्था आहेत. वयाच्या ५६व्या वर्षी कॉप्युटर शिकून त्यांनी त्यावर लिखाण सुरू केले. आजवर त्यांची श्री आद्य शंकराचार्य, समर्थ रामदास स्वामी यांच्याबद्दलची पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्याशिवाय त्यांची ज्ञानेश्वरी, नवनाथ भक्तीरसामृत, एकनाथी भागवत, आणि श्रीमद्भागवत यांविषयावरची चातुर्मास प्रवचनेही खूप गाजली.

सन १९८४ नंतर त्यांच्या सामाजिक कार्याचे धुमारे फुटू लागले. अनेक सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक संस्थांचे ते अध्यक्ष म्हणून जबाबदारी पार पाडतात. ज्ञानेश्वरीवर अधिकारवाणीने प्रवचन करणे हा त्यांचा हातखंडा आहे. श्रीमत् आद्य शंकराचार्य ह्या पुस्तकातील भाषासौष्ठव व कथाभागाची अलगदपणे उलगडणारी घडी वाचकांचे मन भारून टाकते.

अध्यात्म आणि इंजिनियरिंग व्यतिरिक्त अनेक कलांमध्येही श्री अविनाश नगरकर पारंगत असून चित्रकला व शिल्पकलेतील त्यांचे काम वाखाणले जाते.


श्रीमद्भागवत
संक्षिप्त गोष्टीरूप कथामृत
अनुवादक
अविनाश महादेव नगरकर

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत

## पुष्प १ ले

## मनोगत

श्रीमद्भागवत म्हणजेच भगवद्गीता असा अनेक जणांचा समज असल्याचे लोकांच्या विचारण्यावरून, बोलण्यावरून लक्षात आले. म्हणून आपल्या या अलौकिक ग्रंथाची थोड्या प्रमाणात का होईना ओळख व्हावी म्हणून हा लेखन प्रपंच करण्याचे ठरवले आहे. कुतूहल म्हणून अनेकजण मराठी अनुवाद असलेले भागवत वाचायला घेतात पण नंतर कंटाळून ठेवून देतात. भागवताशी मैत्री जोडल्या खेरीज त्यातील अवीट गोडी चाखता येत नाही हेच खरे. भागवतात भगवद्भक्ती व अध्यात्म यांची गोष्टी रूपाने कशी सांगड घातली आहे हे खरोखरच वाचण्यासारखे आहे. त्याची थोडी ओळख व्हावी असे वाटले म्हणून ही पुष्पे सदर करीत आहे. त्यासाठी मूळ भागवत संहिता अभ्यासून मग त्यातल्या निवडक श्लोकांचा उपयोग केलेला आहे. ऐकींव अथवा काल्पनिक गोष्टी यात नाहीत. गर्भित अर्थाच्या अनुषंगाने केलेला अनुवाद आहे. भागवत ग्रंथ म्हणजे भगवद्भक्तीतला एक महान चमत्कार आहे. श्रीमद्भागवतातल्या बाराव्या स्कंधातल्या तेराव्या अध्यायात सूतमुनी म्हणतात

श्रीमद्भागवतं पुराणममलं यद्वैष्णवानां प्रियं यस्मिन् पारमहंस्यमेकममलं ज्ञानं परं गीयते ।
तत्र ज्ञानविराग भक्तिसहितं नैष्कर्म्यमाविष्कृतं तत् शृण्वन् प्रपठन् विचारणपरो भक्त्या विमुच्येन्नरः।।१८।।

अर्थात "श्रीमद्भागवत पुराण हे अत्यंत निर्दोष आहे. ते वैष्णवांना फार प्रिय आहे. ह्या पुराणात मायेपासून अलिप्त असलेल्या परमहंसांच्या अद्वितीय ज्ञानाचे वर्णन केले आहे. या ग्रंथात ज्ञान,वैराग्य व भक्ती यांच्यासह नैष्कर्म्य होण्याचा मार्ग दाखवला आहे. अशा या भागवत ग्रंथाचे भक्तीने श्रवण, मनन व चिंतन करणारा मनुष्य खात्रीने मुक्त होतो." ह्या वरून भागवताचे महत्व किती आहे हे लक्षात येईल. पण संस्कृत न समजण्यामुळे अनेक जण भागवत वाचण्याचा कंटाळा करतात. भागवतातल्या ज्ञानाची ओळख व्हावी हा हेतू या लिखाणा मागे आहे. सद्गुरुकृपेनेच हे होईल अशी आशा आहे. त्यामुळे सद्गुरु चरणी तशी प्रार्थना आहे.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

**अविनाश महादेव नगरकर., ३/२३ थोमस स्ट्रीट, क्लेफिल्ड, ब्रिस्बेन, ऑस्ट्रेलिया.**

# स्कंध दहावा

(स्कंध १ ते ५ साठी खंड पहिला)

(स्कंध ६ ते ९ साठी खंड दुसरा)

।।श्रीगुरु:शरणं।।

श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

पुष्प १३० वे (अध्याय १ पूर्ण)

## कृष्णावताराची योजना

परीक्षित राजा शुकमुनींना म्हणाला, " हे प्रभो! भगवान श्रीकृष्णांचे चरित्र म्हणजे एक अशी दिव्य नौका आहे कीं जी सामान्य मनुष्यालाही परमपद प्राप्त करून देते. असे मी बालपणापासून श्रवण करीत आलो आहे. शिवाय माझ्या मातेच्या गर्भात प्रवेश करून ब्रम्हास्त्रापासून माझे रक्षण केल्याचे मलाही ज्ञात झाले आहे. त्यामुळे भगवान श्रीकृष्णांचे दिव्य चरित्र श्रवण करण्यास मी उत्सुक आहे. त्या उत्सुकतेमुळे व आपल्या अमृतमय वाणीने श्रवण केलेल्या हरीकथांमुळे माझी क्षुधा, तृषा व निद्रा हरपली आहे. म्हणून आपणास माझी प्रार्थना आहे, कीं भगवान श्रीकृष्णांचे समग्र चरित्र आपण मला सांगावे."

शुकमुनींनी नुसत्या श्रवणाने पावन करणारी हरिकथा सांगायला सुरुवात केली. " राजा! भगवान श्रीकृष्णांच्या कथा मनुष्याची बुद्धी स्थिर करणाऱ्या असून कितीही श्रवण केल्या तरी तृप्ती न होणाऱ्या आहेत. त्यामुळे मी तुला सुरुवातीपासून सांगतो. तूं एकाग्र चित्ताने ऐक!

वसुंधरा असुर व दैत्य यांच्या उपद्रवी भारामुळे जेंव्हा फार त्रस्त झाली तेंव्हा तिने ब्रम्हदेवांना गोरूप धारण करून प्रार्थनापूर्वक सांकडे घातले. तेंव्हा वसुंधरेची प्रार्थना ऐकून भगवान ब्रम्हदेव भगवान शिवांसह सर्व देवांना घेऊन क्षीरसागराच्या तीरावर आले. त्यांनी भगवान श्रीहरीचे पुरुषसूक्तादीक वैदिक मंत्रांनी पूजन केले. मग वसुंधरेची व्यथा निवेदन केली. तेंव्हा भगवान ब्रम्हदेवांच्या हृदयांत परावाणी प्रकट झाली. त्यांनी लगेच ती वाणी सर्व देवांना प्रकटतेने सांगितली. ते म्हणाले, " भगवान स्वत:च भूमीभार हलका करण्यासाठी यदुकुळात अवतार धारण करणार आहेत. त्यांच्या सहाय्यासाठी सर्व देव-देवतांनी पृथ्वीवर यदुकुलात विविध ठिकाणी पुत्र, पौत्र इत्यादी रूपाने अवतार धारण करावेत. भगवान प्रथम संकार्षणाला वसुदेव-देवकी यांच्या पोटी आपला थोरला भाऊ म्हणून जन्म घेण्यास सांगतील. नंतर भगवान स्वत: श्रीकृष्णाच्या रूपाने वसुदेव-देवकी यांच्या पोटी अवतीर्ण होतील. त्याच वेळी विष्णुमाया अदृश्य रूपाने आपल्या सर्व शक्तींसह सर्व प्रकारे सहाय्य करण्यास तत्पर होईल." इतके सविस्तर सांगून ब्रम्हदेव आपल्या स्थानी निघून गेले.

शुकमुनी पुढे सांगू लागले, " राजन्! पूर्वी मथुरेत यदुवंशातील शूरसेन नामक राजा राज्य करीत होता. त्याचा पुत्र वसुदेव. वसुदेवाचा विवाह देवकीशी मोठ्या थाटामाटात झाला. वऱ्हाड वाजत गाजत आपल्या घरी जाण्यास निघाले. कंस कौतुकाने वसुदेव-देवकी यांच्या रथाचे सारथ्य करीत होता. देवकी कंसाची लाडकी चुलत बहिण होती. कंस उग्रसेनाचा मुलगा होता. देवकी ही कंसाच्या काकाची म्हणजे देवकाची मुलगी होती. तिचे सौंदर्य अवर्णनीय होते. पित्याची अत्यंत लाडकी असल्याने पित्याने भरघोस आंदण दिले होते. त्या भरघोस आंदणासह ती मिरवणूक मंगल वाद्यांच्या गजरात चालली होती. कंसही मोठ्या खुशीत होता. मिरवणूक मोठ्या आनंदांत चालली होती.

इतक्यात सर्वांना ऐकू जाईल अशी आकाशवाणी झाली. " अरे महामूर्ख, महामलीना, दुष्ट कंसा! ज्या देवकीला तूं मोठ्या वाजत गाजत घेऊन चालला आहेस त्या वसुदेव-देवकीचा आठवा पुत्र तुझा वध करणार आहे." ही आकाशवाणी ऐकताच कंस बिथरला! क्षणातच त्याने रथातून उडी मारून देवकीला खाली खेचले व तिला मारण्यासाठी तलवार उपसली! भयभीत झालेली देवकी दीनवाणीने म्हणाली ' भाऊराया! क्षणभरच थांब!"

इतक्यात वसुदेवांनी रथातून उडी मारून कंसाचा हात धरला. आणि म्हणाले हे शूर व प्रशंसनीय भोजकुलभूषणा! कंसा! थांब! स्त्रीहत्येचे पातक करूं नकोस! तुला तुझ्या मुलीसारख्या असलेल्या लाडक्या बहिणीचा वध करूं नकोस! तिच्या होणाऱ्या पुत्राच्या दोषासाठी तिला शिक्षा करूं नकोस. तुझ्या सारख्या शूराला इतक्या पुढे येणाऱ्या मृत्यूचे भय वाटण्याचे काहीच कारण नाही. शिवाय मी तुला वचन देतो कीं देवकीचे पुत्र जन्मत:च तुझ्या हवाली करीत जाईन. नुकत्याच झालेल्या विवाहाच्या आनंदात मश्गुल असलेल्या निष्पाप बहिणीला मारण्याच्या पापापासून निवृत्त हो! एवढी माझी प्रार्थना मान्य कर." निष्पाप देवकीला वाचवण्यासाठी वसुदेव इच्छा नसताना क्रूर कंसाशी अजीजीने बोलले. वसुदेवांच्या शब्दावर कंसाचा विश्वास होता. त्यामुळे कंसाने देवकीला सोडून दिले.

पुढे वर्षभराने वसुदेव बोलल्या प्रमाणे देवकीला झालेल्या पुत्राला घेऊन कंसा कडे आले. पण त्या गोजिरवाण्या पुत्राला पाहून व वसुदेवाच्या दिलेला शब्द पाळण्याच्या वृत्तीला पाहून कंस द्रवला. वसुदेवाला कंस म्हणाला, " वसुदेवा! मला देवकीच्या आठव्या पुत्रापासून मृत्यू आहे. त्यामुळे ह्याला घेऊन जा! व आठवा पुत्र आणून दे!" चारित्र्यहीन कंसाचे हे बोलणे ऐकून वसुदेवास जराही आनंद झाला नाही. वसुदेव धास्तावलेल्या मनानेच पुत्राला घेऊन शांतपणे निघून गेले.

वसुदेव आपल्या निवासी गेले असतील नसतील तेवढ्यात कंसाकडे देवर्षी नारद आले. नारदांचा सत्कार करून कंसाने आपला मोठेपणा सांगण्यासाठी घडलेला प्रकार कथन केला. नारद हसले व म्हणाले, " अरे कंसा भगवान श्रीविष्णु जर तुला मारण्यासाठीच जन्माला येणार असतील तर ते कसेही अवतीर्ण होतील. मग तूं आठव्याला मारलेस तरी ते देवकीच्या पुत्राच्या रूपाने तुला मारणारच! मग तो आठांपैकी कोणताही असू शकतो !" कंसाच्या पापाचा घडा लवकर भरावा म्हणूनच नारदांनी त्याचा असा बुद्धीभेद केला.

कंसाचा बुद्धीभेद झालाच. त्याने धावत जाऊन देवकीच्या पुत्राला गरगर फिरवून दगडावर आपटून ठार केले व शांतपणे आपल्या प्रासादात आला. नारदांच्या म्हणण्या नुसार भगवान विष्णु यदुकुळात अवतार घेणार आहेत. ह्या नारदांच्या बोलण्या मुळे बिथरलेल्या कंसाला संपूर्ण यदुकुळाचाच संशय येऊ लागला. म्हणून कंसाने प्रथम आपल्या पित्याला म्हणजे उग्रसेनालाच कैदेत टाकले. कारण उग्रसेन सर्व यादवांचा राजा होता. त्यानंतर देवकीला होणारा प्रत्येक पुत्र कंस मारू लागला. वसुदेव-देवकी ईश्वराच्या स्मरणात हे दु:ख सहन करीत आठव्या पुत्राच्या जन्माची वाट पहात काळ कंठू लागले. दिवसांमागून दिवस जात होते आणि कंसाचा निर्दयपणाही वाढत चालला होता. विशेषत: यदुकुळाल्या अनेकांचा तो काळच बनला होता.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:|

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

## पुष्प १३१ (अध्याय २ पूर्ण)

## ब्रम्हदेवकृत गर्भस्थ श्रीकृष्णस्तुती

कंसाने आपला सासरा जरासंध याच्या संरक्षणाखाली आपला जुलमी अंमल बसवला. यदु, भोज, अंधक, सात्वत इत्यादी वंशातल्या राजांना पिडायला सुरुवात केली. इतकी कीं त्यातले अनेकजण राज्यत्याग करून गेले. बाकीचे मांडलिक झाले म्हणून वाचले. या कामी प्रलंब, बक, चाणूर, मुष्टिक, तृणावर्त, अघासूर द्विविद, पूतना इत्यादी महाक्रूर असुर कंसाला हिरीरीने मदत करीत होते.

देवकीला आता सातव्या वेळी गर्भ राहिला. त्यावेळी देवकीच्या अंगी प्रचंड उत्साह व जोम निर्माण झाला. ती निर्भयपणे वीरश्रीयुक्त भाषणे करू लागली. सगळी पृथ्वी मी माझ्या मस्तकावर धारण करीन. इत्यादी काही बाही बोलत सुटे! त्यामुळे कंसापासून धोका असल्याची भीती वसुदेवाच्या मनात उत्पन्न होई. इकडे भगवान विष्णुंनी योगमायेला आज्ञा केली कीं देवकीच्या उदरातला गर्भ अलगद काढ. कंस भयाने वसुदेवाची रोहिणी नामक पत्नी गोकुळात रहात आहे. तिच्या उदरी विनासायास स्थापन कर. हे कल्याणी मी स्वत: देवकीच्या उदरी पुत्ररूपाने अवतीर्ण होणार आहे. त्याच वेळी तूं सुध्दा यशोदेच्या उदरी जन्म घे. दोघांचाही जन्म एकाच वेळी होईल. तुझ्या या कार्याचा गौरव म्हणून सामान्य लोक तुला दुर्गा, कुमुदा, चंडिका, माधवी, कन्यका, माया, नारायणी, शारदा, अंबिका, ईशानी इत्यादी नावांनी संबोधून भव्य सामग्री व पशुयागाने संतुष्ट करतील असा माझा तुला आशीर्वाद आहे.

वैष्णवीमायेने आपले काम चोख केले. इकडे देवकीच्या पोटातला गर्भ नाहीसा झाला. आणि रोहिणी आश्चर्य चकित झाली. पण योगमायेने रोहिणीसह नंद वगैरे प्रभृतीना सर्व ज्ञात होईल असे केले. बलभद्र म्हणजेच बलराम याचा जन्म सोहळा मोठ्या थाटात पार पडला. योग्य समयी भगवान श्रीहरी देवकीच्या उदरात प्रवेशले. देवकी एकदम तेज:पुंज दिसू लागली. तिच्या सर्व चिंता नाहीशा झाल्या. चेहरा आनंदाने फुलून गेला.

देवकीचा सातवा गर्भ जिरल्यानंतर आता देवकी आठव्या वेळी गरोदर राहिल्याचे कंसाला समजताच तो वारंवार तिच्यावर लक्ष ठेवू लागला. देवकीला ठार मारून पुढचे सगळे प्रश्न मिटवावेत असे वाटून त्या तिरीमिरीत तो खड्ग घेऊन देवकीकडे धावे. पण शांत आणि निर्भय देवकीला पाहून थक्क होई. तिच्याकडे नुसते पहात राही आणि थोड्यावेळाने विचार बदलून परत जाई! कंसाची त्यामुळे झोप उडाली.

कारण देवकीला पाहून उत्पन्न होणाऱ्या प्रेम भावनांनाही त्याला आवर घालता येईना आणि तिचा वधही करवेना. अशा विचित्र मन:स्थितीत तो देवकी प्रसूत होण्याची वाट पाहू लागला. भगवंतांनी देवकीच्या उदरात प्रवेश केल्याचे ब्रम्हदेवांना ज्ञात झाले. ब्रम्हदेव सर्व देव-देवतांना घेऊन गुप्तरूपाने देवकीकडे आले. त्यांनी भगवान श्रीहरीची स्तुती केली ," हे सर्व शक्तिमान प्रभो! उत्पत्ती, स्थिती व लय यांचे आपणच स्वामी आहात! काल आपल्याच सत्तेने वर्तत असतो. आपण एकच सत्य आहात. आपणास आमचा सदैव नमस्कार असो. आपल्याच त्रिगुणी मायेच्या सहाय्याने आम्ही धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे पुरुषार्थ साधण्याचा प्रयत्न करीत असतो. आमच्या सप्तावरण शरीरात अंत:करण, मन, बुद्धी, चित्त व अहंकार यांच्या सूक्ष्म व अतर्क्य कार्याने आपणच आत्मरूपाने अखंड असता. हे आम्हाला कळत असूनही आपल्याच मायेने आम्ही नेहमीच संभ्रमात पडतो. पण अव्यभिचारी भक्तीने शरण येणाऱ्या कोणत्याही जीवास तूं कधीच अंतर देत नाहीस. म्हणूनच हे प्रभो आमचा तुला पुन्हा पुन्हा नमस्कार असो." अशाप्रकारे स्तुती करून सर्वजण आपल्या स्थानी निघून गेले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

## पुष्प १३२ वे (अध्याय ३ पूर्ण)

## श्रीकृष्ण जन्म

भगवंताची अवतीर्ण होण्याची वेळ आली तेंव्हा सर्व पृथ्वी फळा फुलांसह आनंदित झाली. सर्वत्र नवचैतन्य आल्या सारखा उत्साह दिसू लागला. पक्षी आणि पशू आनंदाने विहार करू लागले. संत सज्जनांच्या मनात आत्मविश्वास प्रकट होऊ लागला. या उलट असुर चांगलेच अस्वस्थ झाले. दुष्टांच्या मनात अनामिक भयाने घर केले. आकाशांत गंधर्व, किन्नर, अप्सरा यांचे गायन व नृत्य सुरु झाल्याने वातावरण सुरेख भासू लागले. आकाश मेघांनी दाटले गेले.

अशा प्रसन्न वेळी वसुदेवांनी देवकीकडे पहिले. ते देवकीला पाहून आश्चर्य चकित झाले. पहाटेच्या वेळी पूर्व उजळून निघावी तशी देवकी तेजाळली होती. देवकीकडे आश्चर्याने पाहात असतानाच वसुदेवांसमोर शंख, चक्र, गदा, पद्म धारण केलेले बालरूपातले भगवान श्रीहरी ऊभे राहिले. वसुदेव हात जोडून प्रार्थना करू लागले. “हे परमात्मन्! तुझी लीला अतर्क्य तर खरीच पण मोठ्या ज्ञानी लोकांनाही अनाकलनीय आहे. माझा तुला नमस्कार आहे. आकाशवाणीने सांगितल्याप्रमाणे तूं देवकीच्या उदरी अवतरला आहेस असे तरी कसे म्हणावे? पण मी प्रत्यक्ष जे अनुभवित आहे ते असत्य तरी कसे म्हणावे?” इतक्यात देवकी म्हणाली “हे भगवन्! वेदही आपली स्तुती करून "न इति! न इति! " असे म्हणतात व स्तुती करण्यास असमर्थ होतात तिथे मी नमस्कारा शिवाय अधिक काय करू शकणार? तथापि हे काळाच्या अतीत असलेल्या, जन्म मृत्यू रहित परमात्म्या स्त्रीबुद्धीने केलेली माझी प्रार्थना अशी आहे कीं स्त्रीला पुत्र होण्याचे जे सुख अपेक्षित आहे ते तुझ्या खेरीज कोण समजून घेणार? दुसरे असे कीं माझे तान्हुले झाल्यावर तो दुष्ट कंस तुला मारण्यासाठी येणार हे नक्कीच! त्या भयाने मी अत्यंत व्याकूळ झाले आहे. ते माझे भयही तूं नाहीसे कर! तसेच कंसाने तुला मारू नये म्हणून काहीतरी युक्ती सांग!”

देवकीची ही प्रार्थना ऐकून भगवान् श्रीकृष्ण म्हणाले, “हे माते तूं जराही भिऊ नकोस. स्वायंभूव मनूच्या काळी तूं व वसुदेवाने केलेल्या तपामुळे तुमची माझ्यावर दृढ निष्ठा व श्रद्धा बसली. न कंटाळता

निरंतर माझी भक्ती उत्तरोत्तर तीव्र केलीत. इतकी कीं मला प्रकट होऊन तुम्हाला वर देण्याची इच्छा झाली. त्यावेळी मी स्वत: तुमचा पुत्र म्हणून जन्म घ्यावा असा वर वसुदेवाने व तूं मागितला. तोच मी आतां तुमच्या या तिसऱ्या जन्मात तुमचा पुत्र श्रीकृष्ण म्हणून जन्म घेत आहे. मी ह्या स्वरुपात प्रकट होण्याचे कारण असे कीं तुम्हाला पूर्व कल्पना न देता मी जर नैसर्गिक पद्धतीने जन्म घेतला असता तर तुम्हां दोघानाही मी म्हणजे साक्षात् भगवंत तुमच्या पोटी अवतरलो आहे असा विश्वास निर्माण झाला नसता. तसेच कंसाच्या वागण्यामुळे नुसत्या अंत:प्रेरणेने तुम्ही निर्भयतेने कार्यप्रवण होऊ शकला नसता. म्हणून माझ्या या मूळ स्वरूपाच्या दर्शनाने मी तुम्हाला नि:शंक करीत आहे. हे माते, आतां जेंव्हा मी तुझा बालक म्हणून तुझ्या इच्छेप्रमाणे तुझ्या पोटी जन्म घेईन तेंव्हा माझा स्पर्शही तुम्हाला नि:संदेह करील. मग तूं व वसुदेव अंत:प्रेरणेवर निर्भय होऊन अचूक कार्य कराल. आतां तुम्ही सतत माझे चिंतन करीत राहा. इतके सांगून भगवान श्रीकृष्ण पुर्ववत् देवकीच्या उदरी गुप्त झाले.

देवकी यथावकाश प्रसूत झाली. बालकाच्या रूपातल्या श्रीहरिला पाहून आनंदली. तिने प्रेमाने त्या बालकाला पदराखाली घेऊन स्तनपान दिले. बालकाच्या स्पर्शामुळे तिच्या मनात अथांग शांती पसरली. त्याचवेळी गोकुळात नंदाघरी यशोदाही प्रसूत झाली. तिच्या उदरी योगमायेने कन्यारुपाने जन्म घेतला. जन्म घेताच कन्या कीं पुत्र हे समजण्या पूर्वीच योगमायेने प्रथम नंद यशोदेसह सर्व गोकुळाला गाढ योगनिद्रेत टाकून दिले.

वसुदेवांनी बालकाला देवकीच्या मांडीवरून उचलताच त्यांना अंत:प्रेरणा मिळाली. बंदिखान्याची कडेकोट बंदोबस्तातली द्वारे आपोआप उघडली गेली. रक्षक गाढ निद्रेच्या आधीन झाले. बालकाला घेऊन वसुदेव नि:शंक मनाने गोकुळाची वाटचाल करू लागले. मुसळधार पाऊस पडत होता. शेषाने आपला फणा त्यांच्यावर छत्री सारखा उभा केला आहे याची त्यांना जाणीवही नव्हती. यमुना दुथडी भरून वाहात होती. पण कमरे इतक्या पाण्यात येताच यामुनेने दुभंगून सुरेख वाट करून दिली. चमकणाऱ्या विजा रस्ता दाखवीत होत्या. वसुदेव अंत:प्रेरणेने नंदमहाराजांच्या घरी आले. नंद महाराजांच्या घराचे द्वार उघडेच होते. योगमायेला पुढ्यात घेऊन यशोदा शांत झोपलेली होती. वसुदेवांनी श्रीकृष्णाला योगमायेच्या जागी ठेवले आणि योगमायेला घेऊन मथुरेत आले. देवकीच्या हवाली योगमायेला करताच सर्व दरवाजे बंद झाले. द्वारपाल रक्षणासाठी सज्ज झाले. गोकुळातही परिस्थिती पूर्ववत् झाली.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

पुष्प १३३ वे (अध्याय ४ पूर्ण)

## कंसाचे अघोरी अत्याचार

वसुदेव देवकीकडे परत आले. तिच्या हाती योगमायेला सुपूर्त केले आणि योगमायेने 'ट्याऽ' केले. योगमायेचा ध्वनी ऐकून रक्षक धांदलीने कंसाकडे धांवले. आठव्याची धास्ती घेतलेला कंस देवकीकडे धांवतच सुटला.

कंसाला पहाताच असहाय देवकी कंसाला म्हणाली. “कंसराया! अरे ही कन्या आहे! हिला मारू नकोस! स्त्रीहत्येचे पातक माथी घेऊ नकोस. एवढी एकुलती एक कन्या तुझी भेट म्हणून तरी राहू दे!" पण आधीच भेदरलेला व धास्तावलेला कंस काहीच ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता. तो योगमायेच्या प्रभावाखाली होता. भगवंताच्या आज्ञे प्रमाणे योगमाया सारे काही घडवणार होती. त्यामुळे कंसाने जणू आपल्याला काहीच ऐकू येत नसल्या सारखे तिच्या बोलण्याकडे पूर्ण दुर्लक्ष करून नुकत्याच जन्मलेल्या त्या सुकुमार कन्येचे पाय आपल्या राक्षसी पंजात निर्दयपणे पकडले. देवकीने छातीशी धरलेल्या त्या सुकुमार कन्येला खस्स्कन् हिसकावून घेतले. गोफण फिरवावी तशी फिरवून तिला दगडावर आपटणार इतक्यात योगमाया सुळकन त्याच्या हातातून निसटली! आणि क्षणातच आकाशाकडे झेपावली.

कंस तिच्या पाठोपाठ धांवला. आकाशात सुरक्षित अंतरावर गेल्यावर योगमायेने अष्टभुजा नवचंडी दुर्गारूप धारण केले. तिच्या प्रखर तेजामुळे कंसाचे डोळे दिपले. अष्टभुजा दुर्गेने आपल्या हातात ढाल, तलवार, धनुष्य-बाण, त्रिशूळ, शंख इत्यादी दिव्य आयुधे धारण केलेली होती. त्यावेळी कंस तिच्याकडे भेदरलेल्या नजरेने पाहात असतानाच ती कडाडली. "अरे मूर्खा, महामलीना दुष्ट कंसा, नीट कान उघडे ठेवून ऐक, तुझा जन्मजात शत्रू अगदी सुखरूप आहे. तो अन्यत्र वाढत आहे. तुझा वध करण्यासाठीच तो जन्माला आलेला आहे. तूं इतर बालकांची व्यर्थ हिंसा करू नकोस. असे सांगून भगवती दुर्गा वाराणसीला निघून गेली.

कंस विस्मयचकित झाला. त्याच्यावरचा योगमायेचा पगडा गेला. तो एकाकी देवकीचा भाऊ म्हणून शोकमग्न वसुदेव-देवकीस म्हणू लागला, " हे देवकी, हे वसुदेवा मी हकनाक तुमच्या पुत्रांना मारून

नरभक्षक झालो आहे. माणसे खोटं बोलतात हे मला ज्ञात आहे. पण आकाशवाणीच्या माध्यमातून विधाताही खोटे बोलला आहे. त्यातून मी हा असा मूर्खासारखी तुमची निरपराध मुले मारीत सुटलो. पण आता त्यांना मारल्यावर वाईट वाटून काय उपयोग म्हणा! भौतिकातली सुख-दु:खे अटळ म्हणायची आणि सोसायची. ती तुम्ही सोसलीत! आपण दोघेही महान आहात! मला आपण क्षमा करा! आपण आतां मुक्त आहात!

वसुदेवांनी यथोचित शब्दात कंसाला क्षमा केली.

त्या दोघाना वंदन करून कंस आपल्या महालात परत आला.

त्याच दिवसाच्या रात्री कंसाने आपल्या मंत्र्यांची सभा घेतली. त्या सभेत त्याने नवचंडी दुर्गेची वार्ता जशीच्या तशी सांगितली. तेंव्हा स्वत:ला फार शहाण्या समजणाऱ्या असुरांनी कंसाला स्वामी हिताचे फुकटचे सल्ले देण्यास सुरुवात केली. ते म्हणाले, " हे भोजराजा! तसेच जर असेल तर आपल्या पंचक्रोशीतल्या सगळयाच नवजात बालकांना ठार मारणे हा एक उत्तम उपाय आहे. दुसरा पण एक महत्वाचा उपाय करणे गरजेचे आहे तो म्हणजे सद्धर्माचरण ही भगवान श्रीविष्णूंची शक्ती आहे. त्यामुळे ते नष्ट करण्यासाठी सर्व विष्णुभक्ताना ठार करणे उत्तम होईल. इत्यादी असंख्य अधर्मप्रवृत्ती त्यांनी कंसाच्या मनात भरवून दिल्या. कंसाची मनधरणी करून त्याला अधर्माला प्रवृत्त केले. मग आपली असुरीमाया वापरण्याची परवानगी मागितली. त्या मायेच्या उपयोगाने असुरांना आपले रूप बदलून समाजात वावरता येणे शक्य होणार होते.

कंसाकडून तशी परवानगी मिळवून ते निघून गेले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

## पुष्प १३४ वे (अध्याय ५ पूर्ण)

## नंद-वसुदेव भेट

मथुरेत कंसाचे अत्याचार सुरु होते. गोकुळात नंदाघरी धामधुमीत पुत्र जन्म सोहळा साजरा होत होता. गोकुळात सर्वच आनंद साजरा करीत होते. नंदाघरी शांतीपाठ चालले होते. नंदाने ब्राम्हणांना असंख्य गाईंचे सालंकृत दान केले. मंजुळ वाद्यांच्या गजरात स्वर्गीय वातावरण निर्माण झाले होते.

गोकुळातल्या गोपी नटून थटून भरजरी वस्त्रे परिधान करून नंदाच्या वाड्यात आलेल्या होत्या. कृष्णाला पाहून त्या उत्स्फूर्त प्रार्थना म्हणू लागल्या. कृष्ण दर्शनाने त्या अक्षरश: देहभान हरपून म्हणू लागल्या, " मोठा हो बाबा लवकर. आत्ताच आम्हाला वेडे केले आहेस. तूं आता या गोकुळचा राजा होणार आहेस बरे कां! मग आम्हा साऱ्यांना खूप सारी सुखे देणार आहेस." इत्यादी बोलून आपल्या भावना व्यक्त करीत होत्या. पाळण्यातला गोपालकृष्ण या त्यांच्या बोलण्यावर आपल्या मोहक हालचालींनी पायाचा अंगठा मुखात घालीत होता. ते पाहून तर गोपी अधिकच वेडावल्या जात होत्या.

बाहेर आनंद मनवत असलेल्या गोपांची अवस्था काही फारशी वेगळी नव्हती. ते परस्परांना दुध, दही, लोणी असे जे काही मिळेल ते भरवून आनंद मनवीत होते.

नंद महाराजांची तर चांगलीच धांदल उडाली होती. गावातल्या प्रत्येकाला काही ना काही तरी भेट देत होते व आपला आनंद वाटीत होते. वसुदेवाची पत्नी रोहिणी भरजरी वस्त्रे परिधान करून दागदागीन्यांनी नटून-थटून बलरामाला कडेवर घेऊन नंद महाराजांना मदत करीत होती. नंदगृही साक्षात् भगवंत अवतरले असल्यामुळे लक्ष्मी तिथेच निवास करून हवे ते पुरवण्याची खबरदारी घेत होती. नंद महाराज एक कुशल प्रशासक होते. गोकुळाच्या रक्षणाची व सहजीवनाची व्यवस्था ते अतीव कौशल्याने पार पाडीत होते.

अशा प्रकारे गोकुळ आनंदात असताना नंदांना मथुरेला जाऊन वार्षिक कर भरण्याची आठवण झाली. निवडक गोपांना बरोबर घेऊन कंसाकडे वार्षिक कर भरण्यास निघाले. नंदमहाराज वार्षिक कर भरण्यासाठी कंसाकडे आल्याची वार्ता वसुदेवांना समजली. वसुदेव नंदाला भेटण्यास आतुर झाले. नंद-

वसुदेव यांचे प्रेम अगदी निष्कपट होते. नंद जरी वसुदेवांचा सावत्र भाऊ होता तरी प्रेम सख्ख्या भावापेक्षा अधिक होते. कंसाकडे करभरणा करून नंद परत निघाल्याचे समजताच वसुदेव तांतडीने नंदमहाराजांच्या मुक्कामी त्यांना भेटण्यास आले. दोघांची उरभेट झाली.

भेटीचा पहिला आवेग ओसरल्यावर वसुदेवांनी नंदाचे मन:पूर्वक अभिनंदन केले. म्हणाले, नंदा तूं खरोखर भाग्यवान आहेस. तुला पुत्र झाल्याचे समजून खूप आनंद झाला. बाळ कसे आहे? बलराम कसा आहे? कसा दिसतो? तुझा पुत्र कसा दिसतो? कुणासारखा दिसतो? यशोदेला व तुला बलराम आई-बापच समजत असेल, होय कीं नाही? इत्यादी अनेक प्रश्न वसुदेव भरभर विचारीत होते. पण नंदाचा कण्ठ दाटून आला होता. भाव विवश होऊन नंद महाराज म्हणाले, " वसुदेवा! तुझे सर्व पुत्र कंसाने मारले. शेवटची कन्या पण मारली. मला याचे फार फार वाईट वाटते. पण वाईट वाटण्या पलीकडे काहीच करता येत नाही. आज महद्भाग्याने तुझी भेट तरी झाली आहे. ह्या कंसाच्या राजवटीत ते सुध्दा अशक्य असते."

वसुदेव मनातल्या मनात भगवंताच्या अतर्क्य लीलेचे स्मरण करीत होते! आपण आपला पुत्र नंदाकडे ठेवून आलो व त्याची कन्या इकडे आणली पण कोणालाही त्या गोष्टीचा थांग पत्ता लागलेला नाही. चला ते एक छानच झाले आहे. त्यामुळे वसुदेवांचा नंद भेटीचा उद्देश सफल झाला.

वसुदेव हळूच नंदाला म्हणाले, "नंदा, तूं आता मथुरेत जास्त काल थांबू नकोस! कारण उपद्रवी कंस काय उत्पात घडवून आणील याचा काहीच अंदाज बांधता येत नाही. तुझ्या पुत्राला नीट सांभाळ. मला या कंसाचे लक्षण काही ठीक दिसत नाही. नंदही लगेच आपल्या गोपांसह बैलगाड्या सज्ज करून गोकुळाच्या दिशेने मार्गस्थ झाला.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

## पुष्प १३५ वे (अध्याय ६ पूर्ण व ७ चालू)

## पूतना व शकटासुर वध

नंद गोकुळात परत येताना वसुदेवाने सांगितलेल्या गोष्टीचा विचार करू लागला. त्याला आपल्या गोजिरवाण्या कृष्णाची आठवण झाली. त्याने हात जोडून कळवळून भगवंताची प्रार्थना केली कीं, हे भगवंता तुझ्याशिवाय आमच्या गोकुळाचे व माझ्या तान्हुल्याचे रक्षण कोण करणार? तुझी कृपादृष्टी आमच्यावर ठेव हीच मन:पूर्वक प्रार्थना! नंद मनातल्या मनात अशी प्रार्थना करीत असतानाच रक्षक गोपांनी बातमी आणली कीं आजूबाजूच्या परिसरात पूतना राक्षसीने धुमाकूळ घातला आहे. नंदाला वसुदेवांच्या सांगण्याचा प्रत्यय आला. नंदाचा पुढचा सारा प्रवास अत्यंत व्यथित अंत:करणाने झाला.

पूतना राक्षसीने गोकुळात प्रवेश करताना अत्यंत भरजरी वस्त्रे परिधान केलेल्या सुंदर व शालीन स्त्रीचे रूप धारण केले. त्यामुळे विनासायास तिला नंदाच्या घरात प्रवेश मिळाला. एखाद्या नेहमीचा वावर असलेल्या स्त्री प्रमाणे ती कृष्णाच्या खोलीत आली. यशोदा व रोहिणी तिच्या पाठोपाठ कृष्णाच्या खोलीत आल्याच. पण पूतनेच्या विनयशील व शालीन रुपाला त्या सुध्दा भाळल्या. पूतनेने मोठ्या प्रेमाने कृष्णाला आपल्या मांडीवर घेतले. त्यामुळे मातृवत व्यवहार करणाऱ्या पूतनेला त्यांनी मज्जाव केला नाही. तिने कृष्णाला स्तनपान द्यायला सुरुवात केली. सर्व जगताच्या स्वामीने ते स्वीकारले. पूतना आनंदली! कारण तिने स्तनांना भयानक विष लावलेले होते.

पण तिचा आनंद क्षणातच नाहीसा झाला. कारण कृष्णाने जोरजोरात स्तनपान करण्यास सुरुवात केली. स्तनातले दूध संपले आणि कृष्णाचे स्तनपान तर जोरजोरात चालूच राहिले. तिचा जीव लागला कासावीस व्हायला! ती घाबरली. घाबऱ्या-घुबऱ्या आवाजात 'कृष्णा आतां पुरे, आतां पुरे' म्हणू लागली. कृष्णाला स्तनापासून दूर करू लागली पण कृष्णाला दूर करणे तिला शक्य होईना! होणाऱ्या वेदनांमुळे ती किंचाळू लागली. तिला घाम फुटला आणि जमिनीवरून ओघळू लागला. भगवान श्रीकृष्णांनी तिचे प्राण खेचून घेतले. त्यावेळी तिचा मायावी देह सुटला. आपल्या मूळ स्वरुपात ती जमिनीवर उताणी पडली. तिचे स्वरूप भयानक होते. देह प्रचंड मोठा होता. पाय अंगणात गेले होते. छाती जवळजवळ आढ्याला भिडायची शिल्लक होती.

बाल श्रीकृष्ण आपण त्या गावचेच नाही अशा थाटात निरागस चेहऱ्याने तिच्या छातीवर मजेत खेळत होते. त्या पूतनेच्या धडपडीच्या आवाजाने जवळपासचे आणि मग जवळ जवळ सगळे गोकुळ नंदाच्या वाड्याकडे धावत आले. गोपांनी महत्प्रयासानी कृष्णाला प्रथम उचलून यशोदे जवळ दिले. यशोदेला असमान ठेंगणे झाले. तिने कृष्णाला हृदयाशी कवटाळले. रोहीणीने मीठ मोहऱ्यांनी कृष्णाची दृष्ट काढली. काहींनी घरभर गोमूत्र शिंपडले. काही जण जमतील ती स्तोत्रे म्हणून ईश्वराची प्रार्थना करू लागले.

तेवढ्यातच नंद व इतर गोप येऊन पोहोचले. वाड्यातला अघटीत प्रकार पाहून नंद भांबावले. पण लगेच स्वत:ला सावरून खणखणीत आवाजात सगळया गोपांना उद्देशून नंद म्हणाले, " माझ्या परमप्रिय मित्रांनो! आनकदुंदुभी अर्थात वसुदेव फार श्रेष्ठ पदाला गेलेला योगी आहे. त्याने मला मथुरेतच या उत्पाताची कल्पना देऊन लवकर जाण्याचा सल्ला दिला होता. त्याचे भाकीत तंतोतंत खरे ठरले आहे."

त्यानंतर सगळया गोपांनी मिळून पूतनेच्या शरीराचे तुकडे करून ते बाहेर काढले. गोकुळाच्या बाहेर नेऊन त्याला अग्नी दिला. त्यावेळी एक चमत्कार झाला कीं त्या धुराने सगळया गोकुळात सुगंध पसरला. हे ऐकून राजा परीक्षित आश्चर्य चकित झाला. ते पाहून शुक मुनी म्हणाले " राजन्! यात आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. भगवान श्रीकृष्णांनी जिचे स्तनपान केले ती कंसाने मोकळीक दिल्यामुळे अनेक बालकांना भक्षण करून आलेली होती म्हणून तिला मारायचे होतेच. पण कृष्णाला मारण्यासाठी ती खोटेपणाने कां होईना मातेचे रूप घेऊन आल्यामुळे मातृत्व भावनेचा लोप न होऊ देता भगवंताने तिला दिव्य लोकी स्थान दिले. हीच तर भगवंताची लीला मोठी अगाध आहे. आणि अशा लीला नि:शंक मनाने श्रवण करण्याने सुध्दां भगवंताची कृपा होत असते."

बाळकृष्णाच्या लीला ऐकण्यात तल्लीन झालेल्या परीक्षित राजाला शुक मुनी पुढे सांगू लागले. राजन्! काही दिवसांनी कृष्ण पालथा पडू लागला. तेंव्हा झालेला आनंद यशोदेने साजरा करायचे ठरवले. वेदमंत्र पठणासाठी तिने ब्राम्हणांना आमंत्रण दिले. सगळया गोपींना उत्सव साजरा करण्यास बोलावले. अंगणात सजावट केली. अंगणातल्या शकटात सगळे समान लावून ठेवले. कृष्णाला झोपवण्यासाठी शकटा खालीच पाळणा बांधला. मंजुळ वाजंत्री सुरु झाली. सगळी मंडळी जमली. गोपी मधुर गीते गाऊ लागल्या. यशोदा कृष्णाला घेऊन आली. चंद्र रोहिणी नक्षत्रात आला. वैदिक मंत्रांच्या गजरात यशोदेने कृष्णाला मंत्रयुक्त पवित्र जलाने स्नान घातले. काजळ तीट करून शकटा खाली बांधलेल्या पाळण्यात झोपवले. यशोदा पाहुण्यांच्या सरबरीत गुंतली होती. गोप बालके शकटा जवळच खेळत होती. आपल्याकडे आतां कुणाचे लक्ष नाही असे पाहून कृष्णाने छकड्याच्या खालच्या भागावर जोरदार लाथ मारली. त्या प्रहाराने छकडा छिन्न भिन्न झाला. छाकड्यातली भांडी कुंडी धडा धड खाली आली. मोठाच आवाज झाला. जवळच खेळणारी बालके घाबरून छाकड्याकडे पाहू लागली. नंद-यशोदा घाबरून गोप-गोपींसह तिथे आली. पाळण्या वरच्या फळया बाजूला केल्या. शांत पडलेल्या व सुखरूप कृष्णाला पाहून त्यांचा जीव भांड्यात पडला. यशोदेने पटकन कृष्णाला उचलून हृदयाशी कवटाळले. नंदाने ब्राम्हणांना शांतीपाठ करण्यास विनवले. नंदाने अंदाज केला कीं हे नक्कीच कुणा तरी गुप्त असुराचे काम आहे. पण एका श्रीकृष्णालाच ते ज्ञात होते कीं कंसाने पाठवलेला तो शकटासुर होता.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

## पुष्प १३६ वे (अध्याय ७ व ८ पूर्ण)

## तृणावर्ताचा वध व यशोदेस विश्व दर्शन

गोकुळात श्रीकृष्ण सर्व गोप-गोपींचा अति लाडका झाला. गोपी तर वेळ मिळेल तेंव्हा यशोदेकडे येउन बसू लागल्या.

एकदां यशोदा कौतुकाने कृष्णाला आपल्या मांडीवर घेऊन त्याच्याशी खेळत अंगणात बसली होती. कृष्ण तेंव्हा वर्षाचा झालेला होता. थोडावेळ झाला आणि कृष्णाचे वजन वाढू लागले. यशोदेच्या मांडीला ते सहन होईना. म्हणून तिने त्याला खाली काढून ठेवला. इतक्यात तृणावर्त नामक असुराने वायुरूपाने येऊन झपकन कृष्णाला उचलून नेले. जीवाच्या आकांताने यशोदेने किंकाळी फोडली. बाकीच्या गोपी व गोप आवाजाच्या दिशेने धावले. त्यांनी कृष्णाला आकाशात जाताना पाहिले. तृणावर्ताने लगेच सगळीकडे प्रचंड धूळ उडवली त्यामुळे कुणी कुणाला दिसेनासे झाले.

पूतना व शकटासुर यांच्या वधाने धास्तावलेल्या कंसाने तृणावर्ताला पाठवले होते. तृणावर्ताने कृष्णाला आकाशात नेऊन मारण्याची योजना आखली होती. त्याप्रमाणे तो कृष्णाला घेऊन आकाशात आला. कृष्णाने एका हाताने तृणावर्ताच्या गळयाला मिठी मारली व दुसऱ्या हाताने तृणावर्ताचा गळा घोटू लागला. त्याच वेळी भगवान श्रीकृष्ण आपले वजन वाढवू लागले. तृणावर्त तो भार सहन करू शकेना. त्याने श्रीकृष्णाला खाली फेकण्याचा प्रयत्न केला. पण श्रीकृष्णाची पकड इतकी पक्की होती कीं तो श्रीकृष्णाला हलवूच शकला नाही. तृणावर्त गुदमरला. त्याचे डोळे बाहेर आले. शरीर प्राण सोडून गेले. तृणावर्त प्रचंड उंचावरून धाडकन खाली कोसळला. छिन्न-भिन्न झाला.

गोप गोपी तिकडे धांवल्या. तृणावर्ताच्या छातीवर पडलेल्या निरागस चेहऱ्याने त्यांच्याकडे पहात असलेल्या कृष्णाला त्यांनी झपकन उचलून घेतले आणि आक्रोश करणाऱ्या यशोदेकडे आणून दिले. कृष्णाला सुखरूप पाहून प्रथम यशोदेने हात जोडून मनोमन नारायणाला नमस्कार केला. हसऱ्या कृष्णाला उराशी कवटाळले. आणि उद्गारली, " माझ्या सोन्यावर भगवंताची मोठ्ठी कृपा आहे ग बाई! कुठ्ठे कुठ्ठे खरचटले सुध्दा नाही ग माझ्या लेकराला!" यशोदा असे म्हणताच कृष्ण गोड हसला. तत्क्षणी पदराखाली घेता घेता यशोदा म्हणाली, " कळले वाटते बोलणे स्वारीला! जगन्नियंत्याची कृपा आहे ग लेकरावर ! "

यशोदेस काय माहित कीं तो जगन्नियंताच लडिवाळपणे स्तनपान करीत आहे. गोप, गोपी, नंदमहाराज यांनी या अघटित घटनेचा एकच निष्कर्ष काढला कीं तृणावर्त खाली पडून मेला. आणि परमेश्वर कृपेने कृष्ण सुखरूप राहिला. नंदाने परत सर्वांना सांगितले वसुदेव एक महात्मा आहे.

हे ऐकून कृष्णाने स्तनपान थांबवून यशोदेकडे पहिले. यशोदा कौतुकाने कृष्णाकडे पाहू लागली. कृष्णाने जांभई दिली. यशोदा आश्चर्याने थक्क झाली! तिला कृष्णाच्या मुखात चक्क विश्व सामावल्याचे दृश्य दिसू लागले. अत्यानंदाने तिने कृष्णाच्या मुखाचे चुंबन घेतले. ब्रम्हानंदाच्या आनंदात त्याला आपल्या हृदयाशी कवटाळले. आणि त्याच क्षणी पुत्रप्रेमाने व्याप्त होऊन कृष्णाशी लडिवाळपणे खेळू लागली.

शुकमुनी पुढे सांगू लागले, " राजन्! वसुदेव देहाने जरी मथुरेत होते तरी त्यांचे लक्ष सदैव कृष्ण व बलराम यांच्याकडे लागलेले असे. त्यांनीच यदुकुल पुरोहित गर्ग यांना गोकुळात नंदाकडे पाठवले. गर्गमुनी आपल्याकडे आल्याचे पाहून नंदाने त्यांचे खूप छान स्वागत केले. रोहिणीला झालेला वसुदेवपुत्र व आपला पुत्र यांचा नामकरण विधी करण्याची विनंती केली. त्याप्रमाणे गर्गमुनींनी कोणालाही शंका येऊन कंसाला कळू नये म्हणून अत्यंत गुप्त रीतीने नामकरण विधी पार पडला. रोहिणीच्या पुत्राचे नाव बलराम व संकर्षण असे ठेवले. व नंदाच्या पुत्राचे नाव कृष्ण व वासुदेव असे ठेवून म्हणाले नंदा हे दोघे गोकुळात आनंद निर्माण करतील. खूप पराक्रम गाजवतील. इत्यादी सांगून गर्गमुनी निघून गेले.

बलराम व कृष्ण थोडे मोठे झाले. गोकुळात बालमित्रांबरोबर खेळू लागले. दोघांनी गोकुळाला जणू वेडच लावले. गोपी यशोदेकडे दोघांच्या खोड्या सांगून लाडिक तक्रार करू लागल्या.

एकदा कृष्णाने माती खाल्ली म्हणून बलरामासह सगळया गोपालांनी यशोदेकडे तक्रार केली. यशोदेने कृष्णाला पकडून विचारले, " कृष्णा माती खाल्लीस?" घाबरलेल्या कृष्णाच्या डोळयात पाणी आले. आपल्या बोबड्या बोलात तो म्हणाला " मी खलच माती नाई खाल्ली! तूंच बघ!" असे म्हणून घाबरलेल्या चेहऱ्याने कृष्णाने मोठा "आSS" केला. आणि यशोदेला पुन्हा संपूर्ण विश्वाचे दर्शन त्या मुखात झाले! त्या दर्शनाने ती स्वत:ला विसरून गेली. ब्रम्हभावात जाऊ लागली तेंव्हा कृष्णाने आपल्या वैष्णवीमायेने तिला पुत्रप्रेमाने व्याप्त केले. आपल्या चिमुकल्या हातांनी तिच्या गळयाला मिठी मारली. तिचा मातृभाव जागा झाला. त्याने माती खाल्ल्याचे यशोदा विसरून गेली आणि प्रेमाने त्याला पदराखाली घेऊन स्तनपान देऊ लागली.

परीक्षित राजाने विचारले, " प्रभो! कोणत्या पुण्याईने नंद यशोदेला हे भाग्य लाभले कीं वसुदेव देवकीचा पुत्र होऊन बालक्रीडांचे सौख्य मात्र नंद यशोदेला मिळाले?" शुकमुनी म्हणाले, " कृष्ण जन्मापूर्वी श्रेष्ठ वसू द्रोण यांनी आपल्याला सपत्निक कृष्णाच्या बाललीला अनुभवण्यासाठी पृथ्वीवर जन्म मिळावा. अशी ब्रम्हदेवांना प्रार्थना केली. त्याप्रमाणे ब्रम्हदेवांनी त्यांना तसा वर दिला. वसू द्रोण हा नंद म्हणून जन्मास आला व त्याची पत्नी धरा यशोदा म्हणून जन्मास आली. ब्रम्हदेवांनी दिलेला वर खरा करण्यासाठी भगवंताने हि युक्ती केली व नंदाच्या इच्छे प्रमाणे वृंदावनात भक्तिमार्गाचा विकास करण्या साठी अनेक अद्भुत लीला केल्या

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

## ।।श्रीगुरु:शरणं।।

## श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

## पुष्प १३७ वे (अध्याय ९ व १० पूर्ण)

## उखळबंधन व यमलार्जुन उध्दार

श्रद्धा भक्ती पूर्वक ऐकणाऱ्या परीक्षित राजाला शुकमुनी पुढे सांगू लागले, " राजन्! एकदा घरातल्या सगळया दासी विविध कामात गर्क होत्या म्हणून यशोदा स्वत:च डेऱ्यातले ताक घुसळत होती. ताक घुसळताना कृष्ण लीलांचे स्मरण होऊन ती त्याच नादात गीत गुणगुणत होती. जवळच खेळत असलेल्या कृष्णावर लक्ष ठेवीत होती. तसेच चुलीवर ठेवलेल्या दुधावरही तिचे लक्ष होते. कारण दूध तापतच आले होते. त्याचवेळी कृष्णाने यशोदेच्या पायाला मिठी मारली व स्तनपानाची इच्छा व्यक्त केली. यशोदेने कौतुकाने कृष्णाला मांडीवर घेऊन पदराखाली घेतले. कृष्ण आनंदाने स्तनपान करू लागला. तेवढ्यात यशोदेला दूध वर येताना दिसले. तिने घाई-घाईने कृष्णाला बाजूला केले. पटकन उठली आणि चुलीवरून दूध उतरवण्यास गेली. कृष्णाचा चांगलाच विरस झाला. कृष्ण संतापला व खेळताना हातात आणलेला दगड उचलला आणि डेऱ्यावर मारला. डेरा फुटला. खाली सांडलेले लोणी आपल्या बाळमुठीत मावेल तेवढे भरभर पडलेल्या खापरात भरून घेऊन सरळ अंगणात गेला.

यशोदा परत येऊन पहाते तो डेरा फुटलेला आणि कृष्ण जागेवर नाही! ही कृष्णाचीच कर्तबगारी हे जाणून यशोदा कृष्णाला शोधू लागली. ताक-लोणी दोन्ही वाया गेल्याच्या रागात तिने कृष्णाला धाक लावण्याच्या निश्चयाने हातात एक छडी घेतली. कृष्ण अंगणात ठेवलेल्या पालथ्या उखळावर उभा राहून बाहेर जमलेल्या माकडांना लोणी भरवित होता. यशोदा येताच कृष्णाला चाहूल लागली व त्याने तोंड वळवले. छडी घेऊन येणाऱ्या यशोदेला पाहिले! भयभीत होऊन उखळावरून उडी मारून पळून जाऊ लागला.

इथे थोडे थांबून शुकमुनी म्हणाले, राजन्! मोठ मोठ्या योग्यांच्या ध्यानात न येणारा हा परमात्मा यशोदेच्या पुढें भयभीत होऊन पळत होता. यशोदेला त्याच्या मागे धांवणे अवघड होत होते. पण शेवटी तिने कसे बसे कृष्णाला पकडलेच. कृष्णाचा चेहरा घाबराघुबरा झालेला. डोळयातले पाणी गालावरून ओघळलेले. केस विस्कटलेले. यशोदेने त्याचा लोण्याने बरबटलेला हात पकडलेला. त्रिभुवनाचा स्वामी लोण्याने बरबटलेल्या दुसऱ्या हाताच्या पालथ्या मुठीने डोळे पुसण्याचा प्रयत्न करतोय.

नंद यशोदेला व कृष्णाला भेटायला आलेल्या कुंतीला ते सगळे नवलाईचे वाटतेय. ती मुग्ध होऊन पहातच राहिली. यशोदा कृष्णाची सुटण्याची धडपड पाहून रागावून म्हणाली या छडीनेच बडवते आता तुला. पण नंतर तिने विचार बदलला. नको ग बाई लेकराला मारायला त्या पेक्षा उखळाला बांधून ठेवते. असे म्हणून तिथल्याच दाव्याने त्याला बांधू लागली. पण दावे अपुरे पडल्याने दुसरे दावे आणले. तरीही अपुरे पडले म्हणून तिसरे दावे आणले. अशी बरीच दावी झाली. यशोदा घामाघूम झाली. पण गांठ काही मारता येईना! कुंती आणि इतर दासी ही गम्मत पहात उभ्या राहिल्या. पण यशोदा थकलेली पाहून कृष्णालाच दया आली आणि त्या दाव्याची गाठ यशोदेला मारता आली. पालथ्या मुठीने डोळे पुसत रडणाऱ्या कृष्णाला म्हणाली बस आतां रडत. सारख्या खोड्या करतोस नां! दासी व कुंतीसह यशोदा तिथून निघून गेली.

कृष्णाच्या उखळा समोर बाहेर अगदी जवळ जवळ दोन वृक्ष होते. ते वृक्ष म्हणजे नारदांच्या शापामुळे वृक्ष झालेले कुबेर पुत्र यमलार्जुन होते. यमलार्जुन वृक्ष पूर्वीचे कुबेरपुत्र नलकुबर व मणिग्रीव होते. त्यांना भगवान शिवांनी आपले पार्षद म्हणून नेमले. त्यामुळे त्यांना कैलास पर्वतावरील मंदाकिनी नदीतीरी असलेल्या खास उद्यानांतल्या विहारासाठी परवानगी मिळाली. पण तारतम्य न वापरता ते मद्याच्या नशेत सुंदर स्त्रियांसह विवस्त्रावस्थेत तिथे क्रीडा करू लागले. त्यावेळी नारदांची स्वारी तिथून जात होती. नारदांना पाहून त्या स्त्रियांनी पटापट वस्त्रे धारण केली व माना खाली घालून हात जोडून त्या उभ्या राहिल्या पण नलकुबर व मणिग्रीव मात्र तर्र डोळयांनी आदर व्यक्त न करता नारदांकडे नाराजीने पाहू लागले. तेंव्हा त्यांचा उन्मत्तपणा वाढून ते अध:पतित होऊ नयेत म्हणून नारदांनी त्यांना वृक्ष योनीत जाण्याचा शाप दिला. नारद म्हणाले " देवांची शंभर वर्षे वृक्ष योनीत एका जागी उभेराहून पश्चात्ताप रूपाने केलेल्या हरीस्मरणाने तुम्ही शुद्ध व्हाल व मग भगवान श्रीकृष्ण कृपेने तुम्ही परत इथे याल!" तेच हे यमलार्जुन वृक्ष असल्याचे व त्यांची शतवर्षे पूर्ण झाल्याचे कृष्णाने जाणले.

कृष्णाने यमलार्जुनांना वृक्ष योनीतून मुक्त करण्याचे ठरवले. आपल्या परमभक्त नारदांचे वचन सत्य करण्यासाठी कृष्ण हळूहळू उखळासह बाहेर निघाले. उखळ दोन झाडांच्या बुंध्यात अडकले. बाहेर खेळणाऱ्या गोपाळांनी ते पाहिले. ते चकित होऊन पहात राहिले. कृष्णाने अडकलेल्या उखळाने ते दोन्ही वृक्ष ओढून खाली पाडले. "कर्रर्र S कडाडकडाड कर्र्र काड" असा मोठ्ठा आवाज झाला. दोन्ही वृक्ष पडले व त्यातून नलकुबर व मणिग्रीव बाहेर आले. त्यांनी कृष्णाला नमस्कार केला. कृष्ण त्यांना म्हणाले "तुम्ही नारदांनी सांगितल्या प्रमाणे केलेल्या तपामुळे आतां कधीच पद भ्रष्ट होणार नाही. व ऐश्वर्याचा मद तुम्हाला कधीच चढणार नाही." नलकुबर व मणिग्रीव नमस्कार करून आपल्या स्थानी निघून गेले. आणि वृक्ष पडल्याच्या आवाजाने घाबरून नंद- यशोदा वगैरे व आजूबाजूचे गोप गोपी धावत तिथे आले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

## ।।श्रीगुरु:शरणं।।

## श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

## पुष्प १३८ वे (अध्याय ११ पूर्ण)

## कृष्ण लीला

वृक्ष कडाडून पडल्याच्या आवाजाने कार्यमग्न नंद महाराज, यशोदा, रोहिणी, दास, दासी, गोप, गोपी सर्वजण धावत आले. पहातात तो इतक्या वर्षांचे जुने वृक्ष उन्मळून पडलेले. बाजूला कृष्ण उखळाला बांधलेल्या अवस्थेत निरागस चेहऱ्याने पालथ्या मुठीने डोळे चोळतोय!

नंद महाराज आश्चर्याने म्हणाले, " बापरे! माझ्या बालपणापासून पहात आलो आहे ते हे मजबूत वृक्ष आज पडलेच कसे? एकाकी झाले तरी काय?" यशोदेने प्रथम दावे सोडून कृष्णाला कडेवर घेतले. त्याच्या पोटावर दाव्याचे वळ पाहून ती कळवळली. तिच्या डोळयात टचकन पाणी आले. इतक्यात नंद महाराजांच्या प्रश्नाला उत्तर देण्यासाठी गोपाळ (गोप-बालके) पुढे सरसावली. आणि उखळाला बांधलेल्या अवस्थेत तिथे येऊन कृष्णाने ती दोन्ही झाडे उखळाला अडकली असताना ओढून कशी पाडली आहेत याचे अगदी रसभरीत वर्णन केले! आतां या गोष्टीवर नंदाचा कसा विश्वास बसावा? त्यांनी जरी कृष्णाला उखळाला बांधलेले प्रत्यक्ष पहिले होते तरी आतां तो अगदी निरागस चेहऱ्याने यशोदेच्या कडेवर तिच्या गळयाला मिठी मारून बसलेला ते पहात होते. त्यामुळे उखळबंधन वगैरे विसरून ते कृष्णाकडे आपला पुत्र म्हणूनच पहात होते. आणि इतका छोटुकला हे कसे करील? या स्नेह व प्रेमभावनेने त्यांनी कृष्णाला आपल्या कडेवर घेण्यासाठी हात पुढे केले. कृष्ण झपकन त्यांच्या कडे झेपावला व नंदाच्या कडेवर विराजमान झाला. अशा प्रकारे सगळयांच्या डोळया देखत अघटित कृत्ये करूनही आपले बाळपण मोडू न देण्याच्या लीलेमुळे कृष्ण त्यांना सगळयांना बाळच वाटत राहिला. इतकेच नाही तर गोपी त्याच्याशी खेळताना त्याला खाऊचे आमिष दाखवून नाच करून दाखवायला सांगत.

कधी नंद त्याला आपल्या पादुका आणून द्यायला सांगत. तेंव्हा तर कृष्ण त्यांच्या पादुका आपल्या डोक्यावर घेऊन येई आणि त्यांच्या पायांत घालून देई! त्रिभुवनाचा स्वामी आपल्या भक्तांसाठी गोकुळात अशाप्रकारे लीला करीत होता. इतकेच काय पण ईश्वराबद्दल आस्था असलेल्या सत्प्रवृत्तानाही कृष्ण आनंदित करीत असे.

अशीच एक फळ विकणारी बाई गोकुळात नंदाघरी आली. कृष्णाने घरातून आपल्या छोट्या हातांच्या पशात मावतील तेवढे गहू आणून तिला दिले. कृष्णाचे ते वर्तन पाहून तिने कृष्णाच्या हातात मावणार नाहीत इतकी भरघोस फळे त्याला दिली. तिचे ते औदार्य पाहून कृष्णाने तिच्या टोपलीतल्या सगळया फळांवर आपली कृपादृष्टी फिरवून सर्व फळांची अमोल रत्ने केली.

यमलार्जुन वृक्ष पडल्यामुळे नंद व गावकरी यांचे बोलणे होऊन ज्येष्ठ नागरिकांनी उपनंदाच्या मार्फत स्थलांतराचा प्रस्ताव नंद महाराजांच्या पुढे मांडला. मग नंदमहाराजांच्या संमतीने वृंदावनात वस्ती करण्याचे ठरले. त्याप्रमाणे सगळयांनी नंद व उपनंद यांच्या मार्गदर्शनाखाली अगदी शिस्तीत वृंदावनात स्थलांतर केले. वृन्दावनाच्या रम्य परिसरात गोवर्धन पर्वताच्या पायथ्याशी सर्वांचे वास्तव्य सुरु झाले. कृष्ण बलराम आतां थोडे मोठे झाले होते. त्यांना इतर गोप बालकां बरोबर वासरे चारायला नेण्याची मुभा मिळाली होती. घराच्या जवळपास यमुना तीरापर्यंत भरपूर चारा होता.

एकदा बलराम-कृष्ण सगळया गोपालांसह यमुनातीरी वासरे चारायला घेऊन गेली. कृष्णाच्या मागावर असलेल्या कंसाच्या एका असुराने गोवत्सरूप धारण केले. वासरांच्या कळपात घुसलेल्या त्या असुराला कृष्णाने क्षणातच हेरले व बलरामांना संकेत केला. बलराम सावध होताच कृष्णाने त्या असुराचे मागचे दोन्ही पाय पकडले व त्याला इतक्या जोरात गरगर फिरवला कीं त्यातच त्याचे प्राण निघून गेले. कृष्णानी त्याला तसाच सोडून दिला. तो धडकन समोरच्या झाडांवर आपटला. इतर वासरे व गोपाळ पुढे निघून गेले होते. बलराम व कृष्ण हळूच त्यांच्यात जाऊन मिसळले. इतक्या सहजतेने ते गोपबालकांबरोबर आपले जीवन व्यतीत करीत होते.

असेच एकदां वासरांना पाणी पाजण्यासाठी यमुनेवर आले. इतक्यात एक असुर बकाच्या (बगळयाच्या) रूपाने आला. त्या प्रचंड मोठ्या पर्वतासारख्या बकाला पाहून सारेच घाबरले. त्या बकाने कृष्णाला आपल्या चोचीत पकडून गिळूनही टाकले. गोपबालकात हाहाकार उडाला. इकडे कृष्णाने बकासुराच्या गळयात येताच योगाग्निने आपले शरीर इतके तापवले कीं बकासुराने कृष्णाला परत बाहेर टाकले.

कृष्णाला जसाचा तसा पाहून संतापाने बकासुराने चंचू प्रहार करण्यासाठी चंचू उघडली. कृष्णाने बकासुराला कल्पना येण्याच्या आत चोचीचा वरचा व खालचा भाग पकडून चिपाडा सारखा त्याला फाडून टाकला. सगळे गोपाळ आश्चर्याने थक्क झाले. पण क्षणातच धावत जाऊन त्यांनी कृष्णाला मिठी मारली. उंच केले. आनंदाने टाळया पिटल्या. वासरे सुध्दा आनंदाने शेपट्या वर करून उड्या मारू लागली. वृंदावनात घरोघर कृष्णाचा हा पराक्रम सांगितला गेला. त्यावेळी गोपालांशी बोलताना नंदमहाराज इतकेच म्हणाले परमेश्वर कृपेने माझ्या पुत्राचे असे कितीतरी मृत्यू प्रसंग टाळले आहेत. पण वरकरणी असे बोलताना त्यांना गर्ग मुनींनी सांगितलेले बलराम कृष्णांचे भविष्य आठवत असे. पण ते तेवढ्या पुरतेच! लगेच ते कृष्णाच्या बालक्रीडा आठवून त्यांत रममाण होत.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

## पुष्प १३९ वे (अध्याय १२ पूर्ण व १३ चालू)

## अघासुराचा वध

वृंदावनात आनंदाने काळ चालला होता.

एक दिवस कृष्णाने सर्व गोप बालकांना वनभोजनाची कल्पना सुचवली. सगळयांनी ती कल्पना उचलून धरली. आपापल्या घरून सगळे भोजनाची तयारी करून घेऊन आले. विविध खेळ घेतले. मग वासरे व न्याहारीच्या टोपल्या घेऊन सगळे निघाले. वृंदावनाच्या जवळच्या उपवनात जायचे ठरले. सगळे अगदी नटून थटून निघाले होते.

इकडे कंसाचा कृष्ण-बलराम यांना मारण्याचा प्रयत्न निष्फळ होत असल्याने त्याच कामगिरीवर नेमलेल्या अघासुराने नवीन युक्ती करायची ठरवली. तो कृष्णाच्या मागावरच होता. त्या दिवशी बलरामही त्यांच्या बरोबर नव्हता. ती संधी साधून कृष्णासह सगळयांना मारण्याच्या विचाराने आघासुराने प्रचंड मोठे पर्वतप्राय अजगराचे रूप धारण केले. पूतना आघासुराची बहिण होती व बकासुर त्याचा भाऊ होता. त्याचा आघासुराला सूड तर उगवायचाच होता. सगळयांनाच मारले तर आपण कंसाच्या प्रशंसेला पत्र होऊ! या भ्रमात तो वागत होता. त्याच भ्रमात त्याने आपला जबडा पसरून आपली गुलाबी थुलथुलीत जीभ रस्त्यासारखी उपवनाच्या मार्गावर पसरून सगळे गोपाल व कृष्ण आपल्या जबड्यात घेण्याची वाट पाहू लागला. जणू वनविहारासाठी केलेली ती एक सोयच असावी असा भास निर्माण केला. अघासुराची ही युक्ती अगदी शंभर टक्के यशस्वी झाली. गोप बालके त्या ठिकाणी येऊन त्या थुलथुलीत जिभेवर मजेत नाचू लागली. आघासुराचा पसरलेला जबडा म्हणजे त्यांना एक गुहा वाटली व जीभ म्हणजे गुहेत जाण्याचा रस्ता वाटला. ते त्या गुहेत जायला निघाले. त्यांच्यात कृष्ण नसल्यामुळे आघासुर कृष्ण आत येण्याची वाट पहात निश्चल होता.

सर्व गोप बालके आघासुराच्या जबड्यात जाताना कृष्णाने पहिले. क्षणभर विचार करून त्यानें सर्वांना आंत जाऊ दिले. आणि कृष्ण एकदम आघासुराच्या जबड्यात शिरला. अघासुर जबडा मिटू लागला. पण क्षणातच कृष्णाने आपला आकार आघासुराच्या जबड्याच्या आकाराचा केला. आघासुराला जबडा मिटणे तर सोडाच पण श्वासही घेत येईना! श्वासोच्छवास न घेता आल्यामुळे त्याला रुप बदलायलाही अवसर मिळाला नाही. तो गुदमरून मेला. त्याच्या बरोबर आंत गेलेली बालकेही मरण पावली. पण कृष्णाने आपले बालरूप धारण करून सर्व गोप बालकांना व त्यांच्या बरोबर आंत गेलेल्या सर्व वासरांना

सजीव केले. सजीव होताच घाण वासामुळे ते मागे फिरले व कृष्णाचे दर्शन होताच निर्भय झाले. सगळे सुखरूप बाहेर आले.

अघासुर मरण पावताच आकाशस्थ देवांना आश्चर्य वाटले व त्यांनी दुन्दुभिंसह अनेक वाद्यांचा प्रचंड गजर केला. त्याचा आवाज ब्रम्हलोकी ब्रम्हदेवांपर्यंत गेला. तेंव्हा ब्रम्हदेव देवलोकी येउन चौकशी करू लागले. आघासुराच्या वधाची वार्ता कळताच ते ही आश्चर्य चकित झाले. ब्रम्हदेव मनात विचार करू लागले कीं आपल्या प्रार्थनेवरून भगवंताने अवतार धारण केला हे खरे पण तो अवतार हाच आहे कां? जिथे ब्रम्हदेवच साशंक झाले तिथे इतरांची काय कथा? आघासुराचे शरीर वर्षभर तसेच राहिले व मग वाळून चिपाड झाले. त्यामुळे आजूबाजूच्या लोकांचे ते एक क्रीडास्थान बनले. पण सगळया वृंदावना सगट सगळया जणांची वर्षभर एकच चर्चा चालू होती कीं हे आहे काय? व अचानक घडले तरी कसे? पुढे वर्षभराने गोप बालकांनी सर्व घटना जणू आजच घडली आहे अशा प्रकारे आपल्या आपल्या घरी सांगितली.

राजा परीक्षितीने आश्चर्याने विचारले कीं, गोप बालकांनी वर्षभराने ही हकीकत कां सांगितली? शुकमुनी त्या रहस्याचा उलगडा करू लागले, म्हणाले, राजन्! आघासुराला मारल्यावर कृष्ण सर्व गोप बालकांना घेऊन त्या जागेपासून बरेच दूर गेले. यमुना किनारी वासरांना चरायला सुरेख गवत असलेल्या मोकळया मैदानात आले. मैदानाच्या कडेला दाट झाडी होती. त्यमुळे वातावरण फार छान होते. वासरे चरायला सोडून दिली. सगळयांना भुका लागल्या होत्या. म्हणून सगळे यमुनेवरून हात पाय धुऊन सह भोजनाला कोंडाळे करून बसले. सगळयांनी कृष्णाला मधोमध बसवले होते. प्रत्येकजण आपला पदार्थ कृष्णाला भरवायचा आणि कृष्ण आपल्या कडचा दहीभात त्यांना भरवायचा. त्यातच सगळयांशी थट्टा मस्करी करीत कृष्ण सर्वांना हसवीत होता. त्यांची ही अपूर्व निर्भेळ मौज व आनंद पाहून आकाशातून पहात असलेले देवही आश्चर्याने थक्क झाले होते. त्यातच ब्रम्हदेवाला शंका आली कीं हेच ते परब्रम्ह आहे कां? कारण परब्रम्ह असेल तर हे उष्टे-माष्टे कसे खाईल? यज्ञाचा पुरोडाश स्वीकारणारे परब्रम्ह असे कसे असेल? म्हणून परीक्षा पाहण्यासाठी ब्रम्हदेवाने चरत असलेली सगळी वासरे नाहीशी केली. इतक्यात कांही गोपाळांचे लक्ष गेले व ते कृष्णाला म्हणाले, कृष्णा अरे बघ तरी, एकही वासरू दिसत नाही! कृष्ण त्यांना म्हणाला, घाबरू नका! वासरे गर्द झाडीत चरत असतील मी घेऊन येतो. तुम्ही जेवणे चालू द्या! असे म्हणून कृष्ण वासरांना शोधायला गेल्यावर ब्रम्हदेवाने सगळी गोप बालके योगनिद्रेत टाकून ब्रम्हलोकी नेऊन ठेवली. भगवान श्रीकृष्णांनी कसून शोध घेतला पण एकही वासरू दिसेना. निराश होऊन ते परत आले. पाहतात तो गोप बालके नाहीशी झालेली. मग मात्र जगन्नियंत्या भगवंताने आपल्या योग सामर्थ्याने जाणले कीं प्रत्यक्ष ब्रम्हदेवानेच हा खेळ मांडला आहे. मग मात्र जगन्नियंता भगवंत स्वत:च सगळी वासरे व सगळी गोप-बालके झाला. प्रत्येक वासरू जसेच्या तसे व प्रत्येक गोप बालकाचे रूप, शरीर लक्षणे, संवयी, त्याचे कपडे, दागिने इत्यादी सर्व जसेच्या तसे स्वत: कृष्णच झाला. वासरांच्या बाबतीतही तेच केले. ब्रम्हदेवाला "विष्णुमय जगत्" ची प्रचीती द्यायचे भगवान श्रीकृष्णाने ठरवले. नित्याप्रमाणे वासरे चारून कृष्ण व सगळी गोप बालके आपआपल्या घरी परतली.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

पुष्प १४० वे (अध्याय १३ पूर्ण व १४ चालू)

## ब्रम्हदेवाचा भ्रम निरास व कृष्णस्तुती

आतां घरोघर घरात आणि गोठ्यात कृष्णच वावरू लागल्याने सगळयांच्याच वात्स्यल्याला पान्हा फुटला. वृंदावनात घरोघरी आनंदी आनंद होऊ लागला. वासरांना पाहून गोठ्यातल्या गाई "न भूतो न भविष्यति" असा पान्हा सोडून दुधाची रेलचेल करू लागल्या. हे कां घडतेय हे मात्र कोणालाच कळत नव्हते. वृंदावनाचा नित्यक्रम पूर्वीसारखाच चालू होता. भगवान श्रीकृष्णांची ही लीला वर्षभर अशीच चालू होती. वर्ष होण्याला दोनचार दिवस बाकी होते. आणि एक दिवस असे आश्चर्य घडले कीं बलराम, कृष्ण व गोप बालके वासरांना घेऊन नेहमी प्रमाणे गोवर्धन पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या हिरवळीवर वासरांना घेऊन आले. ही चरणारी वासरे आतां मोठी झालेली. व न पिणारी होती. त्या दिवशी गोपांनी आपल्या गाई गोवर्धन पर्वतावर चरायला आणल्या. गाई पर्वतावर चरत असताना एका गाईचे लक्ष पायथ्याशी असलेल्या कुरणावर चरणाऱ्या आपल्या वासरा कडे गेले. वास्तविक त्या गाईच्या अंगावर पिणारे वासरू वृंदावनातल्या गोठ्यात होते. पण ह्या मोठ्या वासराला पाहून त्या गाईला आपला स्नेह आवरता आला नाही. गोवर्धन पर्वताच्या उतारावरून ती जीवाची पर्वा न करता खाली चरत असलेल्या वासराकडे धांवत निघाली. ती धांवत कुठे निघाली हे इतर गाई पाहूं लागल्या व खाली चरणाऱ्या आपल्या वासरांना पाहून त्यांचीही तशीच अवस्था झाली. त्यावेळी गाई राखणारे गोप प्रथम संतापले.

पण खाली आपल्या मुलांना पाहून तेही आपल्या मुलांकडे धांवत सुटले. इकडे गाई आपल्या वासरांना चाटू लागल्या. चाटता चाटता त्यांचा प्रेमभाव अनावर होऊन त्यांना पान्हा फुटून चक्क दूध वाहू लागले. त्यामुळे वासरेही दूध पिऊ लागली. गाई काय करतात हे पहाण्याच्या मन:स्थितीत गोप नव्हतेच. ते आपल्या मुलावर असे काही प्रेम वर्षाव करू लागले कीं जणू खूप वर्षात एकमेकांची भेटच झालेली नाही. त्यांना जवळ घेऊन त्यांच्याशी ते चक्क खेळू लागले. या अघटीत प्रकाराने बलराम आश्चर्य चकित झाले. ते विचार करू लागले, दूध पिणारी पाडसे गोठ्यात असताना या गाई मोठ्या वासरांना पाजायला इतक्या कश्या काय उत्सुक झाल्यात. आणि जर दूध कमी पडले तर अस्वस्थ होणारे हे गोप इतके शांत पणे कसे काय आपल्या मुलाशी खेळत आहेत? अशा विचारात बलरामांच्या एक गोष्ट लक्षात आली कीं सगळया गोकुळात माझ्यासह सर्वांनाच ह्या गोप बालकांचे व वासरांचे प्रेम उत्पन्न झालेले आहे. कोणत्या तरी प्रभावी

योग्याच्या सामर्थ्याने हे घडत असणार! पण एवढा सामर्थ्यवान योगी कोण? आणि मला मोहात टाकण्याचे सामर्थ्य एका श्रीकृष्णा शिवाय कोणाचेच नाही. हा विचार मनात येताच बलरामांनी आपल्या दिव्य दृष्टीने सर्व वत्सांना व गोप बालकांना न्याहाळून जाणून घेतले, कीं सर्वत्र आपला स्वामी वासुदेवच भरलेला आहे.

ते अंतरातूनच भगवंताशी बोलू लागले ' प्रभो ! प्रत्यक्ष आपणच सर्व बालके व वासरे आहात कीं! हे कां? व कसे?'

त्यावेळी भगवान श्रीकृष्णांनी प्रत्यक्ष जवळ जाऊन बलरामांना सगळे समजावून सांगितले. बलरामही तत्क्षणी समजून गेले. भगवान श्रीकृष्णांचा तो दिवस मग बलरामांसह मजेत गेला. नंतर चार दिवसांनी बलराम घरीच असताना भगवान श्रीकृष्ण, गोप बालके व वासरे घेऊन पुन्हा अघासुर मारल्याच्या दिवशी ज्या ठिकाणी वनभोजनास आले होते तिथे आले. त्याचवेळी ब्रम्हदेवही तिथे आले. गोप बालके व गोवत्स यांच्यासह कृष्णाला आनंदात खेळताना पाहून अवाक् झाले. ब्रम्हदेवांनी आपल्या योगबलाने जाणून घेतले कीं ही गोप बालके व गोवत्से रूप, गुण व लक्षणे इत्यादींनी जशीच्या तशीच आहेत. वर्षभर तशीच नांदत आहेत. त्यांनी आपल्या दिव्यज्ञानचक्षुंच्या सहाय्याने ही वासरे व बालके कोण आहेत हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला पण तो निष्फळ झाला.

ब्रम्हदेव गडबडले. त्यांनी लगेच भगवंताचा धांवा केला. ते मनातल्या मनात प्रार्थना करू लागले ' प्रभो! हे सर्व अनाकलनीय आहे! मला क्षमा करा!' ब्रम्हदेव असे म्हणताच त्यांना त्या गोप बालकात व गोवत्सात भगवान श्रीकृष्ण दिसू लागले. आणि जिथे जिथे ते नजर फिरवू लागले तिथे तिथे त्यांना भगवान श्रीकृष्णच दिसू लागले. थोडक्यांत म्हणजे सर्व विश्व कृष्णमय असल्याचे दिसू लागले. ज्याला ते गवळयाचा पोर समजत होते तो गवळयाचा पोर नसून साक्षात् परमात्मा आहे. इतक्यात त्यांना हेही दिसले कीं काल, कर्म, स्वभाव, सत्व, रज व तम हे गुण महत्तत्त्व, पंचमहाभूते इत्यादी सर्व समष्टीतील सूक्ष्म तत्वे आपली स्वतंत्रता नष्ट होऊन भगवंताचे पूजन करीत आहेत.

ब्रम्हदेवांना आपल्या कृत्याची लाज वाटू लागली. आतां त्यांच्या लक्षात आले कीं ज्या योगसामर्थ्याने आपण ही गोप बालके व गोवत्से कोण आहेत हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला ती योगमाया केवळ परब्रम्हाच्या अधीन असल्यामुळे आपल्यासाठी त्यांनीच कार्यान्वित होऊ दिली नाही. त्यामुळे आपली सत्ताच चालली नाही. पण शरणागती पत्करताच ती कार्यान्वित झालेली आहे. त्या परब्रम्हरुपी भगवान श्रीकृष्णाला माझा साष्टांग नमस्कार असो. ब्रम्हदेवांना या जाणीवा होताच संपूर्ण विश्व त्यांना पुर्ववत् दिसू लागले. त्यांचे पूर्वीचे योग सामर्थ्य त्यांना परत प्राप्त झाल्याची जाणीव झाली. पण मग आतां आपण हरण केलेल्या बालकांचे व गोवत्साचे काय करायचे? ब्रम्हदेव चांगलेच घोटाळयात पडले. वर्षभरा पूर्वी कृष्ण वासरांना शोधीत जिथे आला होता त्या पूर्वीच्याच ठिकाणी ब्रम्हदेव आले होते. भगवान श्रीकृष्णही हातात घास घेऊन वासरांना शोधण्यासाठी जसे आले होते तसे तिथेच आले होते. ब्रम्हदेवांनी नि:शंक मनाने त्यांना आपला मुकुट जमिनीवर टेकून नमस्कार केला.

ब्रम्हदेवांनी अंत:करणापासून भगवंताची स्तुती केली. ते म्हणाले, " हे प्रभो! आपण एकमात्र परब्रम्ह आहात. आपल्या कृपेशिवाय आपणास कोणीच जणू शकत नाही. अर्थात ते जाणणे एका विविक्षित मर्यादे पर्यंतच असते. थोडक्यात म्हणजे आपणास कोणीच जाणू शकत नाही. पण आपली कृपा झाल्यावर जिवाला स्वत: कोणीच नसल्याची जाणीव होते. वैदिकज्ञान व योगयाग इत्यादींनी प्राप्त होणारे सामर्थ्य ही केवळ आपली कृपाच असते. पण त्यामुळे आपली प्राप्ती होत नाही. आपली अनुभूती फक्त आत्मसमर्पणात्मक भक्तीने घेता येते. हजारो वर्षांचे माझे तपही आपली लीला जाणण्यास समर्थ होऊ शकले नाही. पण क्षणकालच्या शरणागतीने मला आपल्या लीलेची जाणीव होऊ शकली. माझा सगळा संदेह नाहीसा झाला. माझ्यासह हे सर्व विश्व आपलेच आहे. कृपया परिस्थिती पुर्ववत् करा!

श्रीकृष्णांनी ब्रम्हदेवांना अभय दिले व स्वत:ची गोवत्स रूपे आणि गोप बालक रूपे आवरून घेतली व ब्रम्हदेवांकडे असलेली योगनिद्रेतली सर्व गोवत्से व गोप बालके वर्षापूर्वी ज्या स्थितीत होती त्या स्थितीत आणून ठेवली. त्यामुळे गोप बालकांना तो दिवस आघासुराच्या वधाचाच वाटत होता. वनभोजनानंतर जेंव्हा ती बालके घरी परतली तेंव्हा कृष्णाने मोठ्ठा अजगर मारल्याची कथा ते रसभरीत वर्णनाने सांगू लागले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

## पुष्प १४१ वे (अध्याय १४ व १५ पूर्ण)

## धेनुकासुराचा वध

परीक्षित राजाने शुकमुनींना आपली शंका विचारली कीं गोप बालकांच्या रुपात व स्वभावात तिळमात्र फरक नव्हता तर गोप व गोपस्त्रिया यांच्या अंत:करणात कृष्णरूपातल्या आपल्याच बालकांना पाहून एकाएकी इतके अपूर्व प्रेम कशामुळे निर्माण झाले? शुकमुनी सांगू लागले " राजन्! सृष्टीतल्या यच्चयावत् प्राण्यांना स्वत:चा जीव प्रिय असतो. ह्या आत्मप्रीयतेमुळे स्वगृह, दारा, पुत्रादी वगैरेंची प्रियता उत्पन्न होते. ती आत्मप्रीयते इतकी तीव्र नसते. तर त्या सर्वांबद्दल तो 'मी व माझे' या भावनेत वावरत असतो. जर जीव शरीरासह आपले काहीच नसून सर्व कृष्णाचे आहे अशा भावनेत राहील तर तो कृष्णाच्या अहैतुकी कृपेस पात्र होईल. गोकुळात सर्वांनाच कृष्णाचे वेड लागलेले होते. त्यामुळे त्यांची स्वदेह ममता रूप पालटून आलेल्या कृष्णप्रेमात रुपांतरीत झाली होती.

अर्थात ती सर्व भगवंताची योगमायाच होती. पण त्यामुळे जेंव्हा बालकांच्या रूपाने कृष्ण त्यांच्या घरात प्रविष्ट झाला तेंव्हा तेच आत्मतत्व त्यांना आपल्या पुत्राच्या रूपाने बाहेर जाणवले. राजन्! प्रत्येक जीव समाधानाच्या शोधात असतो. व ते समाधान फक्त भगवंता जवळ असते. पण अज्ञानामुळे आपण ते शरीर सौख्याशी जोडतो. ती अविद्या माया. इथे प्रत्यक्ष समाधान म्हणजेच परब्रम्ह घराघरातून प्रकट झाल्यामुळे. स्व-पर भावाच्या अतीत नकळतच सारे गेले त्याचा हा परिणाम होता.

बलराम आतां मोठे झाल्यामुळे गाई चरायला घेऊन जाऊ लागले. त्यांच्या बरोबर कृष्ण व इतर मोठे झालेले गोप सवंगडी असत. त्यावेळी भगवान श्रीकृष्ण बासरी वादनाने सर्वांनाच आल्हाद देत असत. चालता चालता फळाच्या भारांनी वाकलेल्या फांद्या पाहून कृष्ण बलरामांना म्हणत " दादा! पहा तरी ते वृक्ष तुमच्या चरणी फळे व पुष्पे अर्पण करण्यास किती उत्सुक झाले आहेत. जणू त्यांना आपल्या पूर्व जन्मातली पापे धुवून काढायची आहेत!" इत्यादी बोलून बलरामांना खुश करीत असत. यमुना तीरी भरपूर मोठे कुरण होते. आजूबाजूला भरपूर वने उपवने होती. त्यातच एक ताडवन पण होते.पण ते ताडवन धेनुकासुराने आपल्या ताब्यात घेतलेले असल्याने कोणाला तिथे जाता येत नव्हते. धेनुकासुर गाढवाच्या रूपाने तेथे राहून कोणी आल्यास त्याला लाथा मारून ठार करीत असे. आणि धेनुकासुराचे अनेक साथीदार त्याला मदत करीत असत. सवंगड्यांनी प्रथम बलराम व कृष्ण यांच्या सामर्थ्याची खूप स्तुती केली. मग ते

ताडवन जवळ आल्यावर  तिथे जाऊन ताडफळे खाण्याची इच्छा व्यक्त केली. आपल्या सवंगड्यांच्या या बोलण्यावर बलराम व कृष्ण खुद्कन् हसले! त्यांना घेऊन ताडवनात आले.

बलरामांनी आपल्या पुष्ट बाहूंनी एक ताडाचे झाड गदगदा हलवले आणि भरपूर ताडगोळे खाली पाडून दिली. सगळे सवंगडी आनंदाने ताडफळे खाऊ लागली.

धेनुकासूर गाढवाच्या रुपात त्यांना मारायला धावला.  त्याने बलरामांच्या छातीवर दुगाण्या झाडण्यासाठी मागचे पाय वर केले. बलरामांनी ते हवेतच आपल्या वज्रमुष्टीत पकडून धेनुकाला हवेतल्या हवेत जोरात गरगर फिरवले. त्या वेगाने धेनुकाची शुध्द हरपली व त्याचे डोळे बाहेर आले. ते पाहून बलरामांनी त्याला हवेतल्या हवेत सोडून दिले. धेनुक धाड धाड करीत दोन तीन झाडांवर आपटला आणि गतप्राण झाला. ज्या झाडावर आपटला ते झाड पुढच्या झाडावर पडले. अशा प्रकारे एकापुढची एक अनेक झाडे जमीनदोस्त झाली.

ते पाहून धेनुकासुराचे साथीदार असुर गाढवाच्याच रुपात त्यांच्यावर धावले. बलराम व कृष्ण तयारच होते. पुढे आलेल्या दोन गाढवांच्या तंगड्या धरून तसेच गरगर फिरवून झुपकन सोडून दिले ते मागच्या गाढवांवर इतक्या जोरात आदळले कीं त्यांची थोबाडे फुटून गेली. काहींच्या तंगड्या मागून धावत येणाऱ्या गाढवांच्या पोटात इतक्या जोरात घुसल्या कीं ते जागीच प्राण सोडून पडले. ताडवन निर्धास्थ झाले. अशा लीला करीत श्रीकृष्ण व बलराम संध्याकाळी घरी परतले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

पुष्प १४२ वे (अध्याय १६ पूर्ण)

## कालिया मर्दन

वृंदावन अत्यंत निसर्गरम्य होते. यमुनेच्या तीरावर असल्यामुळे तर अधिकच सुशोभित झाले होते.

एक दिवस यमुनेच्या काठी असलेल्या एका मोठ्या डोहाजवळच्या प्रशस्त कुरणावर कृष्ण सवंगड्यांसह गाई चरायला घेऊन आले. त्यादिवशी बलराम त्यांच्या बरोबर नव्हते. गाईंना चरायला सोडून कृष्ण सवंगड्यांसह खेळण्यात गर्क झाले. उन्हे वर चढली तशी उष्णता वाढली. गाई व मुले समोरच असलेल्या यमुनेच्या डोहाकडे पाणी पिण्यास आले. पाणी पिऊन परत फिरणार इतक्यात सगळेच निष्प्राण होऊन पडले. आपल्यावर निरपेक्ष प्रेम करणाऱ्या त्या सर्व जीवांची भगवंताला दया आली. त्यांनी जाणले कीं हा कालियाच्या विषाचा परिणाम आहे.

भगवान श्रीकृष्णांनी प्रथम त्या सर्व जीवांना सजीव केले व तो परिसरही भयमुक्त करायचे ठरवले. सवंगड्यांना समजले कीं ही कृष्णाची कृपाच आहे. ते अत्यंत प्रेमाने व आदराने कृष्णाकडे पहात असतानाच कृष्णाने आपल्या पीतांबराचा काचा गुडघ्या पर्यंत आवळून घट्ट बांधला. मस्तकावरचा फेटा घट्ट आवळला. सरोवराच्या काठी असलेल्या कदंबवृक्षावर सरसर चढले. सरोवरावर झुकलेल्या एका जाडजूड फांदीवर आले. फांदीवर दिमाखात उभे राहून दंड थोपटले. सगळे सवंगडी जीव मुठीत धरून पाहत राहिले! गाई पण तटस्थ झाल्या.

मग कृष्णाने सराईत जलतरणपटू सारखा सूर मारला. त्यावेळी सरोवराचे पाणी इतक्या प्रचंड प्रमाणात डुचमळले कीं त्यातल्या कालिया नामक सर्पाला व त्याच्या बरोबर रहात असलेल्या सर्व नागांना श्वास घेणे मुश्किल झाले. बालरुपातले पितांबर कसलेले, फेटा बांधलेले भगवान श्रीकृष्ण त्या सरोवरात बिनधास्थ एखाद्या मत्त गजेंद्रासारखे क्रीडा करू लागले. पाण्यावर जोर जोरात थापट्या मारू लागले. पण त्या थापट्यांमुळे कालीयाला जोरजोरात धक्के बसू लागले. तो चवताळून बाहेर आला. कृष्णाला मत्तपणे क्रीडा करताना पाहून कालियाने कृष्णाला विळखा घालून त्याची हालचाल बंद करून टाकली. कृष्णाकडे टक लावून पहात असलेले सखे सवंगडी जणू आपलाच श्वास बंद झाला अशा विकलतेने धाडकन जमिनीवर पडले.

भगवान श्रीकृष्णांची कालियाच्या विळख्यातली ती कमालीची निश्चेष्ट अवस्था पाहून देव-देवतांचा सुध्दा आपल्या शक्तीवरच ताबा सुटला! त्याचा  परिणाम वृंदावनातल्या सर्व भूमीवर होऊन सर्वांच्या मनात भय निर्माण झाले. गोप-गोपी नंदाच्या वाड्याकडे धावले. नंद-यशोदा, रोहिणी सर्वजण हताश होऊन बसले होते. त्यातून गोप व गोपी नैराश्याने घेरून त्यांच्याकडे आल्यामुळे तर नंद महाराज चांगलेच बिथरले.

ते गोपांना पाहून म्हणाले " नेमकीं आजच मला काय बुद्धी झाली कीं मी कृष्णाला एकट्यालाच गाई चारायला पाठवले! कृष्णाच्या जीवाला काही धोका तर झाला नसेल? त्याशिवाय सगळेच इतके कसे अस्वस्थ होतील? चला आपण जाऊन पाहू! आज मला कशाचाच भरवसा वाटत नाही! उगाच तर्क करण्यापेक्षा माझ्या कृष्णाला प्रत्यक्षच पाहून येऊ!" असे म्हणून नंदमहाराज ताडकन घराबाहेर पडले. पाठोपाठ गोप आणि सारे गोकुळ त्यांच्या मागोमाग निघाले.

गाईंच्या पावलांचा माग घेत यामुना किनारी जिथे सारे गोधन व गोप-बालके होती तिथे येउन पोहोचले. आणि कालियाच्या विळख्यातल्या कृष्णाला पाहून नंद, यशोदा, रोहिणी, गोप, गोपी यांची अंत:करणे शतश: विदीर्ण झाली. यशोदा डोहाकडे धावणार हे पाहून काही गोपींनी तिला गच्च पकडून ठेवले. गोपांनी नंदाला सावरले. काही गोप, नंद व यशोदा कृष्णाला वाचवण्यासाठी डोहाकडे धावण्याच्या प्रयत्नात असलेले पाहून बलरामांनी क्षणाचाही विलंब न लावता पुढे होऊन सर्वांना अडवून धरले. या सर्व हालचाली भगवान श्रीकृष्ण पहात होतेच.

जेंव्हा व्रजवासी प्राणार्पणाला सिद्ध झालेले दिसले तेंव्हा कृष्णाने जलद हालचाल केली आणि चपळतेने स्वत:ला कालियाच्या विळख्यातून सोडवून घेतले. सपासप पाणी कापत चपळतेने कालियापासून दूर झाले. कालिया संतापला. खदिरांगारा सारख्या नेत्रांनी त्याने कृष्णाचा वेध घेतला आणि दंश करण्यासाठी त्याने फटकन फणा मारला. पण कृष्ण त्याच्यापासून दूर गेला. तो परत वळला. कृष्ण त्याला चकवीत होते. आणि कालीयाचा संताप वाढत होता. कृष्णाने आपल्या चपळ हालचालींनी त्याला खूप दमवला.

कालीयाचा गर्व हरण झाला पण माज तसाच होता. त्याला थोडी क्षीणता आलेली पाहून चपळाईने त्याच्या फण्यावर उभे राहून भगवान श्रीकृष्ण आपल्या बालरुपात डौलदार नृत्य करू लागले. इतका वेळ जीव मुठीत धरून व श्वास रोखून पहात असलेल्या आकाशस्थ देव देवतांचे श्वास मोकळे झाले व त्यांनी आपली सामर्थ्ये आपल्या नियंत्रणात आणली. मग अत्यंत आनंदाने विश्वनियंत्या भगवान श्रीकृष्णांच्या नृत्याला मृदंगादी वाद्यांची साथ द्यायला सुरुवात केली.

कालीयाला एकशे एक फणे होते. पण भगवान श्रीकृष्ण इतक्या चपळाईने नृत्य करीत होते कीं आपला नृत्याचा ताल जराही चुकू न देता कालियाचे सगळे फणे ठेचून काढत होते. कालिया विव्हल होत होता. समोरून पहाणाऱ्याला ते सहज नृत्य वाटत होते पण कालीयासाठी ते जीवघेणे होते. त्याच्या सगळ्या नाकातून रक्ताच्या धारा वाहू लागल्या. त्याला आपल्या मृत्यूची चाहूल लागली. त्याने प्राणपणाने मनातल्या मनात नारायणाचे स्मरण करून आपला उन्मत्तपणा सोडून दिला.

त्याच वेळी कालियाच्या स्त्रिया आपल्या पतीचे प्राण वाचवण्या साठी भगवान श्रीकृष्णाची प्रार्थना करू लागल्या. त्यांची ती करुण प्रार्थना ऐकून भगवान श्रीकृष्णांनी कालीयाला जीवदान दिले. पण तो डोह सोडून जाण्याची आज्ञा दिली. भगवान श्रीकृष्ण कालीयाला म्हणाले, "ज्या गरुडाच्या भीतीने तूं रमणकद्वीप सोडून इथे आलास तो गरुड तुझ्या मस्तकावरील माझ्या चरणांच्या ठश्यामुळे आतां तुला खाणार नाही! त्यामुळे तूं परत जा!" भगवान श्रीकृष्णांची आज्ञा शिरसावंद्य मानून कालियाने आपल्या पत्नींसह भगवंताचे पूजन केले. आपल्याजवळचा कौस्तुभ मणी भगवंताला अर्पण करून सर्व सर्पांसह तो डोह सोडून निघून गेला.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

पुष्प १४३ वे (अध्याय १७ व १८ पूर्ण)

## कालीयाचा पूर्वेतिहास व प्रलम्बासुराचा वध

परीक्षित राजाने कालीयाचा पूर्वेतिहास विचारला म्हणून शुकमुनी सांगू लागले,

" कालिया पूर्वी रमणक द्वीपात अनेक सर्पांसह रहात होता. तिथे सर्प खाण्यासाठी गरुड येत असे. तेंव्हा कंटाळून सगळया सर्पांनी मिळून गरुडाशी समझोता केला. व दरमहा गरुडाचे खाद्य एका झाडाखाली ठेवू लागले. पण मस्तवाल कालियाच ते सगळे फस्त करून गरुडाला दंश करण्यासाठी टपून बसला. पण गरुडाने आपल्या पंखाचा इतका जबरदस्त तडाखा दिला कीं कालिया जीव वाचवण्यासाठी आपल्या बायका मुलांना घेऊन यमुनेच्या या सुरक्षित डोहात येऊन राहिला. कारण हे सरोवर सौभरी मुनींनी गरुडापासून सुरक्षित केले होते. सौभरी मुनी तिथे तप करीत असताना गरुड तिथे मत्स्य भक्षणास येत असे. त्यावेळी मत्स्यांनी प्रार्थना केल्यामुळे सौभरींनी 'तूं जर पुन्हा या सरोवरात येशील तर तुला मृत्यू येईल.' असा गरुडाला शाप दिला. त्यामुळे गरुड तिकडे फिरकेनासा झाला. हे कालीयाला ज्ञात झाले होते म्हणून कालिया तिथे येऊन राहिला होता. भगवान श्रीकृष्णांनी त्याला हाकलून दिल्यामुळे आतां सरोवर निर्मल व स्वच्छ झाले.

भगवान श्रीकृष्ण सुखरूप बाहेर आले. आपला कृष्ण, आपला सखा, सुखरूप बाहेर आलेला पाहून गलितगात्र झालेल्या गोपांना नवचैतन्य प्राप्त झाले. त्यांनी हर्षातिरेकाने कृष्णाला कडकडून मिठी मारली. बलरामांनी कृष्णाला अलगद आपल्या खांद्यावर घेतले. बायकांनी कृष्णाची दृष्ट काढली. त्या दिवशी कालियाच्या गोंधळामुळे खूप उशीर झाला व रात्र होत आली. म्हणून नंदमहाराजांनी ती रात्र यामुनातीरावर काढण्याचा प्रस्ताव मांडला आणि सगळयांनी तो आनंदाने उचलून धरला.

उन्हाळयाच्या रात्री कालिंदीच्या किनारी गार वाऱ्याचा आस्वाद घेत सर्व निद्राधीन झाले. ज्या झाडांच्या आश्रयाने ते झोपले होते त्या झाडांच्या बाजूच्या काही कोरड्या फांद्या वाऱ्याने एकमेकावर घासून दावानल उत्पन्न झाला. हा हा म्हणता तो सर्वत्र पसरू लागला. त्या प्रखर उष्णतेने व्रजवासी जागे झाले. पण सगळीकडेच आगीचा डोंब उसळलेला. बाहेर पडायला मार्ग नाही. जीवाच्या आकांताने ते "कृष्णा वाचव!" म्हणून ओरडू लागले.

तो धांवा ऐकून कृष्णांनी क्षणातच 'आ' केला. दावानल जणू त्याच गोष्टीची वाट पहात असल्या सारखा कुणालाही इजा न करता पटकन कृष्णाच्या मुखात प्रवेशून शांत झाला. भडकलेल्या सगळया ज्वाला क्षणात शांत झाल्या. सगळे झोपल्या अवस्थेत परत जणू काहीच घडले नाही अशा प्रकारे शांत झोपी गेले.

दुसऱ्या दिवशी झुंजूमुंजू झाल्यावर सगळेजण यमुनेच्या त्या सुरक्षित व निर्मल झालेल्या डोहात स्नाने करून. घडलेल्या सगळया घटनांचा विचार करीत घरोघर परतले. बलराम व कृष्ण यांच्या असामान्य सामर्थ्याचा अनेक प्रकारचा प्रत्यय येऊनही व्रजवासी त्यांना आपल्यातलेच भगवद्कृपा असलेली गोड बालके समजूनच व्यवहार करीत असत. बलराम व कृष्ण  हे सुध्दा व्रजवासियांशी एकरूप होऊन असे काही लोभस वागत कीं सगळे व्रजवासी त्यांना आपले मित्रच समजत. बलराम व कृष्ण नेहमी त्यांच्या सारखा पोशाख करीत व त्यांच्यातच मिसळून खेळत असत. खेळता खेळता गोप बालके बलराम-कृष्णांना आपल्यातला देव समजून पूजाही अगदी मनोभावे करीत असत. आणि पूजा झाली कीं बलराम-कृष्णही त्यांच्या गळयात गळा घालून हास्यविनोद करीत. कंसाच्या असुरांचेही त्यांच्यावर लक्ष असे. एकदा बलराम व कृष्ण नित्याप्रमाणे सवंगड्यांसह गाई चारायला जात होते. कंसाने त्याना मारायला पाठवलेला प्रलम्बासुरही त्यांच्या सवंगड्यासारखा पोशाख व रूप धारण करून दोघांना मारण्या साठी बलराम-कृष्णांशी दोस्ती करीत त्यांच्या बरोबर चालू लागला. बलराम-कृष्णांच्या ते लक्षात आलेच. पण तसे न दाखवता त्याला मारण्याची योजना निश्चित करून बलराम व कृष्णांनीही त्याच्याशी दोस्ती केली. मग कुरणावर गाईंना चरायला सोडून कृष्णाने सगळयांना एकत्र केले. खेचाखेचीचा खेळ खेळण्या साठी एक गट बलरामांचा व एक गट कृष्णाचा असे दोन गट केले. हातांनी खेचून जो गट जिंकेल त्या गटातल्या मुलांना हरलेल्या गटातल्या मुलांनी पाठीवर घेऊन भंडारीक वडाखाली नेउन सोडायचे. प्रलंब कृष्णाच्या गटात होता.

चढाओढीने खेळ सुरु झाला. बलराम भरभर सगळया मुलांना खेचून आपल्या हद्दीत घेऊ लागले. कृष्णाचा गट हरला. मग कृष्णाने श्रीदामाला पाठीवर घेतले व नुकताच मित्र झालेल्या प्रलंबाला बलरामांना पाठीवर घ्यायला सांगितले. प्रलंब त्याच संधीची वाट पहात होता. प्रलंब बलरामांना घेऊन भलतीकडेच धावू लागला. तेंव्हा बलरामांनी एकदम इतके वजन वाढवले कीं प्रलंब मूळ स्वरूपात प्रकट होऊन आकाशात झेपावला. त्याच क्षणी बलरामांनी आपल्या वज्रमुष्टीच्या प्रहाराने त्याचे मस्तक फोडून टाकले.

हे सर्व घडत असताना सर्व गोप बालके व गाई भेदरून बलरामांच्याकडे पाहत होते. पण प्रलंबाला बलरामांनी मारताच भेदरून पाहाणारे त्यांचे सवंगडी वासराने शेपट्या वर करून गाईकडे धावावे तसे बलरामांकडे धावले.  त्याना उचलून खांद्यावर घेतले आणि त्यांचा जय जयकार केला. विविध प्रकारे आपला आनंद व्यक्त केला.

हरये नमः। हरये नमः। हरये नमः।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

## पुष्प १४४ वे (अध्याय १९ २० व २१ पूर्ण)

## दावानल भक्षण व शरदातले वृंदावन

नित्याप्रमाणे एकदा गोप बालके व बलराम-कृष्ण गाई चारण्यास गेले असता कोवळे लुसलुशीत गवत खाता खाता गाई गर्द झाडीत घुसल्या. इकडे गोप बालके व बलराम-कृष्ण खेळात इतके दंग झाले होते कीं गाई किती लांब गेल्यात इकडे कुणाचेच लक्ष नव्हते.

गाई जेंव्हा दिसेनाशा झाल्या तेंव्हा शोधाशोध सुरु झाली. पण गाईंचा ठिकाणा लागेना. आपले उपजीविकेचे साधन, गोप बालके तहानभूक विसरून शोधू लागले. शोधता शोधता अगदी रडकुंडीला आले. इतक्यात त्यांना गाईंच्या हंबरण्याचा आवाज आला. गाई वाट चुकून मुंज नावाच्या गवतरानात घुसल्या होत्या. मुंज गवत मुलांच्या डोक्याच्या वर होते. गाई चांगल्या भांबावल्या होत्या.

इतक्यात कृष्णाने साद दिली. कृष्णाची साद ऐकताच त्या जीवाच्या आकांताने हंबरू लागल्या. डोक्याएवढ्या उंच वाढलेल्या गवतातून मोठ्या प्रयासाने मार्ग काढीत कृष्णाच्या दिशेने धावू लागल्या. इतक्यात त्या गवतात दावानल उत्पन्न झाला. मागे जाता येईना कीं पुढे! आता गाईंच्या सगट आपण या मुंज गवतात भस्म होणार असे गोप बालकांना स्पष्ट जाणवले. त्यांनी जीवाच्या आकांताने कृष्णाला साद घातली, " कृष्णा धाव! आम्ही तुला शरण आहोत तूं अमोघशक्ती आहेस."

कृष्णाने गंभीर आवाजात सांगितले जिथे आहात तिथेच डोळे मिटून उभे रहा. भगवान श्रीकृष्णांनी क्षणातच तो दावाग्नी प्राशन करून वातावरण पूर्ववत केले. गोपबालकांना शीतल वायूचा स्पर्श झाला. आणि त्यांनी आश्चर्याने डोळे उघडले. कृष्णामुळे आपले रक्षण झाल्याचे त्यांना समजले व कृष्ण म्हणजे साक्षात परमात्माच आहे या जाणीवेत ते आले. पण बलराम-कृष्ण दिसताच आपले सखे म्हणूनच त्यांच्याकडे धावत आले. बलराम-कृष्ण आपल्या मधुर वाणीने त्यांना म्हणाले, " मित्रांनो! चला! आतां संध्याकाळ होत आली. गाईंना घेऊन घरी जाऊं या!" दिवसभर दमल्यामुळे गोप बालकेही लगेच घरी जाण्यास निघाली. बलराम-कृष्ण आपल्या सवंगड्यांच्या गळयात हात टाकून गोकुळाकडे निघाले.

कृष्णाला गाईंसह गोकुळात येताना पाहून तरुण गोपी कृष्णाकडे एकटक पहात राहिल्या. तरुण गोपींच्या मनात कृष्ण असा काही घर करून बसला होता कीं त्या क्षणकालही कृष्णाला विसरू शकत नव्हत्या. त्यामुळे कृष्ण दर्शन होई पर्यंतचा काळ त्यांना युगायुगा सारखा वाटत असे. इतकी त्यांना कृष्ण दर्शनाची ओढ निर्माण झाली होती. गोप बालकांनी घरी परतल्यावर कृष्णाने दावाग्निपासून केलेल्या रक्षणाचे रसभरीत वर्णन केले. त्यांना नेहेमीच कृष्ण लीला वर्णन करण्याची इच्छा होत असे. आणि त्यांनी केलेली रसभरीत वर्णने गोप व गोपी अगदी मनापासून ऐकत असत. व मनातल्या मनात कृष्णाला हात जोडत असत. आणि तरीही कृष्णाला आपल्यातलाच एक समजत असत.

वृन्दावनावर आता वर्षाऋतूं आपले आवरण घालू लागला होता. आकाशात मेघांची दाटी होऊन उरात धडकीं भरेल असा ढगांचा कडकडाट होई. आणि मग आकाशस्थ मेघ सत्पुरुषासारखे जीवदान करून पृथ्वीला जलपान देऊ लागत. मग ग्रीष्माच्या तडाख्याने करपलेली भूमी पुन्हा हिरवीगार होऊन स्वजनांना भौतिक सौख्य देण्यास तत्पर झाली. वर्षा ऋतूंची जागा हळूच शरदाने घेतली. मग शरदाने निर्वेधपणे आपले साम्राज्य पसरवायला सुरुवात केली. सरोवरे नितळ झाली. त्यांत विकसित कमळांची दाटी होऊ लागली. भ्रमरांचा गुंजारव सर्वत्र निनादू लागला. आकाशही अथांग निळे दिसू लागले. वृंदावनाच्या सर्व शेतांमधून नवीन धान्यांचे पीक टरटरून वर आले. दाणेदार कणसांनी शेते दिमाखाने डुलू लागली. गावागावांत आनंदोत्सव साजरे होऊ लागले. ह्या सर्वात बलराम व कृष्ण यांच्या सहवासाची भर पडल्यामुळे आनंदाला नुसते उधाण आले.

अशा आनंदी वातावरणात जेंव्हा गाई चरू लागत तेंव्हा कृष्ण आपली बासरी वाजवू लागे. त्यावेळी बलरामांसह गोप बालके मंत्र मुग्ध होऊन बासरी ऐकायला बसत. त्याचवेळी वायू त्या बासरीचे मंजुळ स्वरलहरी हळुवारपणे वृंदावनात नेऊन सोडीत असे. आणि मग गोपी मुग्ध होत असत. कृष्णाच्या वेणू गीताने त्यांच्या मनाचा ठाव घेतला कीं त्या हातातले काम सोडून झालेला आनंद व्यक्त करण्यासाठी एकमेकींकडे येत. एकमेकींना आलिंगन देत. आणि मग कृष्ण लीलांचे स्मरण सुरु होई. मधूनच एखादी गोपी आपल्या तीव्र भावना व्यक्त करताना म्हणे, " त्या बासरीला कृष्णाच्या अधरामृताचा नेहमीच लाभ होतो. पण खरा तो आपल्यालाही व्हायला हवा. काय पुण्य केले होते त्या बासरीने कुणास ठाऊक?" तिचे हे बोलणे संपते न संपते तोच दुसरी म्हणते, "अग सखये! जंगलातले पक्षी सुध्दा कृष्णा जवळच्या वृक्षावर दाटीवाटीने बसून निवांत वेणूगीत ऐकत असतात. अग नक्कीच ते पूर्वीचे कुणी तरी ऋषी मुनी असावेत!" तिसरी पटकन म्हणाली, " पण बाई ग तो गोवर्धन पर्वत सर्वात श्रेष्ठ म्हणावा लागेल! कारण अग सखींनो! बलराम व कृष्ण, गाई गोवर्धन पर्वतावर घेऊन गेले कीं हा पर्वत गाईंना भरपूर हिरवेगार गवत तर देतोच पण कृष्ण व बलराम यांनाही मधुर फळे व फुले देऊन वर सुरेख जलपानही देतो! आणि शिवाय त्यांना आपल्या अंगा खांद्यावर खेळवतोही!" अशाप्रकारे व्रजभूमीतल्या तरुण गोपी कृष्णाच्या मुरली वादनाने मोहून मनोरम संवादाने कृष्ण चिंतनात मग्न होत असत.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

श्रीमद्भागवत-दहावा स्कंध

पुष्प १४५ वे (अध्याय २२ पूर्ण)

# चीर हरण

व्रजभूमीतल्या सर्व कुमारिकांनी हेमंतऋतुच्या पहिल्या महिन्यात पहिल्या दिवसापासून कात्यायनी व्रताला सुरुवात केली. पहाटेच उठून सगळया जणी यमुनेवर येऊन वस्त्रे काठावर ठेवून स्नान करीत. मग तशाच विवस्त्र अवस्थेत काठावर येऊन वस्त्रे परिधान करीत. मग मृत्तिकेची दुर्गादेवी स्थापन करून पूजा करीत. पुजनानंतर हात जोडून प्रार्थना करीत,

" कात्यायनी महामाये महायोगीन्यधीश्वरी ।

नंदगोपसुतं देवि पतिं मे कुरु ते नम: ॥ "

( हे कात्यायनीदेवी नंदाचा पुत्र कृष्ण आम्हाला पती म्हणून प्राप्त होऊ दे! आमचा तुला नमस्कार आहे." )

अशा प्रकारे त्यांचा नित्यक्रम सुरु असताना एक दिवस कृष्णाचे यशोगान गात गात त्या गोपी कपडे उतरवून स्नानासाठी यमुनेत उतरल्या. त्याच वेळी भगवान श्रीकृष्ण आपल्या सवंगड्यांसह तिथे आले. सवंगड्यांना दूर लपवून आपण स्नानाला उतरलेल्या गोपींची वस्त्रे घेऊन जवळच असलेल्या कदंब वृक्षावर जाऊन बसले. स्नानात दंग असलेल्या मुलींना ते कळले नाही. भगवान श्रीकृष्ण झाडावर बसल्यावर जोरजोरात हसू लागले. त्या बरोबर लपलेली गोप बालकेही हसू लागली. चमकून त्या मुली भगवान श्रीकृष्णांकडे पाहू लागल्या.

त्यावेळी भगवान श्रीकृष्ण त्या मुलींना म्हणले, " मुलींनो! इथे माझ्याकडे येऊन स्वेच्छेने आपले वस्त्र घेऊन जावे! ही मस्करी नाही. मला ठाऊक आहे कीं तुम्ही जे व्रत करीत आहात त्यामुळे थकलेल्या आहात. इथे आलेल्या माझ्या मित्रांनाही हे ठाऊक आहे. त्यामुळे मी खोटे बोलतोय किंवा मस्करी करतोय असे अजिबात समजू नका. आतां एकएक जणीने येऊन घ्या किंवा सगळया जणी एकदम या. श्रीकृष्णाच्या या अनपेक्षित बोलण्याने भांबावलेल्या मुलींना तरी ती मस्करीच वाटली. त्यांचे कृष्णप्रेम तर उतूं चालले होते. त्यांना कृष्णाचा जराही राग आला नाही.

त्या म्हणू लागल्या, " हे काय कृष्णा! तुला हे योग्य वाटते कां? अरे तूं नंदाचा पुत्र म्हणून सगळे तुझा सन्मान करतात आणि आम्ही तुझ्यावर प्रेम करतो. तुझ्या इतके आम्हाला काहीही प्रिय नाही. त्यामुळे हे प्रियकरा उगाच भलतीच थट्टा करू नकोस. आमची तुला प्रार्थना आहे कीं आमची वस्त्रे आम्हाला परत दे! आम्ही तुला शरण आलेल्या तुझ्या दासी आहोत! तूं सांगशील तसे आम्ही वागू पण आधी आमची वस्त्रे परत दे! आणि वस्त्रे देणार नसलास तर आम्ही नंदाकडे तक्रार करूं."

हे ऐकून कृष्ण म्हणाला, " तुम्ही माझ्या दासी आहात असे म्हणता आणि वर तक्रार करूं म्हणता? तुम्ही जर खऱ्याच दासी असाल तर मुकाट्याने बाहेर येऊन आपापली वस्त्रे निवडून घ्या! आणि माझे न ऐकता राजाकडे तक्रार जरी केलीत तरी तुम्ही माझ्या दासी आहात हे कबुल केल्यावर तो तरी काय करू शकणार आहे? "

हे ऐकून गोपी चांगल्याच विचारात पडल्या. पण मग काहीच मार्ग न दिसल्यामुळे हातांनी जेवढे अंग झाकता येईल तेवढे झांकून त्या हळू हळू बाहेर आल्या. त्यांचा विशुध्द भाव जाणून भगवान श्रीकृष्ण म्हणाले, " अरेरे! व्रतस्थ असताना विवस्त्र स्नानाने आराध्य देवतेचा अपराध होतो. त्यामुळे आधी त्याचे प्रायश्चित्त घ्या! प्रथम दोन्ही हात मस्तकावर घेऊन देवीला नमस्कार करा. मग आपली वस्त्रे घेऊन जा! हे ऐकून त्या गोपींना आपली चूक कळली. त्यांनी तत्क्षणी मस्तकावर हात जोडून देवीची क्षमा मागितली. पण नमस्कार मात्र कृष्णाला करून पापमुक्त झाल्या. त्यांचा प्रामाणिक भाव पाहून भगवान श्रीकृष्णांनी आपली कृपादृष्टी त्यांच्या वरून फिरविली. सर्वांची वस्त्रे परत दिली.

वस्त्रे परिधान करून त्या गोपी लाजेने लाल होऊन कृष्णावर नजर स्तब्ध करून हात जोडून उभ्या राहिल्या. त्यांना मनातून भगवंताला साष्टांग नमस्कार करायचा होता पण त्या तटस्थ उभ्या राहिल्या. भगवान श्रीकृष्ण त्यांचे मनोगत जाणून म्हणाले, " हे साध्वी कुमारीकांनो! तुम्ही माझ्या प्राप्तीसाठी हे व्रत करीत आहात हे मी जाणले आहे. तुमची अभिलाषा मी जरूर पुरी करीन. आपले मन मला अर्पण करून माझ्या प्राप्तीची इच्छा करणारा भक्त निरिच्छ होतो. त्यामुळे हे बालिकांनो तुम्ही आता निश्चिंत मनाने घरी जा! तुमची माझ्या सहवासाची इच्छा पूर्ण होईल."

गोप कुमारिका गेल्यावर सर्व गोप बालके पटापट उड्या मारून बाहेर आली. मग कृष्ण त्या सर्वांना घेऊन दूर वनात गाई चारण्यास घेऊन गेले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

## ।।श्रीगुरु:शरणं।।

## श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

## पुष्प १४६ वे (अध्याय २३ पूर्ण)

### ऋषी पत्न्यांना श्रीकृष्णांचा आशिर्वाद

गोप कुमारिका आपल्या घरी निघून गेल्यावर आपल्या सवंगड्यांना घेऊन कृष्ण लांब जंगलात गाई चारण्यास घेऊन गेले.

दुपारची वेळ झाल्यावर गोप बालके, बलराम कृष्णांना भूक लागली म्हणू लागले. तेंव्हा श्रीकृष्णांनी जवळच असलेल्या आश्रमात चाललेल्या यज्ञस्थानी पाठवून " बलराम व कृष्णानी आम्हाला पाठवले आहे. आम्हाला भुका लागल्या आहेत. ह्या यज्ञात मध्यावधी सोडून भोजन निषेध नसल्याने आम्हाला भोजन देण्यास हरकत नाही. तर काही तरी खायला द्या." असे मागायला सांगितले. बलराम कृष्ण यांनी सांगितल्या प्रमाणे गोप बालके आनंदाने यज्ञस्थानी आले. त्यांनी अत्यंत विनयाने ब्राम्हणांना नमस्कार करून, बलराम व कृष्णाचा निरोप सांगितला. पण कर्मकांडात व्यस्त झालेल्या त्या ब्राम्हणांनी त्यांच्या कडे लक्ष न दिल्यामुळे ते निराश होऊन कृष्णाकडे परतले.

तेंव्हा भगवान श्रीकृष्ण हसून म्हणाले. "काही काळजी करू नका. तुम्हाला हवे तेवढे भोजन प्राप्त होईल. तुम्ही आतां त्याच यज्ञशाळेच्या पाकशाळेतल्या ब्राम्हण स्त्रियांकडे जाऊन माझा निरोप सांगा कीं बलराम व कृष्ण इथे आलेले आहेत. त्यांना व आम्हाला भोजन हवे आहे." त्याप्रमाणे गोप बालके लगेच मोठ्या उत्साहाने यज्ञस्थानी असलेल्या पाकशाळेत आले. पाकसिद्धी करून प्रसन्नतेने स्वस्थ बसलेल्या ऋषीपत्न्यांना नमस्कार करून त्यांना बलराम व कृष्ण यांचा निरोप सांगितला.

त्या ब्राम्हण पत्न्यांच्या मनात भगवान श्रीकृष्ण व बलराम यांच्या बद्दल अपरंपार आदर व प्रेम होते. त्यामुळे ते दोघे इथे जवळच आले आहेत व भोजनाची याचना करीत आहेत हे ऐकून त्या स्त्रिया अति भाव विवश झाल्या. बलराम-कृष्ण यांच्या दर्शनास अधीर होऊन त्यांनी भरभर पक्वान्नांनी भरलेली ताटे तयार केली व त्या निश्चिंत मनाने निघाल्या.

इतक्यात त्यांच्या पती, भाऊ, इत्यादी आप्तांनी कडकडून विरोध केला. पण ऋषीपत्न्या कृष्ण प्रेमाने कृष्णमय झाल्या होत्या. कृष्ण दर्शनाच्या ओढीमुळे त्यांनी त्या विरोधाला जुमानले नाही. सर्वस्वाचा त्याग

करून आपण आतां आश्रमात परत येऊच शकणार नाही अशा तयारीनेच त्या निघाल्या होत्या. लगबगीने त्या बलराम व कृष्ण जिथे होते तिथे आल्या. पक्कान्नांची ताटे बलराम-कृष्ण व गोप बालके यांना अर्पण करून त्या देहभान हरपून भगवान बलराम व श्रीकृष्ण यांच्याकडे एकटक पहात उभ्या राहिल्या. आपल्या अंतरात परब्रम्ह भेटल्याचा आनंद त्या स्त्रिया अनुभवत होत्या.

सर्वांतर्यामी भगवान श्रीकृष्णांनी त्यांची ही स्थिती जाणली. इतकेच नाही तर आपण पतीची अवज्ञा करून इथे आल्यामुळे आतां संसाराचा त्यागच करावा लागणार असल्याची जाणीवही त्यांच्या अंत:करणात असून त्या बद्दल त्यांना कुठल्याच प्रकारचा खेद वाटत नसल्याचेही भगवंताने जाणले. त्यामुळे स्मित करून भगवान श्रीकृष्ण म्हणाले, " हे भाग्यशालिनी ललनांनो! तुम्हा सर्वांचे स्वागत असो. तुम्ही साऱ्याजणी केवळ माझ्या दर्शनासाठी आल्या आहत हे मी जाणतो. आज तुम्हाला जी स्थिती प्राप्त झालेली आहे ती केवळ तुमच्या निष्काम भक्तीमुळेच झालेली आहे. निष्काम भक्त मला अत्यंत प्रिय असतो. त्यामुळे मी तुमचे काय प्रिय करू? आतां तुम्ही यज्ञस्थानी परत जा! कारण यज्ञकर्मात तुमच्या सहयोगाची त्यांना आवश्यकता असल्यामुळे तुमचे पती तुमची वाट पहात असतील."

भगवान श्रीकृष्णांचे हे बोलणे ऐकून त्या ललना आपली असहायता व्यक्त करीत म्हणाल्या, " हे प्रभो! असे निष्ठुर होऊ नका. आपण अनाथांचे नाथ, भक्तवत्सल, शरणागत वत्सल अशा शब्दांनी शास्त्रात वर्णिले जाता. मग आपल्या चरणी आत्मार्पण केलेल्या आमचा कां बरे त्याग करीत आहात? आम्ही आमच्या पती व इतर आप्त यांच्या विरोधास न जुमानता आपल्या चरणी आलो असल्यामुळे आमचा परतीचा मार्गच खुंटला आहे. त्यामुळे आपल्या दासी म्हणूनच आम्ही आतां आपली चरणधूळ मस्तकी धारण करून इथे वनातच राहू. तुझ्या चरणां खेरीज आम्हाला आतां कोठेच थारा मिळणार नाही हे आम्हाला पक्के ठाऊक आहे. त्यामुळे आतां तार किंवा मार." असे म्हणून त्या कृष्णापुढे नतमस्तक झाल्या.

त्यांचे हे निस्सीम भक्तिप्रेम पाहून भगवान श्रीकृष्ण म्हणाले, " हे ब्राम्हणींनो! उठा अत्यंत निर्भयतेने परत जा! तुमचा स्वीकार केला जाईल! मी स्वत:च तुमच्या पतींना व संबधितांना समजाऊन सांगेन. इतके कीं देवगणही त्याला अनुमोदन देतील. देहाने माझ्या बरोबर राहणे समाज विघातक होईल. त्यामुळे सध्या तुम्ही जसे मला अंत:करणात धारण केले आहे तोच मार्ग योग्य आहे. माझ्या लीलांचे स्मरण करणे, मानसपूजा करणे,ध्यान धरणे ह्या मार्गाने तुम्ही माझ्याच सान्निध्याचा अनुभव घ्याल. त्याने तुमचे माझ्यावरचे जितके प्रेम वाढेल तेवढे माझ्या जड देहाच्या सान्निध्याने ते वाढणार नाही. त्यामुळे तुम्ही आतां आपल्या घरी जाणेच योग्य आहे.

भगवंताच्या या बोलण्याने त्या ऋषीपत्न्यांच्या मनात दृढ विश्वास उत्पन्न झाला. बलराम-कृष्णांना साष्टांग दंडवत घालून त्या आत्मविश्वासाने स्वगृही परतल्या. सर्व ब्राम्हणांनी त्यांचे मन:पूर्वक स्वागत केले. यज्ञ आनंदात पूर्ण झाला.

सर्व स्त्रिया जेंव्हा कृष्णाकडे जाण्यास निघाल्या होत्या त्या वेळी एका ब्राम्हणाने आपल्या पत्नीला हट्टाने कोंडून ठेवले होते. त्यामुळे ती कृष्ण दर्शनाला जाऊ शकली नव्हती. यज्ञ पूर्ण झाल्यावर जेंव्हा इतर

स्त्रियांच्या तोंडून कृष्ण दर्शनाची लीला श्रवण करू लागली तेंव्हां तिचा कृष्णभाव अति तीव्र झाला व कृष्ण दर्शनासाठी ती तळमळू लागली. भगवान श्रीकृष्णांना तिने मनातल्या मनातच दृढ आलिंगन दिले. त्याक्षणी तिची भक्ती इतकी तीव्र झाली कीं भगवंताच्या त्या आलिंगनातच ती देह सोडून कृष्ण चरणी लीन झाली. तिची भक्ती श्रेष्ठ ठरली.

यज्ञस्थानी असलेल्या सर्व ब्राम्हणांना तीव्र पश्चात्ताप झाला. आपल्या कृतीला दोष देत ते म्हणू लागले ,"अहो! आम्ही किती मूर्ख! ह्या स्त्रियांवर आमच्यासारखे वैदिक संस्कार झालेले नाहीत वा ना कुणा अध्यात्मिक गुरूंच्या सहवासात तपाचरण करण्यास राहिल्या! पण केवळ भाव व भक्ती ह्यांच्या बळावर त्या परमेश्वराचे दर्शन घेऊ शकल्या. पण कर्म कचाट्यात सांपडून आम्ही पापीच ठरलो! गवळयाच्या रूपात प्रगट झालेल्या परब्रम्हाला आम्ही जाणू शकलो नाही. भगवंताचे आणि भगवंतासाठी बनवलेले अन्न भगवंताचे सेवक मागत असतानाही आम्ही अहंकाराने त्यांना दिले नाही. ते आमच्या स्त्रियांनी परिणामाची पर्वा न करतां सहजतेने व भक्तिभावाने त्यांना अर्पण केले. आम्हीच आमचा धिक्कार करतो.

अशाप्रकारे त्या ब्राम्हणांनी पश्चात्ताप व्यक्त करून मनोमन श्रीकृष्णांना नमस्कार केला. त्यांना श्रीकृष्ण दर्शनाची इच्छा होती पण कंसाच्या भयाने ते गेले नाहीत. भगवान श्रीकृष्णांनी सर्व ऋषीपत्न्यांना आशीर्वाद देऊन परत पाठवल्यावर कृष्णाने प्रथम सगळया गोप बालकांना पोटभर खायला घातले व नंतरच स्वत: खाल्ले. दिवस उतरतीला लागल्यावर सगळे गोकुळात परतले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

पुष्प १४७ वे (अध्याय २४ व २५ पूर्ण)

## गोवर्धन पूजा

वृंदावनात नंदमहाराजांसह सर्व थोरांची प्रतिवर्षाप्रमाणे करावयाच्या इंद्र-यागाची तयारी सुरु झाली. ती धावपळ पाहून इतर श्रेष्ठी व गुरुजन यांच्या उपस्थितीत कृष्णाने पित्याला विनयाने विचारले, " तात! आपण मला या यागा मागच हेतू समजावून सांगाल कां? कारण कोणतेही सत्कर्म जाणीव पूर्वक भक्तीने ईश्वरार्पण केल्यास ईहजन्मातच त्याचे फळ मिळते अन्यथा ते सुकृतात जमा होते." हे ऐकून नंद महाराज म्हणाले, " इंद्र-देवता मेघांचा स्वामी आहे. आपल्याला धान्य व गोधनाला चारा मुबलक मिळावा म्हणून त्याने योग्य प्रमाणात पाऊस द्यावा व त्याला आहुती देऊन उर्वरित प्रसाद भक्षण करण्याने धर्म, अर्थ, काम व मोक्ष ह्या चार पुरुषार्थांची प्राप्ती होते." हे ऐकून कृष्णाने आपले विचार प्रकट केले, " पूर्वजन्मातल्या कर्मामुळे प्रारब्ध निर्माण होऊन त्यानुसार जीव सुख-दु:खादीचा अनुभव घेत असतो. ते प्रारब्ध इंद्र कसा काय बदलणार? प्रारब्ध तर फक्त सद्गुरु म्हणजे परब्रम्ह बदलू शकतात. त्यामुळे खऱ्या अर्थाने सध्या आपल्याला सर्व सुखसोयी ज्या गोवर्धन पर्वताद्वारे प्राप्त होतात म्हणून गोवर्धन पर्वताचे पूजन आपल्याला नेहमीच फलदायी होईल असे मला वाटते. कारण आपण जंगलात रहात असून जंगल व पर्वत हेच आपलेअन्नदाते आहेत. त्यातही सर्वात उपयुक्त गोवर्धन पर्वत आहे. त्रिगुणात्मक प्रकृतीचे संचालन करणारा ईश्वर! त्या ईश्वराच्या प्रेरणे मुळेच सर्व देव-देवता कार्यरत होत असतात. त्याला नद्या पर्वत मेघ कोणीच अपवाद नाहीत. मग आपल्याला भरभरून सौख्य देणाऱ्या गोवर्धनालाच उपास्य दैवत मानून इंद्रा ऐवजी त्याची पूजा केली तर ती फलदायी होईल असे मला वाटते. त्यामुळे आपण भरपूर प्रमाणात पंचपक्वान्ने करून ती गोवर्धनाला अर्पण करू! तो एकदम खुश होईल व आपल्याला हवे ते देत राहील. आपण भेदभाव न करता भरपूर अन्नदान करू. सर्वजण तृप्त झाल्यावर नटूनथटून उत्साहाने ब्राम्हण व यज्ञकर्ते यांच्या सह गोवर्धन पर्वताला प्रदक्षिणा करू." हे तात! मला जे योग्य वाटते ते मी सांगितले. आतां आपणा सर्वांना जर ते पटले असेल तर मला फार आनंद होईल. ह्या यज्ञामुळे आपण गाई, ब्राम्हण व गोवर्धन पर्वत ह्या सर्वांच्याच कृपेला पत्र होऊ. भगवान श्रीकृष्णांनी इंद्राला झालेला गर्व उतरवण्यासाठीच हा प्रस्ताव मांडला होता. कृष्णाच्या मधुर बोलण्याने व सुसंगत विचार मांडण्याने नंदासह सगळेच प्रभावित झाले व त्यांनी

गोवर्धन पर्वताच्या पूजनाचा प्रस्ताव आनंदाने मान्य केला. लगेच नजीकच्या सुमुहूर्तावर गोवर्धन पर्वताचे पूजनही करण्यात आले. नैवेद्यासाठी अमाप पक्वान्ने बनवण्यात आली. अपार दानधर्म झाला. भरपूर अन्नदान झाले. नंतर गाई, बैल, वासरे, गोप बालके, गोप गोपी सगळे सगळे सजून, नवीन वस्त्रालंकार धारण करून कृष्णाचे यशोगान गात पर्वता भोवती प्रदक्षिणा करू लागले. प्रदक्षिणा करताना सर्वांची गोवर्धन पर्वतासह आपल्यावरील श्रद्धा दृढ व्हावी म्हणून भगवान श्रीकृष्ण विराट रूपाने पर्वतात प्रवेशले व " मी गोवर्धन पर्वत तुमच्या भेटीचा स्वीकार करीत आहे. तुम्हा सर्वांचे कल्याण असो!" असे म्हणून नैवेद्याचा स्वीकार केला. त्यावेळी सर्वजण गोवर्धन पर्वताकडे आश्चर्याने पाहू लागले. आणि कृतज्ञतेने त्यांनी नमस्कार केला. भगवान श्रीकृष्णांनी सुध्दा सर्वांबरोबर गोवर्धन पर्वताला नमस्कार केला. अशा प्रकारे आनंदोत्सव साजरा करून सर्वजण उत्साहाने व्रजास परत आले. वृंदावनातल्या गवळयांनी एका मुलाचे ऐकून आपला याग न करता गोवर्धन पर्वताचा याग केल्याने इंद्र संतापला. इंद्राने सारासार विचार न करता संवर्तक मेघाला (प्रलय करणारा मेघ) वृंदावनाचा विध्वंस करण्याची आज्ञा दिली. इंद्राच्या आज्ञे प्रमाणे संवर्तक वृंदावनावर हत्तीच्या सोंडेसारख्या जाड जलधारांनी अकाली पडू लागला. त्याच्या पाठोपाठ इंद्राने वायुदेवतेलाही प्रचंड वेगाने वृंदावनावर जाण्यास सांगितले. भयंकर पावसाने व वादळाने दाणादाण उडालेले व्रजवासी, होते तसे आपल्या बायका-मुलांना व गोठ्यातल्या जनावरांना घेऊन जीव वाचवण्यासाठी कृष्णाकडे धांवत आले. कृष्ण मनात म्हणाला सत्वगुणातून या देवतांची नेमणूक करूनही ह्यांचा उन्मत्तपणा वाढतच आहे. हा इंद्र स्वत:ला ब्रम्हांडाचा स्वामीच समजू लागलेला दिसतोय! त्यामुळे यांचे अज्ञान दूर केलेच पाहिजे. असा विचार करून त्रैलोक्याधिपती भगवान श्रीकृष्णांनी सगळयांना गोवर्धन पर्वतच आपले रक्षण करील असे आश्वासन दिले. त्वरित सगळे आपल्या गोधनासह व बायका-मुलांसह कृष्णाच्या मागोमाग गोवर्धन पर्वताजवळ आले. आणि भगवान श्रीकृष्णांनी सर्वांसमक्ष गोवर्धनाला आपल्या हाताने सहज उचलून एखाद्या छत्री सारखे उंच धरले. मग सगळयांना त्याच्या आश्रयाखाली येण्यास सांगितले. व्रजवासी अत्यंत आनंदाने आपल्या परिवारासह व गोधनासह त्या पर्वताखाली नि:शंक मनाने आले. सात दिवस घनघोर पाऊस व वारा होता. पण पर्वता खालच्या समतल भूमीवर गाई-वासरांसह, आपल्या शेतीच्या बैलांसह व परिवारासह गोप-गोपी, नंद-यशोदा, ब्राम्हण-पुरोहित इत्यादी सगळे सात दिवस अहोरात्र तहान-भूक इत्यादी शरीरधर्म विसरून मोठ्या कौतुकाने कृष्णाकडे एकटक पहात होते. भगवान श्रीकृष्णांचे हे अलौकिक योगसामर्थ्य पाहून चकित झालेल्या इंद्राने स्वत:च्या कृत्याची लाज वाटून सर्वत्र शांतता प्रस्थापित केली. निरभ्र झालेल्या आकाशातून सूर्यप्रकाश आला. भगवान श्रीकृष्णांनी सर्वांची भावसमाधी उतरविली व म्हणाले, " व्रजवासियांनो! चला, निर्भयपणे पर्वताखालून बाहेर पडा! वादळ-पाऊस थांबला आहे. नदीचे पाणीही उतरले आहे. आपल्या मुक्कामी जाऊ या! सर्वजण पर्वताखालून आनंदाने बाहेर आले. मग भगवान श्रीकृष्णांनी हळूच पर्वत होता तसा जागेवर ठेवला. पर्वत खाली ठेवताच कृष्णाला नंद यशोदेने आपल्या हृदयाशी कवटाळले. मित्रांनी व बलरामांनी कृष्णाला उचलून घेतले, ब्राम्हणांनी आशिर्वाद दिले. असे प्रत्येकाने आपल्या परीने आदर व प्रेम व्यक्त केले. मग सगळे आनंदाने व्रजात परतले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

पुष्प १४८ वे (अध्याय २६,२७ व २८ पूर्ण)

## कृष्णाच्या अद्भुत लीलांचे स्मरण

गोवर्धन पर्वत धारण केल्यामुळे कृष्णाला अपोआप गोवर्धनधारी म्हणून संबोधून व्रजातील सर्व आबाल वृध्द कौतुक करू लागले. एकमेकांत कृष्णाच्या अलौकिक सामर्थ्याचे आश्चर्य व्यक्त करूं लागले. उपनंदादी ज्येष्ठ गोप नंदमहाराजांना म्हणू लागले, " महाराज! आपण फार थोर आहात. आपल्या पोटी कृष्णा सारखे दिव्य नररत्न जन्माला आले आहे. पण आम्हाला एक फार मोठा प्रश्न पडला आहे कीं आपण हे असे जंगलात राहणारे गवळीलोक. आणि अशा हलक्या लोकांमध्ये इतका लोकोत्तर पुत्र आपल्या पोटी कोणत्या पुण्याईने जन्माला आला आहे? अहो! सातव्या वर्षी गोवर्धनपर्वत एखाद्या कमळा सारखा उचणारा पुत्र म्हणजे काही सामान्य गोष्ट नाही! त्यामुळे पुतनेला, तृणावर्ताला मारणारा आपलाच पुत्र आहे हे निश्चित. तसेच धड चालता येत नसताना व उखळाला बांधलेला असताना दोन्ही वृक्ष उखडणारा आपलाच पुत्र आहे. हे आतां नक्की झाले. चोच फाडून बकासुर मारणारा, ताडवनातल्या धेनुकासुराला साथीदारांसह मारणारा आपलाच पुत्र आहे. त्याच्या कृपेनेच आतां आम्ही निश्चिंत मनाने ताडवनात जाऊ शकतो. यमुनेच्या डोहातल्या कालीयाचा माज उतरवून त्याला हाकलून देण्याचे अघटीत कृत्य करणारा आपलाच पुत्र कृष्ण आहे. त्यामुळे हे नंद महाराज! आपल्या या पुत्राचे सर्व गोकुळाला जे प्रेम वाटते त्याचे काय रहस्य आहे? हा कुणी महान् देव आहे कां?"

हे ऐकून नंदमहाराज म्हणाले, " मला गर्गमुनींनी हा युगायुगात अवतरणारा परमात्मा आहे असे सांगितले होते. अनेक कारणांनी याने पूर्वी वसुदेवाच्या पोटी जन्म घेतलेला असल्याने हा वासुदेव म्हणूनही ओळखला जाईल. तसेच याच्या दिव्य कर्मामुळे याला अनेक नावे आहेत. पण ती गर्गमुनींना ज्ञात आहेत. गर्ग मुनींनी असेही सांगितले आहे कीं ज्या असुरांचे दमन इतर देव करू शकत नाहीत त्यावेळी कृष्णाचा अवतार होतो. तेंव्हा हा कृष्ण म्हणजे साक्षात नारायणच आहे. असे म्हणता म्हणता नंद महाराजांची भावसमाधी लागली.

गोपांना अतिशय आनंद झाला व त्यांनी नंद-यशोदा, रोहिणी, बलराम-कृष्ण यांचे पूजन करून मोठाच उत्सव साजरा केला. त्यात सगळेच व्रजवासी उत्साहाने व प्रेमादराने सामील झाले. गोकुळातल्या

सगळयाच्या सगळया गोधनाचे रक्षण भगवान श्रीकृष्णांनी केल्यामुळे कामधेनू सुरभीला अतिशय आनंद झाला व ती भगवान श्रीकृष्णांच्या दर्शनास निघाली. इंद्राला आपल्या अविवेकी कृत्याचा चांगलाच पश्चात्ताप झाला होता. त्यामुळे सुरभी बरोबर तोही कृष्ण दर्शनास आला. कृष्णाला एकांतात पाहून त्याने आपला मुकुट कृष्णचरणी अर्पण केला व कृष्णचरणी लोळण घेतली. क्षमा मागितली. इंद्राचा गर्व हरण झाला होता. भगवान श्रीकृष्ण हे साक्षात परब्रम्ह असल्याची त्याला पूर्ण जाणीव झाली. त्याजाणीवेतून इंद्राने आपला उद्धटपणा व उन्मत्तपणा कबुल करून भगवंताची क्षमा मागितली व यथोचित शब्दात स्तुती केली.

तेंव्हा भगवंत म्हणाले, " इंद्रा, मी तुझ्यावर दया आल्यामुळेच तुझा यज्ञ रोखला आहे. तुझा उन्मत्तपणा मला कमी करावयाचा होता. त्यामुळे आता तुला सदैव माझे स्मरण राहील. व आपले कर्तव्य पार पाडताना तूं विनाकारण आपल्या सामर्थ्याचा अभिमान बाळगणार नाहीस. तुम्हा देवांची सगळी सामर्थ्ये माझी असल्याची जाणीव ठेऊन वागायला शिक."

भगवान श्रीकृष्ण बोलण्याचे थांबताच सुरभी नमस्कार करून म्हणाली " हे विश्वात्मन आपण सर्व गोधनाचे रक्षण केल्यामुळे आपण संपूर्ण गाईंचे इंद्रपद भूषवले आहे म्हणून आपण साक्षात गोविंद झाला आहात. ब्रम्हदेवांच्या आदेशाचे पालन करण्यासाठी आम्ही आपणास दुग्धाभिषेक करणार आहोत. असे म्हणून सुरभीने भगवंताला आपल्या दुधाने अभिषेक केला. इंद्राने ऐरावताच्या सोंडेतून आकाश गंगेच्या जलाने भगवंताला अभिषेक करून आपल्या मातेच्या आदेशाचे पालन केले. त्यावेळी या सर्व सोहळयावर आकाशस्थ देव-देवतांनी स्तुती सुमनांचा वर्षाव केला. अप्सरांसह सर्व देवपत्न्यांनी अपूर्व नृत्य केले. दिव्य पुष्पांच्या वर्षावात भगवंताच्या 'गोविंद" नावाचा जयजयकार करीत सर्वजण आपल्या स्थानी निघून गेले. पुढे एकदा एकादशीच्या दिवशी पूजन अर्चन उपवास इत्यादी व्रत करून नंदमहाराज द्वादशीला पहाटेच यमुनेत ब्रम्हसरोवरात स्नानाला उतरले. त्याच वेळी वरुणाचे सेवकही तिथे स्नानासाठी आले होते. त्यांना नंद महाराजांचे त्यावेळी येणे आवडले नाही. त्यामुळे त्यांनी नंदाला उचलून आपला स्वामी वरुण याच्याकडे आणले.

नंद महाराज दिसेनासे होताच बरोबरच्या गोपांनी कृष्णाला सांगितले. क्षणाचाही विलंब न लावता भगवान श्रीकृष्णांनी सूर मारला व वरुणाच्या दरबारात प्रवेश केला. आपल्या दरबारात भगवंताला पाहून वरुणाने हर्षाने त्यांचे पूजन केले व वारंवार नमस्कार करून प्रार्थना केली कीं हे प्रभो माझ्या अज्ञानी सेवकांनी तारतम्य न वापरल्यामुळे हा अपराध घडला आहे. त्याबद्दल आपण मला क्षमा करा. आणि माझ्यावर आपली कृपादृष्टी ठेवा. भगवान श्रीकृष्णांची पूजा पाहून नंद महाराज आश्चर्यचकित झाले. त्यांनी मनोमन जाणले कीं हे साक्षात परब्रम्हाच आहे. यामुनेतून बाहेर येताच नंदानी गोपांना ही गोष्ट सांगितली. तेंव्हा गोपांच्या मनात आले कीं आपल्यालाही कृष्ण असे दर्शन देईल कां? त्यांच्या हे मनात येताच भगवान श्रीकृष्णांनी त्यांना लगेच आपल्या बरोबर घेतले व ब्रम्हसरोवरात डुबकीं मारायला सांगितली. तत्क्षणी सर्व गोपांना वैकुंठाचे व परब्रम्ह स्वरुपात कृष्णाचे दर्शन झाले. त्यांची भक्ती श्रीकृष्ण चरणी दृढ झाली.

हरये नमः। हरये नमः। हरये नमः।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

## पुष्प १४९ वे (अध्याय २९ पूर्ण)

## रासक्रीडा

स्वत: पूर्ण ब्रम्ह असूनही श्रीकृष्णांनी शरद ऋतूंतल्या एका रात्री रासक्रीडा करण्याचे ठरवले. त्यारात्री चंद्र क्षितिजाच्या बराच वर आलेला पाहून त्यांनी यमुनाकाठच्या रम्य वनात बासरी वादनास सुरुवात केली. योगमायेने प्रभावित केलेले बासरीचे ते मधुर सूर ज्या गोपिंसाठी होते त्या सर्व गोपी हातातली कामेच काय पण पिणाऱ्या बालकांनाही बाजूला करून, होत्या तशाच स्थितीत देहभान हरपून कृष्णाकडे धांवत सुटल्या. त्यांनी भौतिक व लौकिक व्यवहाराची पर्वाच केली नाही. अंतर्गृहात असल्यामुळे ज्या जाऊच शकत नव्हत्या त्यांनी आपले नेत्र मिटून श्रीकृष्णाचे स्मरण करून अंतरातच त्याची प्राप्ती करून घेतली व देहबंधनातून मुक्त झाल्या. त्यांचे जीवन धन्य झाले.

परीक्षित राजाने विचारले " प्रभो! जारबुद्धीने चिंतन करून त्या कशा काय मुक्त झाल्या?"

शुकमुनी म्हणाले, " राजन्! अरे शिशुपालादिक अभक्त सुध्दा विरोध भक्तीने श्रीकृष्णाला जाऊन मिळतात तर इथे ह्या गोपींनी आपले सर्वस्व अर्पण केले होते! त्यातून त्यांनी कृष्ण प्राप्तीसाठी केलेल्या कात्यायनी व्रताचे वेळी भगवान श्रीकृष्णांनी स्वत:च्या प्राप्तीचे वचन त्यांना दिले होते. ह्यातले रहस्य असे आहे राजन्! कीं जो कोणी आपला काम, क्रोध अथवा कोणतेही भौतिक कर्म जेंव्हा नि:शेष एकत्वाच्या भावनेने कृष्णार्पण करतो त्यालाच असे मुक्त होता येते. त्यामुळे ह्यात आश्चर्य वाटण्याजोगे काहीच नाही." शुकमुनी पुढे सांगू लागले अशा प्रकारे सगळ्या गोपी आलेल्या पाहून कृष्णाने आपले बासरी वादन थांबवून मोहक हास्य केले आणि गोपींना म्हणाले, 'हे भाग्यशाली गोपींनो इतक्या रात्री तुम्ही वनात येणे अयोग्य आहे. तुमच्या घरातील सर्वजण तुमच्या काळजीने चिंतातूर झाली असतील. आता हे यमुना काठचे सौंदर्य पहा आणि आल्या तशा पटकन आपल्या संसारात परत जा! पतिव्रता स्त्रियांनी असे वागू नये. पतिसेवा व बालकांचे संगोपन हाच तुमचा परम स्त्रीधर्म आहे. व्यभिचार अत्यंत निंद्य आहे व त्याने अध:पतनच होते. लौकिकात तर नाचक्की होतेच पण परलोकीही दु:खच पदरी येते. संसारात राहून माझ्या गोष्टी सांगा, श्रद्धेने

नामस्मरण करा. त्याने जे साधेल ते शरीर संबंधाने साधणार नाही. भक्तिमय नामस्मरण व पूजानादी उपचारांनी मी तुम्हाला प्राप्त होईन. '

कृष्णाचे हे बोलणे ऐकून विषण्ण झालेल्या, डोळयात पाणी आलेल्या, घसा कोरडा पडलेल्या अशा भग्न हृदयी गोपी म्हणाल्या, 'हे प्रभो! आम्ही तुझ्या चरणकमळांच्या आश्रयास आलो आहोत. सर्व संसाराचा व भौतिक सौख्याचा आम्ही त्याग केलेला आहे. तुझा उपदेश अत्युत्तम असला तरी आतां आम्हाला कोणीही घरात घेणार नाही. तुला प्रत्यक्ष पाहून होणारा आनंद आम्हाला आमच्या संसारात होत नाही. त्यामुळे हे कृष्णा आमच्या हृदयात प्रज्वलित झालेला विरहाग्नी केवळ तुझ्या अधरामृतानेच शांत होईल. कारण तो तुझ्या बांसरी वादनाने तूंच निर्माण केला आहेस आणि तूं जर तो शांत करणार नसशील तर आम्ही इथेच विरहाग्नीत आमची आहुती देऊन स्वत:ला नष्ट करून टाकू. आणि तुझ्याच चरणी लीन होऊन जाऊ!

गोपींची ही परमावधीची व्याकुळता पाहून त्यांच्या दास्य भक्तीने प्रसन्न झालेले भगवान श्रीकृष्ण गोपींवर कृपा करण्यासाठी त्यांच्या बरोबर रासक्रीडनात रममाण झाले. गोपींनी फेर धरून भगवंताला आपल्यामध्ये घेतले. प्रफुल्लीत झालेल्या गोपी हातात हात गुंफून कृष्णाची स्तुतिगीते गात गात फेर धरून अतिशय सुरेख नृत्य करू लागल्या. त्यांच्या त्या नृत्याला व गीताला भगवान श्रीकृष्णांच्या बासरीची साथ मिळताच त्यांत स्वर्गीय आनंद भरला गेला. कृष्णाने आपला स्वीकार केल्याच्या आनंदाने गोपी अगदी बेहोष होऊन नाचू लागल्या. आपल्या कौशल्याने भगवान श्रीकृष्णांनी त्यांना यमुनेच्या मुलायम वाळूवर आणले. भगवान श्रीकृष्णांच्या होणाऱ्या स्पर्शामुळे व अविरोध क्रीडनामुळे गोपींच्या मनातल्या दास्य-भावाची जागा हळूच श्रेष्ठत्वाच्या भावनेने घेतली व गोपी स्वत:ला जगातील श्रेष्ठ स्त्रिया समजू लागल्या.

गोपींचा विनीत भाव नष्ट होऊन त्याची जागा आतां गर्वाने घेतल्याचे भगवान श्रीकृष्णांच्या लक्षात आले. भक्तीचा असला तरी गर्व तो गर्वच. "मी" पणाचा गर्व कुणालाच सहन होत नाही तो भगवंताला कसा सहन होणार? गोपींवर अनुग्रह करण्यासाठी त्याच क्षणी भगवान श्रीकृष्ण गुप्त झाले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

## पुष्प १५० वे (अध्याय ३० व ३१ पूर्ण)

## शोकमग्न गोपी व विरहगीत

खेळ ऐन रंगात आल्यावर भगवान श्रीकृष्ण आपल्यातून नाहीसे झालेले पाहून गोपी आपला प्राण हरपल्या सारख्या विव्हल झाल्या. त्या इतक्या सैरभैर झाल्या कीं कृष्णाला शोधताना तिथल्या झाडांना विचारू लागल्या. हे अश्वत्था, हे बकुला, हे प्लक्षा अरे तुम्ही तरी सांगा रे आमचा कृष्ण कुठे आहे? हे मालती, हे मल्लिके, हे युथिके, हे तुलसी अग तुम्ही तरी आमच्या चित्तचोराला कुठे पहिला आहे कां? हे तुलसी अगे तूं तरी नक्कीच पहिले असणार कारण तूं तर त्याची अतिप्रिय आहेस ना? मग सांगा ना आमचा प्राण कुठे आहे ते?"

थोड्या वेळाने त्या इतक्या बेभान झाल्या कीं त्या स्वत:लाच कृष्ण समजून एकमेकींची समजूत घालू लागल्या. एक दुसरीला म्हणू लागली "अग तूं कृष्णाला शोधते आहेस कां? मग माझ्याकडे बघ मीच तो कृष्ण! तूंच ती पुतना कां? ये घे मला मांडीवर मग बघच मी काय करते .... " इत्यादी इत्यादी बोलून कृष्ण लीलांमध्ये मश्गुल झाल्या. इतक्यात त्यांना भूमीवर कृष्णाची पदचिन्हे उमटलेली दिसली. त्यातल्या जरा जास्तच हुशार गोपींनी कृष्णाच्या पदचिन्हाच्या शेजारची दुसरी पदचिन्हे पाहून आपला तर्क सांगितला " अग! आपल्यापैकीच कोणत्यातरी गोपी बरोबर कृष्ण एकांत करावयास गेलेला दिसतोय." असे तर्क करीत करीत पुढे आल्यावर त्यांना फक्त कृष्णाचीच पदचिन्हे दिसू लागली. तेंव्हा त्या मत्सराने उद्गारल्या, " अगबाई! इथून पुढे तर कृष्णाने तिला उचलून नेलेले दिसतेय. कारण कृष्णाची पावले अधिक खोल व स्पष्ट दिसत आहेत."

दुसरी म्हणाली "आम्हा सगळयांना सोडून तिच्या एकटीच्याच वाट्याला हे भाग्य कसे काय आले? कारण कृष्णाला तशी आपल्या कोणाचीच गरज नाही. तो तर आत्मसंतुष्ट आहे." अशा प्रकारचे मनोगत व्यक्त करीत त्या थोड्या पुढे आल्या तो त्यांना एक गोपी हळुवार रुदन करताना दिसली. तेंव्हा इतर गोपींनी तिला सहानुभूती दाखवीत विचारले, "तुझ्या बरोबर कृष्ण होता नां? मग कुठे गेला?" तेंव्हा ती गोपी भावविवशतेने मुळूमुळू रडत म्हणाली "काय सांगू सखयांनो? आम्ही दोघे मौज मस्ती करीत एकांतात

निघालो. मधेच कृष्णाने माझ्या डोक्यात फुले माळली. तेंव्हा मी दमले म्हणाले म्हणून त्याने मला अगदी फुलासारखे अलगद उचलून घेतले. आणि चालू लागला तेंव्हा मनातल्या मनात मी म्हणाले, कीं साऱ्या त्रिभुवनात माझ्यासारखी भाग्यवान कोणी नाही. इतके माझ्या मनांत येता क्षणीच मी इथे एकटी उरले. कृष्ण कुठे नाहीसा झाला हे कळलेच नाही." इतके सांगून ती पुन्हा मुसमुसून रडू लागली. आता सगळया जणी विरहगीत गात कृष्णाला शोधण्यात गर्क झाल्या. गोपी आर्त होऊन म्हणू लागल्या, " प्राणप्रिया, तुझ्या अवतरण्यामुळे ही व्रजभूमी पवित्र होऊन सुजलां सुफलां झाली आहे. तुझ्या वास्तव्यामुळे लक्ष्मी इथे निरंतर वास करू लागली आहे. आम्ही तुझ्या दर्शनासाठी अगदी व्याकूळ झालो आहोत. आम्ही निरपेक्षतेने तुझ्या चरणी अर्पण केलेले जीवन तुझे दर्शन न होण्यामुळे संपलेले तुला आवडेल कां? अरे पुरुषश्रेष्ठा, तूं आम्हाला कालिया, अघासुर, संवर्तकाची अतिवृष्टी, दावानाल इत्यादींपासून वारंवार वाचवलेस ते काय असे वियोग दु:खाने मारण्यासाठी कीं काय? हे सखया! तूं जरी यशोदेचा पुत्र म्हणून ओळखला जात असलास तरी ब्रम्हदेवांनी प्रार्थना केल्यामुळे सात्वतकुळात अवतीर्ण झालेला तूं परमात्माच आहेस. हे आम्हालाही ज्ञात आहे. भवभयाने तुझ्या चरणांचा आश्रय घेणाऱ्यांना अभय देणाऱ्या कृष्णपरमात्म्या तुझा कोमल वरदहस्त तूं आमच्याही मस्तकावर ठेव. आमचा गर्व हरण करणारा तूं वीरपुरुष आहेस. ज्या कोमल चरणांनी तूं कालियाच्या फण्यावर नृत्य केले आहेस ते कोमल चरण तूं आमच्या हृदयावर ठेवून आमची वासनारुपी आग छिन्नभिन्न कर. आत्मज्ञान विकसित होऊन पाप मुक्त करणारे तुझे कथामृत हे विश्वाला मोठे वरदानच आहे. ते आम्ही त्यासाठीच सदैव प्राशन करीत असतो. पण तुझ्या दर्शनच्या ओढीने आमची हृदये शतश: विदीर्ण झाली आहेत. म्हणून हा छळ थांबवून धांवत ये! तूं जेंव्हा गाई चारायला घेऊन जातोस तेंव्हा तुझ्या चरणकमळांना तृणांकुर बोचत असणार या कल्पनेने सुध्दा आम्ही दिवसभर अस्वस्थ असतो. सायंकाळी तूं परत येताना तुझ्या दर्शनात पापण्याच्या उघड झापी मुळे येणाऱ्या व्यत्ययाने सुध्दा आम्ही व्यथित होतो. आणि पापण्या निर्माण करणाऱ्या ब्रम्हदेवाचा तो एक मूर्खपणाच वाटू लागतो. सखया! अरे, आम्ही आमचे पती, पुत्र, बंधू, सासरे, सासू इत्यादी सर्व वडीलधारी माणसांचे सर्व बंध झुगारून अर्ध्या रात्री तुझ्या वेणुनादाने मुग्ध होऊन देहभान हरपून तुझ्या दर्शनास आलो आहोत हे कां तुला ज्ञात नाही? मग इतक्या रात्री आमचा अशाप्रकारे त्याग करून आम्हाला छळणे तुला योग्य वाटते कां? केवळ तुझ्या स्मरणामुळे आम्ही अद्याप जिवंत आहोत ते या आशेवर कीं तूं कृपाळूपणे आम्हाला दर्शन देशील.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

## पुष्प १५१ वे (अध्याय ३२ व ३३ पूर्ण)

## पुनर्मिलन व रासक्रीडा

अशा प्रकारे भाव विभोर होऊन गोपी आर्ततेने भगवान श्रीकृष्णांची प्रार्थना करीत होत्या. पण थोड्याच वेळात भावावेग अनावर होऊन त्यांना काही सुचेनासे झाले. शब्दांऐवजी त्यांच्या नेत्रातून अश्रुधारा व मुखातून सुस्वर रुदानाशिवाय काहीच बाहेर पडेना. त्यांच्या त्या सुस्वर व मधुर रुद्नाचा आवेश इतका हृदयद्रावक होता कीं भगवान श्रीकृष्णांनाही राहावले नाही. त्यांनी आपल्या चेहऱ्यावर मोहक स्मित धारण करून त्या गोपींच्या समूहात प्रवेश केला. झळझळीत पितांबर, हाती दिव्य वेणू, घननील सतेज कांती, सुगंधी वनमाला, मस्तकी मयुरपिच्छ असे ते चैतन्यमय अवर्णनीय व कामदेवाला लाजवील असे मोहक रूप पाहून सगळ्या गोपी एकदम नवचैतन्याने उजळून निघाल्या आणि एकदमच उभ्या राहिल्या. एकीने आनंदाने श्रीकृष्णाचा हात आपल्या हातात घेतला, एकीने त्याचा बाहू आपल्या खांद्यावर घेतला, एकीने तर भगवंताच्या मुखातला चर्वण केलेला तांबुल आपल्या मुखात धारण केला. एकीने आपल्या हृदयातच श्रीकृष्णाला दृढ आलिंगन दिले. त्या आलिंगनाने तिचे शरीर पुलकित होऊन एखाद्या योग्यासारखी ती परमानंदात मग्न झाली. अशा विविध प्रकारे सर्व गोपी आपले विरह दु:ख विसरून श्रीकृष्ण दर्शनाने भवताप मुक्त होऊन आनंद व्यक्त करू लागल्या. भगवान श्रीकृष्णांनी त्या व्रजबालांना घेऊन यमुना काठी असलेल्या मऊमुलायम वाळूवर प्रवेश केला. शरदातल्या पौर्णिमेमुळे झालेल्या रम्य वातावरणात सगळ्या व्रजसुंदरींनी आपल्या वक्षस्थळा वरील केशराने माखलेल्या ओढण्या एकावर एक रचून भगवान श्रीकृष्णांना बसण्यासाठी आसन तयार केले. त्रैलोक्यातील सर्व सौंदर्य एकवटलेले भगवान श्रीकृष्ण मोठ्या कौतुकाने त्या अपूर्व आसनावर विराजमान झाले. त्रैलोक्याचा स्वामी असा विराजमान होऊन आपल्या दासींचे मनोगत पूर्ण करीत होता. त्यांचा शृंगार रंगात आल्यावर एका गोपीने लटक्या रागाने विचारले, ' हे रे काय मधुसूदना! काही लोक प्रेम करणाऱ्यावर प्रेम करतात. काही लोक प्रेम न करणाऱ्यावरही प्रेम करतात. पण काही जण त्या दोघांवरही प्रेम करीत नाहीत. त्याविषयी आम्हाला थोडे समजावून सांग ना! भगवान श्रीकृष्ण म्हणाले, "सख्यांनो! प्रेम करणाऱ्यावर प्रेम करणारे स्वार्थासाठी प्रेम करतात. त्यात सौहार्द्र किंवा धर्म नसतो. प्रेम न करणाऱ्यावर प्रेम करणारे स्वभावत:च सज्जन, माता-पिता असे हितचिंतक असतात. त्यांचा व्यवहार धर्माधिष्ठित असतो. प्रेम करणाऱ्यावर व न करणाऱ्यावरही जे प्रेम करीत नाहीत

ते चार प्रकारचे असतात. एक आपल्याच स्वरुपात रमणारे, दुसरे कृतकृत्य झालेले, तिसरे आपल्यावर प्रेम करणाऱ्यांची जाणीव नसणारे व चौथे जाणून बुजून द्रोह करणारे असतात. पण सख्यांनो तुमचा राग मी समजू शकतो. कारण मी प्रेम करणाऱ्यावरही प्रेम करीत नाही. हा तुमच्या रागाचा खरा रोख आहे. पण माझ्या प्रिय सख्यांनो, माझा यातला उद्देश एकच असतो कीं माझ्यावर प्रेम करणाऱ्याची चित्तवृत्ती सतत माझ्याकडे लागून राहावी. जसे धनलोभ्याचे सगळे धन एकाकी नष्ट झाले कीं त्याचे हृदय त्या धनाच्या चिंतेने भरून जाते. तसाच मी सुध्दा प्राप्त झाल्यावर पुन्हा अदृश होतो ते केवळ माझ्या भक्तांनी माझे चिंतन करावे म्हणून! पण लौकींकातली सारी बंधने तोडून माझ्याकडे आलेल्या माझ्या लाडक्या गोपींनो मी तुम्हाला कसा बरे सोडून जाईन? तुम्ही साऱ्याजणी माझ्या खऱ्या प्रेमातल्या आहात. तुमच्या खऱ्या प्रेमानेच तर मला ऋणी केले आहे. भगवान श्रीकृष्णांचे हे बोलणे ऐकून गोपींना फार आनंद झाला. त्या भगवंताच्या भोवती फेर धरून उभ्या राहिल्या. मग भगवंतांनी त्यांच्यात मिसळून रासक्रीडा आरंभली. प्रत्येक गोपीला श्रीकृष्ण आपल्या जवळ असल्याचा अनुभव येत होता! असा अद्भुत रास सोहळा सुरु होताच आकाशात ह्या रासोत्सवाच्या दर्शनासाठी शेकडो देव-देवतांच्या विमानांची दाटी झाली. भगवान श्रीकृष्ण रासमंडळात गोपींबरोबर नृत्य करू लागताच वातावरण एकदम धुंद होऊन गेले. रास खेळताना गोपी कृष्णसख्या बरोबर अतीव लाडिक हालचाली करीत बेभान होऊन नाचत होत्या. लहान मुलांनी आरशातल्या आपल्या प्रतीबिम्बाशी खेळावे तशी अनेक रूपे धारण करून श्रीहरी जणू आपल्याच प्रतिबिंबाशी खेळत होते. भगवंताच्या सगुण रूपातल्या अंगस्पर्शाने देहभान हरपलेल्या गोपींचे नृत्य पाहून स्वर्गातल्या अप्सरासुध्दा काम मोहित झाल्या. भगवान श्रीकृष्णांनी गोपींची सगळीच मनोकामना पूर्ण करण्याचे ठरविले होते. त्यांनी सर्व गोपींसह जलक्रीडाही केली." इथे परीक्षित राजाने आश्चर्याने विचारले, " सर्वार्थाने धर्म रक्षण करणाऱ्या भगवान श्रीकृष्णांनी परस्त्री स्पर्शाचे धर्म विरोधी कृत्य कां केले? निरिच्छ ईश्वराने केलेल्या ह्या लीलेचे रहस्य मला सांगा!" शुकमुनी म्हणाले, " वर वर पहाणाऱ्याला हे वर्तन धर्मविरोधी वाटेल हे जरी खरे असले तरी सर्व भक्षक अग्नी जसा कधीच अपवित्र होत नाही तसेच परब्रम्हाचे आहे. परब्रम्हाचे सामर्थ्य अंगी नसलेल्यांनी अशा गोष्टी मनातही आणता कामा नयेत. विचार कर भगवान शिवांनी हलाहल प्राशन केले म्हणून ते इतरांना करतां येईल कां? तसे सामर्थ्य नसताना काही करणे म्हणजे स्वत:चा नाश करून घेणेच आहे! भगवान श्रीहरी सर्व जीवांचे स्वामी आहेत. त्यांच्या बाबतीत कर्मबंधाची कल्पना करता येत नाही. कारण या रुपात जेंव्हा हजारो गोपींसह श्रीकृष्णांची रासक्रीडा चालू होती त्यावेळी त्या त्या गोपांना आपली पत्नी आपल्या जवळ असल्यासारखीच वाटत होती. त्यामुळे हे राजन्! व्रजामध्ये कोणत्याच प्रकारचा असंतोष अथवा खळबळ माजलेली नव्हती. हे काही सामान्य मनुष्याचे कर्म नव्हे! आणि राजन्! ही रास क्रीडा पहाटे पर्यंत चालली होती. गोपींना आपल्या घरादाराचा विसर पडलेला होता. पण भगवान श्रीकृष्णांनी त्यांना देहभानावर आणून आपल्या घरी पाठवले. त्या नाईलाजाने कृष्णाची आज्ञा म्हणून घरी गेल्या. घरी त्यांचे नेहमीप्रमाणे सर्व काम सुरळीत सुरु झाले. परब्रम्हस्पर्शामुळे थकवा वगैरे स्वाभाविक विकार त्यांच्यात त्यावेळी उद्भवले नाहीत. राजन्! श्रद्धा, भक्तीने मनन करणाऱ्याला त्यातील रहस्य समजेल व तो स्वत:ही काम विकारमुक्त होईल.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

## पुष्प १५२ वे (अध्याय ३४ व ३५ पूर्ण)

## युगलगीत

शुकमुनी पुढे सांगू लागले, " राजन्! एका शिवरात्रीला भगवान श्रीकृष्ण गोकुळवासियांसह अंबिकावनात गेले होते. सर्वांबरोबर अंबिकादेवीचे दर्शन, पूजन, दानधर्म इत्यादी सगळे झाल्यावर भगवान श्रीकृष्ण सवंगड्यांसह जत्रेची मौज लुटत होते. सूर्यास्त झाल्यावर सगळे सरस्वती नदीच्या तीरावर पथाऱ्या पसरून विश्रांती साठी पडले. दमल्यामुळे सगळे लगेच निद्राधीन झाले.

थोड्याच वेळात एक भयानक अजगर नंदमहाराजांना गिळू लागला. नंदना लगेच जाग आली. त्यांनी कृष्णाचा धावा केला. त्यांचा आरडा ओरडा ऐकून गोप उठले व नंद महाराजांची अजगारच्या तावडीतून सुटका करण्याचा प्रयत्न करू लागले. लाठ्या-काठ्या, जळते कोलीत इत्यादी कशाचा उपयोग होईना. इतक्यात नंदाचा नंद कृष्ण तिथे आला. त्याने अजगराच्या मुखाला चरणस्पर्श केला. आणि चमत्कार झाला कीं तो अजगर नंद महाराजांना सोडून एका दिव्य पुरुषाच्या रुपात हात जोडून भगवान श्रीकृष्णांसमोर उभा राहिला. दिव्य अलंकाराने नटलेल्या त्या पुरुषाने भगवान श्रीकृष्णांना साष्टांग नमस्कार केला.

तेंव्हा इतरांना कळावे म्हणून भगवान श्रीकृष्ण त्याला म्हणाले, " अरे! इतक्या दिव्य सौंदर्याने व ऐश्वर्याने झळकणारा तूं या किळसवाण्या योनीत आलास कसा?" तेंव्हा तो दिव्य पुरुष म्हणाला, " हे प्रभो! मी पूर्वीचा सुदर्शन नामक विद्याधर आहे. पण माझ्या सौंदर्याच्या व ऐश्वर्याच्या मदात मी एका ऋषींच्या कुरूपतेला पाहून हसलो. त्यांच्या शापाने मला ही योनी प्राप्त झाली. हे माझ्या पापाचे फळ. पण आत्तां आपल्या चरण स्पर्शाने माझे सर्व पाप नाहीसे होऊन मी पूर्वपदी आलो आहे. प्रभो! आपल्याच चरणांच्या स्मरणाने लोक भवसागर तरुन जातात. इथे तर मला आपल्या चरणाचा स्पर्श झाला आहे. मी आपणास शरण आहे." असे म्हणून सुदर्शनाने भगवान श्रीकृष्णांना साष्टांग नमस्कार करून प्रदक्षिणा घातली व भगवंताच्या अनुमतीने स्वस्थानी गमन केले.

पुढे व्रजात परतल्यावर काही दिवसांनी बलराम व कृष्ण गोपींसह रात्रीच्या रम्यवेळी वनविहार करीत होते. गोपी बलराम-कृष्णांचे भाव-विवशतेने गुणगान करू लागल्या. त्याच वेळी भगवान बलराम-कृष्ण समयोचित राग आळवू लागले. गोपी तल्लीनतेने ऐकू लागल्या. त्यावेळी कुबेराचा शंखचूड नामक एक यक्ष तिथे आला. भगवान श्रीकृष्ण व बलराम यांच्या समोरच आपल्या पाशवी शक्तीने सर्व गोपींना पळवून नेऊ लागला. गोपींचा धावा ऐकून बलराम व कृष्ण दोघेही शंखचुडाचा पाठलाग करू लागले. प्राणभयाने घाबरलेला शंखचूड गोपीना सोडून पळू लागला. गोपींच्या संरक्षणासाठी बलराम गोपींजवळ थांबले. श्रीकृष्णांनी जाऊन शंखचूडला गाठले. त्याच्या मस्तकावर प्रहर करून त्याचे मस्तक धडावेगळे केले. त्याच्या मस्तकावरचा मणी काढून घेतला व मग परत येऊन तो मणी बलरामांना अर्पण केला.

भगवान श्रीकृष्णांच्या अनेक लीलांमुळे वेडावलेल्या गोपी कृष्ण विरह सहन व्हावा म्हणून कृष्ण लीलांचे स्मरण करीत दिवस घालवीत असत. त्या एकमेकींना म्हणत, " गे सखये! बासरी आपल्या अधरा जवळ नेउन कृष्ण जेंव्हा हाताच्या बाजूला डावा गाल झुकवतो आणि आपली लांब सडक सुकुमार बोटे बासरीच्या छिद्रांवरून इतकी सफाईने फिरवितो कीं त्या बासरी मधून निघणाऱ्या मधुर स्वरांनी विमानात बसून स्वत:च्या पती बरोबर आकाशातून विहार करणाऱ्या सिद्धपत्न्यासुध्दा काम विव्हल होतात आणि देह भान हरपून बसतात. तिथे आमच्या सारख्यांनी त्याचा विरह कसा सहन करावा ग? अग सख्यांनो याच्या वेणूनादाने दु:खितांचे दु:ख हरण होते. हिरवागार चारा चरणारे गाई बैल व हरीणांचे कळपच्या कळप सुध्दा मुग्धतेने स्तब्ध होतात. चरत असलेले तोंडातले गवतसुध्दा तोंडातच राहते. आणि सर्व जण चित्रातल्या सारखे स्तब्ध होऊन जातात ग बाई! अग सखयांनो! काय सांगू तुम्हाला? हा नंदकिशोर केशर-कस्तुरी-चंदन यांचा टिळा लावून, गळयात सुंदर वनमाला धारण करून वनातून फिरतो तेंव्हा सर्व परिसर केशर-कस्तुरी व चंदनाच्या घमघमाटाने दरवळू लागतो. आणि मग अनेक भ्रमर धाव घेऊन थव्याथव्याने कृष्णा भोवती रुंजी घालू लागतात. तेंव्हा त्या भ्रमरांच्या गुंजारवाचा सूर पकडून नंदकिशोर बासरी वादन करू लागला कीं सारस, हंस, कारंडव इत्यादी पक्षी स्वत:ला विसरून ते गीत ऐकत बसतात. अग हे तर काहीच नाही पण हा नंदकिशोर जेंव्हा पर्वत शिखरावर चढून जातो आणि आपले बासरी वादन सुरु करतो तेंव्हा सारे विश्व त्या सुरांनी मुग्ध होऊन जाते. त्यावेळी ह्या बंसीधराला ऊन लागू नये म्हणून मेघ त्याच्यावर छत्र धरून अगदी मंद मंद तुषार उडवून थंडावा निर्माण करीत असतात. ही यशोदामाता मोठी भाग्यवान आहे ग बाई! कां तर तिचा हा गोपालकृष्ण आपल्या नाजूक व लालचुटुक ओठांवर बांसरी ठेवतो आणि विविध राग आळवू लागतो तेंव्हा ब्रम्हदेव, शिवशंकर, गंधर्व इत्यादी देव सुध्दा कोणते राग आहेत हे न कळल्यामुळे गोंधळून जातात. पण त्याचवेळी त्या रागांनी व त्या सुरावटींनी ते मंत्रमुग्धही होतात. अगे सखये, आमचा नंदकिशोर दिवसभर फिरून दमला असला तरी इतका मोहक दिसतो कीं आम्हाला असेच वाटू लागते कीं हा आमचा विरहताप दूर करण्यासाठीच परत येत आहे." शुकमुनी म्हणाले, " राजन्! कृष्णमय झालेल्या गोपी दिवसभर कृष्णलीलांचे स्मरण करीत त्याच्याच चिंतनाने भक्तिरसात दंग होऊन आपले जीवन धन्य करीत असत."

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

## पुष्प १५३ वे (अध्याय ३६ पूर्ण)

## अक्रुराचे व्रज गमन

एक दिवस भगवान श्रीकृष्ण आपल्या सवंगड्यांसह व्रजात प्रवेश करीत असताना गोप-गोपी, मुले सगळे जीवाच्या आकांताने "कृष्णा धांव~~~ कृष्णा धांव" असे जीवाच्या आकांताने ओरडू लागली. कारण त्यावेळी कंसाने पाठवलेला अरिष्टासूर नामक दैत्य एका विशाल बैलाचे रूप धारण करून आपल्या प्रचंड मोठ्या खुरांनी जमीन उकरीत, शेपटी वर करून, मोठ मोठ्याने हम्बरत व्रजभूमी थरथर कापवीत होता. आपल्या अजस्त्र शिंगांनी त्याने व्रजाचे तट ढासळवले होते. जागोजागी मुतत व शेण टाकीत तो साऱ्या व्रजात धुमाकूळ घालत होता. शरीराने अतिनाजूक व छोटा दिसणारा त्रैलोक्याचा स्वामी तत्क्षणी बैलाच्या हंबरण्याच्या अनेक पट वरच्या व कणखर आवाजात म्हणाले, " भिऊ नका! भिऊ नका!" त्या आवाजात आत्मविश्वास निर्माण करून निर्भय करण्याचे सामर्थ्य होते. त्यामुळे सर्व गोप-गोपी, मुले इत्यादी सगळे जागीच स्तब्ध झाले. तेंव्हा त्रैलोक्य स्वामी श्रीकृष्ण वृषासुराच्या वरच्या पट्टीत आवाज चढवून वृषासुरावर धावून जात ओरडले, " अरे, दुष्टा! महामलीना, खला, निष्ठुरा, या गाई बैलांना व गवळयांना भिववून काय होणार? तुझ्या सारख्या नीच व दुष्ट, पापी व हलकट दैत्यांचा गर्व हरण करणारा मी इथे आहे!" असे म्हणून श्रीकृष्णांनी कानठळया बसवणाऱ्या आवाजात दंड थोपटले. आणि वृषासुराला आपल्या लेखी काडी इतकीही किंमत नसल्यासारखे मित्राच्या खांद्यावर हात ठेवून उभे राहिले. कृष्णाने आपल्याला किटका सारखे झटकल्याचा अपमान वाटून वृषासूर खुरांनी जमीन उकरीत व शेपटी वर करून संतापाने "फ़ोंऽऽफ़ों" करीत आपली तीक्ष्ण शिंगे रोखून कृष्णावर चालून गेला. तो आपल्या जवळ येतांच भगवान श्रीकृष्णांनी एखाद्या खेळातल्या बैलाला खेळवावे तसे त्याच्या शिंगाला धरून त्याला मागे रेटायला सुरुवात केली. अठरा हात मागे रेटून आणि खेळण्यातल्या बैलाला आडवे पाडावे तसे आडवे पाडून सोडून दिले. अधिकच संतापलेला वृषासूर धडपडत उठला. सारे व्रजवासी धडधडत्या छातीने पुढचा प्रकार पाहू लागले. तेंव्हा व्रजवासीयांची ती धडधड थांबविण्यासाठी श्रीकृष्णांनी समोर आलेल्या वृषभाला शिंगांना पकडून दाणकन खाली आपटला. आणि पायाखाली दाबून ओला कपडा पिळावा तसा मुंडी पिळून मारला. मुंडी पिळताना त्याची हाडे मोडू लागली तो आवाज भयानक होता. एवढे होऊनही त्याचा प्राण जाईना. तेंव्हा भगवान

श्रीकृष्णांनी त्याची शिंगे उपटून काढली आणि त्याच शिंगांनी भोसकून त्याला ठार मारला. त्यावेळी तोंडातून रक्त ओकत व विण्मुत्र सोडीत, पाय झटकत, बुबुळे उलटी फिरवून तो अरिष्टासूर गतप्राण झाला. आकाशातून गंधर्व, देव-देवता इत्यादी सर्व स्तुती करू लागले. पण गोपमित्रांनी कृष्णाला मिठी मारून त्याचा हात आपल्या हाताला लावून आपल्या एवढ्याच हाताने त्याने हे अघटीत कृत्य केले म्हणून केलेले कौतुक कृष्णाला अधिक प्रिय वाटले. अरिष्टासुराला कृष्णाने मारल्याची बातमी कंसाला नारदांकडून समजली. नारद कंसाला म्हणाले "अरे! तुझ्या हातून निसटलेली कन्या देवकीची नसून यशोदेची होती. आणि अरिष्टासुराला मारणारा कृष्ण हा देवकीचा पुत्र आहे. तुझ्या भयाने वसुदेवाने त्याला नंदाकडे ठेवले आहे." हे ऐकून कंस संतापला. नारद म्हणाले, "अरे वसुदेवाला जर तुला धडा शिकवायचा असेल तर कृष्णाला वसुदेवाच्या समोर ठार मार! बलरामालाही ठार मार. म्हणजे त्यातून तुझे सामर्थ्य प्रगट होईल.". कंसाला हा विचार पसंत पडला. त्याने लगेच केशी नामक दैत्याला बोलावून बलराम कृष्ण यांना मारण्यास सांगितले. केशी लगेच व्रजाकडे निघून गेला. कंसाने मुष्टिक, चाणूर, शल, तोशल, व माहूत अम्बष्ठ यांना बोलावून कृष्ण व बलराम यांना कुस्तीच्या निमित्ताने मारण्याची योजना सांगितली. त्यासाठी आखाड्याच्या चार बाजूला चार मंच वेग वेगळया ग्राम वासियांना कुस्तीची मौज बघण्यासाठी तयार करा. आखाड्याच्या द्वारावर कुवलयापीड हत्ती उभा करा. बलराम-कृष्ण येताच कुवलयापीड सोडून त्यांना ठार करा. येत्या चतुर्दशीला विधी पूर्वक धनुर्यागाला सुरुवात करा. वरदात्या भूतनाथाला पवित्र पशूंचा बळी द्या. अशा सगळया सूचना दिल्यावर कंसाने अक्रूराला पाचारण केले. स्वार्थ साधण्यात कुशल असलेल्या कंसाने अक्रूर त्याच्याकडे येताच अक्रूराला अत्यंत आदराने व हाताला धरून आपल्या शेजारी बसविले. त्याचा हात आपल्या हातात घेऊन अत्यंत प्रेमाने म्हणाला, " भगवान विष्णूंच्या आश्रयाने इंद्र जसा स्वार्थ साधत असतो तसाच मी तुझ्या आश्रयाने माझा स्वार्थ साधणार आहे. तूं व्रजात जाऊन बलराम व कृष्ण यांना रथात घालून इकडे घेऊन ये! धनुर्यागाच्या निमित्ताने नंद गोपांनाही नजराणे घेऊन येण्यास सांग. बलराम व कृष्ण यांना मी कुवलयापीड सोडून ठार मारणार आहे आणि जर त्यातूनही ते वाचले तर मुष्टिक व चाणूर यांच्या बरोबरच्या कुस्तीत त्यांना मारवीन. ते दोघे मारले गेले कीं मग मी वृष्णीकुळातल्या वसुदेवाला त्याच्या साऱ्या बांधवांसह नष्ट करीन. त्यानंतर माझे मित्र शंबरासुर, नरकासुर, बाणासुर, यांच्या सहाय्याने देवांच्या पक्षपाती राजांना मारून संपूर्ण पृथ्वीचे निष्कंटक राज्य भोगीन. पण यातील एकही गोष्ट नंदाला सांगू नकोस. त्याला फक्त धनुर्यागाचे कारण सांग!" कंसाचे बोलणे ऐकून अक्रूर म्हणाला, " महाराज! आपण आपल्या वरील अरिष्ट दूर करू इच्छिता म्हणून आपला हा विचार योग्यच आहे! पण मनुष्याचे सगळे मनोरथ दैवाधीनतेमुळे सफल होतातच असे नाही. तरीसुद्धा मी आपल्या आज्ञेचे पालन करीन!" असे बोलून अक्रूर आपल्या घरी निघून गेला.

हरये नमः। हरये नमः। हरये नमः।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

## पुष्प १५४ वे (अध्याय ३७ पूर्ण)

## नारदकृत कृष्णस्तुती

कंसाज्ञेचे पालन करण्यासाठी निघालेल्या केशी दैत्याने प्रचंड मोठ्या घोड्याचे रूप घेतले. मोठ मोठ्याने खिंकाळत व आपल्या सुपा सारख्या प्रचंड मोठ्या खुरांनी जमिनीवर आघात करीत, मानेवरील आयाळ झटकीत व्रजाकडे धावत सुटला. त्याच्या अवाढव्य काळया शरीराकडे आणि अंगार ओकणाऱ्या डोळयांकडे पाहून भयभीत झालेल्या व्रजवासियांना पाहून भगवान श्रीकृष्ण मोठ्या सिंह गर्जनेसारख्या आवाजासह केशीच्या समोर आले.

ज्याचा शोध आपण घेत आहोत तो कृष्णच गर्जना करून आपल्या समोर आलेला पाहून चवताळलेला केशी आपला प्रचंड जबडा वासून अशा त्वेषाने कृष्णावर धांवला. जणू तो एका घासातच कृष्णाला गिळून टाकणार. अफाट वेग, प्रचंड शक्ती, विद्युतगतीच्या हालचाली इत्यादी पाहून आपला लाडका कृष्ण आता काय करणार? ह्या विवंचनेत व्रजवासी असतानाच त्या बालरूपातल्या त्रिभुवन स्वामीने केशी पेक्षाही अधिक वेगाने हालचाल केली. व्रजवासीयांच्या डोळयाचे पाते लावते न लावते तोंच भगवान श्रीकृष्णांनी जलद गतीने हालचाल करून त्याचे मागचे पाय पकडले व मग स्वत: जराही न हालता केशीला प्रचंड वेगाने गरगर फिरवून सोडून दिले. केशी चारशे हात दूर फेकला गेला. पण तडफडत उठला आणि परत 'आ' वासून कृष्णाला गिळायला धावला. मग मात्र भगवान श्रीकृष्णांनी त्याच्या वासलेल्या जबड्यात आपला वज्रासारखा कठीण असा डावा हात घातला. आणि इतका तापवला कीं त्या भयानक तप्तस्पर्शाने केशी कासावीस होऊ लागला. घशात घातलेला हात मोठा मोठा होत होता. केशीला असह्य वेदना होऊ लागल्या. हात जसा जसा मोठा होत होता तसा केशीला श्वास घेता येईना. त्याचे डोळे उलटे झाले, तो लीद टाकून घामाने डबडबून निष्प्राण झाला. भगवंताने केशीला त्याच हाताने धाडकन जमिनीवर आपटला. तेंव्हा एखादे चिबूड फुटवे तसा केशी फुटला. मग भगवंताने अलगद आपला हात त्याच्या थोबाडातून बाहेर काढला.

आकाशस्थ देवांना या अद्‌भुत पराक्रमाचे प्रचंड आश्चर्य वाटले. त्यांनी भगवंतावर स्तुतीसुमनासह दिव्यपुष्प वृष्टी केली. नारदाना हा अद्‌भुत प्रकार पाहून भगवंताला एकांतात भेटण्याची ओढ लागली. भगवंताने त्यांना तशी संधी प्राप्त करून दिली.

नारद स्तुती करू लागले, " हे प्रभो! आपले स्वरूप हे मन, वाणी या दोन्हींच्याही आवाक्या बाहेरचे आहे. आपण योगेश्वर असून संपूर्ण चराचराचे स्वामी आहात. आपणास माझा नमस्कार असो! आपले शरीर दिसावायला जरी पंचकोषरूपाने दिसत असले तरी ते तसे नसून स्व सत्तेचे आहे. त्यामुळेच सर्वांचे नियंते आपणच आहात. सर्वान्तिर्यामी असूनही आपण वेगळेपणाने प्रगट होता. हे प्रभो! ह्याच केशी दैत्याच्या अश्वरूपातल्या खिंकाळण्याला भिऊन देवांची पळापळ होत असे. त्याच केशीला आपण आपले बालरूप न मोडता ज्या सहजतेने ठार मारले आहे त्या आपल्या बाल स्वरूपास माझा पुन्हा पुन्हा नमस्कार असो. आपण पूर्ण असूनही मानवरूपाने अवतरून यदु, वृष्णी, अंधक, सात्वत इत्यादीकांचे अग्रणी झालात त्या आपल्याला मी सदैव शरण आहे. आपणास माझे सदैव वंदन असो!" भगवान श्रीकृष्णांची अशी हृद्य स्तुती करून नारद आपल्या विणाझन्कारात कृष्णलीलांचे गायन करीत त्रिभुवनात संचारासाठी निघून गेले. पुढे काही दिवसांनी भगवान श्रीकृष्ण आपल्या सवंगड्यांसह पर्वत माथ्यावर गाई चारत होते. गाईंना चरायला सोडून सगळे गोपाळ करमणूक म्हणून चोर शिपाई हा खेळ खेळू लागले. एक गट चोरांचा, दुसरा शिपायांचा व तिसरा बोकडांचा. त्याचवेळी मयासुराचा पुत्र व्योमासुर कंसाच्या आज्ञेवरून कृष्णाला मारायला तिथे आला होता व तोही एक गोपाळ बनून त्यांच्यात सामील झाला होता. मग तो बोकड झालेल्या मुलांना चोरून घेऊन जाई. एका गुहेत त्यांना बंद करून येई. अशा प्रकारे त्याने पुष्कळ मुलांना गुहेत बंद केले व आता फक्त सहासात मुले व कृष्ण उरलेले पाहून त्याला मोठा हुरूप आला. आता या मुलांसह कृष्णाला आंत टाकले कीं आपले काम झालेच. अशा संभ्रमात येउन त्याने उरलेल्या गोपाळांना उचलून न्यायला सुरुवात केली. इतक्यात लांडग्याला सिंहाने पकडावे तसे कृष्णांनी गवळीरूपातल्या त्या व्योमासुराला पकडले. व्योमासुराची मानगूट भगवंताच्या हाताच्या पकडीत करकचून आवळली गेली होती. प्राण कासावीस होताच व्योमासुराने आपले खरे रूप प्रकट केले. त्याला वाटले कीं आपण आपले खरे अजस्त्र रूप प्रकट केल्यावर कृष्णाच्या पंजातून आपली मान आपोआपच सुटणार! पण त्याला काय माहित कीं ही पकड अंतकाच्याही अंतकाची आहे! संपूर्ण त्रिभुवनाच्या स्वामीची आहे! सर्व शक्तींच्या उगमस्थानाची आहे! त्यामुळे कृष्णांची पकड सैल न होता इतकी आवळली गेली कीं व्योमासुराची हालचालच बंद झाली. तत्क्षणी भगवंतांनी त्याला उचलून धुण्याचा कपडा दगडावर आपटावा तसा जोरात एका दगडावर आपटला. आणि त्याचे नरडे आवळून त्याला ठार केला. भगवंताची ही लीला देव-देवता विमानातून पहात होत्याच. त्यांनी भगवान श्रीकृष्णांवर दिव्य पुष्पांचा वर्षाव करून आपला आनंद व्यक्त केला. नंतर भगवान श्रीकृष्णांनी गुहेवरची शीळा लीलया बाजूला करून आत कोंडलेल्या सर्व बालकांना बाहेर काढले. शीळा दूर करताच ते टणाटण उड्या मारीत बाहेर आले. आणि हातात हात गुंफून त्यावर कृष्णाला बसवून आनंदाने व्रजाकडे निघाले. भगवान श्रीकृष्णही गोपाळांच्या खांद्यावर हात ठेवून त्यांच्या आनंदाशी समरस झाले. गोपाल भगवान श्रीकृष्णांची स्तुती गात गात गाईंना घेऊन व्रजाकडे निघाले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

## पुष्प १५५ (अध्याय ३८ व ३९ पूर्ण)

## अक्रुरांना भगवद्दर्शन

अक्रूर भगवान श्रीकृष्णांना फार मानत होता. कंसाला त्याने तसे कधीच भासू दिले नव्हते. त्यामुळे कंसाने सोपवलेली कामगिरी त्याला मनापासून आवडली होती. मथुरेकडून व्रजात जाताना त्याला आपले पूर्व जन्मीचे तप फळाला आल्याची भावना झाली. भगवान श्रीकृष्ण व बलराम दिसताच मी रथातून उडी मारून त्यांचे चरणकमल वंदिन व आत्मसाक्षात्काराची प्रार्थना करीन. कंसाने जरी मला दूत म्हणून पाठवले असले तरी माझ्या मनातील खरी भावना श्रीकृष्ण नक्कीच जाणतील. अक्रूरकाका म्हणून जेंव्हा ते मला हांक मारून आलिंगन देण्यास येतील त्यावेळी माझे जीवन धन्य झाल्यामुळे मी हात जोडून त्यांच्या समोर उभा राहीन. तेंव्हा त्यांना कुणाचाच द्वेष नसल्यामुळे ते माझ्यावर लगेच प्रसन्न होतील. मग माझे दोन्ही हात आपल्या हातात पकडून मला आपल्या हृदयाशी घेतील. हसत हसत घरात नेउन उत्कृष्ट पाहुणचार करतील. पाहुणचार करता करता विचारतील "काका! कंस आमच्या घरच्या लोकांबरोबर कसा वागतो?"

अशाप्रकारे कृष्णचिंतनात मग्न होऊन अक्रूर सूर्यास्ताला व्रजा जवळ आला. भिरभिरत्या नजरेने श्रीकृष्णांना शोधू लागला. इतक्यात पितांबर नेसलेले श्रीकृष्ण व निलांबर नेसलेले बलराम त्याला दिसले. देहभान हरपून अक्रुराने रथातून उडी मारली. त्याने सद्गद होऊन श्रीकृष्ण चरणी लोळण घेतली. भगवान श्रीकृष्णांनी त्यांना उठवून त्यांचे दोन्ही हात आपल्या हाती घेऊन त्यांना आपल्या हृदयाशी कवटाळले. मग दोघा भावांनी त्यांचे हात धरून त्यांना घरात नेले. उच्चासनावर बसवून सर्व आतिथ्य केले. उत्कृष्ट भोजन दिले. सुगंधी तांबुल दिला. थकवा घालवण्यासाठी पाय चेपून दिले. अक्रुराने व्रजात येता येता ज्या ज्या कल्पना केल्या होत्या त्या सर्व प्रत्यक्षात अनुभवास आल्याने त्याची कृष्णभक्ती दुणावली. सारा शीण नाहीसा झाला.

सुखासनात बसलेल्या अक्रूरकाकांना प्रणाम करून श्रीकृष्णांनी विचारले, " काका! आपण कंसाच्या राज्यातून इथे आमच्याकडे कसे काय आलात? आपले मन अत्यंत निर्मल आहे हे मी जाणतो. पण कंस मामा म्हणजे आमच्या कुळाला जडलेली एक मोठी व्याधीच आहे. मला एका गोष्टीचे राहून राहून वाईट वाटते कीं माझ्यामुळे आपल्या सारख्यांना व माझ्या मात्या पित्या सारख्या सदाचरणी लोकाना हालअपेष्टा सोसाव्या

लागल्या आहेत. माझ्या मात्या पित्यांचा बंदिवास, त्यांचे मारलेले पुत्र हे सारे आठवून फार शीण होतो. आपल्या भेटीने माझी फारा दिवसांची इच्छा पूर्ण झाली आहे. पण आता मला हे सांगा कीं आपण इथे कोणत्या हेतूने आला आहात? "

अक्रुराने कोणतीही लपवा छपवी वा मखलाशी न करता कंसाचा त्यांना कशा प्रकारे मारण्याचा बेत आहे ते सर्व सांगून टाकले. तसेच आपण दोघे वसुदेवाचे पुत्र असल्याचे व मारताना हातातून निसटलेली कन्या यशोदेची असल्याचेही नारदांनी कंसाला सांगितले आहे. आता कंसाने आपल्याला उत्सवाच्या निमित्ताने मथुरेस बोलावले आहे. आपल्याला घेऊन येण्याचे कामच कंसाने माझ्यावर सोपवले आहे." अक्रुराच्या या निष्कपट भाषणावर बलराम-कृष्ण मनमुराद हसले. त्यांनी लगेच नंद बाबांना पाचारण केले कंसाची आज्ञा त्यांना ऐकवली. नंदमहाराजांनी लगेच सर्वांना कळावे म्हणून दवंडी पिटवली कीं , "सगळे दूध एकत्र करा, नजराणे घ्या, छकडे जोडा, आपण उद्याच सकाळी मथुरेला उत्सवासाठी जाणार आहोत. बलराम-कृष्ण यांना नेण्यासाठी अक्रूर महराज आले आहेत." सर्व व्यवस्था होऊन अक्रुरांचा शीण दूर झाल्यामुळे ते शांत झोपी गेले.

बलराम-कृष्णांना अक्रूर उद्या मथुरेस घेऊन जाणार आहेत हे ऐकून गोपी एकाकी हातातली कामे अर्धवट टाकून धपापत्या उराने एकत्र आल्या. जागोजागी त्यांचे गट तयार होऊ लागले. त्यांची तोंडे कोमेजली. डोळे पाणावले. सूं S सूं वाजणारे नाक ओढणीला पुसत त्या एकमेकींकडे आपले दु:ख व्यक्त करू लागल्या. " ह्या विधात्याने हृदय घडवले खरे पण त्याच्या हृदयात दयेचा लवलेशही नाही. आधी मैत्रीने आणि प्रेमाने एकमेकांशी जोडून त्यांच्या मनोकामना पूर्ण होण्यापूर्वीच वियोग घडवतो. मी म्हणते त्या अक्रुराचे जाऊ दे ग! पण आपल्या नंदकुमारांचे काय? ते तरी एका क्षणात आपल्या सगळयांना सोडून निघालेच कसे म्हणते गे मी? अग याच्यासाठीच तर आपण घरदार, सगे सोयरे, पती पुत्र इत्यादी सारे सोडून याच्या दासी झालो अहोत नां? पण आता बसा, कारण मथुरेतल्या युवती आपल्या मोहक हालचालींनी व मधाळ भाषणाने त्यांचे चित्त आपल्या कडे खेचून घेतील. मग आम्हा गावंढळ गौळणींची आठवण त्यांना कशाला येईल? अशा प्रकारच्या विरह व्याकूळ अवस्थेत त्या रात्रभर हे माधवा, हे गोविंदा, हे दामोदरा, असे म्हणून मुसमुसतच होत्या.

त्यांचे मुसमुसणे जरी थांबले नाही तरी रात्र थोडीच थांबणार? पहाट व्हायची तेंव्हा ती झालीच. सूर्योदय झाला. अक्रुरांनी स्नानसंध्या इत्यादी नित्याचे आन्हिक केले. रथ तयार करून बलराम-कृष्ण यांना घेऊन निघाले. पाठोपाठ छकड्यातून नंदही निघाले. इतर सारे गोप व गोप बालकेही निघाली. दुधा दह्याची भरपूर योजना केलेले व अमाप भेटवस्तूंनी भरलेले छकडेही बरोबर निघाले.

इतक्यात विरहव्यथेने व्याकूळ झालेल्या गोपी श्रीकृष्णांना पहाण्यासाठी त्यांच्या रथामागे आल्या. तेंव्हा श्रीकृष्णांनी लगेच मागे वळून पहिले. बस तेवढ्यानेही त्या आनंदित होऊन कृष्णाकडून काहीतरी निरोप येईल म्हणून वाट पहात उभ्या राहिल्या. श्रीकृष्णांनी लगेच आपल्या दूता करवी "मी येईन! काळजी करू नका!" एवढ्या एका निरोपावर गोपी तिथल्या तिथे चित्रातल्या सारख्या तटस्थ उभ्या राहिल्या.

अक्रूर, बलराम व कृष्ण यांच्या सह जेंव्हा यमुनातीरावर आले तेंव्हा एका प्रशस्त घाटावर अक्रूर स्नानासाठी खाली उतरले. त्यांनी पापविनाशी यमुनेची प्रार्थना केली. मग विधीपूर्वक संकल्प उच्चारला व बुडी मारली. त्यावेळी पाण्यात समोरच बलराम व कृष्ण यांना पाहून अक्रूर आश्चर्य चकित झाले. अक्रूराने डोके वर काढून पहिले तों बलराम व कृष्ण रथातच बसलेले दिसले.

त्यामुळे त्याला पाण्यातला भास वाटला व त्याने पुन्हा पाण्यात बुडी मारली तेंव्हां मात्र भगवान श्रीकृष्ण शेषावर विराजमान झालेले आहेत व सिद्ध, चारण, गंधर्व, विद्याधर इत्यादी सर्वजण त्यांची स्तुती करीत आहेत. अवर्णनीय वैभवाने व सौंदर्याने नटलेले ते परब्रम्ह अक्रूर अनिमिष नेत्रांनी अंत:करणात साठवीत होते. अष्टसात्विक भाव जागे झालेले अक्रूर पुढे झाले व आपले मस्तक श्रीकृष्ण चरणी ठेवून धन्य झाले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

## पुष्प १५६ वे (अध्याय ४० व ४१ पूर्ण)

## श्रीकृष्णांचा मथुरा प्रवेश

भावविभोर झालेले अक्रूर सद्गदित कंठाने हात जोडून भगवान श्रीकृष्णांची स्तुती करू लागले, "हे प्रकृती-पुरुष यांच्या पर असलेल्या नारायणा माझा तुला नमस्कार असो! महत्तत्वादी पंचमहाभूते इंद्रियांचे सर्व विषय हे सर्व आपआपल्या अधिष्ठानभूत देवतांमुळे चराचर व्यापून आहेत त्या सर्वांचे मूळकारण असलेल्या आपणास माझा पुन्हा पुन्हा नमस्कार असो. त्रिगुणासह विश्वोत्पत्ती करूनही आपण त्यात लिप्त होत नाही. ह्या आपल्या लीलेस मझा पुन्हा पुन्हा नमस्कार असो. प्रभो आपणच सर्व अनुभूतींचे कारण असून जीव, ईश्वर, प्रकृती, पुरुष इत्यादी जे काही आहे व नाही ते सर्व आपणच आहात. अनंतशक्ती परब्रम्ह आहात आपणास माझा नमस्कार असो. मी आपणास शरण आलो आहे आपण माझे रक्षण करा!"

अक्रूराला देहभानावर आणण्यासाठी भगवंतानी ते दर्शन आवरून घेतले. ते दिव्य दर्शन अंतर्धान पावताच अक्रूर घाई घाईने पाण्याबाहेर आले. नित्यकर्म करून भारावलेल्या अवस्थेत रथाकडे परतले. त्यांच्या त्या अवस्थेकडे पाहून भगवान श्रीकृष्णांनी हसत हसत विचारले 'काका! पाण्यात काय विशेष व अद्‌भुत दर्शन घडले कीं काय?' अक्रूर मनोमन समजला कीं भगवान श्रीकृष्ण म्हणजे साक्षात परब्रम्हच आहेत व चराचरातील प्रत्येक घटना त्यांना ज्ञात आहे. या गोष्टीची जाणीव ठेवून अक्रूर म्हणाले, " हे भगवन! विश्वातल्या सर्व अद्‌भुत वस्तू आपल्यातच सामावलेल्या आहेत. त्यामुळे आपल्या शिवाय मी तिथे काय पाहू शकणार?" असे म्हणून अक्रुराने भारावलेल्या अवस्थेतच रथ हाकला. बलराम व कृष्ण मथुरेला निघाले असल्याची बातमी वाटेवरच्या बहुतेक गावात आधीच गेली होती. त्यामुळे वाटेत लागणाऱ्या गावातील लोक त्यांना भेटण्यासाठी आधीच रस्त्यावर येऊन उभे रहात व रथ थांबवीत. मग एकटक कृष्णाकडे पहात रहात. त्यामुळे मथुरेला पोहोचावयाला संध्याकाळ झाली. नंद व इतर गोप आधीच पोहोचले होते. मथुरेजवळच्या उपवनात ते बलराम-कृष्ण येण्याची वाट पहात होते. रथ नंद महाराजांच्या समोर येताच बलराम-कृष्ण पटकन रथातून उतरले. अक्रूरही रथा खाली उतरून नंदमहाराजांसमोर विनम्र उभे राहिले. तेंव्हा श्रीकृष्ण त्यांचे हात आपल्या हातात घेऊन मधुर वाणीने म्हणले, " काका, आपण रथासह आपल्या घरी जा! आम्ही उद्या मथुरा पहाण्यास येऊ." पण अक्रुराने त्यांना आपल्या घरी चलण्याचा

खूप आग्रह केला तेंव्हा कृष्ण म्हणाले, " काका मी दादा बरोबर नक्की आपल्या घरी येईन. पण आज नाही. यादवांच्या शत्रूचा अंत करून माझ्या सर्व आप्तांना आधी सुखी करून मगच येईन!" श्रीकृष्णांच्या वाणीतला कणखरपणा जाणून अक्रूर खिन्नतेने सर्वांचा निरोप घेऊन निघाला. प्रथम कंसाला भेटून मग घरी गेला.

दुसरे दिवशी नंद महाराजांची प्रसन्नता पाहून बलराम व कृष्ण आपल्या सवंगड्यांसह मथुरा पाहण्यास निघाले. स्फटिकाच्या उंच उंच गोपुरांनी बहारदार दिसणारी व खंदकांनी सुरक्षित केलेली तटबंदी ओलांडून त्यांनी नगरात प्रवेश केला. घरांना सोन्याचे दरवाजे, सोन्याची चमचमणारी तोरणे, प्रशस्त अंगण, उंच उंच जोते इत्यादी वैभव पहात बलराम व कृष्णांनी आपल्या सवंगड्यांसह राजमार्गाने मथुरेत प्रवेश केला. त्यावेळी बलराम व कृष्ण यांना पहाण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा चांगलीच गर्दी झाली. मथुरेतल्या महालांच्या गच्च्या स्त्रियांच्या उपस्थितीने फुलून गेल्या. त्या परमादर व प्रेम व्यक्त करण्यासाठी पुष्पवृष्टी करू लागल्या. अनेकजण धूप दीपादी उपचारांनी पूजन करू लागले.

चालता चालता समोरून एक धोबी राजवस्त्रे धुवून नीट करून घेऊन जाताना दिसला. श्रीकृष्णांनी त्याच्याकडे उत्कृष्ट वस्त्रांची मागणी केली. तो धोबी कंसाच्या खास मर्जीतला होता. अत्यंत उर्मटपणे तो कृष्णाला म्हणाला, " अरे,जंगली पोरांनो मथुरेतून सुखरूप परत जायचे असेल तर असली मागणी करू नका. नाही तर राजाचे शिपाई तुम्हाला कैदेत टाकून बडवून काढतील. त्यावेळी ~~~ " तो धोबी तुच्छतेने असली बडबड करीत असतानाच भगवान श्रीकृष्णांनी आपल्या हाताच्या एका फटक्यातच त्याचे मस्तक धडावेगळे केले. हे पाहून त्याच्या हाता खालचे सर्व नोकर स्वच्छ धुतलेले व नीट केलेले सगळे कपडे तिथेच टाकून वाट फुटेल तिकडे पळत सुटले. मग बलराम व श्रीकृष्णांनी आपल्याला हवी असलेली वस्त्रे निवडली. उरलेली सवंगड्यांना वाटून पुढे निघाले. इतक्यात एका शिंप्याने भगवान श्रीकृष्णांना पहिले तो अत्यंत आनंदला. त्याने बलराम व श्रीकृष्णांना वंदन केले. आदराने त्यांना थांबवून त्यांच्या अंगावरचे कपडे नीटनेटके करून दिले. भगवान श्रीकृष्ण त्याच्यावर प्रसन्न झाले. त्याला आपले स्मरण दिले. देहांती सारुप्य मुक्तीची व्यवस्था केली. अमाप ऐश्वर्यासह काही अतींद्रिय शक्ती प्रदान करून पुढे निघाले. नंतर ‘बलराम कृष्ण’ सुदामा माळयाच्या घरी आले. सुदाम्याचे अष्टसात्विक भाव जागे झाले. पंचोपचार पूजा करून म्हणाला, " आज माझे कूळ धन्य झाले! मी आपणास पूर्ण शरण आहे. आपली भक्ती माझ्या अंत:करणात दृढ व्हावी हीच माझी प्रार्थना आहे." भगवान श्रीकृष्णांनी त्या निष्काम भक्ताला ऐश्वर्यासह आपली स्मरणभक्ती दिली. व पुढे निघाले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

पुष्प १५७ वे (अध्याय ४२ व ४३ पूर्ण)

## धनुर्भंग

दिसायला अत्यंत सुंदर पण पाठीवर भलेमोठे कुबड असल्यामुळे विद्रूप दिसणारी एक युवती अप्रतिम सुगंध असलेला उटण्याचा डबा घेऊन राजमार्गावरून जाताना भगवान श्रीकृष्णांना दिसली.

भगवान श्रीकृष्ण हसत हसत तिला म्हणाले, " हे सुंदरी तूं कोण आहेस? आणि हे इतके सुगंधी उटणे कोणासाठी घेऊन चालली आहेस?"

ती कुब्जा म्हणाली " हे शामसुंदरा, मी त्रिवक्रा नावाची उटणे लावणारी कंसाची आवडती दासी आहे. पण आज माझ्या परमभाग्याने या उटण्यासाठी खऱ्या अर्थाने पात्र असणारे आपण दोघे भेटला आहात." असे म्हणून अत्यंत आदराने व प्रेमाने बोलून तिने ते उटणे आपले सारे कौशल्य पणाला लावून बलराम व कृष्ण यांना लावले. त्या केशरी उटण्यामुळे बलराम-कृष्ण फारच सुंदर दिसू लागले.

कुब्जेच्या निष्कपट भावाने प्रसन्न झालेल्या भगवान श्रीकृष्णांनी तिच्यावर कृपा करण्याचे ठरवले व आपल्या पायांनी तिचे पाय घट्ट दाबून ठेवले व काय घडते आहे हे कळण्याच्या आतच आपल्या दोन बोटांनी तिची हनुवटी धरून तिला वर खेचले. अनामिक आनंदलहरी शरीरात निर्माण होऊन कुब्जा अत्यंत सुंदर व प्रमाणबध्द झाली. तिचे कुबड नाहीसे झाले. अनुपम सौंदर्य प्राप्त होताच तिने भगवंताला आपल्या घरी येऊन आपली मनोकामना पूर्ण करण्याची नि:संकोच प्रार्थना केली. आपल्या थोरल्या भावासमोर अशी नि:संकोच विनवणी करणाऱ्या त्या सैरंध्रीला हसत हसत श्रीकृष्ण म्हणाले, " हे सुंदरी! तुझे घर म्हणजे एक निश्चिंतपणे राहण्याचे ठिकाण आहे. तेंव्हा माझे इथले कार्य पूर्ण करून मी निश्चिंत मनाने तुझ्या घरी निश्चित येईन! नाही तरी माझ्या सारख्या बेघर वाटसरूला तुमच्या सारख्यांचाच आधार आहे." असे बोलून भगवान श्रीकृष्ण पुढे निघाले.

बलराम कृष्ण मथुरेच्या बाजारपेठेतून व्यापारी लोकांचे हार-तुरे स्वीकारीत धनुर्यागाच्या स्थानी आले. अनेक सैनिकांच्या संरक्षणात ठेवलेले ते मौल्यवान व अद्भुत धनुष्य श्रीकृष्णांनी पाहिले. तुकतीच

पूजा करून व अलंकृत करून ठेवलेले ते अद्‌भुत धनुष्य श्रीकृष्णांनी विजेच्या चपळाईने सहज उचलून उसाचे कांडे मोडावे तसे काडकन मोडून टाकले.

त्या धनुर्भंगाचा आवाज सर्व मथुरेला हादरवून गेला. धरणीकंप झाल्यासारखा कंसाचा राजवाडा हादरला. त्यामुळे कंसही हादरला. यज्ञस्थानी असलेल्या रक्षक सैनिकांनी बलराम-कृष्ण यांना गराडा घालताच दोघांनी त्या धनुष्याच्या तुकड्यांनी त्यांची पिटाई करून त्यांना यमसदनास पाठवले. कंसाने पाठवलेल्या नव्या ताज्या दमाच्या संरक्षकांची तीच गत केली. व सूर्यास्त समयी राजमार्गावरून आपल्या निवासस्थानी परतले. नंद महाराजांसह खीरपुरीचे सुग्रास भोजन करून शांत झोपी गेले.

कृष्णाने धनुर्भंग केल्याची व सर्व सैनिकांना मारल्याची वार्ता राजवाड्यात कंसाला समजताच कंस चांगलाच भेदरला. जवळ जवळ अर्धमेल्या सारखा झाला. त्याला रात्री झोप येईना. चुकून डोळा लागलाच तर तो स्वत:ला मस्तक विरहीत नागवा चालताना पाहून घाबरून जागा होई. परत डोळा लागला तर सर्वांग तेलाने माखलेल्या अवस्थेत गाढवावरून आपली धिंड चाललेली पाहून जागा होई. कंस भयाने चिंताक्रांत झाला. त्याला आपला मृत्यू जवळ आल्याची जाणीव झाली. काळ कोणासाठीच थांबत नाही.

पहाट होताच कंस घाईघाईने उठला. मल्लक्रीडा महोत्सवाची सगळी तयारी व्यवस्थित झाली असल्याची खात्री करून घेतली. हार तोरणांनी सजवलेल्या नियोजित ठिकाणी कंस आपल्या मांडलिक राजांच्या मध्यभागी ठेवलेल्या रत्नजडीत सिंहासनावर स्थानापन्न झाला. मनातून तो प्रचंड घाबरलेला होता. इतक्यात वाद्यांच्या गजरात आलेल्या मुष्टिक, चाणूर, शाल, तोषल इत्यादी पहिलवान पाहून त्याला परत धीर आला. नंदादी गोप कंसाला नजराणे अर्पण करून आपल्या नियोजित जागेवर जाऊन बसले. आखाड्यातल्या नगाऱ्यांचा आवाज ऐकून बलराम-कृष्ण आखाड्याकडे निघाले.

आखाड्याच्या प्रवेशद्वारी कुवलयापिड हत्ती द्वार अडवून उभा होता. कृष्णाने आपल्या धारदार आवाजात माहुताला हत्ती बाजूला घ्यायला सांगितला. पण त्याने कंसाच्या आज्ञे प्रमाणे तो हत्ती कृष्णावर सोडला. कुवलयापीडाने झेप घेऊन श्रीकृष्णांना आपल्या सोंडेत पकडले. भगवान श्रीकृष्णांचे शरीर स्वसत्तेचे असल्यामुळे कुवलयापीडाने त्यांना आपटण्यापूर्वीच सुळकन निसटून ते कुवलयापिडाच्या मागे आले. व त्याचे शेपूट पकडले आणि गरुडाने नागाला फरपटत न्यावे तसे कुवलयापीडाला २५ हात मागे ओढत नेले. त्यावेळी कुवलयापीड वेदनेने चित्कारत होता.

कुवलयापीड चांगला पिसाळल्यावर भगवान श्रीकृष्ण त्याच्या समोर आले आणि त्याच्या सोंडेवर एक घणाघाती घाव घातला. त्या वेदनेने चित्करीत तो कृष्णाला पकडण्यास धावला. श्रीकृष्ण पुढे धावताना एकदा पडले. कुवालायापीड आपले अणकुचीदार दात श्रीकृष्णांच्या अंगात खुपसण्यासाठी त्वेषाने धावला व जीव खाऊन त्याने आपले दात श्रीकृष्णांच्या अंगात खुपसले पण तो वर श्रीकृष्ण केंव्हाच बाजूला झाले होते व कुवलयापिडाचे दांत जमिनीवर आपटून तो मात्र संतापला होता. मग मात्र भगवंतांनी त्याची सोंड पकडून माहूतासगट खाली जमिनीवर आपटला. त्यामुळे सारी मथुरा हादरली. श्रीहरींनी एक पाय त्याच्या मस्तकावर ठेवला व त्याचा एक दांत उपटून त्या दांताने प्रथम माहुताला यमसदनाला पाठवला. मग त्याच दांताने हत्तीच्या मर्मस्थानी प्रहार करून त्यालाही ठार केला. दुसरा दांतही उपटून घेतला.

बलराम व कृष्ण डाव्या खांद्यावर गजदंत ठेवून विजयी मुद्रेने दिमाखात आखाड्यात प्रवेशले. सर्वांचे लक्ष त्यांच्याकडे वेधले. ज्याला त्याला ते आपल्या भावाप्रमाणे दिसत होते. माता-पित्यांना पुत्र, कंसाला आपला मृत्यू, दुष्टांना कठोर शास्ता, तर सज्जनांना आपला कैवारी. कंस अत्यंत धैर्यवान खरा पण कुवलयापिडाला मारून आलेला कृष्ण आता आपल्याला कसला सोडतोय! या आंतरिक भयाने तो आखाड्या जवळ आलेल्या बलराम-कृष्ण यांना न्याहाळत होता.

इतक्यात तुतारी वाजली आणि बलराम-कृष्ण यांना उद्देशून चाणूर बोलू लागला, "हे बलराम व नंदनंदना, तुम्ही दोघे वीरांना आदरणीय आहात. कंस महाराजांपर्यंत तुमचे कुस्ती नैपुण्य पोहोचले आहे. ते पहाण्याची कंस महाराजांना इच्छा झाली आहे. त्यामुळे कंस महाराजांच्या इच्छेनुरूप तुम्ही व आम्ही कुस्ती खेळावी व आपले नैपुण्य कंस महाराजांना दाखवावे."

त्यावर श्रीकृष्ण म्हणाले, " हे चाणुरा! आम्ही सुध्दा भोजराज कंसमहाराजांचीच प्रजा आहोत. आम्ही जरी वनवासी असलो तरी त्यांना आवडणारी गोष्ट केलीच पाहिजे. त्यातच आमचे कल्याण आहे याची आम्हाला जाणीव आहे! पण हे चाणुरा! आमच्या बरोबरीच्या मुलांशीच आम्ही कुस्ती खेळू. समशक्ति असलेल्यांच्या कुस्तीमुळे खेळणारा व पाहणारा दोघेही निर्दोष राहातात. त्यामुळे कुस्ती लावणाऱ्याला अन्यायाचे पाप लागत नाही."

ह्यावर चाणुर म्हणाला, " अरे! तुम्ही दोघेही बलवानांमध्ये श्रेष्ठ आहात. लहान नाही कीं किशोरही नाही. कारण दहाहजार हत्तींचे बळ असलेला कुवलायापीड मारून तुम्ही आत आला आहात. कुवलायापीडाला जमिनीवर आपटून ठार मारणाऱ्यांना लहान तरी कसे म्हणावे? त्यामुळे ते काही नाही. तूं माझ्या बरोबर व मुष्टिक बलरामांबरोबर कुस्ती खेळण्यात कोणताही अन्याय नाही."

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

पुष्प १५८ वे (अध्याय ४४ पूर्ण व ४५ चालू)

## कंसोद्धार

चाणुर असे बोलल्यावर बलराम-कृष्ण उडीमारून आखाड्यात उतरले. कुस्ती पहात असलेल्या प्रजाजनांच्या मनात कंसाच्या या अन्यायाची चीड निर्माण झाली. प्रजाजन कंसाबद्दल कमालीचे उदास झाले. त्यांना कंस मनापासून नकोस झाला.

चाणूर दंड थोपटून श्रीकृष्णांना भिडला! व मुष्टिक बलरामांना भिडला. पर्वतप्राय दिसणारे चाणूर-मुष्टिक कुठे आणि नाजूक कोवळी दिसणारे बलराम-कृष्ण जोडी कुठे. प्रेक्षक प्रजेला या विसंगतीचा फारच राग आला. ते बलराम-कृष्ण विजयाची प्रार्थना करू लागले. बलराम-कृष्ण तयारीतच होते. चाणुराने आपले हात जेंव्हा जोराने कृष्णाच्या हातावर आपटले तेंव्हा त्याचा चांगलाच भ्रमनिरास झाला. कंसाला खुश करण्याचा त्याचा सारा उत्साह एका क्षणात मावळला. कारण कृष्णाच्या हातावर हात भिडताच कृष्णाने त्याचे हात मनगटापासून खिळखिळे करून टाकले. त्यामुळे चिडलेल्या चाणुराने संतापून कृष्णाच्या छातीवर आपल्या दोन्ही हातांच्या मुठी आवळून जोरदार प्रहर केला. पण भगवान श्रीकृष्ण जागचे रेसभरही हालले नाहीत. उलट त्यांनी चाणुराचे तेच हात पकडून त्याला गरगर फिरवायला सुरुवात केली. मग अत्यंत वेगाने फिरवून त्याला धुण्याच्या कपड्या सारखा दाणकन जमिनीवर आपटला. फिरण्याच्या असह्य वेगानेच त्याचे प्राण निघून गेले होते. त्यामुळे खाली आपटल्यावर तो परत उठलाच नाही. इकडे बलरामांनी मुष्टीकाचा समाचार घेतला. मुष्टीकाने जेंव्हा बलरामांना ठोसा मारला तेंव्हा त्याची बोटे पूर्ण निकामी झाली. त्या धक्यातून मुष्टिक सावरण्याच्या आताच बलरामांनी आपल्या पोलादी पंजाचा असा काही जोरदार फटका दिला कीं मुष्टिक रक्त ओकत जो पडला तो पुन्हा उठलाच नाही.

मुष्टिक उठत नाही असे पाहून तयारीत असलेल्या मल्लांपैकी कूट बलरामांवर चालून गेला व शल श्रीकृष्णांवर चालून गेला. कूट समोर येताच बलरामांनी आपल्या डाव्या हाताच्या एकाच फटक्यात त्याला वरचा रस्ता दाखवला. तर शल समोर येताच पायाच्या ठोकरीने भगवान श्रीकृष्णांनी त्याचे मस्तक धडा वेगळे करून त्याला वरचा रस्ता दाखवला.

ते पाहून त्याचा भाऊ तोषल कृष्णावर धावला. श्रीकृष्णांनी ज्या पध्दतीने लत्ता प्रहर केला त्याच पध्दतीने त्यानेही कृष्णांवर लत्ता प्रहर केला. तेंव्हा कृष्णांनी त्याचे तेच तंगडे धरून खाली पाडले व तो भयानक वेदनांनी किंचाळत असताना दुसऱ्या पायावर आपला पाय ठेवून त्याला उभा चिरून काढला. त्यामुळे इतर मल्ल इतके भेदरले कीं आखाडा सोडून ते मागे वळून न पहाता धूम पळाले.

बलराम व कृष्ण यांच्या या अद्‌भुत पराक्रमाने प्रजाजन आनंदले. पण कंस मात्र चांगलाच भेदरला. त्याने बलराम व कृष्ण यांना मथुरे बाहेर घालवून देण्याची आज्ञा आपल्या सेवकांना दिली व गोपांचे सारेधन जप्त करण्यास सांगितले. वसुदेवाला ठार मारण्याची आज्ञा दिली. कंस पिसाळल्या सारखा उन्मत्त बडबड करू लागला.

त्यामुळे भगवान श्रीकृष्णही चिडले. त्याच्या आज्ञा पाळल्या जाण्याच्या आतच ते कंसा समोर आले आणि त्याला पकडले. त्यात कंसाचा मुकुट खाली पडला. कंस भेदरून थरथर कापत असतानाच त्याला मंचावरून खाली आखाड्यात फेकून दिला. पाठोपाठ आपण उडी मारून त्याच्या छाताडावर उभे राहिले. कंस रक्त ओकत जागीच गतप्राण झाला. कंस कृष्णभयाने सतत त्याचेच चिंतन करीत असल्यामुळे त्याची प्राणज्योत श्रीकृष्णातच विलीन झाली. कृष्णांनी कंसाला फरपटत आणून आखाड्या बाहेर फेकून दिले. ते पाहून कंसाचे आठ भाऊ कंक, न्यग्रोध इत्यादी श्रीकृष्णांना मारण्यासाठी पुढे सरसावले.

इतक्यात बलरामांनी त्या आठही जणाना वरचा रस्ता दाखवला. त्यावेळी अंतरिक्षात दुंदुभी वाजू लगल्या. कंसाच्या स्त्रिया शोक करताना म्हणू लागल्या "स्वामी आपण निरपराध लोकांना अतिशय छळले आहे. त्यामुळेच आपली अशी दशा झाली आहे." इत्यादी बोलून शोकातही सत्य प्रकट करू लागल्या. त्यांचे सांत्वन भगवान श्रीकृष्णांनी यथोचित शब्दात करून सर्व मृतांचे क्रियाकर्म करवून घेतले.

नंतर बलराम व कृष्ण यांनी आपल्या माता पित्यांच्या चरणावर मस्तक ठेवले. बलराम व श्रीकृष्ण यांनी वसुदेव-देवकी यांच्या चरणावर मस्तक ठेवले खरे पण वसुदेव व देवकी यांना फारच अवघडल्या सारखे होऊ लागले. कारण त्यांचे भगवद्भावाचे ज्ञान जागे झाले व त्यांना त्याच क्षणी बलराम व कृष्ण यांच्या चरणी लीन व्हावेसे वाटू लागले. आपले माता-पिता त्या विचारात येताच भगवंताने आपल्या वैष्णवीमायेने त्यांचा तो भाव पुत्रस्नेहात रुपांतरीत केला.

मग उठून उभे राहात म्हणाले, " तात, आई, आम्ही आपले पुत्र आहोत पण आपल्याला आमच्या बाल्यावस्थेचे सुख जसे अनुभवता आले नाही तसेच आम्हालाही माता पित्यांकडून होणाऱ्या लाडांचे सुख अनुभवता आले नाही. तथापि आपल्या ऋणातून आम्ही कधीच मुक्त होऊ शकणार नाही. दुष्ट कंसाने आपल्याला अतिशय कष्ट दिले. परंतु आमच्या परतंत्रतेमुळे आम्हाला काहीच करता आले नाही. आम्हाला क्षमा असावी!"

भगवान श्रीकृष्णांच्या या मधुर बोलण्याने वसुदेव-देवकी यांचा पुत्रस्नेह अधिकच दाटून आला. त्या दोघांनी बलराम-कृष्ण यांना आपल्या मांडीवर बसवून घेतले त्यांचा भावावेग अनावर झाला. त्यांनी दोघांनाही आपल्या हृदयाशी घट्ट कवटाळले.

प्रेमावेग कमी झाल्यावर भगवान श्रीकृष्णांनी उग्रसेनमहाराजांना राजा होण्याचा प्रस्ताव मांडला. तो सर्वांनी स्वीकारला.

श्रीकृष्ण म्हणाले, " महाराज आम्ही आपली प्रजा आहोत. ययातीच्या शापामुळे यदुवंशी राजसिंहासनावर बसू शकत नव्हते. पण आतां आपण राजसिंहासनाचा स्वीकार करा. आम्ही आपली मनोभावे सेवा करू. आम्ही आपली सेवा करू लागल्यावर देवही आपणास नजराणे देतील! मस्तक नमवून आपला सन्मान करतील."

कालांतराने भगवान श्रीकृष्णांनी देशोधडीस लागलेल्या सर्व यदुवंशीयांना परत सन्मानाने मथुरेत आणले व त्यांचे पुनर्वसन केले. मथुरेत आता आनंदी आनंद सुरु झाला होता. नंदबाबा समजत होते कीं बलराम-कृष्ण जसे आपल्या बरोबर मथुरेत आले तसे परत गोकुळात येतील. ह्या आशेवर नंदबाबा अजून मथुरेतच होते.एकदिवस नंदबाबांच्या गळयाला मिठी मारून श्रीकृष्ण म्हणाले, " बाबा! आपण दोघांनी आमचे अतिशय लाडाने व प्रेमाने संगोपन केले आहे. आपल्या वात्सल्यामुळे आम्ही आपणास कधीच विसरू शकणार नाही. आम्ही वेळ प्रसंगी आपणास भेटावयास व्रजात येत जाऊ. पण आता आपणास व्रजास जाणे भाग आहे."

अशाप्रकारे नंदबाबांची समजूत घालून श्रीकृष्णाने त्यांना भरपूर वस्त्रालंकार, संसारोपयोगी वस्तू, भरपूर द्रव्य इत्यादी देऊन अत्यंत आदरयुक्त सन्मानाने परत पाठवले. थोड्याच दिवसांनी वसुदेवांनी राजपुरोहिताकडून बलराम व कृष्ण यांचा उपनयन संस्कार करून त्यांना संदिपनींच्या आश्रमात पुढील शिक्षणासाठी पाठवले.

हरये नमः। हरये नमः। हरये नमः।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

## पुष्प १५९ वे (अध्याय ४५ व ४६ पूर्ण)

## उद्धवाचे व्रजगमन

अवंतीपुरात रहात असलेल्या कश्यपगोत्रातल्या संदिपनींच्या आश्रमात दाखल झाल्यावर बलराम व कृष्ण गुरु संदिपनींची मनोभावे सेवा करू लागले. बलराम व श्रीकृष्णांनी गुरुसेवेचा एक नवा आदर्श निर्माण केला. कोणत्याच वेळी कोणत्याही कामाचा कंटाळा नाही, कामचुकारपणा नाही, अत्यंत नम्रता, अभ्यासात तत्परता, समयसूचकता व तारतम्य यांचा एक नवा आदर्श त्यांनी विद्यार्थी वर्गात निर्माण केला. सद्गुणाचा आदर्श असलेल्या त्या दोघांनी केवळ अडीच महिन्यातच सर्व मंत्रज्ञान, तंत्रज्ञान, धनुर्वेद, मनुस्मृती, षड्दर्शन, मीमांसा, इत्यादी चौदा विद्या व चौसष्ट कालांसह सर्व ज्ञान आत्मसात केले. त्यामुळे सांदीपनीच्या हे लक्षात आले कीं इतकी सगळी विद्या केवळ चौसष्ट दिवसात आत्मसात करणारे हे साक्षात् परब्रम्हच आहेत.

आता शिकवण्याजोगे माझ्या जवळ काही नाही. असे संदिपनी गुरूंनी सांगताच भगवान श्रीकृष्णांनी त्यांना गुरुदक्षिणा विचारली. संदिपनी व त्यांच्या पत्नी यांनी आधीच विचारविनिमय केला होता. त्यानुसार त्यांनी " प्रभासक्षेत्री समुद्रात बुडून मरण पावलेला माझा पुत्र आणून देण्याची गुरुदक्षिणा मला दे! " असे सांगितले.

ठीक आहे असे म्हणून दोघेही लगेच रथारूढ होऊन प्रभासक्षेत्री आले. भगवान श्रीकृष्ण येता क्षणीच समुद्र पूजा सामग्री घेऊन आला. यथायोग्य पूजन केल्यावर भगवान म्हणाले "सागरा! संदिपनीचा पुत्र तूं गिळंकृत केला आहेस तो मला परत दे!" सागर म्हणाला, " देवा! मी त्याला गिळंकृत केलेला नाही. पण माझ्याच खोल जळात एक पांचजन नावाचा दैत्य शंखाच्या रूपाने वावरत आहे. त्याने कदाचित तो चोरला असावा!"

भगवंतांनी पांचजन दैत्याला मारून त्याच्या पोटात शोध घेतला. पण ते बालक आढळले नाही. तेंव्हा पांचजन दैत्याचे शंखरूप शरीर आपल्या हातात धारण करून ते बलरामांसह यमाच्या संयमनी

नगरीस आले. व हातातला पांचजन्य फुंकला. तत्क्षणी यम हात जोडून त्यांच्या समोर आला. व त्यांचे मनोगत ऐकून संदिपनींचा पुत्र अत्यंत आदराने श्रीकृष्णांच्या स्वाधीन केला.

बलराम-कृष्ण गुरुपुत्रासह अवंती नगरीस गुरूगृही परत आले. अत्यंत नम्रतेने तो पुत्र गुरुचरणी अर्पण केला. व विनयाने अधिक काय सेवा करू म्हणून विचारले. त्यावेळी सांदिपनी म्हणाले, "वीर हो! तुमच्या सारख्यांच्या गुरूंचे कोणते मनोरथ अपूर्ण राहू शकतील? संपूर्ण विश्वात तुमची कीर्ती दुमदुमत राहील. एवढी मोठी गुरुदक्षिणा दिल्यावर मी काय मागणार? मी तृप्त आहे. आपण दोघेही आता आनंदाने स्वगृही गमन करा! तुम्हा दोघांची विद्या नित्य नूतन राहो!"

आपल्या गुरूंचा आशिर्वाद घेऊन दोघेही मथुरेस आले. त्यांचा रथ मथुरेच्या प्रवेशद्वाराशी येताच द्वारपालांनी चौघडे वाजवून त्यांचे स्वागत केले. नगारे व चौघडे धडाडू लागताच प्रजाजनांना भगवान श्रीकृष्ण आल्याचे समजले. त्यांनी प्रचंड उत्साहाने बलराम-कृष्ण यांचे स्वागत करून आपला आनंद व्यक्त केला.

मथुरेत आल्यावर भगवान श्रीकृष्णांनी प्रथम आपला प्रिय मित्र उध्दवाची भेट घेतली. उध्दव हा बृहस्पतींचा शिष्य होता. उद्धवाची बालपणापासून श्रीकृष्णावर परम भक्ती होती. उध्दव अत्यंत बुद्धिमान व कष्टाळू असल्यामुळे मथुरेच्या राजदरबारी तो एक मान्यवर मंत्री होता. भक्तवत्सल भगवान श्रीकृष्ण उद्धवाचा हात आपल्या हातात घेऊन म्हणाले, "उध्दवा! व्रजात जाऊन माझ्या मातापित्यांना आनंदित करून ये! तसेच येताना गोपींचे विरह दु:ख दूर करून ये! त्या सर्व लौकिक व पारलौकिकाची आस सोडून मला त्यांचा आत्माच मानतात. उध्दवा! माझ्यासाठी लौकिक व पारलौकिक जे विसरतात त्यांचे पालन पोषण मीच करीत असतो. मी त्यांना परत येईन असे आश्वासन दिल्यामुळे माझ्या आगमनाच्या प्रतीक्षेत त्या कष्टाने आपले प्राण धरून आहेत."

भगवान श्रीकृष्णांची आज्ञा शिरोधार्य मानून उध्दव, श्रीकृष्णांना प्रणाम करून त्वरित व्रजाकडे जाण्यास निघाला. उध्दव गोकुळात पोहोचला तेंव्हा सायंकाळ झालेली होती. गोकुळातले गोधन आपल्या वासरांच्या ओढीने घराकडे परतत होते. त्यांच्या गळयातल्या घंटांच्या मंजुळ आवाजाने सगळे वातावरण मंगलमय झाले होते. उध्दव गोकुळात पोहोचला तेंव्हा सायंकालीन पूजन व आरत्या घरोघरी चालू झाल्या होत्या. त्यामुळे वातावरण पवित्र झाले होते. अशा पवित्र वातावरणात उद्धव आपल्या स्वामींच्या म्हणजे नंदमहाराजांच्या वाड्यात भारावल्या सारखा प्रवेशला.

उध्दवाला पाहून नंद महाराज आनंदले. त्यांना जणू कृष्ण आल्याचाच आनंद झाला. त्यांनी उद्धवाला घट्ट आलिंगन दिले. कृष्ण समजूनच त्याचा सन्मान केला. त्याच्यासाठी खास पंचपक्वान्नांचे भोजन बनविले. भोजनानंतर माचाकावर बसवून त्याचे पाय चेपून देऊन त्याचा सारा शीण दूर केला. मग नंद महाराज म्हणाले, ' उध्दवा! बलराम-कृष्णांनी ज्या अद्‌भुत प्रकारे मुष्टिक आणि चाणुर यांना मारले तो प्रसंग अजूनही डोळया समोरून हटत नाही बघ! त्यानंतर एवढ्या बलाढ्य कंसालाही मारले त्यामुळे तर फारच आनंद झाला. कारण सगळयाच सज्जनाचा तो फार छळ करीत होता. पण आतां वसुदेव-देवकी कसे आहेत?

बलराम-कृष्ण यांच्या सहवासात नक्कीच आनंदी असणार. पण उध्दवा! अरे, इथे गोकुळात प्रत्येकाला बलराम-कृष्ण यांची आठवण बेचैन करित असते. उद्धवा! कृष्णाला कधी आमची आठवण येते कां रे? इथेही त्याची आई आहे." असे म्हणताना नंद महाराज अत्यंत भाव विवश झाले व म्हणाले, " आपल्या आईला, बाबांना भेटायला माझा गोविंदा एकदां तरी येईल कां रे? पूर्वी गर्गमुनींनी मला सांगितले होते कीं बलराम-कृष्ण देकार्यासाठी अवतरलेले परब्रम्ह आहे! आणि आम्हीही ते कुवलयापीड, मुष्टिक, चाणूर, कंस इत्यादिकांना ज्या सहजतेने मारले त्यावरून सहज समजू शकतो. पण ते आमचे पुत्र असल्याची आमची भावना काही लोप पावत नाही त्याला काय इलाज आहे? कारण अरे उध्दवा ह्याच गोविंदाने स्वत:च्या डोक्यावरून माझ्या पादुका अनेक वेळा आणून दिल्या आहेत! त्यामुळे तर मी फारच व्यथित होतो. म्हणून विचारतो एकदां तरी आमचा गोविंदा आम्हाला भेटायला येईल कां रे?" भाव-विभोर झालेले नंद महाराज स्तब्ध झाले. यशोदा डोळे पुसू लागली.

तेंव्हा बुद्धिमान उद्धव हळूच म्हणाला, " अहो नंदबाबा-यशोदामैय्या आपल्या श्रीकृष्णावरील प्रेमाने आपण दोघेही श्रेष्ठ झालेले आहात. बलराम-कृष्ण हे पुराण पुरुष आहेत हे तर नक्कीच. सर्व विश्वाचे उपादान व निमित्त कारण तेच आहेत. खरेतर सर्व विश्व तेच आहेत. आणि असे हे परब्रम्ह आपल्या अंगणात खेळलेले आहे. थोड्याच दिवसात ते इथे येऊन आपणास आनंदित करतील. आपल्या दोघांची भक्ती अत्यंत श्रेष्ठ आहे. त्यामुळे बलराम कृष्णांना नेहेमी आपल्या जवळ असल्याचे अनुभवाल! अहो हे सांगण्या साठीच तर त्यांनी मला इथे पाठवले आहे." उध्दव-नंद-यशोदा यांच्या आपसातल्या श्रीकृष्णाच्या गोष्टी इतक्या रंगल्या कीं बोलता बोलता घरातल्या दासी जेंव्हा कृष्ण चरित्र गीत गात गात डेऱ्यातले दही घुसळू लागल्या तेंव्हा त्यांना समजले कीं पहाट झाली. त्या स्वरलहरींनी सारे गोकुळ मंगलमय होत होते. सूर्योदयी दधीमंथन थांबले. नित्याप्रमाणे गोपी घडे घेऊन यमुनेवर निघाल्या. नंदमहाराजांच्या वाड्यासमोर सोन्याचा रथ पाहून थबकल्या. आणि आपसात तर्क मांडू लागल्या. इतक्यात उद्धव स्वत:च बाहेर आला.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

पुष्प १६० वे (अध्याय ४७ पूर्ण)

## भ्रमर गीत

उद्धावाचा प्रसन्न तेजस्वी चेहरा, आजानुबाहू, प्रमाणबध्द शरीरयष्टी व कृष्णासारखीच वेशभूषा हे पाहून गोपींना कृष्णाचीच आठवण झाली. त्यांनी अभावितपणे उद्धवाला घेरून टाकले. उद्धवाने पटकन सांगून टाकले, कीं मी श्रीकृष्णांचा आपल्यासाठी खास संदेश घेऊन आलो आहे. हे ऐकून गोपी इतक्या लाजल्या कीं उध्दव ते लाजणे पहातच राहिला. गोपींनी लगेच आपला मोहरा बदलला. उध्दवाला आसनावर बसवून त्याचा चांगला आदर सत्कार करून म्हणाल्या, " खरेच कां आपण यादुनाथांचे दूत आहात? त्यांनी तुम्हाला माता-पित्यांची भेट घ्यायला पाठवले आहे नां? हो कारण आता आठवण यावी असे गोकुळात आहेच कोण म्हणा त्यांचे?" हे बोलताना गोपी इतक्या हळव्या झाल्या होत्या कीं त्यांना श्रीकृष्ण विरहाची आग सहन होईना. सर्व लोक व्यवहार विसरून त्या बोलू लागल्या " धन संपलेल्या माणसाचा गणिका, भोजन झालेला अतिथी गृहाचा, दक्षिणा मिळाल्यावर ऋत्विज यजमानाचा, फळे संपल्यावर पक्षी वृक्षाचा जसा त्याग करतात तसा कृष्णाने आमचा त्याग केला आहे." असे म्हणून कृष्णाच्या आठवणींनी त्या सुस्वरात मुळू मुळू रडू लागल्या. त्या रडण्यात विरहाची आग होती. कृष्ण प्रेमाची समर्पणात्मक भक्ती होती. निष्कपट प्रेम, नि:स्वार्थी प्रेम होते. त्या प्रेमात गोपी हळूहळू देहभान विसरून श्रीकृष्ण आठवणी गाऊ लागल्या. एका गोपीला एक भ्रमर तिथे गुणगुण करताना दिसला तेंव्हा ती इतकी कृष्णमय झालेली होती कीं तिला तो कृष्णाकडून आपली मनधरणी करण्यास आलेला दूतच वाटला व ती त्याच्याशी त्याच तन्मयतेने बोलू लागली. "अरे भ्रमरा! तूंच कां तो आमच्या प्रीयतमाचा सखा? मग थांब, तिथेच थांब, कारण तुझ्या मिशांना ते पिवळे केशर कसले लागले आहे संग बरे? श्रीकृष्णाच्या वनमालेचेच नां? आणि काय रे तुझ्यात आणि तुझ्या स्वामित काय फरक आहे रे? तूं जसा फुलातला मध घेऊन निघून जातोस तसेच तुझे स्वामी आम्हाला एकदाच त्यांचे अधरामृत पाजून निघून गेलेत. आणि भ्रमरा! तूं जे हे कृष्णाचे गुणगान आमच्या समोर करतो आहेस ना ते काही आम्हाला नवीन नाही! जा ते गुणगान तूं आता मथुरेतल्या त्यांच्या नव्या सख्यांसमोर कर. कारण यावेळी कृष्णाच्या आधारमृताने त्यांची पीडा शमलेली असणार. त्यामुळे तूं जे मागशील ते तुला त्यांच्या कडून मिळेल. अरे भ्रमरा! त्यांना वश होणार नाही अशी स्त्री तुला अख्ख्या

त्रिभुवनात सांपडणार नाही. जिथे साक्षात् लक्ष्मीच त्यांच्यावर भाळली तिथे आम्ही कोण रे! अरे अरे हे काय करतोस? तूं माझ्या पायावर डोके ठेवण्याचा प्रयत्न करू नकोस. मनधरणी करण्यात तुझ्या स्वामींनी तुला चांगलाच पटाईत केलेले दिसतेय. अरे पण ज्यांनी त्यांच्या साठी आपल्या पती, पुत्र, घर या सर्वांचा त्याग केला आहे तेच जर आम्हाला सोडून गेले तर आम्ही तरी त्यांच्याशी तडजोड कां करावी सांग बरे? त्यामुळे तूं नां, आलास तस्सा परत जा पाहू. भ्रमर गुणगुणत निघून गेला अन् फिरत फिरत तसाच परत आला.

तेंव्हा ती गोपी म्हणू लागली, " अरे माझ्या प्रियतमाच्या सख्या! तूं त्याच्याकडे जाऊन परत आलास वाटते! छान! म्हणजे आमची मनधरणी करायला परत पाठवले नां? तर मग ये कीं! अरे आम्हाला तुझा राग नाहीय रे! तूं तर आमच्या प्रियतमाचा दूत असल्यामुळे आदरणीयच आहेस. पण आता परत आलाच आहेस तर सांग तुला काय हवे आहे? जे हवे असेल ते माग! कारण आमच्या प्रियतम श्रीकृष्णाकडे एकदां गेल्यावर त्याला सोडून परत येणे किती कठीण असते हे आम्ही जाणतो. आणि आता तूं आम्हाला त्यांच्याकडे चल म्हणतोस! कशाला? त्यांच्या वक्षस्थळावर त्यांची प्रिय लक्ष्मी नेहमी असतेच नां? मग बाबारे आम्ही तिथे येऊन काय करणार? पण ते जाऊ दे! आम्हाला फक्त हे सांग कीं आमचे प्रभू मथुरेतच आहेत नां?. आम्हा दासींविषयी काही बोलतात कां? त्यांच्या पवित्र व कोमल मंगलमय करांचा स्पर्श आमच्या मस्तकाला कधी होईल कां? सांग सांग आम्ही ऐकायला फार फार उत्सुक आहोत."

गोपींची ही उच्चतम भावावस्था पाहून उध्दव अवाक् झाला! काय बोलावे हेच त्याला समजेना! त्याच्या तोंडून उत्स्फूर्त शब्द बाहेर आले, " गोपिंनो तुम्ही धन्य आहात. कृतकृत्य आहात! संपूर्ण विश्वाला पूजनीय आहात! भगवान श्रीकृष्णांच्या ठिकाणी तुम्ही केलेल्या अत्मार्पणाला साऱ्या विश्वात तोड नाही. श्रीकृष्णांच्या वियोग दु:खामुळे त्यांच्या ठिकाणी जडलेल्या नि:स्सीम भक्तीचे दर्शन मला लाभले. हे देवींनो भगवान श्रीकृष्णांनी तुमच्यासाठी एक खास गुप्तसंदेश पाठवला आहे. तो काना मनाला एक करून ऐका! भगवंतानी असे सांगितले आहे कीं तुमचा माझ्याशी पूर्ण वियोग कधीच होऊ शकत नाही. संपूर्ण विश्व जसे पंचमहाभूतांनी व्याप्त आहे, तसा मी प्राण, मन, इंद्रिये, त्यांचे विषय व पंचमहाभूते यांचा आश्रय आहे. मी त्रिगुणाशी संबंध नसलेला विशुध्द ज्ञानरूप आत्मा आहे. तथापि सुषुप्ती, स्वप्न व जागृती या मायेच्या तीन वृत्तींमुळे मी नेहमीच प्रत्ययाला येत असूनही कोणीही मला जाणू शकत नाही. स्वप्नातून जाग आल्यावर स्वप्नातले पदार्थ खोटे असल्याचा प्रत्यय येऊन जीव त्यापासून जसा अलिप्त होतो तद्वत जागृतीत दिसणारे पदार्थही आत्मानात्म विवेकाने मिथ्या असल्याचा निश्चय स्वत:च्या मनाने करावा. व मन माझ्यात स्थिर करावे. गोपिंनो मी तुम्हाला प्रिय असूनही तुमच्यापासून दूर राहाण्याचे कारण असे कीं तुम्ही ध्यानाच्या योगाने सतत माझ्या जवळ असल्याचा अनुभव तुमचा तुम्हाला घेता यावा म्हणून! प्रियकर सतत डोळयासमोर असल्यावर स्त्रियांचे चित्त प्रियकरावर जितके गुंतावे तेवढे गुंतत नाही. पण दूर गेल्यावर ते सतत गुंततच जाते. त्यामुळे तुम्ही सतत माझाच विचार करीत राहाता. त्या सततच्या स्मरणामुळे तुम्ही मलाच येऊन मिळाल." इतके बोलून उध्दव स्तब्ध झाला.

हे सगळे ऐकून झाल्यावर एका गोपीने अधिरतेने विचारले, " उद्धवा! आधी हे सांग कीं विरहाग्नीत होरपळणाऱ्या आम्हाला भेटायला स्वामी केंव्हातरी येणार आहेत कां?"

परस्पर दुसरीने उत्तर दिले, " अग वेडे! आपले स्वामी कृतकृत्य आहेत. त्यांना वनवासी गौळणी काय अथवा राजकुमारी काय कुणाशीच काही एक कर्तव्य नाही"

ह्यावर तिसरी म्हणाली " ते त्यांचे खरे आहे ग बाई! पण आपले काय? त्या पिंगळा वेश्येने सुध्दां कोणतीही आशा न ठेवता राहिल्यास संसारात सुख प्राप्त होते असे सांगितले आहे. आणि आपल्याला हे माहिती असूनही आपण श्रीकृष्णांच्या भेटीची आशा सोडू शकतो कां?"

अशा कितीतरी गोष्टी करतां करतां त्यांना इंद्रियातीत असलेले आपले प्राणनाथ श्रीकृष्णच आपले प्राण असल्याचे आत्मज्ञान झाले. मग गोपींनी अत्यंत आदराने व प्रेमाने उद्धवाचा मनापासून सत्कार केला व आग्रहाने दोन दिवस ठेवून घेतले. उध्दवही गोपींच्या समाधानासाठी दोन दिवस व्रजात राहिला. त्या दोन दिवसात गोपींनी केलेल्या भगवान श्रीकृष्णलीला ऐकून उध्दव स्वत: देहभान विसरून जात असे.

त्याच्या मुखातून उत्स्फूर्त शब्द उमटले, " ह्या गोपींचे शरीरधारण करणे सार्थकीं लागले आहे. श्रीकृष्ण कथामृत यांच्या रोमरोमात भिनले आहे. उगाच नाही या गोपांगनांच्या गळयात गळा घालून रासक्रीडेचा कृपाप्रसाद श्रीकृष्णांनी यांना दिला. अहो! साक्षात लक्ष्मीला सुध्दा तो मिळालेला नाही. मग इतरांची काय कथा. नंदाच्या व्रजात राहाणाऱ्या व श्रीकृष्णमय झालेल्या या गोपींच्या चरणधुळीला मी वारंवार वंदन करतो. या गोपींच्या कृष्णकथामृत गायनाने त्रिभुवन पवित्र झाले आहे."

गोपींच्या सहवासात राहून कृष्णमय झालेल्या उध्दवाला आतां मथुरेस जाणे भाग होते. उद्धव मथुरेला जाण्यासाठी सिद्ध होताच सगळया गोपींनी कृष्ण समजून उद्धवाचा सत्कार केला. जड अंत:करणाने उद्धव मथुरेकडे निघाला.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

## पुष्प १६१ वे (अध्याय ४८ व ४९ पूर्ण)

## कुब्जा व अक्रूर यांचे घरी श्रीकृष्ण

सर्व वैभव भगवान श्रीकृष्णांना अर्पण करून कुब्जा श्रीकृष्ण मिलनासाठी अत्यंत आतूर झाली होती. तिला कृष्णाशिवाय काही सुचत नव्हते. भगवान श्रीकृष्ण केंव्हाही आले तरी आपण त्यांच्या स्वागतास सिद्ध असले पाहिजे या उद्देशाने ती सदैव धूप, दीप, पुष्पे इत्यादी सर्व पूजा साहित्याची जय्यत तयारी ठेवीत होती.

आणि एक दिवस भगवान श्रीकृष्ण उध्दवासह तिच्या घरी आले. कुब्जेला आसमान ठेंगणे झाले. तिने भगवंताला संकल्पित उच्चासनावर बसविले. उद्धवांनाही यथायोग्य आसन दिले. तथापि उद्धवांनी स्वीकारल्याचे द्योतक म्हणून नुसता स्पर्श केला व जमिनीवर बसले. नंतर कुब्जेने दोघांचीही मनापासून पूजा केली. मग श्रीकृष्णांचा हात आपल्या हातात घेऊन त्यांना आपल्या शयनमंदिरात घेऊन गेली. भगवंतांनी तिची मनोकामना पूर्ण केली. त्यानंतर कुब्जेने काही दिवस आपल्याकडे राहाण्याची विनंती केली. भगवंतानी तीही मान्य केली.

कुब्जेकडून परतल्यावर भगवान श्रीकृष्ण, बलराम व उद्धव यांच्यासह अक्रूरकाकांच्याकडे आले. भगवान श्रीकृष्ण अक्रूरकाकांकडे दुहेरी हेतूने आले होते. एक म्हणजे अक्रुराने त्यांना पूर्वीच बोलावले होते. दुसरे म्हणजे श्रीकृष्णांना अक्रूराला हस्तिनापूरला पाठवावयाचे होते. अक्रुराने त्यांचे मन:पूर्वक स्वागत व पूजन केले. तेंव्हा त्या तिघांनीही अक्रूरकाकांना नमस्कार केला. भगवान श्रीकृष्ण अक्रूराला म्हणाले, " काका! आपण आमचे आदरणीय चुलते आहात. आपणच आम्हा बालकांचे रक्षण करावयाचे. आपल्या सारख्या संतांच्या ठायी स्वार्थ नसतो. त्यामुळे आपण आमच्यासाठी हस्तिनापूरला जाऊन पांडवांची खुशाली जाणून घ्यावी. कारण पांडूच्या मृत्यूनंतर कुंतीआत्यासह पांडव अत्यंत दु:खात आहेत. अंधधृतराष्ट्राने त्यांना राजधानीत आणले आहे. पण धृतराष्ट्र मनाने कणखर नाही. तो आपल्या पुत्रांच्या आहारी गेल्याचे समजते. त्यामुळे आपल्या भावांच्या मुलांशी म्हणजेच पांडवांशी तो स्वपुत्रांप्रमाणे व्यवहार करीत नसावा असे वाटते. तरी आपण प्रत्यक्ष तिथे जाऊन त्यांची स्थिती जाणून घ्यावी. ते समजल्यावर आपल्या आप्तांना सुख कसे प्राप्त होईल त्याचा आपल्याला विचार करतां येईल.

अक्रुराने ते लगेच मान्य केले. पुरुवंशी राजांच्या धवल कीर्तीने उज्वल असलेल्या हस्तिनापुरात अक्रूर आला. भगवान श्रीकृष्णांच्या सांगण्या प्रमाणे त्याने पांडवांची खुशाली नीट समजावी म्हणून आपल्या मुत्सद्देगिरीने भीष्म, द्रोण, धृतराष्ट्र, बाल्हिक, विदूर, कुंती यांची व्यक्तिगत भेट घेऊन माहिती मिळवली. विदुरांनी पांडवांचे शस्त्रास्त्र नैपुण्य, सौजन्य, लोकप्रियता, विनय, चातुर्य, न्यायप्रियता इत्यादी सर्व गुणाचे यथायोग्य वर्णन करून धृतराष्ट्राचे पुत्र त्यांचा पराकोटीचा द्वेष करीत असल्याचे सांगितले. इतकेच नाही तर दुर्योधानादी धृतराष्ट्र पुत्रांनी भीमावर केलेल्या विषप्रयोगाची माहितीही दिली. अक्रुराच्या भेटीमुळे कुंती चांगलीच भावविवश झाली. खूप दिवसात माहेरचे कोणीच भेटले नव्हते. नात्याने अक्रूर तिचा भाऊच होता. तिने सर्व खरे खरे सांगून आपले मन मोकळे केले. कुंतीने आई-बाबा, भाऊ-बहिणींसह सर्व नातेवाईकांची चौकशी केली. स्वत:ची व स्वत:च्या पुत्रांची स्थिती तिने अत्यंत विदारक शब्दात अक्रूराला सांगितली. ती म्हणाली, " दादा, या साऱ्या शत्रूंच्या गराड्यात आम्ही अत्यंत शोकाकुल आहोत. माझी अवस्थातर असंख्य लांडग्यांनी घेरलेल्या हरिणीसारखीच झालेली आहे. मला श्रीकृष्णाची वारंवार आठवण येत असते. मुलांसह मी महायोगी श्रीकृष्णाला शरण आहे. हे तूं श्रीकृष्णाला सांग! परब्रम्ह परमात्मा श्रीकृष्ण आमचे रक्षण करो." असे म्हणून कुंती श्रीकृष्ण स्मरणामुळे विकल होऊन रडू लागली. त्यावेळी अक्रूर व विदूर यांनी तिला तिच्या पुत्रांच्या जन्मदात्या देवांचे स्मरण करून दिले व निर्भय राहण्यास सांगितले.

मथुरेला जाण्यापूर्वी अक्रुराने मुत्सद्दीपणाने पुन्हा एकदां धृतराष्ट्राची भेट घेतली. धृतराष्ट्र आपल्या पुत्रांचा पक्षपाती होता. तो पांडवांशी धूर्त व कपटीपणाने वागत होता. हे जाणून अक्रुराने सर्वांसमक्ष धृतराष्ट्राला भगवान श्रीकृष्णांचा निरोप सांगितला. अक्रूर म्हणाला, " हे कुरुकुल भूषण महाराज धृतराष्ट्र! आपला वडील बंधू पांडू स्वर्गवासी झाल्यामुळे आपणास राज्याधिकारी म्हणून नेमले आहे. आपण सदाचार व सध्दर्मानुसार पृथ्वीपालन करून प्रजेला सौख्य द्यावे. स्वजनांबरोबर समवर्तन ठेवून स्वत:चे इह पर कल्याण साधावे. या नश्वर शरीराने विपरीत आचरण करून स्वपुत्र व पांडुपुत्र यांच्यात भेद्बुद्धी ठेवाल तर अंती नरकाचे धनी व्हाल. म्हणून हे धृतराष्ट्र महाराज, या स्वप्नवत् संसारात स्वत:वर नियंत्रण ठेवून चित्त स्थिर ठेवून समत्वाने शांत राहा!" अक्रुराचा हा भगवान श्रीकृष्णांचा निरोप ऐकून पातळयंत्री धृतराष्ट्र म्हणाला, " उत्कृष्ट सल्ला देणाऱ्या महोदय अक्रुरा! आपण माझ्या कल्याणाची गोष्ट सांगितली आहे. अमृत पिताना जशी तृप्ती होत नाही तद्वतच आपल्या या उपदेशामृताने मी अद्याप तृप्त झालो नाही! असे असूनही आपला हा उपदेश माझ्या या चंचल चित्तात स्थिर झालेला नाही. कारण पुत्रांच्या ममतेमुळे विषम झालेल्या माझ्या मनाला मी आवरू शकत नाही. सर्वशक्तिमान भगवान श्रीकृष्ण पृथ्वीवरील भार हलका करण्यासाठी यदुकुळात अवतीर्ण झाले आहेत. त्यांच्या विधानात कोण बदल करणार? त्यांना माझा नमस्कार आहे." धृतराष्ट्राचे हे मानभावी बोलणे ऐकून अक्रूर हस्तीनापुरातून निघाला. मथुरेला आल्यावर त्याने भगवान श्रीकृष्णांना धृतराष्ट्राचे पांडवांशी असलेले कपटाचरण धृतराष्ट्राच्या मानभावी भाषणासह जसेच्या तसे निवेदन केले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

पुष्प १६२ वे (अध्याय ५० व ५१ पूर्ण)

## द्वारकेची स्थापना

कंस वधाने दु:खी झालेल्या कंसाच्या राण्या अस्ती व प्राप्ती दोघीही आपला पिता मगधराज जरासंधाकडे परत गेल्या. त्यांच्या वैधव्याचे कारण श्रीकृष्ण असल्याचे समजताच जरासंध संतापला. त्याने पृथ्वी यादव रहित करण्याचे ठरवले. आपल्या तेवीस अक्षौहिणी सैन्यासह जरासंधाने मथुरेला वेढा दिला.

भगवान श्रीकृष्णांनी आपल्या प्रजेला अभय दिले. व बलरामांसह युध्द सामग्रीने परिपूर्ण असे दोन दिव्य रथ घेऊन मथुरे बाहेर आले. नगरा बाहेर येताच श्रीकृष्णांनी पाञ्चजन्य शंख फुंकला. त्याच्या आवाजाने शत्रुसैन्यात कमालीची घबराट पसरली. श्रीकृष्णांनी थोडेसेच सैन्य बरोबर घेतले होते. इतक्यात जरासंध त्यांच्या समोर येऊन म्हणाला, " आपल्या मामाचा वध करणाऱ्या नराधमा तूं माझ्याशी युध्द करण्याच्या लायकीचा नाहीस. मी फक्त बलरामांशी युध्द करीन."

यावर श्रीकृष्ण म्हणाले, " खरे शूर अशा वल्गना करीत नाहीत तर ते शौर्य गाजवतात. पण मृत्यू समीप आला कीं भ्रम होऊन मनुष्य अशी तुझ्यासारखी बडबड करतो." इतक्यात जरासंधाच्या इशाऱ्यावर नाचणाऱ्या मांडलिक राजांनी आपल्या सेनेसह बलराम व कृष्ण यांना चहूकडून घेरून टाकले. तत्क्षणी बलरामांनी मेघातून पाऊस पडावा तसा शरवर्षाव केला. मांडलिक राजांच्या सेनेची दाणादाण उडाली. हत्ती घोडे रथ पदाती असे चतुरंग सैन्य धडाधड धारातीर्थी पडू लागले. मथुरे भोवती जणू रक्ताचा सागर तयार झाला.

जरासंधाने यादव सेनेची कत्तल चालवलेली पाहून बलरामांनी जरासंधाला वरुणपाशात बध्द करून त्याच्या तेवीस अक्षौहिणी सैन्याची कत्तल केली. बलरामांनी जेंव्हा जरासंधाला वरुणपाशात बध्द केले तेंव्हा भगवान श्रीकृष्ण बलरामांना हळूच म्हणाले, " दादा, याला न मारता सोडल्यास हा आणखी सेना घेऊन परत येईल. याचे सारे सामर्थ्य मांडलीक राजांच्या सेनेवर अवलंबून आहे. त्यामुळे आपण याच्या मांडलीक राजांसह सेना कापली कीं आपोआपच नृशंसांचा वध होऊन भूभार हलका होईल."

बलरामांनी ते ऐकले. मग श्रीकृष्णांनी जरासंधाला दया दाखवून सोडून दिले. पराभूत होऊन मगधाला परत जाण्याची जरासंधाला लाज वाटू लागली. तेंव्हा युद्धात वाचलेल्या मांडलीक राजांनी त्याला राजनीती वगैरेचे दृष्टांत देऊन पुन्हा प्रयत्न करण्याची प्रेरणा दिली. व पराभूत झालेल्या जरासंधाने आपला लौकिक परत मिळवण्यासाठी सतरावेळा मथुरेवर स्वारी केली. भगवंतांनी सतरावेळा त्याचे तेवीस तेवीस अक्षौहिणी सैन्य कापून काढले.

पण अठराव्या वेळेस जेंव्हा जरासंध मथुरेवर स्वारी करण्यास निघाला तेंव्हा तो मथुरेला येऊन पोहोचण्यापूर्वी नारदांनी चिथवलेल्या कालयवनाने आपल्या तीन कोटी सेनेसह मथुरेला वेढा घातला. ते पाहून भगवान श्रीकृष्णांनी बलरामांशी विचार विनिमय करून मथुरावासियांना योगमार्गाने प्रथम सुरक्षित स्थळी हालवायचे ठरविले. त्याप्रमाणे त्यांनी मनुष्याला जाण्यास कठीण अशा समुद्रातल्या ठिकाणी समुद्राकडून शहाण्णव मैल लांब व शहाण्णव मैल रुंद (म्हणजे नऊ हजार दोनशे सोळा मैल क्षेत्रफळाची) समतल भूमी मागून घेतली. त्यावर विश्वकर्म्याकडून नेत्रदीपक द्वारका नागरी निर्माण करून घेतली. अत्यंत रेखीव आखीव व वास्तुशास्त्रानुसार सडका, चौक, वने उपवने, विविध व्यापारी पेठा, उत्कृष्ट गोदामे, गगनचुंबी गोपुरे, महाल, राजवाडे, उद्याने, मंदिरे, पाठशाला, गौळीवाडे, असे जे जे नागरी जीवनासाठी आवश्यक होते ते ते सर्व भरपूर प्रमाणात निर्माण करून घेतले. भगवान श्रीकृष्ण स्वत:साठी द्वारका नागरी निर्माण करतात हे समजताच कुबेराने आठही निधी तिथे आधीच पाठवून दिले. इंद्राने सुधर्मसभा पाठवून दिली. वरुणाने एकच कान शामवर्ण असलेले चंद्रासारखे तेजस्वी व मनोवेगाने धावणारे एक हजार अश्व पाठवून दिले. लोकपालांनी आवश्यक त्या सर्व संपत्ती पाठवल्या.

सर्व निवासस्थाने जीवनावश्यक वस्तूंनी व गृहसजावटीने परिपूर्ण करून घेतल्यावर भगवान श्रीकृष्णांनी आपल्या योगमायेने सर्व संबंधितांना निद्रेत असतानाच द्वारकेत नेउन सोडले. उर्वरित मथुरावासीयांच्या संरक्षणासाठी बलराम मथुरेत राहिले. भगवान श्रीकृष्ण बलरामांच्या सल्ल्यानुरूप गळयात फक्त वनमाला धारण करून नि:शस्त्र अवस्थेत मथुरेच्या मुख्य प्रवेशद्वारातून सकाळी सूर्योदयी कालयवनाच्या समोर बाहेर आले.

भगवान श्रीकृष्णांना नि:शस्त्र समोर आलेले पाहून कालयवन जरा आश्चर्य चकित झाला. अनवाणी व पायी येत असल्यामुळे त्यांच्याशी द्वंद्व युध्द करावे लागणार. या विचाराने कालयवन अनवाणी व नि:शस्त्र होऊन त्यांचा पाठलाग करू लागला. कालयवन आपला पाठलाग करीत असलेला पाहून भगवान श्रीकृष्ण रणभूमी सोडून एका पर्वताच्या दिशेने पळू लागले. पावलो पावली कालयवनाला आपण त्यांना गाठले असे वाटे पण श्रीकृष्ण त्याच्या आवाक्यात येत नसत. त्यामुळे त्यांना थांबवण्यासाठी कालयवन त्यांचा पाणउतारा करू लागला. पण तिकडे पूर्ण दुर्लक्ष करून भगवान श्रीकृष्ण सहजतेने एका पर्वताच्या अंधाऱ्या गुहेत शिरले. महत्प्रयासाने रक्तबंबाळ होऊन कालयवनही त्यांच्या पाठोपाठ त्या गुहेत शिरला. कालयवनाला त्या अंधारात समोरच कोणी एक मनुष्य झोपलेला दिसला. आपल्याला खिजवण्यासाठी कृष्णच असा झोपला आहे असे समजून त्या तिरीमिरीत त्याने जोरदार लत्ता प्रहर केला. तो निद्रिस्त पुरुष जागा झाला. युद्धासाठी आव्हान देणारा कालयवन त्याच्या दृष्टीस पडला. तत्क्षणी कालयवनाच्या शरीरातला वैश्वानर प्रगट झाला आणि कालयवन भस्म होऊन खाली कोसळला.

तो पुरुष म्हणजे इक्ष्वाकू वंशातल्या मांधात्याचा पुत्र मुचकुंद होता. त्याच्या सत्यप्रतिज्ञ व ब्राम्हणभक्तीने त्याने अनेक सामर्थ्ये प्राप्त करून घेतली होती. त्यामुळे इंद्राच्या प्रार्थनेवरून त्याने देवांसाठी देवांची अहोरात्र सेवा करून इंद्राचे राज्य सुरक्षित करून दिले. कालांतराने देवांना कार्तिकेया सारख्या प्रभावी सेनापतीची प्राप्ती झाली. तेंव्हा इंद्राने प्रसन्न होऊन मुचकुंद राजाचा सन्मान केला. इंद्र म्हणाला, हे राजा तूं आपल्या गृह,दारा, पुत्रादिसह राज्य त्याग करून आमच्यासाठी कार्यरत झालास. एवढ्या काळात आता तुझे कोणीच शिल्लक उरलेले नाही. तुझ्या नि:स्वार्थी सेवेसाठी मोक्षा खेरीज जे हवे असेल ते मागून घे! " तेंव्हा राजा मुचकुंद खूप दमलेला व अनेक वर्षे झोप न मिळालेला होता म्हणून त्याने झोपेचा वर मागून घेतला. तेंव्हा त्याच्या इच्छे प्रमाणे इंद्राने त्याला झोपेचा वर दिला आणि सांगितले जो कोणी तुझी झोप मोड करील तो तुझ्या दृष्टीस पडताच भस्म होईल. तोच हा राजा मुचकुंद.

कालयवनाने झोपमोड केल्याने राजा मुचकुंदाच्या दृष्टीस पडून भस्म झाला. कालयवन भस्म होताच भगवान श्रीकृष्ण मुचकुंदाच्या समोर आले. भगवान श्रीकृष्णाचे ते दिव्य रूप पाहून मुचकुंद स्तंभीत झाला.

राजा मुचकुंद भीत भीत म्हणाला. " आपण कोण आहात? आपले तेज पाहून आपण त्रिदेवां पैकी कोणी आहात असे वाटते! मी इक्ष्वाकू वंशातला युवनाश्वनंदन मांधात्याचा मुचकुंद नामक पुत्र, आपण कोण हे जाणून घेण्यास फार उत्सुक आहे."

भगवान श्रीकृष्ण म्हणाले, " मुचकुंदा मी अनंतनामी असून माझे जन्म कर्म गुण अनंत आहेत. सांप्रतच्या जन्मात मी श्रीकृष्ण वसुदेव यादव असून ब्रम्हदेवाच्या प्रार्थनेवरून हा अवतार धारण केला आहे. तूं पूर्वी अंत:करण पूर्वक माझी प्रार्थना केलेली आहेस. त्यामुळे तुला हवा तो वर तूं मागून घे!"

पूर्ण भानावर आलेला राजा मुचकुंद म्हणाला, " हे प्रभो! मी पूर्वीच्या राजलक्ष्मीच्या प्रभावाने परमार्थाला मुकलो आहे. त्याकाळचे सम्राटपद ही केवळ आपली कृपाच असताना मी अहंकाराने स्वकर्तृत्व समजून अनर्थच ओढवून घेतला आहे. तथापि हे भगवन आपली माया अतर्क्य आहे. त्यामुळे मी आपणास शरण आलो आहे. मला आपल्या चरणी आश्रय द्या!"

भगवान श्रीकृष्ण म्हणाले, " वरदानाचे प्रलोभन दाखवूनही तुझी बुद्धी स्थिर राहिली आहे. त्यामुळे तूं आपले मन माझ्या ठिकाणी स्थिर कर व माझ्या स्मरणात उर्वरित आयुष्य व्यतीत कर. म्हणजे पुढल्या जन्मी शुध्द होऊन मला येऊन मिळशील."

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

## ।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

## पुष्प १६३ वे (अध्याय ५२ पूर्ण व ५३ चालू)

## रुक्मिणीचे पत्र

भगवान श्रीकृष्णांनी वर दिल्यावर मुचकुंद राजा श्रीकृष्णांना नमस्कार व प्रदक्षिणा करून बाहेर पडला. बाहेर येताच त्याला झाडे डोंगर इत्यादी छोटे छोटे झालेले दिसून आले. तेंव्हा आता कलियुग सुरु झाल्याचे जाणून श्रीकृष्णांनी सांगितल्या प्रमाणे तो गंधमादन पर्वतावर तपाचरणास निघून गेला. भगवान श्रीकृष्ण मथुरेकडे निघाले. मथुरेला अद्याप म्लेञ्छ सेनेचा वेढा तसाच पाहून त्यांनी त्या सर्व म्लेञ्छ सेनेचा संव्हार केला व सर्व धन मथुरेत आणू लागले. तेवढ्यातच मगधराज जरासंध आपल्या तेवीस अक्षौहिणी सैन्यासह हजर झाला. ते पाहून बलराम व श्रीकृष्ण अगदी सामान्य माणसासारखे सगळे धन तिथेच टाकून मथुरेकडे धूम पळत सुटले. ते पाहून जरासंध उन्मादहास्याने रथातून उडी मारून त्यांना पकडण्यासाठी त्यांच्या मागे लागला. बलराम व कृष्ण दुसऱ्या दाराने मथुरेच्या बाहेर पडले व प्रवर्षणपर्वतावर चढू लागले. प्रवर्षणपर्वतावर खूप दाट झाडी असल्यामुळे जरासंधाला ते दिसेनात. तेंव्हा संतापून जरासंधाने झाडी पेटवून दिली. बलराम व कृष्ण प्रवर्षणपर्वताच्या शिखरावर जाऊन तिथे असलेल्या कड्यावरून उडी मारून पलीकडे गेले. जरासंध व त्याच्या सैनिकांना चकवून सागरातून द्वारकेस गेले. जरासंधाचा समज ते दोघे आगीत भस्म झाले असा होऊन विजयी मुद्रेने तो मगधास परत गेला. भगवन श्रीकृष्ण व बलराम द्वारकेस परत आले तेंव्हा आनर्त देशीचा (संदर्भ पुष्प११३) कुकुद्मी राजा ब्रम्हदेवाच्या आज्ञे प्रमाणे आपली कन्या रेवती बलरामांना अर्पण करण्यास घेऊन आला होता. बलरामांनी तिचा स्वीकार करून मोठ्या थाटात विवाह केला.

विदर्भादिपती राजा भीष्मक याला पाच पुत्र व एक कन्या होती. सर्वात थोरला पुत्र रुक्मी, दुसरा रुक्मरथ, तिसरा रुक्मबाहू, चवथा रुक्मकेश, पांचवा रुक्ममाली व सहावी कन्या रुक्मिणी. रुक्मिणी अतिशय सुंदर व नाजूक होती. राजदरबारी येणाऱ्या अतिथींच्या तोंडून तिने भगवान श्रीकृष्णांच्या शौर्यकथा, त्यांचे सौंदर्य, चातुर्य, औदार्य व वैभव यांचे वर्णन वारंवार ऐकले होते. तेंव्हा रुक्मिणीने श्रीकृष्णांशी विवाह करण्याचा निश्चय केला. रुक्मि सोडून बाकीच्या भावांनाही रुक्मिणीचा विवाह श्रीकृष्णांबरोबर व्हावा असेच वाटत होते. रुक्मिच्या मनात श्रीकृष्णांबद्दल अकारण द्वेष असल्याने त्याचा मात्र रुक्मिणी-कृष्ण विवाहास ठाम विरोध होता. आपल्या भावांचा कल श्रीकृष्णांकडे असल्याचे पाहून

रुक्मीने तातडीने रुक्मिणीचा विवाह शिशुपालाशी नक्की केला. रुक्मिणीला हे समजताच तिने खूप विचार करून एका विश्वास पात्र ब्राम्हणाला एक पत्र देऊन श्रीकृष्णांकडे पाठवले. व त्वरित उत्तर घेऊन येण्यास सांगितले. भगवान श्रीकृष्णांकडे तो ब्राम्हण येताच श्रीकृष्णांनी त्याचे उत्तम स्वागत करून भोजनादी झाल्यावर त्याचे पाय चेपून देत देत सर्व चौकशी केली. तेंव्हा त्या ब्राम्हणाने रुक्मिणीने दिलेले गुह्य पत्र भगवान श्रीकृष्णांना दिले. भगवान श्रीकृष्णांनी ते पत्र त्या ब्राम्हणालाच वाचून दाखवण्यास सांगितले. भगवंताची आज्ञा शिरोधार्य मानून ब्राम्हण पत्र वाचू लागला. रुक्मिणीने लिहिले होते, " हे त्रिभुवन सुंदरा, आपले गुण श्रवण करणाऱ्याचे त्रिविध ताप हरण होतात व दर्शनाने सर्व पुरुषार्थ प्राप्त होतात. हे दयाघना अच्युता! सर्व संकोच सोडून मी आपणास विनवीत आहे कीं माझ्या चित्ताने आपल्या ठिकाणी प्रवेश केला आहे. हे मुकुंदा, आपण कुल, शील, स्वभाव, सौंदर्य, विद्या, पराक्रम, वय, द्रव्य इत्यादी सर्व गुणांमध्ये अद्वितीय आहात. सर्वांचे मन मोहित करणाऱ्या हे मनमोहना! कोणती कुलवती व धैर्यशील कन्या विवाहासाठी आपणास वरणार नाही? म्हणून हे प्रभो मी आपणास वरले आहे. हे कमलनयना, पूर्व जन्मात इष्ट भगवद्भक्ति व धर्मपालन मी केले असेल तर आपण इथे येऊन पत्नी म्हणून माझा स्वीकार करावा. आपल्या सारख्या नरशार्दुलाचा वाटा शिशुपाला सारख्या कोल्ह्याला मिळू नये. हे अजिता, विवाहाच्या आदल्या दिवशी मला गिरीजादेवीच्या मंदिरात दर्शनासाठी जावे लागेल त्यावेळी दर्शनकरून परत जाते वेळी शिशुपाल, जरासंध इत्यादी राजांचा त्यांच्या सेनेसह पराभव करून व त्यांची सेना उध्वस्थ करून आपल्या शौराचे मोल देऊन माझे राक्षस विधीने पाणिग्रहण करावे. मी जर आपल्या चरणकमळांचा आश्रय प्राप्त करून घेऊ शकले नाही तर व्रतस्थ होऊन प्रायोपवेषनाने प्राण त्याग करीन." पत्र वाचून होताच मनोमन भगवंताला नमस्कार करून ब्राम्हण भगवंताला म्हणाला, "हे यदुश्रेष्ठा! वेळ अत्यंत थोडा आहे. त्यामुळे या पत्राच्या संदर्भात जे काही करावयाचे असेल ते त्वरित करावे अशी माझी आपणास नम्र विनंती आहे." इतके बोलून तो ब्राम्हण अधिरतेने श्रीकृष्णांच्या निर्णयाची वाट पाहू लागला. भगवान श्रीकृष्ण ब्राम्हणाचा हात आपल्या हातात घेऊन हसत हसत म्हणाले, " माझे मनही तिच्यावर जडल्यामुळे मला तर झोपही लागत नाही. रुक्मिने केवळ द्वेषाने तिचा विवाह माझ्याशी होऊ द्यायचा नाही असे ठरवले आहे. पण हे भूदेवा! आपण काळजी करू नका. माझ्यावर प्रेम करणाऱ्या रुक्मीणीला मी अगदी अलगद घेऊन येईन. इतके बोलून भगवान श्रीकृष्णांनी ताबडतोब दारुकाला बोलावून शस्त्रास्त्रासह रथ सिद्ध करण्याची आज्ञा दिली. रथ सिद्ध झाल्याचे दारुकाने सांगताच भगवान श्रीकृष्णांनी ब्राम्हणाच्या हाताला धरून प्रथम त्याला रथात बसविले व मग आपणही रथारूढ झाले. मनोवेगाने धावणाऱ्या त्या अश्वांच्या सहाय्याने भगवान श्रीकृष्ण एका रात्रीतच आनर्तदेशातून (म्हणजे काठेवाडातून) विदर्भातल्या कुंडीनपूरया राजधानीला आले. त्यावेळी  रुक्मिणी मंगलस्नान करून उत्तमोत्तम वस्त्रालंकार परिधान करून पत्र दिलेल्या ब्राम्हणाची वाट पहात होती. तेवढ्यात तो ब्राम्हण रुक्मिणीला भेटण्यास अंत:पुरात आला. त्याचा प्रसन्न व निश्चिंत चेहरा पाहून रुक्मिणीच्या मनाचा ताण एकदम नाहीसा झाला. स्मितहास्याने तिने ब्राम्हणाचे स्वागत केले. ब्राम्हणाने भगवान श्रीकृष्ण कुंडीनपूरात आले असून आपणास घेऊन जाण्याची सत्य प्रतिज्ञा केली असल्याचे सांगितले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

## पुष्प १६४ वे (अध्याय ५३ व ५४ पूर्ण)

## रुक्मिणी हरण

भगवान श्रीकृष्ण कुंडीनपूरात आले असून त्यांनी आपणास घेऊन जाण्याची सत्यप्रतिज्ञा केली आहे! असे ब्राम्हणाने रुक्मीणीला सांगताच रुक्मिणीने ब्राम्हणाला मनापासून नमस्कार केला. त्याचा उचित सन्मान केला. रुक्मिणीचा आनंद गगनात मावेना. कुंडीनपूरात 'रुक्मिणी-शिशुपाल' विवाहासाठी बरेच राजे श्रीकृष्णाशी युध्द करावे लागले तर त्या तयारीनेच आपापले सैन्य घेऊन आलेले होते.

भगवान श्रीकृष्ण कुंडीनपूर येथे एकटेच गेल्याचे बलरामांच्या हेरांनी बलरामांना कुंडीनपूरातल्या शत्रुपक्षाच्या हालचालींसह तत्काळ दिली. तेव्हा बलरामांचे हृदय बंधुप्रेमाने उचंबळून आले. बलराम लगेच आपले चतुरंग सैन्य घेऊन श्रीकृष्णांच्या मदतीसाठी कुंडीनपूर येथे आले. बलराम व कृष्ण कुंडीनपुरात आल्याचे भीष्मकाला समजताच भीष्मकाने त्यांचे उत्कृष्ट पूजन करून त्यांच्या निवासाची व्यवस्था केली. बलराम कृष्ण कुंडीनपुरात आल्याची बातमी पसरताच त्यांच्या दर्शनासाठी नागरिकांची रीघ लागली.

इकडे रुक्मिणी सशस्त्र सैनिकांच्या कडेकोट बंदोबस्तात देवीच्या मंदिराकडे जाण्यास निघाली. भगवान श्रीकृष्णाच्या चरणांच्या चिंतनात ती पायीच भगवतीच्या मंदिराकडे निघाली होती. पुष्कळ ब्राम्हणपत्न्या तिच्यासह चंदन, आगरु, केशर इत्यादी सुगंधी लेपन करून गजरे माळून उंची वस्त्रालंकार परिधान करून तिच्या समवेत चालल्या होत्या. मंजुळ वाद्यांच्या व सुरेल गवयांच्या समूहाने रुक्मिणीवर स्तुती सुमनांची बरसात चालू ठेवली होती. मंदिरात आल्यावर प्रौढ व अनुभवी ब्राम्हण स्त्रियांनी रुक्मिणी कडून शिवपार्वतीला वंदन करवून घेतले. मग सुरेख पूजन करवून घेतले. मग रुक्मिणीने मनातल्या मनात प्रार्थना केली, " हे अंबिके! तुझ्या स्कंद व गणेश या दोन पुत्रांसह मी तुला वंदन करिते. तूं मंगल करणारी आहेस. माझी तुला हात जोडून प्रार्थना आहे कीं भगवान श्रीकृष्णच मला पती मिळेल असा वर दे." अशी अगदी कळवळून प्रार्थना करून रुक्मिणी एका दासीचा हात धरून मंदिरा बाहेर आली. भगवंताच्या माये

प्रमाणेच रुक्मिणी सुध्दा वीरांना मोहित करणारी होती. तिच्या अपूर्व सौंदर्याच्या प्रभावामुळे रुक्मिणीचे दर्शन होताच अनेक मोठ मोठे राजे देहभान हरपून खाली पडले.

रुक्मिणी भगवान श्रीकृष्णांची प्राप्ती व्हावी अशी इच्छा धरून हळू हळू आपली नाजूक पावले टाकीत  चालली होती. चालता चालता भिरभिरत्या नजरेने ती श्रीकृष्णांना शोधू लागली आणि तिला भगवान श्रीकृष्ण दर्शन झाले. तत्क्षणी एका अनामिक ओढीने ती श्रीकृष्णांच्या रथाकडे झेपावली. काय घडते आहे हे समजण्याच्या आताच भगवान श्रीकृष्णांनी तिला आपल्या रथात घेतले. आणि प्रतिकार करणाऱ्या राजांचा पराभव करून बलरामांसह निघूनही गेले. कोल्ह्यांच्या कळपातून सिंहाने आपला भाग न्यावा तसे भगवान श्रीकृष्ण रुक्मिणीला घेऊन निघूनही गेले. पण पराभूत राजे जरासंधाच्या अभिमानाने "सिंहाचा वाटा कोल्ह्याने पळवला हो!" म्हणून टाहो फोडू लागले. रुक्मिणीला पाहून कामविव्हल झालेले सारे राजे श्रीकृष्णांनी रुक्मिणीला पळवून नेल्यावर सावध झाले. आणि मग शस्त्रे परजून श्रीकृष्णांच्या मागे धावले. सगळी यादव सेना तयारीतच होती. त्यांनी शत्रुसेनाच्या अनेकपट शरवर्षाव करून शत्रुसेनेच्या हत्ती, घोडे, रथी वगैरेंची मस्तके धडाधड उडवायला सुरुवात केली. बलरामांचा प्रतिकार इतका तीव्र होता कीं जरासंधही निमुटपणे मागे फिरला.

जरासंध मागे फिरताच त्याला उदास, निस्तेज व रडवेला झालेला शिशुपाल दिसला. तेंव्हा शिशुपालाची समजूत घालण्यासाठी तो शिशुपालास म्हणाला, " हे पुरुषसिंह शिशुपाला! ही उदासीनता सोडून दे! आपण योजिलेल्या सगळया गोष्टी आपल्या मनाप्रमाणे घडतीलच अशी शाश्वती कधीच नसते. अरे मी सतरा वेळा मथुरेवर तेवीस तेवीस अक्षौहिणी सेनेसह चालून गेलो व पराभूत होऊन परत आलो. पण अठराव्या वेळी मला विजय प्राप्त होऊनही मी कृष्णाला पकडू शकलो नाही. कारण काल त्यांना अनुकूल होता. त्यामुळे काल अनुकूल झाल्यावर आपण त्यांना जिंकू शकू!" सम्राट जरासंधाने असे समजावल्यावर शिशुपाल आपल्या अनुयायांसह व वाचलेल्या मित्रांसह आपल्या राजधानीस परत गेला. पण कृष्ण द्वेष्ट्या रुक्मिला काही रहावले नाही.

रुक्मिला आपल्या ताकदीचा फार गर्व होता. तो चांगलाच खवळला. त्याने लगेच कवच धारण करून तिथे जेवढे राजे उपस्थित होते त्यांच्या समोर प्रतिज्ञा उच्चारली " आपणा सर्वांसमोर मी प्रतिज्ञा करतो कीं जर मी कृष्णाला मारून रुक्मिणीला परत आणले नाही तर कुंडीनपुरात प्रवेश करणार नाही." अशी मूर्खासारखी प्रतिज्ञा करून रथारूढ होऊन त्याने श्रीकृष्णाला गाठले. आणि ओरडून श्रीकृष्णांना म्हणाला, " मूर्खा जो वर मी तुला जमिनीवर आडवे करीत नाही तोवर माझ्या बहिणीला सोडून दे!" असे म्हणून  रुक्मीने तीन बाण कृष्णावर सोडले. श्रीकृष्णांनी त्याचे ते तिन्ही बाण निष्प्रभ करून त्याचे धनुष्य तोडून टाकले. रुक्मीने दुसरे धनुष्य हातात घेताच तेही तोडून टाकले अशी तीन धनुष्ये तोडल्यावर रुक्मी खवळला व त्याने कृष्णावर परीघ सोडला. त्यावर कृष्णांनी त्याचे प्रत्येक अस्त्र निष्प्रभ करून त्याला नि:शस्त्र केले. त्यामुळे रुक्मी पाय उतार होऊन ढाल तलवार घेऊन पुढे आला. श्रीकृष्णांनी त्याची ढाल तालावर तोडून त्याच्यावर सोडण्यासाठी धनुष्याला बाण लावला. ते पाहून तत्क्षणी रुक्मिणीने केलेल्या प्रार्थने वरून तो विचार सोडून दिला. पण मूर्ख रुक्मी आपल्या ताकदीने श्रीकृष्णांना मारण्यासाठी त्यांच्याजवळ आला. तेंव्हा श्रीकृष्णांनी त्याच्या दाढी-मिशा काढून केसात पाट काढून त्याला विद्रूप केला.

त्यावेळी बलरामांना दया आली व त्यांनी त्याला बद्धावस्थेतून मोकळे करून म्हटले, "कृष्णा आता मेलेल्याला आणखी मारण्यात काय अर्थ आहे? दे सोडून." इतके बोलून बलराम रुक्मिणीकडे वळून म्हणाले, " हे रुक्मिणी ! झाल्या प्रकारा बद्दल तूं वाईट वाटून घेऊ नकोस. कारण हा तुझा भाऊ सर्व प्राण्यांचा द्वेष करणारा, राज्य, संपत्ती, स्त्री इत्यादी भौतिक सुखाने व स्वत:च्या शरीर बलाने उन्मत्त झालेला आहे त्यामुळे जे झाले ते ठीकच झाले असे समजून तूं शोक करू नकोस!" बलरामांच्या या सात्वनपर बोलण्याने रुक्मिणीचे समाधान झाले व ती शांत झाली. रुक्मिने आधीच प्रतिज्ञा केली असल्याने तो परत कुंडीनपूर येथे गेला नाही. जिथे पराभव झाला तिथेच भोजकट नामक नगर बसवून राहू लागला.

भगवान श्रीकृष्ण रुक्मिणीसह द्वारकेत प्रवेशले. द्वारकावासियांना हे आधीच समजले असल्यामुळे त्यांनी द्वारका सजवून मंगलमय करून टाकली होती. रस्त्या रस्त्यावर दुतर्फा, हातात पंचारत्यांची ताटे घेऊन सुवासिनी कृष्ण रुक्मिणी याना ओवाळीत होत्या. फुले उधळीत होत्या व आपला आनंद व्यक्त करीत होत्या. ठीकठिकाणचे मित्र राजे आपल्या अपूर्व ऐश्वर्यासह अगणित नजराणे घेऊन द्वारकेच्या राजमार्गावरून शिस्तबध्द मिरवणुकींने भगवंताच्या भव्य राजप्रासादाकडे निघाले होते. भगवान श्रीकृष्ण लक्ष्मीरूपी रुक्मिणीला द्वारकेत घेऊन आल्याचा आनंद द्वारकेचे नागरिक मोठ्या उत्साहाने साजरा करू लागले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

श्रीमद्भागवत-दहावा स्कंध

पुष्प १६५ वे (अध्याय ५५ पूर्ण)

## प्रद्युम्न व शंबरासूर

शुकमुनी पुढे सांगू लागले, " राजन्! पूर्वी भगवान शिवांनी क्रोधाने वासुदेवाचा अंश असलेल्या मदनाला भस्म केले होते. त्यामुळे आता पुन्हा शरीर धारण कण्यासाठी त्याने वासुदेवाचा म्हणजे श्रीकृष्णांचा आश्रय घेतला. तोच काम अथवा मदन प्रद्युम्न या नावाने प्रसिध्द झाला. प्रद्युम्न कोणत्याच बाबतीत पित्यापेक्षा कमी नव्हता. दिसायलाही हुबेहूब श्रीकृष्णच! प्रद्युम्नाचा जन्म झाल्यावर दहा दिवसही झाले नाहीत तेवढ्यातच प्रद्युम्न हा आपला शत्रू असल्याचे ओळखून शंबरासुराने इच्छेनुरूप रूप पालटण्याच्या विद्येच्या बळावर प्रद्युम्नाला सुतीकागृहातून पळवून नेले. आणि समुद्रात फेकून दिले. प्रद्युम्नाला त्याचवेळी एका मोठ्या माशाने अलगद गिळून टाकले. तो मोठा मासा एका कोळयाच्या जाळयात सांपडला. चांगला मोठ्ठा मासा मिळाल्याच्या आनंदात त्या कोळयाने तो मासा शंबरासुराला भेट म्हणून दिला.

शंबरासुराच्या आचाऱ्याला त्या माश्याच्या पोटात ते बाळ सांपडले. त्याने ते बाळ शंबरासुराची दासी मायावती हिला दिले. मायावतीला त्या बाळाचे फार कौतुक वाटले. त्यावेळी त्रिकालज्ञ नारदमुनींनी मायावतीला भेटून ते बाळ म्हणजे भगवान श्रीकृष्ण व रुक्मिणी यांच्या पोटी पुन्हा जन्म घेतलेला कामदेव अर्थात तुझा पतीच आहे. शंबरासुराने त्याला सूतिकागृहातून पळवून समुद्रात टाकले. तिथे माशाने त्याला गिळल्यामुळे इथे तुझ्या हाती आला आहे. मायावती ही प्रत्यक्ष रतीच होती. प्रद्युम्न मोठा झाल्यावर हुबेहूब श्रीकृष्ण दिसू लागला. मायावती ही रतीच असल्यामुळे प्रद्युम्न हा आपला पतीच आहे अशी तिची दृढ धारणा होती. व त्याच धारणेतून ती प्रद्युम्नाचा सांभाळ करीत होती. प्रद्युम्न वयात आल्यावर व तारुण्याने मुसमुसल्यावर जेंव्हा इतर स्त्रिया त्याच्याकडे पहात तेंव्हा त्यांचा काम उद्दीपित होई आणि मग त्या लाज्जायुक्त हास्य कटाक्ष त्याच्याकडे टाकीत. प्रद्युम्नाला आता या गोष्टींची संवय झाली होती.

पण मायावती जेंव्हा स्त्री-पुरुष संबंधित भाव प्रकट करू लागली तेंव्हा मात्र प्रद्युम्न चक्रावला. त्याने मायावतीला ' तूं माझी आई असताना माझ्या बाबतीत तुला ही अशी विपरीत बुद्धी कशी झाली?' तेंव्हा मायावतीने प्रद्युम्नाला सर्व पूर्वकथा सांगून प्रद्युम्न स्वत: मदन व आपण रती असल्याचे सत्य त्याच्या जवळ उघड केले.

रती म्हणजेच मायावती पुढे म्हणाली "हे प्रभो! आपला मुलगा हरवल्यावर माता रुक्मिणी किती शोकाकुल झाली असेल याचा विचार करा! पुत्रस्नेहाने ती आजही शोकाकुल आहे. ज्या शंबरासुराने आपल्याला माता रुक्मिणीपासून पळवून समुद्रात फेकून दिले त्या शंबरासुराला अनेक मायावी विद्या ज्ञात आहेत. त्याला वश करून घेणे अथवा जिंकणे अत्यंत कठीण आहे. हे स्वामी! त्यासाठी मी आपल्या चरणी महामाया नावाची अत्यंत प्रभावी व इतर कोणत्याही माया नष्ट करणारी विद्या अर्पण करते. त्या विद्येमुळे आपला पराक्रम अबाधित होईल व आपण शंबरासुराला मारू शकाल." रतीने प्रद्युम्न जवळ हे रहस्य उघड केल्यावर प्रद्युम्न मनातून शंबरासुरवर चांगलाच खवळला. पण वरकरणी शांतपणा धारण करून तो शंबरासुराकडे आला. आणि शंबरासुरावर नाही नाही ते आरोप करू लागला. शंबरासुराला ते असह्य झाले व तो संतापला. तेंव्हा प्रद्युम्नाने त्याला युद्धाचे आव्हान दिले. शंबरासूर लगेच गदा घेऊन प्रद्म्नाच्या अंगावर धावून गेला. प्रद्युम्न तयारच होता. विजेच्या कडकडाटाने येणारी प्रचंड गदा प्रद्युम्नाने आपल्या गदेने सहज चूर्ण करून टाकली! ते पाहून शंबरासूर अवाक् झाला! हा कालचा पोर एका झटक्यात संपवू अशा गर्वात असणाऱ्या शंबरासुराचा गर्व पार उतरला. त्याच्या गदेचे चूर्ण करणारा प्रतिस्पर्धी आजवर त्याला भेटलाच नव्हता. त्यामुळे प्रद्युम्नाचे सामर्थ्य जाणून त्याने आपल्या मायावी विद्येचा प्रभाव दाखवण्यास सुरुवात केली. पण प्रद्युम्नाने आपल्या विद्येने ती नष्ट केली. आपली सर्व मायावी विद्या नष्ट होताच संतापलेला शंबरासूर प्रद्युम्नाच्या समोर येऊन त्याच्या अंगावर धावून गेला. शंबरासुर समोर दिसताच प्रद्युम्नाने आपल्या तीक्ष्ण तलवारीने त्याचे मस्तक धडावेगळे केले. त्यानंतर आकाशात फिरू शकणाऱ्या मायावतीने प्रद्युम्नासह द्वारकेत रुक्मिणीच्या अंत:पुरातच प्रवेश केला.

प्रद्युम्नाचे ते हुबेहूब श्रीकृष्णा सारखे दिसणारे रूप पाहून रुक्मिणीच्या मनात आलेच कीं हा आपला सूतिकागृहातून पळवलेला मुलगा तर नसेल? आणि तसेच असले पाहिजे अन्यथा माझ्या मनात त्याच्या बद्दल पुत्रप्रेम कां बरे दाटून यावे. अशा विचारात रुक्मिणी गर्क असतानाच वसुदेव-देवकी सह भगवान श्रीकृष्ण व नारद तिथे आले. नारदांनी वसुदेव, देवकी, श्रीकृष्ण, रुक्मिणी यांना शंबरासुराची सर्व हकीकत सांगितली. व हाच तो शंबरासुराने पळवून नेलेला आपला मुलगा प्रद्युम्न असल्याचे सांगितले. प्रद्युम्न हा आपला मुलगा असल्याचे समजताच रुक्मीणीला असमान ठेंगणे झाले. द्वारकेतल्या प्रजाजनांना हे समजताच त्यांनी प्रचंड मोठा आनंदोत्सव साजरा केला. प्रद्युम्न सर्वच बाबतीत आपल्या पित्यासारखा म्हणजे भगवान श्रीकृष्णां सारखा असल्यामुळे इतर मातांना तो आपला पतीच वाटे! यात आश्चर्य वाटण्या सारखे काहीच नाही कारण प्रद्युम्न हा साक्षात वासुदेव पुत्र कामच होता. त्यामुळे तो समोर दिसल्यावर असे होणे स्वाभाविक होते.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-दहावा स्कंध

## पुष्प १६६ वे (अध्याय ५६ पूर्ण)

## जांबवती व सत्यभामा-श्रीकृष्ण विवाह

द्वारकेतल्या सत्राजिताने भगवान श्रीसूर्यनारायणांची सख्यभक्ती करून रोज अठराभार सोने देणारा स्यमंतकमणि प्राप्त करून घेतला होता. त्या मण्याचे पूजन ज्या ठिकाणी होत असे त्या ठिकाणी अवर्षण, अतिवृष्टी, ग्रहपीडा, शारीरिक वा मानसिक पीडा होत नसत. सत्राजिताने तो मणि आपल्या देवघरात स्थापन केला.

पुढे एकदा प्रसंगोपात्त भगवान श्रीकृष्णांनी सत्राजिताला तो मणि प्रजाहितार्थ राजा उग्रसेनाला अर्पण करण्यास सांगितला. पण आपल्या भक्तीचा गर्व झालेल्या सत्राजिताने ते मनावर घेतले नाही. पुढे काही दिवसांनी सत्राजिताचा भाऊ प्रसेन तो मणि गळयात घालून वनात शिकार करण्यास गेला. तेथे एका सिंहाने प्रसेनाला त्याच्या घोड्यासकट मारले. त्यावेळी जांबवानाने ते पाहिले व प्रसेनाच्या गळयातला मणि आपल्या गुहेत नेऊन मुलाला खेळण्यास दिला. प्रसेन परत न आल्यामुळे प्रसेनाला स्यमंतक मण्यासाठी श्रीकृष्णांनी मारले असावे अशी शंका सत्राजित द्वारकेतल्या प्रतिष्ठित नागरिकात व्यक्त करू लागला.

श्रीकृष्णांच्या कानावर ही गोष्ट गेली. त्यांनी आपल्यावरील आळ दूर करण्याचे ठरवले. द्वारकेतल्या काही प्रतिष्ठित नागरिकांना बरोबर घेऊन ते प्रसेनाला शोधण्यासाठी वनात गेले. प्रसेनाला मारलेल्या अवस्थेत सर्वानीच पहिले. पण त्याच्या गळयात स्यमंतक मणि नव्हता. म्हणून मागोवा घेत ते अस्वलाच्या गुहे पर्यंत गेले. ती गुहा फारच भयंकर दिसत होती व आत काळोखही होता. म्हणून श्रीकृष्णांनी प्रतिष्ठित नागरिकांना बाहेरच थांबायला सांगून स्वत: स्यमंतक मण्याच्या शोधासाठी गुहेत शिरले. बरेच आत गेल्यावर स्यमंतक मण्याशी खेळणारा जांबवानाचा मुलगा त्यांनी पाहिला. मुलाकडून तो मणि काढून घेण्याच्या उद्देशाने श्रीकृष्ण त्या मुलाच्या जवळ जाताच मुलाला सांभाळणारी दाई ओरडू लागली. तिचा आरडा-ओरडा ऐकून जांबवान तिथे आला आणि श्रीकृष्णांना मारायला धावला. पण श्रीकृष्णांच्या जबरदस्त प्रतिकाराने तो सावध झाला व स्वसामर्थ्याच्या अभिमानाने त्यांच्याशी द्वंद्व युध्द खेळू लागला.

अठ्ठावीस दिवस अहोरात्र युध्द केल्यावर जांबवान दमला. भगवान श्रीकृष्णांनी त्याची सगळी हाडे खिळखिळी करून टाकली होती. त्यामुळे त्याची विजयाची आशा मावळली. आणि आश्चर्य चकित होऊन

श्रीकृष्णना शरण गेला. श्रीकृष्णांना शरण जाताच त्याच्या अंत:करणात हे आपले स्वामी प्रभुरामचंद्र असल्याची जाणीव उत्पन्न झाली. व सुयोग्य शब्दात त्यांची स्तुती करू लागला. स्तुती करून झाल्यावर आपणच माझे स्वामी श्रीराम आहात. मी आपणास शरण आलो आहे. असे म्हणून त्यांच्या चरणी लीन झाला. तेंव्हा भगवान श्रीकृष्णांनी आपला येण्याचा हेतू त्याला सांगितला. जांबवानाने लगेच तो मणि भगवंताच्या स्वाधीन केला व केलेल्या अपराधाचे परिमार्जन व्हावे म्हणून आपली रूपवती कन्या जांबवतीही भगवंताला अर्पण केली.

गुहेच्या बाहेर वाट पाहाणारे प्रतिष्ठित नागरिक कंटाळून बाराव्या दिवशी द्वारकेस परत आले. व सत्राजिताला शिव्या देत महामाया दुर्गादेवी समोर श्रीकृष्ण सुखरूप परत यावेत म्हणून धरणे धरून बसले. त्यांच्या उपासनेला फळ आले. व स्यमंतक मण्यासह जांबवतीला घेऊन श्रीकृष्ण द्वारकेस परत आले. द्वारकेस आल्यावर भगवान श्रीकृष्णांनी राज सभेत उग्रसेनाच्या समोर सत्राजिताला बोलावले व घडलेला प्रकार सांगून तो मणि सर्वांच्या समोर सत्राजिताला परत केला. सत्राजिताला मेल्याहून मेल्या सारखे झाले. सत्राजिताला मान वर करून पहाण्याचे धैर्य होईना! श्रीकृष्णांशी वैर उत्पन्न केल्याचे भय त्याला वाटू लागले व त्या भयातून मुक्त होण्यासाठी त्याने आपली अत्यंत सुंदर कन्या सत्यभामा श्रीकृष्णांना स्यमंतक मण्यासह अर्पण केली. पण भगवान श्रीकृष्णांनी फक्त सत्यभामेचा स्वीकार केला. स्यमंतक मण्याचा स्वीकार केला नाही.

श्रीकृष्ण सर्वांच्या समोरच सत्राजिताला म्हणाले, "तूं सूर्यभक्त आहेस! म्हणून तो तुझ्याच जवळ असूदे. त्याच्यापासून मिळणाऱ्या सोन्याचा आम्ही स्वीकार करू!" असे म्हणून तो मणि श्रीकृष्णांनी सत्राजिताला परत केला.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

## श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

## पुष्प १६७ वे (अध्याय ५७ पूर्ण)

### स्यमंतक मण्याचे अपहरण

पांडव आणि कुंती लक्षागृहाला लागलेल्या आगीत भस्म झाल्याची खबर हस्तिनापुरहून आल्यामुळे वसुदेव देवकी चांगलेच अस्वस्थ झाले. भगवान श्रीकृष्ण जरी सर्व जाणत होते तरी लोकव्यवहार म्हणून बलराम व श्रीकृष्ण हस्तिनापूरला भीष्म, द्रोण, कृप, विदुर, धृतराष्ट्र, गांधारी इत्यादींच्या सांत्वनासाठी आले.

बलराम व श्रीकृष्ण द्वारकेतून हस्तिनापुर येथे गेल्याचे पाहून अक्रूर व कृतवर्मा शतधन्व्याकडे आले. शतधनव्याला म्हणाले, " सत्राजिताने सत्यभामा तुला देण्याचे कबुल केले होते. पण ती आता त्याने कृष्णाला दिली आहे. मग निदान तो स्यमंतक मणि तरी तूं त्याच्याकडून कां घेत नाहीस?" शतधन्वा तसा दुष्ट स्वभावाचा होता. तो विचारात पडलेला पाहून अक्रूर व कृतवर्मा दोघेही म्हणाले," अरे, विचार कसला करतोस? तुला दिलेले वचन त्याने मोडले आहे. मग वचनभंग करणाऱ्या सत्राजिताला त्याच्या भावाच्या मार्गाने वर पाठव आणि घे तो स्यमंतक मणि."

शतधन्व्याला ते पटले. मागचा पुढचा विचार करण्या इतका शतधन्वा मुत्सद्दी नव्हता. स्यमंतक मण्याच्या लोभाने तो सत्राजिताच्या घरी आला. सत्राजित त्यावेळी झोपलेला होता. शतधन्व्याने काही एक विचार न करता, जीवाच्या आकांताने ओरडत असलेल्या सत्राजिताच्या स्त्रियांकडे पूर्ण दुर्लक्ष करून सत्राजिताला ठार केले व मणि घेऊन पसार झाला. आपल्या पित्याचा इतका हृदयद्रावक अंत झालेला पाहून सत्यभामा मूर्च्छित पडली. पण सावध होताच आपल्या पित्याचे शव तेलाच्या कढईत ठेवून ती तांतडीने हस्तिनापुरला भगवान श्रीकृष्णाकडे आली. बलराम-कृष्ण लगेच द्वारकेला परतले. श्रीकृष्ण द्वारकेला परत आल्याचे समजताच शतधन्वा घाबरून अक्रूर व कृतवर्म्याच्या आश्रयास आला. पण दोघांनीही त्याला वाटेला लावले. तेंव्हा शतधन्व्याने स्यमंतक मणि अक्रुराकडे ठेवायला दिला व स्वत: वेगवान घोड्यावरून द्वारका सोडून पळाला. शतधन्वा पळाल्याचे समजताच बलराम-कृष्ण त्याचा पाठलाग करू लागले. मिथिले जवळच्या उपवनात शतधन्व्याचा घोडा उर फुटून मेला. त्यामुळे शतधन्वा पायीच पळू लागला. ते पाहून श्रीकृष्णही त्याच्या मागे पळत गेले व आपल्या सुदर्शन चक्राने त्याला ठार केले. मग त्याच्या जवळ जाऊन

मणि शोधला पण मणि काही मिळाला नाही. श्रीकृष्णांनी रथाजवळ येऊन बलरामांना तसे सांगितले. तेंव्हा बलराम जरा नाराजीने म्हणाले ठीक आहे. शतधन्व्याने तो द्वारकेतच कोणाकडे तरी ठेवला असेल. तेंव्हा तूं द्वारकेत जाऊन शोध घे. मी इथे माझ्या जुन्या मित्राच्या म्हणजे मिथिलाधिपतीच्या भेटीस जातो. असे सांगून बलराम मिथिलेस गेले. काही काल मिथिलेस राहून बलराम दुर्योधनाला गदायुद्धाचे शिक्षण देण्यास हस्तिनापुरला आले. द्वारकेस परतल्यावर भगवान श्रीकृष्णांनी प्रथम सत्राजीताचे और्ध्वदेहिक केले. मग त्यांनी अक्रूर व कृत्वार्म्याची चौकशी केली. पण ते बलराम व श्रीकृष्ण यांच्या भयाने द्वारका सोडून पळून गेल्याचे समजले. तसेच अनेक श्रेष्ठ व ज्येष्ठ नागरिकांनी श्रीकृष्णांना असे सांगितले कीं अक्रूर द्वारकेतून गेल्यापासून सर्वांना विविध संकटांना तोंड द्यावे लागत आहे.त्यामुळे त्याला द्वारकेत परत आणल्या शिवाय या संकटांपासून आपली सुटका होणार नाही. अक्रुराने स्यमंतक मणि द्वारकेतून पळवला असल्यामुळे ही संकटे येत असल्याचे भगवान श्रीकृष्ण जाणत होते. तरी ज्येष्ठ नागरिकांच्या म्हणण्याला मान देऊन त्यांनी अक्रूराला आणण्यासाठी आपले दूत पाठवले.

अक्रूर भगवंताच्या समोर येताच भगवान श्रीकृष्ण म्हणाले, " अहो अक्रूरकाका! धन देणारा स्यमंतक मणि आपल्याकडे आहे हे आम्ही जाणतो. सत्राजिताला पुत्र नसल्यामुळे त्याच्या मुलीची मुलेच त्याला तिलांजली देऊन पिंडदान करणार व त्याचे ऋण फेडणार. त्यातून जे शिल्लक राहील त्या सर्व धनाचे अधिकारी ती मुलेच होतील. थोडक्यात म्हणजे उत्तराधिकारी या हक्काने तो मणि माझ्याकडेच असायला हवा! पण तरी सुध्दा तो माणि आपण आपल्याकडेच ठेवा! कारण आपण व्रतनिष्ठ आहात. शिवाय तो माणि सांभाळण्याची कुवत इतरांजवळ नाही. बलराम दादांना असे वाटते कीं तो मणि माझ्या जवळच आहे. म्हणून आपण तो मणि दाखवून आमच्या ज्येष्ठ बंधूंची शंका दूर करा. त्या मण्याच्या सामर्थ्यावरच आपण सोन्याची यज्ञवेदी करून पाठोपाठ यज्ञ करीत सुटला आहात हे आम्ही जाणतो." भगवान श्रीकृष्ण असे म्हणताच अक्रुराने आपल्या वस्त्रातून तो माणि बाहेर काढला. भगवान श्रीकृष्णांनी तो बलरामदादांना दखवला, इतरही सर्व बांधवांना दाखवला आणि स्वत:वरील आळ दूर करून तो अक्रूराला परत केला. भगवान श्रीकृष्णांच्या या आख्यान श्रवणाने मनुष्य सर्व पापांपासून मुक्त होतो.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

॥श्रीगुरु:शरणं॥

श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

पुष्प १६८ वे (अध्याय ५८ पूर्ण)

## भगवान श्रीकृष्णांचे अन्य विवाह

पांडव लाक्षागृहातून श्रीकृष्णांच्या आशिर्वादाने सुखरूप बाहेर पडून पुन्हा हस्तिनापूरला आले. मग पांडवांनी इंद्रप्रस्थाला आपले स्वतंत्र राज्य निर्माण केले. त्यानंतर काही काळाने भगवान श्रीकृष्ण पांडवांना भेटण्यासाठी इंद्रप्रस्थ येथे गेले. भगवान श्रीकृष्णांच्या आगमनामुळे सर्वांनाच मोठा आनंद झाला. पांडवांनी भव्य स्वागत केले. पांडवांच्या प्रेमापोटी श्रीकृष्ण इंद्रप्रस्थाला बराच काळ वास्तव्य करून होते. त्या वास्त्व्यात ते एकदा अर्जुना बरोबर शिकारीला गेले असताना यमुनेवर जलपानास आले. तिथे त्यांना एक सुंदर कन्या तप करताना दिसली. तेंव्हा श्रीकृष्णांनी अर्जुनाला तिची चौकशी करण्यास पाठवले. तिने आपण सूर्यकन्या कालिंदी असून भगवान श्रीविष्णू पती म्हणून मिळावेत या उद्देशाने हे तप आरंभले असल्याचे सांगितले. आपल्या पित्याने इथे यमुना जळात बांधून दिलेल्या महालातच आपण राहात असून श्री विष्णुंची प्राप्ती होई पर्यंत तिथेच राहाण्याचा आपला निर्धार असल्याचे तिने अर्जुनाला सांगितले. तेंव्हा भगवान श्रीकृष्णांनी तिला आपले दर्शन देऊन आपल्या रथात घेतले व तिघेही इंद्रप्रस्थाला परत आले.

नंतर पांडवांच्या विनंती वरून भगवान श्रीकृष्णांनी इंद्रप्रस्थ नगरीचे रुपांतर एका अद्‌भुत, रम्य, प्रशस्त, रेखीव व विस्तीर्ण नगरीत विश्वकर्म्याकडून करवून दिले. त्याच वास्तव्यात अग्निदेवांच्या मागणी वरून त्यांनी अर्जुनाकरवी खांडव वन अग्नीला भक्षण करण्यास दिले. खांडववन भक्षण करण्यास मिळाल्या मुळे प्रसन्न झालेल्या अग्नीने अर्जुनाला अभेद्य असे गांडीव धनुष्य व बाणांचे दोन अक्षय भाते दिले. त्या शिवाय एक रथ, चार पांढरे घोडे व अभेद्य कवच दिले. खांडव वन जळत असताना मयासुराच्या विनंती वरून अर्जुनाने त्याला जिवदान दिल्यामुळे त्या उपकाराच्या फेडी साठी मयासुराने पांडवांना एक अद्‌भुत सभागृह बांधून दिले. त्याच सभागृहात दुर्योधन जमिनीला पाणी व पाण्याला जमीन समजून फजित पावला होता. यथावकाश भगवान श्रीकृष्ण कालिंदीसह द्वारकेस परतले व योग्य काळी कालिंदीशी विवाहबध्द झाले.

त्यानंतर काही दिवसांनी श्रीकृष्णांची अवंतीनगरीची आत्या राजाधिदेवी हिच्या मित्रविंदा नामक कन्येने श्रीकृष्णांना वरण्याची इच्छा व्यक्त केली. पण तिचे भाऊ अवंतीनगरीचे राजे विंद व अनुविंद हे दुर्योधनाचे मित्र असल्याने त्यांना तिची ही इच्छा मान्य नव्हती. पण भगवान श्रीकृष्णांना मित्रविंदाची

इच्छा समजल्यावर त्यांनी मित्रविंदाच्या स्वयंवर प्रसंगी भर सभेतून आपल्या सामर्थ्याने तिला द्वारकेस आणले व तिच्याशी विवाह केला. कोसलदेशीचा राजा नग्नाजिताची कन्या सत्या ही अत्यंत सुंदर होती. नग्नाजिताने तिच्या विवाहासाठी सात तीक्ष्ण शिंगाच्या मस्तवाल खोन्डांना मैदानातून पकडून त्यांना नमवणाऱ्याला आपली कन्या दिली जाईल. अशी अट घातली होती. सत्येच्या मनात भगवान श्रीकृष्णांना वरण्याची तीव्र इच्छा होती. भगवान श्रीकृष्ण ती अट पूर्ण करण्याच्या उद्देशाने भरपूर सेनेसह कोसलदेशी आले. नग्नाजिताने भगवान श्रीकृष्णांचे अपूर्व स्वागत केले. श्रीकृष्णांना पाहून सत्या आनंदली. तिने मनोमन प्रार्थना केली कीं मी जर अव्यभिचारी भक्तीने श्रीकृष्णांचे चिंतन केले असेल तर भगवान श्रीकृष्ण माझे पती व्हावेत व माझी पवित्र मनोकामना पूर्ण करावी. भगवान श्रीकृष्णांनी नग्नाजिताचा पण समजून घेतला व लगेच कंबर कसून तयार झाले. नग्नाजिताने सातही मस्तवाल खोंडांना मैदानात सोडले. भगवान श्रीकृष्णांनी एकाच वेळी सात रूपे धारण करून त्या सातही खोंडांना जेरबंद करून वेसण घातली. मग सहजतेने खेळण्यातल्या लाकडी बैलांसारखे ओढू लागले. राजा नग्नाजितासह सर्वच आश्चर्य चकित झाले. मग नग्नाजिताने विधिपूर्वक कन्यादान केले.

पूर्वी ज्या राजांना सत्येच्या प्राप्तीसाठी खोंडांना वेसण घालण्यात अपयश आले होते ते अत्यंत संतापले. त्यांना या सगळया प्रकारात नग्नाजित व श्रीकृष्ण यांची लबाडी वाटली. त्यांनी श्रीकृष्णाशी युध्द करून सत्याला सोडवायचे ठरवले! भगवान श्रीकृष्ण वैभवशाली दक्षिणा घेऊन सत्येसह द्वारकेस निघाले तेंव्हा या अपयशी राजांनी त्याना वाटेत गाठले. पण भगवान श्रीकृष्ण त्या तयारीनेच आलेले होते. त्या सर्व राजांना श्रीकृष्णां बरोबर आलेल्या अर्जुनाने सिंहाने लांडग्यांना पळवून लावावे तसे पळवून लावले. भगवन श्रीकृष्ण व सत्या यांचा विवाह द्वारकेस मोठ्या समारंभात पार पडला. पुढे मद्रदेशीच्या राजाची राजकन्या लक्ष्मणा हिला सुध्दा भगवान श्रीकृष्णां बरोबर विवाह करण्याची इच्छा होती. तिलाही भगवान श्रीकृष्णांनी तिच्या स्वयंवरातून एकट्यानेच हरण केले. तसेंच भौमासुराच्या बंदिखान्यातून सोडवलेल्या हजारो स्त्रियांचे भगवान श्रीकृष्णांनी एकाच वेळी तितकीं रूपे धारण करून पाणिग्रहण केले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

पुष्प १६९ वे (अध्याय ५९ पूर्ण)

## भौमासुराचा वध

शुकमुनी पुढे सांगू लागले, " राजन्! भौमासुराने स्वपराक्रमाने वरुणाचे छत्र, अदितीची दिव्य कुंडले व देवांचे मणिपर्वत नावाचे रम्य स्थान हिसकावून घेतले होते. हे सर्व परत मिळावे अशी देवराज इंद्राने श्रीकृष्णांना प्रार्थना केली. भगवान श्रीकृष्ण सत्यभामेसह गरुडावर स्वार होऊन भौमासुराच्या प्राक्ज्योतिषपुरला निघाले. भौमासुराने प्राक्ज्योतिषपुरात प्रवेश करणे फार अवघड करून ठेवले होते. प्रथम चारी बाजूला प्रचंड शस्त्रास्त्रांनी सज्ज करून ठेवलेले पर्वत होते. त्यांच्या आत पाण्याचे खंदक होते. त्याच्या आत आल्यावर प्रचंड वेगाने वाहणारे वाऱ्याचे तट होते. ते ओलांडल्यावर नगरा भोवती दहा हजार फास लावले होते. या सर्वावर मूर नामक असुराची देखरेख होती.

भगवान श्रीकृष्णांनी प्रथम गदेने पर्वत फोडले. बाणांनी शस्त्रे निष्प्रभ केली. सुदर्शन चक्राने पाणी, अग्नी, वायू यांची खंदके नेस्तनाबूद केली. सगळे फास तलवारीने कापून काढले. श्रीकृष्णांनी आपल्या शंख नादाने यंत्रे व वीरपुरुषांची अंत:करणे शतश: विदीर्ण करून टाकली. त्या शंख नादाने निश्चिंत मनाने झोपलेला मूर दचकून जागा झाला. पण भगवंतांनी क्षणभराचाही वेळ न दवडता आपल्या सुदर्शन चक्राने त्याचे मस्तक धडा वेगळे केले. मूरच्या मृत्यूमुळे संतापलेल्या त्याच्या सात पुत्रांनी भगवंतावर हल्ला केला. त्या सर्वांचा भगवान श्रीकृष्णांनी वध केला. त्यामुळे भौमासुर संतापून आपली सगळी सेना घेऊन भगवंतावर तुटून पडला. सर्वात पुढे असलेल्या हत्ती दलावर गरुडानेच हल्ला चढवल्यामुळे हत्ती बिथरून उलटे फिरले. म्हणून गरुडावर चिडून भौमासुराने वज्रलाहि निष्प्रभ करणारी शक्ती सोडली पण गरुडापुढे ती शक्ती निष्प्रभ झाली. हे सर्व होई पर्यंत भगवान श्रीकृष्णांनी भौमासुराची सगळी सेना विविध शस्त्रास्त्रांनी व बाणांनी एकाच दमात कापून काढली. त्यामुळे भौमासुर एकटाच उरला. भगवंतांनी भौमासुराचे मस्तक सुदर्शन चक्राने धडावेगळे केले आणि युध्द संपवले.

इतक्यात भौमासुराची आई पृथ्वी भगवंताकडे आली. श्रीकृष्णांची पूजा करून तिने प्रथम अदितीची कुंडले, वरुणाचे छत्र वगैरे देऊन हात जोडून प्रार्थना केली, " हे शरणागत वत्सला, भौमासुराचा पुत्र भगदत्त भयभीत झालेला आहे कृपया त्याला अभय द्या!" भगदत्ताला अभय देऊन भगवान श्रीकृष्णांनी

भौमासुराच्या राजप्रासादात प्रवेश केला. तेंव्हा त्यांना भौमासुराने जिंकलेल्या राजांच्या सोळा हजार राजकन्या त्याच्या अंत:पुरात असलेल्या आढळल्या. भगवान श्रीकृष्ण अंत:पुरात येताच त्या सगळया राजकन्यांना भगवान श्रीकृष्णांचे दर्शन झाले व एकाच वेळी त्यांनी मनोमन श्रीकृष्णांना आपले पती म्हणून वरले. त्या सर्व राजकन्यांनी आपल्या ठिकाणी आत्मार्पण केल्याचे जाणून भगवान श्रीकृष्णांनी त्यांना उत्तम वस्त्रालंकारांनी नटवून व पालख्यांमध्ये बसवून द्वारकेस पाठवून दिले.

प्राग्ज्योतिषपुरहून भगवान श्रीकृष्ण इंद्राच्या अमरावतीस आले. तिथे इंद्राणीने भगवान श्रीकृष्ण व सत्यभामा यांचे अपूर्व पूजन केले. अदितीची कुंडले परत करून जेंव्हा भगवान अमरावतीहून निघाले तेंव्हा सत्यभामेने इंद्राच्या बागेतला पारिजातक मागितला. पण इंद्राने चक्क नकार दिला. इंद्राला जेंव्हा आपल्या आईची कुंडले हवी होती तेंव्हा ह्याच इंद्राने मुकुट टेकून भगवंताला विनंती केली होती पण काम झाल्यावर साधा पारिजातक द्यायला तयार नव्हता. तेंव्हा इंद्राला न जुमानता भगवान श्रीकृष्णांनी तो उपटून गरुडावर ठेवला. इंद्र चिडला व युद्धाला आला. तेंव्हा त्या सर्वांचा पराभव करून भगवान श्रीकृष्ण द्वारकेस परत आले.

भगवंतांनी पारिजातकाची स्थापना सत्यभामेच्या बागेत करून सत्यभामेच्या महालाची शोभा अपूर्व केली. भगवान श्रीकृष्णांनी आणलेल्या हजारो राजकन्यांशी भगवंताने एकाच वेळी एकाच मुहूर्तावर वेगवेगळया भवनांमध्ये वेगवेगळी शरीरे धारण करून अपूर्व थाटामाटात विवाह केला. आणि गृहस्थाश्रमाचे पालन करीत त्यांच्यासह रममाण झाले. ब्रम्हदेवालाही प्राप्त करून घेण्यास अशक्य अशा परब्रम्हाला त्या राजकुमारींनी पतीच्या रूपाने प्राप्त करून घेतले. त्या अत्यंत श्रद्धेने, प्रेमाने व भक्तिभावाने भगवंताची सेवा करीत!

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

## पुष्प १७० वे (अध्याय ६० पूर्ण)

## कृष्ण-रुक्मिणी संवाद

यदुकुळात अवतीर्ण झालेला जगन्नियंता, साक्षात् परब्रम्ह भगवान श्रीकृष्ण एकदा रुक्मिणिमातेच्या मंदिरात मंचकावर आरामात पडले होते. रुक्मिणीच्या महालाची शोभा अपूर्व होती. दुधावरच्या सायीसारखी मऊ व शुभ्र चादर घातलेल्या मंचकावर श्रीकृष्ण आरामात रेलले होते. आगरु वगैरेंनी सुगंधित झालेल्या प्रसन्न वातावरणात रुक्मिणी वाळयाच्या पंख्याने भगवंताला वारा घालीत होती. खरे तर ती साक्षात् लक्ष्मीच होती. केवळ भगवंतासाठी तिने भगवंताला अनुरूप देह धारण केला होता. तिला पाहून हसत हसत भगवान श्रीकृष्ण म्हणाले, "हे राजकन्ये! लोकपालांसारखे ऐश्वर्यवान, शूर, पराक्रमी राजे तुझी इच्छा करीत होते. तुझ्या पित्याने व वडील भावाने तसा शब्दही दिला होता. कामोन्मत्त होऊन तुझी प्रार्थना करणाऱ्या शिशुपाला सारख्याला सोडून तूं तुझ्या तोडीचा नसलेल्या मला कां वरलेस हेच मला समजत नाही! अग रूपवान राजकन्ये! जरासंधा सारख्यांच्या भयामुळे आम्ही समुद्रात वस्ती केली. शिवाय आम्हाला राजसिंहासनही मिळणार नाही! आम्हाला तसे काही ध्येयही नाही. शिवाय आमचा लौकिक व्यवहारही काही वाखाणण्या जोगा नाही. त्यातून आम्ही निष्कांचन. आमची आवड म्हणशील तर ती ही निष्कांचन लोकांची. त्यामुळे आमच्यावर प्रेम करणारे तेच. धनवान तर आमच्याकडे ढुंकूनही पहात नाहीत. शिवाय तूं राजकन्या! तर मी एक साधा गवळयाचा पोर! त्यामुळे धन, कुल व प्रताप या गोष्टी तोडीस तोड असणाऱ्यांचे विवाह सुखकर व यशस्वी होतात. तुमच्या दरबारात येणाऱ्या भिक्षुकांनी केलेल्या प्रशंसेला भाळून तूं मला वरण्यात चूक केली आहेस. कदाचित ती चूक अदूरदर्शित्वामुळे झाली असेल. तर ती तूं अजूनही सुधारू शकतेस. आपल्याला अनुरूप अशा श्रेष्ठ क्षत्रियाला स्वीकारून तूं तुझे इह-पर कल्याण साधून घे! हे राजकन्ये! शिशुपाल, शाल्व, जरासंध, दंतवक्र, तुझा भाऊ रुक्मी, इत्यादी राजे माझा द्वेष करतात. केवळ त्यांच्या धन, बळ व सत्तादिंचा माज उतरवण्यासाठी त्यांचा पराभव करून मी तुला पळवून आणले आहे. अन्यथा आम्ही घर, दारा, पुत्र, इत्यादींच्या बाबतीत उदासीन आहोत. आणि आम्हाला तसेही कोणी विचारीत नाही. आमच्या साक्षीने सगळे व्यवहार चालतात इतकेच. जसे दिव्याच्या प्रकाशामुळे लोकव्यवहार होतो तसे. आणि आम्हीही आत्मानंदात तृप्त असतो." रुक्मीणीला झालेला गर्व हरण करण्यासाठी इतके बोलून भगवान श्रीकृष्ण गप्प बसले. आपल्या परम प्रिय भगवंताचे पूर्वी कधीही श्रावण

न केलेले अप्रिय भाषण ऐकून व्यथित झालेल्या रुक्मिणीचे सर्वांग थरथरू लागले. ती घामाने डबडबली. तिला रडू अनावर झाले. ती खाली मान घालून पायाच्या अंगठ्याने जमीन उकरू लागली. तिची विचारशक्तीच नष्ट झाल्यासारखी होऊन भगवंताच्या वियोगाच्या कल्पनेने ती विकलांग झाली. तिच्या हातातला पंखा निसटला, बांगड्या गळून पडल्या. ती पांढरी फट्ट पडली. व वाऱ्याने केळी जशी उभीच्या उभी उन्मळून पडावी तशी मूर्च्छना येऊन रुक्मिणी उभीच्या उभी धडकन जमिनीवर निस्तब्ध पडली. आपल्यावरील प्रेमामुळे आपण केलेली थट्टा रुक्मिणीच्या जिव्हारी झोंबल्याचे पाहून श्रीकृष्णाचे हृदय द्रवले. चतुर्भुज रूप धारण करून त्यांनी तिला उचलून घेतले. तिचे डोळे पुसले, केस सावरले, तिला पूर्ण दिलासा मिळण्यासाठी आपल्या हृदयाशी कवटाळले. मग समजूत घालण्यात कुशल असलेल्या भगवंतांनी समजूत घालायला सुरुवात केली. ते म्हणाले, " नको! नको! विदर्भ राजकन्ये! माझे हे थट्टेतले बोलणे इतके जिव्हारी लाऊन घेऊ नकोस. तूं माझ्याशी परिपूर्ण एकनिष्ठ असल्याचे मी जाणतो. पण असे काही बोलल्यावर तूं कृतकोपाने थरथरत, डोळयांच्या कडा लाल करून काय काय बोलशील ते ऐकण्याच्या हेतूने मी तुझी थोडी थट्टा केली. अग वेडे! गृहस्थांना एकांतात आपल्या पत्नी बरोबर हास्य-विनोद करीत काही काळ मजेत घालवता यावा म्हणून तर मी हा याम निर्माण केलेला आहे! "

भगवंताचे हे समजूत घालणारे बोल ऐकून निर्भय झालेली रुक्मिणी प्रेमपूर्ण सलज्ज कटाक्ष श्रीकृष्णांच्या मुखावर टाकून लाजत लाजत म्हणाली, "हे कमलनयना! आपल्या सारख्या त्रिभुवनचालकाला मी अनुरूप नाही. हे आपले म्हणणे अगदी खर आहे. कारण आपल्याला तपस्वी, ज्ञानी, ब्रम्हादिकांसारखे श्रेष्ठ देव वंदन करतात. तर मला प्रकृतीच्या आहारी गेलेले अज्ञानी व भौतिकाची हाव असलेले वंदन करतात. आपण राजे लोकांच्या भयाने समुद्रात राहता हेही खरेच आहे. कारण राजे रजोगुणाधिक्यामुळे त्रिगुणांनी व्याप्त असतात तर आपण निर्गुण! त्यामुळेच तर त्यांचे आपल्याशी वैर! म्हणून तर आपण समुद्रात शयन करता. आपण सदैव आत्मानंदरुपी सिंहासनावर आरूढ असल्यामुळे आपले सेवक सुध्दा राजसिंहासनाचा त्याग करतात. आपल्या चरणकमळांचा मकरंद सेवन करणारे मोठ मोठे योगी व ब्रम्हदेवही आपला मार्ग व कर्म जाणत नाहीत. व पशुवत मानवी जीवन जगणारेही जाणत नाहीत. त्यामुळे आपल्या क्रिया आपल्या शिवाय कोण बरे जणू शकणार? आपण स्वत:ला निष्कांचन म्हणवता तेही अगदी खरे आहे. कारण सर्व चराचरच जर आपण आहात तर दुसरे धन आणायचे कोठून? धनाढ्य लोक इंद्रियतृप्तीच्या मागे लागून आपल्याला विसरतात तर आत्मानात्म विवेकी सर्वस्वाचा त्याग करून आपल्याला भजत असतात. आपली अशा प्रकारची सर्व कीर्ती ऐकून तर मी आपल्याला समजून उमजून वरले आहे. त्यामुळे अनासक्त ज्ञानी भिक्षुकच आपल्याला समजू शकतात. हे गदाग्रजा! इतर राजांच्या भयामुळे आपण समुद्रात निवास करता हे तर्क संगत होत नाही. कारण आपण आपल्या शाङ्‌र्गधनुष्याच्या नुसत्या टणत्काराने माझ्या विवाहाला आलेल्या सर्व राजांना पळवून लावलेत. सिंह जसा आपल्या नुसत्या डरकाळीने इतर श्वापदांना पळवून लावतो व आपला भाग नेतो तद्वत आपण मला पळवून आणले आहे. हे भगवन! आकांक्षा पूर्ण करण्यासाठी मी दुसऱ्या एखाद्या राजकुमारला वरावे असे आपण म्हणता. पण लोकांना पाप-तापापासून मुक्त करणाऱ्या, लक्ष्मीचे निवासस्थान असणाऱ्या आपल्या चरणकमळांचा आश्रय घेतल्यानंतर स्वार्थ व परमार्थ जाणणारी कोणती स्त्री भयग्रस्त राजकुमारांचा विचार मनात आणील? इह-

पर कल्याण करणाऱ्या व सर्वांचा आत्मा असलेल्या जगदिश्वरांना मी वरले आहे. हे अच्युता, हे अनंता, ज्या ज्या राजांची नावे आपण घेतली आहेत ते ते राजे घरामध्ये गाढवासारखी ओझी वाहणारे, कुत्र्यासारखे स्त्रियांकडून तिरस्कार सहन करणारे व हिंसक बोक्यासारखे स्त्रियांचे दास्यत्व स्वीकारणारे आहेत. ब्रम्हलोकी गायिली जाणारी आपली कीर्ती त्या दुर्दैवी स्त्रियांच्या कानी कधी पडलेलीच नाही. चर्मकुंडाला कवटाळणाऱ्या त्या स्त्रियांना आपल्या चरणकमळांचा सुगंध कधी हुंगावयास मिळालेला नसल्यामुळे त्यांची अशी अवस्था आहे. हे प्रभो! आपल्या चरणी माझी दृढ निष्ठा राहावी अशी मी आपणास प्रार्थना करते. आपण विश्वाच्या अभिवृध्धीसाठी सतत कार्यरत असता व रजोगुणाचा स्वीकार करून माझ्यावरही कृपादृष्टी टाकता हा सुध्दा आपला मजवर फार मोठा अनुग्रह असतो. प्रभो! विवाहापूर्वी स्त्री एखाद्या पुरुषावर आकृष्ट झालेल्या स्त्री बाबत आपले बोलणे अगदी योग्य आहे. आणि आंबेसारखी एखादी स्त्री तशी असतेही. पण मी काही तशी नाही!"

रुक्मिणीचे हे मुद्देसूद व मोहक बोलणे ऐकून भगवान श्रीकृष्ण खुशीत येऊन तिला म्हणाले, " हे साध्वी राजकन्ये! अग अशा प्रकारचे बोलणे तुझ्याकडून ऐकायला मिळावे म्हणून तर तुझी थोडी थट्टा केली. तूं लावलेला अर्थ अगदी योग्यआहे. तूं माझी अनन्य भक्त असल्यामुळे तुझी कोणतीच कामना अपूर्ण राहणार नाही. शिवाय माझ्या संबंधीच्या कोणत्याच कामना संसार बंधनात टाकणाऱ्या नसतात. अग थट्टेतल्या बोलण्यातसुध्दा माझ्या त्यागाची कल्पना सहन न होऊन तूं प्राण त्यागास सिद्ध झालीस! पण हे गृहस्वामिनी ! तूं निरंतर माझी सेवा केल्यामुळे बंधमुक्त आहेस! माझ्यावर इतके उत्कट प्रेम करणारी तुझ्याशिवाय मला दुसरी कोणी दिसत नाही. शिवाय मला तुझ्या एका साहसाचे फार फार कौतुक वाटते कीं विवाहा पूर्वी तूं एका ब्राम्हणा बरोबर पाठवलेले पत्र. ते पत्र तूं केवळ माझी कीर्ती ऐकून पाठवले होतेस! तुझ्या पत्रातल्या संदेशानुसार तुझे हरण करताना तुझ्या भावाशी युद्ध करावे लगले त्यात त्याला विद्रूप केला पण तूं ते सर्व माझ्यासाठी सहन केलेस. त्याही पेक्षा विशेष म्हणजे पुढे बलरामांनी जेंव्हा रुक्मीचा वध केला तेंव्हा माझ्या भावना जपण्यासाठी तूं एका शब्दानेही मला काही बोलली नाहीस! याच गुणांमुळे तूं मला जिंकले आहेस. इतकेच नाही तर तूं पाठवलेला ब्राम्हण परत येण्यास विलंब लागला तेंव्हा मी येतोय कीं नाही असे वाटून तुला सर्व जग भकास वाटू लागले व तूं आपले शरीर त्यागण्याच्या निर्णयाप्रत आलीस. आणि तोच प्रेमभाव तूं आजही व्यक्त केलास! तुझ्या या प्रेमभावाची मला परत फेड तर करताच येणार नाही म्हणून मी फक्त तुझे अमाप कौतुक करतो!" साक्षात् परब्रम्ह असलेले भगवान श्रीकृष्ण अशाप्रकारे संसारी मनुष्य सारखे प्रेमालाप करीत रुक्मिणी बरोबर रममाण झाले. इतकेच नाही तर हे जगद्गुरु सर्वव्यापी असूनही अन्य सर्व पत्नींच्या महालातही गृहस्थधर्मानुसार कालक्रमणा करीत होते.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

पुष्प १७१ वे (अध्याय ६१ व ६२ पूर्ण)

## रुक्मीचा वध व अनिरुद्ध-उषा

ब्रम्हदेवही ज्यांचे खरे रूप जणू शकत नाहीत त्या भगवान श्रीकृष्णांनी सोळा सहस्त्र स्त्रियांना वरले. त्या सर्वजणी श्रीकृष्णांवर प्रेम करणाऱ्या अत्यंत कुशल व कर्तव्य तत्पर गृहिणी होत्या. श्रीकृष्णांवर मोहिनी घालण्यचा त्या नेहेमीच प्रयत्न करीत असत. पण त्या हे कधीच समजू शकल्या नाहीत कीं आपला पती म्हणजे साक्षात् परब्रम्हच आहे. व ते कालत्रयी विचलित होणार नाही. हे जरी खरे असले तरी भगवान श्रीकृष्णांच्या प्रत्येक पत्नीला त्यांच्यापासून दहा दहा मुले झाली होती. रुक्मिणीचा पुत्र प्रद्युम्न याचा विवाह रुक्मिच्या रुक्मावती कन्येशी झाला. स्वयंवर प्रसंगी तिने प्रद्युम्नाला वरले. त्यावेळी इतर राजे संतापले कारण रुक्मीचे श्रीकृष्णाशी वैर होते. त्यांनी प्रद्युम्नाशी युध्द आरंभले. तेंव्हा प्रद्युम्नाने एकट्यानेच त्या सर्वांचा पराभव केला आणि रुक्मावतीचे हरण केले. प्रद्युम्न व रुक्मावतीचा मुलगा अनिरुध्द. अनिरुध्दचा विवाह रुक्मीची नात रोचना हिच्याशी झाला. अनिरुद्धाचा विवाह झाल्यावर कलिंग नरेशांनी रुक्मिला बलरामांशी द्यूत खेळण्याच्या भरीस पाडले. बलराम पहिले काही डाव हरले. पण मग इरेला पेटून बलरामांनी एक लक्ष मोहरांचा पण लावला आणि तो जिंकला. पण रुक्मी लबाडीने "मी जिंकलो! मी जिंकलो" अशी हाकाटी करीत बलरामांची खिल्ली उडवू लागला, कीं " अरे! तुम्ही वनातले गवळी, तुम्हाला द्युतातले काय समजते? आम्ही राजे लोकांनीच काय तो द्यूत खेळावा!"

त्यामुळे खवळलेल्या बलरामांनी दहा कोटी मोहरांचा पण लावला व जिंकलाही! पण रुक्मी कपटाने "मीच जिंकलो आहे! त्यामुळे इथे असलेल्या तज्ञांनाच निर्णय करू दे!" असे म्हणाला. इतक्यात आकाशवाणी झाली कीं " बलराम जिंकले आहेत व रुक्मी कपटाने खोटे बोलत आहे !" ही आकाशवाणी ऐकूनही रुक्मी खोडसाळपणे बलरामांचा उपहास करू लागला व त्याच्या साथीदारांनी त्या उपहासाला दुजोरा द्यायला सुरुवात केली. मग मात्र बलरामांनी तिथेच असलेल्या एका लोखंडी सोट्याने रुक्मीवर प्रहर करून त्याला वरचा रस्ता दाखवला! दांत विचकणाऱ्या कलिंग नरेशचे दांत पाडले. रुक्मिला साथ देणारे राजे भयभीत होऊन पळत सुटले. त्यातले हाती लागले त्यांना बलरामांनी वरचा रस्ता दाखवला. श्रीकृष्णांनी या बाबत मौन धारण केले. मग स्थिरस्थावर झाल्यावर अनिरुध्द व रोचना यांना श्रेष्ठ रथात बसवून सर्वजण भोजकाटाहून द्वारकेस परतले.”

शुकमुनी पुढे म्हणाले, " राजन्! अनिरुध्द व उषा यांची कथा ऐक. उषा ही बाणासुराची कन्या. बाणासुर हा बलीचा थोरला पुत्र व नि:स्सीम शिवभक्त. आपल्या शिवभक्तीने त्याने शिवांकडून एकहजार हात प्राप्त करून घेतले होते. शिवतांडव नृत्याचे वेळी त्या एक हजार हातांनी त्याने अनेकविध वाद्ये वाजवून शिवांना पुन्हा प्रसन्न करून घेतले. तेंव्हा शिव त्याला हवा तो वर माग असे म्हणाले. बाणासुराने " प्रभो आपण माझ्या शोणितपूर नगरीचे रक्षण करीत राहावे!" असा वर मागितला. भोळेशिवशंकर तथास्तु म्हणाले. त्या योगे बाणासुर अत्यंत गर्विष्ठ झाला. इतका कीं एकदां तो भगवान शिवांनाच त्यांच्या चरणी मस्तक टेकून म्हणाला, " हे जगद्‌गुरो! भक्तमनोरथ पूर्ण करणारे आपण कल्पवृक्षच आहात! आपल्याच कृपेने मला हजार हात मिळालेत. पण ते सळसळायला लागल्यावर पर्वत फोडूनही समाधान होत नाही. शिवाय त्रैलोक्यात आपल्या खेरीज माझ्या तोडीचा योद्धा मला दिसत नाही." हे ऐकून भगवान शिवशंकर म्हणाले, " मूर्खा! काळजी करू नकोस! लवकरच तुझा गर्व हरण करणारा योद्धा तुला भेटेल!" बाणासूर मूर्खासारखा तो आपल्याला मिळालेला वर समजून आनंदाने त्या दिवसाची वाट पाहू लागला. बाणासुराला उषा नावाची रूपवती कन्या होती. एके दिवशी निद्रावस्थेत असताना कधीही न पाहिलेल्या अनिरुद्धाशी तिने स्वप्नात समागम केला. अनिरुध्द स्वप्नातून निघून जाऊ लागताच ती "नाथ! नाथ! आपण कोठे आहात?" असे म्हणत उठून बसली. तिच्या जवळच असलेल्या तिच्या सख्यांनी ते ऐकले. तेंव्हा बाणासूराच्या कुभांड नामक मंत्र्याची कन्या चित्रलेखा तिला म्हणाली, " हे राजकुमारी! तुझे कोणी पाणिग्रहण केलेले नसताना तूं कुणाला बरे शोधीत आहेस?" तेंव्हा उषेने चित्रलेखेला अनिरुद्धाचे यथार्थ वर्णन करून सांगितले. तेंव्हा चित्रलेखा म्हणाली तो जर त्रैलोक्यात असेल तर मी तुझी विरह व्यथा दूर करीन! असे म्हणून चित्रलेखेने गंधर्व, किन्नर, विद्याधर इत्यादी लोकातली चित्रे काढली पण त्यात अनिरुध्द नसल्याने उषा काहीच बोलेना! मग चित्रलेखेने शूरसेन, वसुदेव, प्रद्युम्न इत्यादींची चित्रे काढताना अनिरुद्धाचे चित्र काढले. तेंव्हा लाजत लाजत उषा "हेच ते! हेच ते! हेच माझे प्राणनाथ" असे म्हणाली. चित्रलेखा एक महान योगिनी होती. तिने तत्क्षणी आकाशमार्गाने गमन केले. ती द्वारकेतल्या अनिरुद्धाच्या महालात आली. मंचकावरील निद्रिस्त अनिरुध्दाला झोपेतच शोणितपूर मधल्या उषेच्या महालात आणून उषेच्या मंचकावर झोपवले. आपल्या प्राणवाल्ल्भाला पाहून आनंदित झालेली उषा आपले सर्वस्व अनिरुध्दाला अर्पण करून त्याच्या सहवासात आनंदाने कालक्रमणा करू लागली. अनिरुद्धाच्या सहवासाने उषेत माता होण्याची लक्षणे दिसू लागली. तेंव्हा पहारेकऱ्यानी ही अनाकलनीय गोष्ट बाणासुराच्या कानावर घातली. बाणासूर आश्चर्य चकित होऊन लगेच उषेच्या महालात आला. तेंव्हा उषा परमसुंदर अनिरुद्धा बरोबर सारीपाट खेळताना दिसली. बाणासूर आपल्या सशस्त्र सैनिकांसह आलेला पाहून अनिरुद्धाने प्रसंगावधान राखून चपळाईने जवळच असलेला एक परीघ उचलून युद्धाचा पवित्र घेतला. त्याला पकडण्यास सैनिक जवळ येताच डुकरांना मारावे तसे अनिरुद्धाने त्या सैनिकाना मारून टाकले. अनिरुद्धाचा हा अचाट पराक्रम पाहून संतापलेल्या बाणासुराने अनिरुध्दाला नागपाशात बध्द केले. ते पाहून उषा शोकमग्न होऊन रडू लागली.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

## ।।श्रीगुरु:शरणं।।

## श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

## पुष्प १७२ वे (अध्याय ६३ व ६४ पूर्ण)

### श्रीकृष्ण-बाणासूर युध्द

द्वारकेतल्या सर्वांनीच अनिरुद्धाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. तेंव्हा शोकाकुल यादवांना नारदांकडून अनिरुध्दाचा ठावठिकाणा समजला. भगवान श्रीकृष्ण व बलराम यांच्या मार्गदर्शनाखाली यादवांच्या सगळया शूर सेनांनी शोणितपुरला वेढा दिला. यादव जेंव्हा शोणितपूरची तटबंदी उध्वस्त करू लागले तेंव्हा बाणासुराने भगवान शिवशंकरांच्या अधिपत्याखाली युद्धाला प्रारंभ केला. भगवान शिवशंकर स्वत:च बाणासुराचे रक्षण करीत असल्याचे पाहून भगवान श्रीकृष्णांनी जृम्भणास्त्राने त्यांना शांत झोपवून बाणासुराचे सैन्य कापून काढले. बाणासुर संतापून श्रीकृष्णांवर धावला. आपल्या सहस्त्र हातांनी पाचशे बाण एकाच वेळी सोडले. भगवान श्रीकृष्णांनी एकाच बाणात ते सगळे निष्प्रभ केले व बाणासुराचा रथ मोडला, घोडे मारले. इतक्यात बाणासुराला वाचवण्या साठी बाणासुराची धर्ममाता 'कोटरा' नग्नावस्थेत श्रीकृष्णां समोर आली. श्रीकृष्णांनी आपली दृष्टी दुसरी कडे वळवताच बाणासूर नगरात निघून गेला. इतक्यात माहेश्वर ज्वर श्रीकृष्णांवर धावला. भगवंतांनी वैष्णवीज्वर सोडताच तो होरपळू लागला. श्रीकृष्णांना शरण जाऊन म्हणू लागला, " काल, कर्म, स्वभाव, द्रव्य, शरीर, प्राण, अहंकार, शब्द, स्पर्श रूप, रस, गंध, ११इंद्रिये, आम्ही सर्व ज्वर, इतकेच नव्हे तर सर्व सामर्थ्ये आपणच आहात. आम्ही सर्व आपल्या मायेचा एक अल्पसा भाग आहोत. मी आपणास शरण आहे माझे रक्षण करा!" भगवान श्रीकृष्ण म्हणाले " हे त्रिशिरा! तूं भयमुक्त हो! जो कोणी आपला हा संवाद श्रवण करील त्याला तुझ्यापासून भय राहणार नाही." एवढ्या वेळात उसंत घेऊन नव्या दमाने बाणासूर सहस्त्र आयुधे घेऊन परत आला. तेंव्हा भगवान श्रीकृष्णांनी आपल्या सुदर्शन चक्राने त्याचे हात कापायला सुरुवात केली. नेमके त्याच वेळी भगवान श्रीशिवशंकर जृम्भणास्त्राच्या प्रभावातून बाहेर आले. व हात जोडून भगवान श्रीकृष्णाला म्हणाले, " प्रभो! बाणासूर माझा भक्त आहे! त्याच्यावर आपली कृपा असावी!" भगवान श्रीकृष्ण म्हणाले, " हा आपला भक्त व बलीचा पुत्र असल्यामुळे मी याचा वध करणार नाही. पण याचा गर्व नष्ट करण्यासाठी ह्याला फक्त चार हात ठेवून बाकीचे कापून टाकणार आहे. पण आपल्या पार्षदांमध्ये हा प्रमुख असेल." भगवान श्रीकृष्ण व भगवान शिव यांचा संवाद ऐकून बाणासूर भगवान श्रीकृष्णांसमोर येऊन नतमस्तक झाला. जमिनीवर डोके टेकून म्हणाला, " हे भगवान मी आपणास शरण आहे." असे म्हणून बाणासूराने उषा व अनिरुध्द यांना

सन्मानाने रथात बसवून श्रीकृष्णांच्या समोर आणले. मग भगवान शिवांच्या संमतीने भगवान श्रीकृष्ण, ‘उषा व अनिरुध्द’ यांना घेऊन आपल्या सेनेसह द्वारकेस परत आले. या कथेच्या श्रवणाने, श्रवण करणाऱ्याचा कधीच पराजय होत नाही.

द्वारकेस परतल्यावर एके दिवशी भगवान श्रीकृष्ण स्वस्थ बसले असताना सांब, प्रद्युम्न, गद इत्यादी मुले त्यांना सांगू लागली कीं एका उपवनातल्या विहिरीत त्यांनी एक मोठा सरडा पहिला आहे. व त्याला विहिरीच्या बाहेर येत येत नाही. भगवान श्रीकृष्ण त्यांना बरोबर घेऊन त्या विहिरी जवळ आले. मग श्रीकृष्णांनी त्याला सहज बाहेर काढले. पण बाहेर काढता क्षणीच त्याचे रुपांतर एका सुंदर देवात झाले. तेंव्हा मुले एकदम आश्चर्य चकित होऊन पाहू लागली. मुलांना कळावे म्हणून श्रीकृष्णांनी " तुला कोणत्या दुष्कर्मामुळे सरड्यासारखी नीच योनी प्राप्त झाली? " असे विचारले. तेंव्हा भगवान श्रीकृष्णांना जमिनीवर मस्तक टेकून नमस्कार करून तो दिव्यदेहधारी झालेला पूर्वीचा सरडा आपली कथा सांगू लागला.

तो म्हणाला, " मी पूर्वीचा इक्ष्वाकूपुत्र नृगराजा आहे. राजा असताना मी जो दानधर्म करीत असे त्यात मी असंख्य सवत्स गाईंचे दान करीत असे. एकदां कर्म धर्म संयोगाने एका ब्राम्हणाला दान केलेल्यातील एक गाय चुकून परत माझ्या गायींमध्ये आली. नित्याप्रमाणे गाई दान करताना माझ्या न कळत ती गाय दुसऱ्या ब्राम्हणाला दान दिली गेली. दुसरा ब्राम्हण ती गाय नेत असताना पहिला ब्राम्हण त्या गायीला शोधीत तिथे आला व म्हणू लागला कीं ही गाय माझी आहे. आता आली पंचाईत. ते दोघे वाद मिटवण्यासाठी माझ्याकडे आले. मी धर्म संकटात सापडून नकळत घडलेल्या अपराधाची क्षमा मागितली. आणि त्यांना दुसऱ्या असंख्य गायी देण्याची तयारी दर्शवली. पण ते दोघेही कोणतीच तडजोड न करता निघून गेले. माझ्या देहपातानंतर मला विचारले गेले कीं तूं आधी पुण्याचे फळ  भोगणार कीं पापाचे? त्यावेळी मी पापाचे म्हणताच मला ही सरड्याची योनी प्राप्त झाली. हे प्रभो मी पूर्वीपासूनच आपला भक्त असल्यामुळे आपल्या कृपेने माझी पूर्वजन्मातली स्मृती कायम आहे. माझे चित्त आपल्या चरणी जडलेलेच आहे. व दर्शनाची मोठीच अशा होती ती आता पूर्ण झाली. आता माझे चित्त चिरकाल आपल्या चरणी स्थिर होवो. माझा आपणास वारंवार नमस्कार असो." असे म्हणून नृग राजाने भगवंताला प्रदक्षिणा केली साष्टांग नमस्कार केला. इतक्यात एक दिव्य विमान खाली उतरले. तेंव्हा भगवंताच्या अनुमतीने नृग राजा विमानारूढ झाला व दिव्य लोकी निघून गेला. नृग राजा गेल्यानंतर द्वारकावासी यादवांना समजाऊन सांगण्यासाठी भगवान श्रीकृष्ण म्हणाले, " हलाहल विषाचा प्रतिकार करता येईल. पण ब्राम्हणाचे धन हरण केल्यास त्या दोषाचे परिमार्जन कशानेच होत नाही. विष प्राशनाने परिणामी एकट्याचेच नुकसान होते. पण ब्राम्हणाच्या धनाचे अपहरण करणाऱ्याचे संपूर्ण कूळच भ्रष्ट होते. म्हणून ब्राम्हणाचे धन नजरचुकीने सुध्दा माझ्या खजिन्यात येऊ नये याची मी खबरदारी घेतो."  असा उपदेश करून भगवान श्रीकृष्ण आपल्या महालात निघून गेले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

पुष्प १७३ वे (अध्याय ६५ व ६६ पूर्ण)

## बलरामांचे व्रज गमन

बलरामांना एकदां व्रजवासियांना भेटण्याची इच्छा झाली. लगेच ते व्रजात आले. नंद-यशोदा आनंदले व बलरामांचे टोलेजंग स्वागत केले. गोकुळात आनंदोत्सव साजरा होऊ लागला. बलराम व्रजवासीयांच्या प्रेमाने नाहून निघाले. बलराम जरा निवांत बसले होते. इतक्यात सगळ्या गोपींनी त्याना घेरले व आनंदाश्रू ढाळीत त्यांनी श्रीकृष्णांची चौकशी केली! त्या म्हणू लागल्या, " आम्ही कृष्णासाठी घरादाराचा त्याग करायला तयार असताना आमचा प्राणवल्लभ मथुरेत गेला. आपल्या प्रेमाच्या माणसाचे बंधन सोडणे किती कठीण असते. पण हा चित्तचोर आम्हाला सहजतेने सोडून गेला आहे! त्याच्या गोड बोलण्यावर आम्ही भाबड्या स्त्रियांनी विश्वास ठेवला. पण तो आम्हाला फसवून निघून गेला." इत्यादी मधुर भाव व्यक्त करीत त्या गोपी भावविवश होऊन मुळूमुळू रडू लागल्या. बलरामांनी त्यांची समजूत घालून गोपींना आनंद देण्यासाठी चैत्र व वैशाख तिथेच काढायचे ठरवले. तेंव्हा त्या वसंत ऋतूंत बलरामांना खुश करण्यासाठी वरुणाने आपली कन्या वारुणी त्यांच्याकडे पाठवली. वारुणीदेवीने यमुना काठच्या उपवनातल्या एका वृक्षाच्या खोडातून मोहक सुगंधाच्या रूपाने प्रवाही होऊन त्या सुगंधाने बलरामांसह गोपींना आपल्याकडे खेचून घेतले. बलराम गोपींना घेऊन त्या उपवनात आले. गोपी बलरामांच्या चरित्राचे गायन करीत त्यांच्या भोवती नृत्य करू लागल्या. त्यातच त्यांना वारुणीची चांगलीच नशा चढली. त्या नशेत त्यांनी यमुनेला तिच्यात क्रीडा करण्यासाठी आपल्याकडे बोलावले. पण बलराम वारुणीच्या नशेत असल्याचे पाहून यमुनेने त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. तेंव्हा बलरामांनी आपल्या नांगराच्या टोकाने यमुनेला आपल्याकडे खेचून घेतले. बलरामांना संतापलेले पाहून यमुनेने लगेच त्यांची क्षमा मागितली. व त्यांच्या क्रिडनासाठी त्यांना हवी तशी प्रवाही झाली. तेंव्हा लगेच प्रसन्न होऊन बलरामांनी तिच्यात जलक्रीडा करून गोपींच्या कृष्णविरहावर फुंकर घातली.

जलक्रीडा करून बाहेर आल्यावर बलरामांना अधिकच प्रसन्न करण्यासाठी लक्ष्मीने त्यांना झळाळणारी नीलवस्त्रे व सुवर्णालंकार अर्पण केले. ते परिधान करून बलराम अधिकच विलोभनीय दिसू लागले. यमुना आजही बलरामांनी खेचून घेतलेल्या जागेवरूनच वाहात आहे. बलरामांच्या सहवासात वसंतऋतूं केंव्हा संपला हे गोपींना समजलेच नाही. बलराम जेंव्हा व्रजात गेले तेंव्हा द्वारकेत करुषनरेश

पौंड्रकाचा दूत आला. त्याने भगवान श्रीकृष्णांना भर सभेत पौंड्रकाचा निरोप सांगितला. तो दूत म्हणाला, " मी पौंड्रकराजा भगवान वासुदेव असून विश्वकल्याणासाठी अवतार धारण केलेला आहे. त्यामुळे तूं आपले वासुदेव हे खोटे नाव धारण केले आहेस ते टाकून दे! आणि मला शरण ये! अन्यथा युध्द करून मरणास तयार हो!" दूताच्या या निरोपावर यादवसभा उग्रसेनासह खदखदून हसू लागली. भगवान श्रीकृष्णांनी त्या दूताला सांगितले, " जा! तुझ्या मूर्ख राजाला सांग कीं, मूर्खा माझ्या शंख, गदादी चिन्हांनी तुला चिथावणाऱ्या साथीदारांसह तुला रणशय्येवर निद्र घ्यावी लागेल. तेंव्हा तुम्ही सगळे कावळे व गिधाडांचे भक्ष व्हाल!" दूत निरोप घेऊन गेल्यावर भगवान श्रीकृष्णही कशीराजावर चाल करून गेले. कारण पौंड्रक त्यावेळी काशीराजा जवळ राहत होता.

दूताने भगवान श्रीकृष्णांचा तिरस्कारयुक्त निरोप जसाच्या तसा काशीराजाच्या सभेत सांगितल्यामुळे पौंड्रक संतापून गेला. व दोन अक्षौहिणी सैन्यासह श्रीकृष्णांवर चाल करून गेला. पौंड्रकानेही भगवान श्रीकृष्णांसारखीच वेशभूषा केली होती. दोन कृत्रिम हात लावून त्या हातात शंख व चक्र धारण केले होते. रंगमंचावरील नटा सारखा तो जेंव्हा कृष्णांसमोर आला तेंव्हा श्रीकृष्णांना खदखदून हसू आले. ते पौंड्रकला म्हणाले, " अरे पौंड्रका! मला सोडून द्यायला सांगितलेली चिन्हे मी तुझ्यावर सोडतो आणि तूं जे खोटेपणाने माझे नाव धारण केले आहेस तेही तुला आत्ताच सोडायला लावतो." अशाप्रकारे पौंड्रकला खडसावून भगवान श्रीकृष्णांनी आपल्या सुदर्शनचक्राने पौंड्रकचे व त्याच्या बरोबर त्याला मदत करण्यास आलेल्या काशिराजाचे मस्तक उडवले. ते थेट काशीतल्या राजमहालाच्या प्रवेशद्वारात जाऊन पडले. पौंड्रक सतत भगवंताच्या रूपाचेच चिंतन करीत असल्याने भगवंताला जाऊन मिळाला. भगवान श्रीकृष्ण द्वारकेस परतले. इकडे काशिराजाच्या वधामुळे त्याचा पुत्र सुदक्षिण संतापला. आपल्या पित्याचा वध करणाऱ्याचा वध करण्याने आपण पितृऋणातून मुक्त होऊ. असा निश्चय करून तो शिवाराधानेस बसला. भगवान शिव प्रसन्न झाले. सुदक्षिणाने त्यांच्याकडे आपल्या पित्याचा वध करणाऱ्याचा वध करण्याचा वर मागितला. त्यासाठी भगवान शिवांनी त्याला अभिचारिक अग्नीचा यज्ञ करण्यास सांगितला. सुदक्षिणाने तो केला. प्रसन्न झालेल्या अग्नीला सुदक्षिणाने द्वारकेवर पाठवले. तो भयंकर अग्नी द्वारकेवर चालून येतो हे कळताच भगवान श्रीकृष्णांनी प्रलयकारी अग्नीप्रमाणे धगधगणारे आपले सुदर्शनचक्र त्या अग्नीच्या बंदोबस्तासाठी पाठवले. सुदर्शनचक्राने अभिचारिक अग्नी जेंव्हा छिन्न भिन्न होऊ लागला तेंव्हा तो काशीला परतला व अभिचारिक प्रयोग करणाऱ्या ऋत्विजांसह सुदक्षिणाला भस्म करून मोकळा झाला. पाठोपाठ सुदर्शनचक्र काशीत आले व काशीराजा कधीच डोके वर काढणार नाही असा बंदोबस्त करून द्वारकेस भगवंताकडे परत आले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

पुष्प १७४ वे (अध्याय ६७ व ६८ पूर्ण)

## द्विविदाचा उध्दार

भगवान श्रीकृष्णांनी भौमासुराला मारल्यावर भौमासुराचा द्विविद नावाचा एक वानर मित्र श्रीकृष्णांवर चिडला होता. द्विविद अत्यंत बलवान होता. तो सुग्रीवाचा एक मंत्रीही होता. द्विविदाला दहा हजार हत्तींचे बळ होते. श्रीकृष्णांवर सूड उगवण्यासाठी तो काठेवाडात धुमाकूळ घालीत होता. गावेच्या गावे उध्वस्थ करणे, निरपराध स्त्री पुरुषांना गुहेत कोंडून मारणे इत्यादी अमानुष व अनुचित कृत्ये तो करीत होता. तो एकदा रैवतक पर्वतावर आला. त्यावेळी भगवान बलराम आपल्या स्त्रियांसह वनविहाराला आले होते. तेंव्हा तो दुष्ट वानर बलरामांच्या स्त्रियांची मस्करी करू लागला. त्यांना आपले गुप्त अंग दाखवून असभ्य चाळे करू लागला. बलरामांची शक्ती ज्ञात नसल्यामुळे त्यांचीही खिल्ली उडवीत होता. काठेवाडाची दुर्दशा केल्याचा बलरामांना राग होताच. आज प्रत्यक्ष बलरामांचीच खोडी काढल्यामुळे बलरामांनी त्याचा पुरा बंदोबस्त करायचे ठरवले. बलरामांनी आपले मुसळ व नांगर उचलले. द्विविदही बलवान होता. त्यानेही एक झाड उपटून घेतले. फांद्या तोडून मुसळा सारखे सरळ केले व बलरामांच्या डोक्यात मारले. बलरामांनी आपल्या मुसळाने त्याचा प्रतिकार केला व तेच मुसळ द्विविदाच्या डोक्यात मारले. द्विविदाचे डोके त्यामुळे फुटले. पण त्याची पर्वा न करता द्विविदाने दुसरा वृक्ष उपटला. बलरामांनी त्याचेही तुकडे तुकडे केले. तेंव्हा तो भराभर वृक्ष उपटून वनाची नासाडी करू लागला.

तेंव्हा बलराम चिडले. जवळपासचे सगळे वृक्ष संपलेले पाहून द्विविद हातांनी मारण्यासाठी बलरामांच्या जवळ आला. आपल्या जवळ येताच भगवान बलरामांनी नांगर व मुसळ बाजूला ठेवले आणि कपिराज द्विविदाच्या मानेवर आपल्या वज्र मुष्टीचा जोरदार प्रहार केला. तो प्रहार इतका तीव्र होता कीं महाबलाढ्य द्विविद भेलकांडत व रक्त ओकत डोळे पांढरे करून जमिनीवर पडला तो परत उठलाच नाही. बलराम शांतपणे वनविहार संपवून आपल्या स्त्रियांसह आनंदाने द्वारकेस परत आले. शुकमुनी पुढे म्हणाले, राजन्! बलराम एकदां कौरवांवरही कोपले होते. त्याचे असे झाले कीं दुर्योधनाने आपली कन्या लक्ष्मणा हिचे स्वयंवर मांडले. त्यावेळी सांबाने लक्ष्मणाला पळवून नेले.

त्यामुळे कौरव संतापले. त्यांनी सांबाला कैद करायचे ठरवले. त्याप्रमाणे दुर्योधनाने ज्येष्ठांच्या संमतीने कर्ण, शल, भूरिश्रवा, यज्ञकेतू इत्यादींसह सांबाचा पाठलाग केला. इतक्या सगळया कौरवांच्या

एकत्रित हल्ल्या पुढे सांब निष्प्रभ झाला व पकडला गेला. सांबाला दुर्योधनाने कैद करून हस्तिनापूरला नेल्याची बातमी बलराम यांना समजली. यादव संतापले. उग्रसेनच्या संमतीने यादव त्वरित कौरवांशी युध्द करण्यास निघाले. बलरामांनी त्यांना शांत केले व स्वत: इतर ज्येष्ठांसह कौरवांशी समझोता करण्यास निघाले. बलरामांनी हस्तिनापूरच्या बाहेर असलेल्या एका उपवनात मुक्काम केला व उध्दवाला धृतराष्ट्राकडे पाठवले. उद्धावाचे यथोचित स्वागत झाल्यावर उद्धवाने बलराम उपवनात आले असल्याचे सांगितले. कौरव त्वरित उपवनात येऊन बलरामांना भेटले.

बलराम म्हणाले, " उग्रसेन महाराजांना हे ज्ञात झाले आहे कीं तुम्ही सर्वांनी मिळून अधर्माने सांबाला पकडले आहे. तेंव्हा त्याला सन्मानाने इथे आणा!"

तेंव्हा कौरव उद्धटपणे बलरामांना म्हणाले, " अहो काय आश्चर्य! पायातले जोडे डोक्यावर बसू इच्छित आहेत! आम्ही ज्यांना राजसिंहासनावर बसवले आणि आमच्या बरोबरीला आणले तेच आतां आम्हाला आज्ञा करू लागले आहेत! धिक्कार असो या वृत्तीचा!"

हे ऐकून बलराम संतापले. या घमेंडखोरांना त्यांची जागा दाखवलीच पाहिजे. आम्ही जोडे आणि हे मुकुट काय? थांबा! असे मनात म्हणून बलरामांनी आपला नांगर हस्तीनापुरावर रोवला व संपूर्ण हस्तिनापुर यमुनेत बुडवण्यासाठी खेचू लागले. हस्तिनापुर डळमळू लागताच सर्व कौरव बलरामांना शरण जाऊन त्यांची स्तुती करू लागले. तेंव्हा शांत होऊन बलरामांनी हस्तिनापूर पूर्ववत् स्थिर केले. मग कौरवांनी प्रचंड दक्षिणेसह सांब व लक्ष्मणा यांना बलरामांच्या हवाली केले. नवदंपतीस घेऊन बलराम द्वारकेस परतले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

## पुष्प १७५ वे (अध्याय ६९ व ७० पूर्ण)

## श्रीकृष्णांचा गृहस्थाश्रम

देवर्षी नारदांना एकदां भगवान श्रीकृष्ण सोळाहजार एकशे आठ स्त्रियांशी एकाचवेळी कसा काय संसार करतात हे पाहण्याची इच्छा झाली. ते भगवान श्रीकृष्णांच्या अंत:पुरात प्रवेशले. सोळाहजार एकशे आठहून अधिक महाल असलेले ते अंत:पूर अति भव्य दिव्य होते. वस्त्रालंकारांनी नटलेल्या दासींची लगबग प्रत्येक महालात दिसत होती. प्रत्येक महालासमोर भव्य बाग व अवर्णनीय कारंजी होती. नारद प्रथम रुक्मिणीच्या महालात गेले. त्यावेळी भगवान श्रीकृष्ण रुक्मिणीशी हितगुज करीत होते. रुक्मिणी बोलता बोलता पंख्याने वारा घालीत होती. नारदांना पहाताच दोघेही उभे राहिले. नारदांचे स्वागत केले. पाद्यपूजा केली.

तेंव्हा नारद म्हणाले, " प्रभो आपण साक्षात् परब्रम्हच आहात. मला आपल्या चरणाचा कधीच विसर पडणार नाही असा आशिर्वाद द्या!" असा भगवंताचा आशिर्वाद घेऊन नारद तेथून निघाले. नारद श्रीकृष्णांच्या दुसऱ्या पत्नीकडे आले. तिथे श्रीकृष्ण आपली पत्नी व उध्दव यांच्या बरोबर द्यूत खेळत होते. नारद आलेले पाहून श्रीकृष्णांनी जणू नारदांना प्रथमच पहात आहोत अशाप्रकारे सपत्निक नारदांचे स्वागत केले. मग पाद्यपूजा केली. थोड्या गप्पा मारून नारद निघाले. असे प्रत्येक ठिकाणी तेच श्रीकृष्ण विविध व्यवसायात दिसले. तेंव्हा भगवंताच्या अशा विविध लीला पाहून नारद त्यांना म्हणाले, "ब्रम्हदेवांनाही आकलन होणार नाही अशी आपली माया पाहून मी धन्य झालो. आपल्याच कृपेने मला हे दिव्य दर्शन घडले आहे. आता आपल्याच आशिर्वादाने मी त्रिभुवनात आपल्या पावन करणाऱ्या लीलांचे गायन करीत फिरणार आहे."

भगवान श्रीकृष्णांनी नारदांचा उचित सन्मान करून त्यांना निरोप दिला. विश्वोत्पत्ती, स्थिती व लय करणाऱ्या भगवान श्रीकृष्णलीला श्रवणाने भगवद्भक्ति उत्पन्न होते. भगवान श्रीकृष्णांची दिनचर्या अत्यंत आदर्श होती. पहाटे कोंबडा आरवला कीं श्रीकृष्णांच्या सगळया स्त्रियांना त्या कोंबड्याचा भारी राग यायचा! कारण त्याक्षणी भगवान श्रीकृष्ण उठणार व आपल्याला त्यांचा विरह सहन करावा लागणार! भगवान श्रीकृष्ण पहाटेच उठून ध्यान धारणा करीत असत. मग स्नान-संध्या-पूजन-अर्चन इत्यादी झाल्यावर

सूर्योदयी देवतर्पण, ऋषीतर्पण, पितृतर्पण करीत. मग ज्येष्ठांना वंदन करून आदरणीय ब्राम्हणांचे पूजन करीत व एकबध्द म्हणजे १३०८४ सालंकृत व सवत्स दुधाळ गायींचे, वस्त्रे प्रावरणे, धन-धान्य, इत्यादीचे दान करीत. हा सर्व दान विधी झाल्यावर सात्यकी व उध्दवा सह रथात बसून सुधर्मसभेत जात असत. भगवान श्रीकृष्ण जेंव्हा सुधर्म सभेत प्रवेश करीत त्यावेळी संपूर्ण सभा नवचैतन्याने उजळून निघत असे. एकदां ते असेच सुधर्म सभेत प्रवेश करून सिंहासनस्थ झाल्यावर एक दूत भगवान श्रीकृष्णांकडे आला. श्रीकृष्णांनी सतरावेळा पराभव केलेल्या जरासंधाने कैदेत टाकलेल्या कैदी राजांचा तो दूत होता.

तो भगवान श्रीकृष्णांना म्हणाला, "हे प्रभो! जरासंधाच्या दिग्विजय प्रसंगी जे राजे जरासंधाला शरण गेले नाहीत त्या सर्वांना जरासंधाने आपल्या बंदिखान्यात टाकले आहे. त्या बंदिखान्यातल्या राजांचा दूत म्हणून मी आपणास प्रार्थना करण्यास आलो आहे. भौतिक सौख्य नाशिवंत असल्याचे आम्ही जाणत असूनही आपल्या मायेने आम्ही ते ओढत असतो. आम्ही आपणास शरण आलो आहोत. आपण सतरा वेळा जरासंधाचा पराभव केला आहे व अठराव्या वेळी पराभव पत्करलात. त्यामुळे जरासंध जास्तच घमेंडखोर झाला आहे. आपण आम्हा शरणागतांचे जरासंधाच्या अन्यायकारक जरबेतून रक्षण करावे ही आमची आपणास नम्र प्रार्थना आहे.” कैदी राजांचा दूत हे सर्व सांगत असतानाच देवर्षी नारदांचे तिथे आगमन झाले. भगवान श्रीकृष्णांनी त्यांचे स्वागत केले. पूजन वगैरे यथास्थित झाले. नारद आसनस्थ झाल्यावर श्रीकृष्णांनी पांडवांचे कुशल विचारले.

तेंव्हा नारद म्हणाले, " प्रभो आपण सर्वगामी, सर्वसाक्षी, सर्वांतर्यामी असूनही मानवी लीला करीत असता. ,म्हणूनच आपण पांडवांचे कुशल विचारले आहे हे मी जाणतो. प्रभो! आपला आतेभाऊ युधिष्ठीर राजसूय यज्ञ करू इच्छित आहे. त्यासाठी हे त्रिभुवनमंगला! तो आपल्या संमतीची याचना करीत आहे." नारदांचे हे बोलणे सभेतल्या ज्य्ष्ठ व श्रेष्ठ यादवांना पसंत पडले नाही. हे त्यांच्या तत्क्षणी दिसलेल्या प्रतिक्रियेवरून भगवंताच्या लक्षात आले. म्हणून भगवंतांनी स्मितहास्य पूर्वक काहीच निर्णय न देता उद्धवाला सल्ला विचारला.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

## पुष्प १७६ वे (अध्याय ७१ व ७२ पूर्ण)

## श्रीकृष्णांचे इंद्रप्रस्थ गमन

भगवान श्रीकृष्णांनी उद्धवाला सल्ला विचारताच उद्धवाच्या हे लक्षात आले कीं सभेतल्या ज्येष्ठ व श्रेष्ठ यादवांना धर्मराजाचा राजसूय यज्ञाचा विचार फारसा आवडलेला नाही. त्यामुळे उध्दवांनी श्रीकृष्णांचे मनोगत जाणून भर सभेत आपले विचार स्पष्टपणे मांडले.

उध्दव म्हणाला, " शरणागताचे रक्षण करणे हे आपले कर्तव्य आह. त्यामुळे कैदी राजांची कैदेतून मुक्तता करणे हे आपले कर्तव्यच आहे. तसेंच पांडव हे आपले आप्त म्हणजे आते भाऊच आहेत. तेंव्हा हे श्रीकृष्णा त्यांच्या यज्ञात आपला सहभाग अपरिहार्य आहे. तसेंच सर्व दिशांवर विजय प्राप्त झाल्या खेरीज पांडव राजसूय यज्ञ करू शकत नाहीत. म्हणजेच जरासंधाला मारणे आवश्यक आहे. जरासंधाला तुल्यबळ प्रतिस्पर्धी फक्त भीमसेनच आहे. आणि यातील खरे रहस्य हे आहे कीं प्रभो! आपणच सर्वशक्तिमान निर्गुण कालस्वरूप आहात व भीमसेन हा केवळ एक निमित्तमात्र असणार आहे! त्यामुळे जरासंधाला भिमाशी द्वंद्वाला प्रवृत्त करू शकणारे आपणच आहात. शिवाय याचे मुख्य कारण असे आहे कीं जरासंधाने आजवर जे काही विजय प्राप्त केले आहेत ते सर्व विजय शंभर अक्षौहिणी सैन्य व मांडलिक राजे यांच्या बळावर मिळवलेले आहे. जर आपण भीमसेनाला प्रवृत्त करून ब्राम्हण याचकाच्या रूपाने जरासंधाकडे द्वंद्वाची भिक्षा मागितली तर याचकाला परत न पाठवणारा जरासंध स्वशक्तीच्या गर्वामुळे नक्कीच द्वंद्वाची भिक्षा घालील. मग आपल्या कृपेने भीम जरासंधाला नक्कीच ठार मारील. त्यावेळी आपल्या मनाप्रमाणे जरासंधाच्या कैदेत असलेल्या सर्व राजांची सुटका होईल." उद्धावाचे सर्व मुद्दे बिनतोड असल्यामुळे सर्व श्रेष्ठ व ज्येष्ठ यादवांना अनुमोदन द्यावे लागले. सभेचे अनुमोदन मिळताच श्रीकृष्णांनी आलेल्या दूतास राजे लोकांच्या सुटकेचे आश्वासन देऊन परत पाठवले. भगवान श्रीकृष्ण त्वरित इंद्रप्रस्थाला जाण्यासाठी निघाले. भगवान श्रीकृष्ण इंद्रप्रस्थाला निघाल्याचे वृत्त धर्मराजाला श्रीकृष्ण मत्स्य प्रदेश पार करून इंद्रप्रस्था जवळ आल्यावर कळले. त्याने त्वरित भगवान श्रीकृष्णांच्या स्वागताची तयारी केली. संपूर्ण नगर सजवून श्रीकृष्णांच्या स्वागतासाठी स्वत: नगरा बाहेर येऊन श्रीकृष्णांना सामोरा गेला. भगवान श्रीकृष्ण आपल्या पांच पत्नींसह इंद्रप्रस्थास आले होते. पांडवांनी त्या सर्वांचे अत्यंत आदराने व वैभवाने स्वागत केले. याच मुक्कामात मागे वर्णन केलेले खांडववन अग्नीला देवविले होते. त्याच वेळी मयासुराने मयसभा रचून दिली.

भगवान श्रीकृष्णांना वंदन करून युधिष्ठिरांनी आपले राजसूय यज्ञाचे मनोगत सांगितले. भगवान श्रीकृष्णांनी त्याला अनुमती देताना उद्धवाचे मतही सांगितले. धर्मराजाने त्याप्रमाणे आपल्या मनाची तयारीही केली. धर्मराजाने नकुल, सहदेव, अर्जुन व भीम यांना चार दिशांना दिग्विजयाला पाठवून अमाप धन खजिन्यात जमाही करून घेतले. आतां फक्त जरासंधावर विजय प्राप्त करून घ्यायचा शिल्लक होता. भगवान श्रीकृष्ण स्वत:च धर्मराजाला म्हणाले होते कीं जरासंध अजिंक्य आहे! त्यामुळे धर्मराज काळजीत पडून राजसूय यज्ञ पुढे ढकलावा कीं काय अशा विचारात असताना भगवान श्रीकृष्णांनी धर्मराजाकडे भिमार्जुनांची मागणी केली. श्रीकृष्णांनी धर्मराजाला आश्वासन दिले कीं आम्ही तिघे जाऊन जरासंधाचा पराभव करून परत येऊ! भगवान श्रीकृष्ण भीमार्जुनासह उध्दवांनी सुचवल्या प्रमाणे ब्राम्हणाचा वेश धारण करून जरासंधाकडे निघाले. कारण याचक ब्राम्हणाला जरासंध विन्मुख पाठवीत नसे. जरासंध ह्या तीन ब्राम्हणांसमोर आल्यावर भगवान श्रीकृष्ण म्हणाले, " राजन! आम्ही मोठ्या आशेने येथे आलो आहोत. आम्हाला अपेक्षित भिक्षा आपण द्याल अशी आशा आहे. आपल्या समदर्शित्वाची ख्याती ऐकूनच आम्ही इथे आलो आहोत." जरासंधाने तिघांच्याही मनगटावरील घट्टे पाहून हे क्षत्रिय असल्याचे जाणले. तथापि याचक म्हणून आलेले असल्याने जरासंधाने काय हवे ते मागा मी देईन असे म्हटले! तेंव्हा भगवान श्रीकृष्णांनी द्वंद्वयुद्धाची भिक्षा मागितली. व स्वत:सह भिमार्जुनांची ओळख करून दिली.

जरासंध दिसल्यापासूनच भीम त्याच्याकडे अत्यंत तुच्छतेने पहात होता. जरासंध संतापून म्हणाला, " अरे कृष्णा तूं भ्याडा सारखा मथुरा सोडून पळालास म्हणून मी काही तुझ्याशी द्वंद्व युध्द खेळणार नाही व अर्जुन माझ्या ताकदीचा नसल्यामुळे मी त्याच्याशीही खेळणार नाही पण या भिमाबरोबर मी द्वंद्वाला तयार आहे. त्याला प्रथम यमसदनाला पाठवल्यावर मग तुम्हा दोघांना वर पाठवीन." असे म्हणून जरासंध त्या तिघांना नगरा बाहेरील मोकळया मैदानात घेऊन आला. भीमसेन व जरासंध यांचे सत्तावीस दिवस घनघोर युध्द झाले. सगळे नगर त्या युद्धाने दणाणून गेले. अठ्ठाविसाव्या दिवशी भगवान श्रीकृष्णांनी भीमात आपल्या दैवी शक्तीचे संक्रमण करून भीमाला एकदम प्रभावी केले. तेंव्हा भीमाने जरासंधाला जमिनीवर पाडून आपल्या पायाखाली त्याचा एक पाय दाबून धरला व दुसरा पाय हाताने पकडून गुदापासून जरासंधाला उभा चिरून काढला. त्यावेळी जरासंधाच्या भयानक किंकाळयांनी गिरिव्रज दणाणून गेले व भयग्रस्त झाले. पण जरासंधाच्या मृत्यूनंतर भगवान श्रीकृष्णांनी त्यांना अभय देऊन जरासंधाचा पुत्र सहदेव याला मागधाधिपती म्हणून अभिषेक केला. सहदेवाने पांडवांचे मांडलिकत्व स्वीकारून सर्व कैदी राजांची सन्मानाने सुटका केली.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

॥श्रीगुरु:शरणं॥

## श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

## पुष्प १७७ वे (अध्याय ७३, ७४ व ७५ पूर्ण)

### पांडवांचा राजसूय यज्ञ

जरासंधाने कैदेतल्या राजांना एका खोल दरीत कोंडून अगदी दयनीय अवस्था करून टाकली होती. त्यांची सन्मानाने सुटका होताच ते भगवान श्रीकृष्णांचे दर्शन घेण्यास अंगावरच्या मलिन वस्त्रानिशीच आले. दर्शन घेताना म्हणाले, " प्रभो! आम्ही राजमदाने धुंद होऊन पृथ्वी जिंकण्यासाठी आपसातल्या स्पर्धेने स्वत:चीच प्रजा नष्ट करीत असतो आणि त्या मस्तवालपणात आम्ही आपलीही पर्वा करीत नाही! आज आपल्याच कृपेने आम्ही ह्या हीन अवस्थेतून मुक्त झालो आहोत. आपल्या कृपेने नष्ट झालेला आमचा उन्मत्तपणा व गर्व पुन्हा कधीही उद्भवू नये असा आशीर्वाद द्या! आपल्या चरणांचा आम्हाला कधीच विसर पडू नये ही आमची मन:पूर्वक प्रार्थना आहे." त्या राजांची प्रार्थना ऐकून भगवान श्रीकृष्ण म्हणाले, " हे नाराधीपांनो! तुम्ही प्रकट केलेली इच्छा फलद्रूप होण्यासाठी आपले चित्त माझ्या ठिकाणी जडवून आपल्या वंशपरंपरेचे रक्षण करण्यासाठी संतान निर्माण करा! आणि विधिवशात जे प्राप्त होईल त्यात समाधान मानून प्रजा पालन करा. देहसौख्या बाबत औदासिन्य धारण करून स्वस्वरूपात रममाण होण्याचा प्रयत्न करा. मन माझ्या ठिकाणी स्थिर करून मला प्राप्त करून घ्या!" इतके सांगून भगवान श्रीकृष्णांनी त्यांच्या स्नानाची, वस्त्रप्रावर्णाची, अलंकारांची योग्य व्यवस्था केली. त्यानंतर त्या नराधीपांचे भोजनादी सर्व यथास्थित होऊन त्यांच्या मनाला स्थिरता आल्यावर सर्वांचा यथोचित सत्कार करून श्रीकृष्णांनी त्यांना आपआपल्या देशी रवाना केले. भगवान श्रीकृष्ण भिमार्जुनांसह इंद्रप्रस्थाला परतले. जरासंधाची सर्व हकीकत ऐकून धर्मराजा अत्यंत भावविवश झाला. त्याने भगवान श्रीकृष्णांची अत्यंत योग्य शब्दात स्तुती केली व आपला आदर व्यक्त केला. भगवान श्रीकृष्णांच्या अनुज्ञेने धर्मराजाने यज्ञदीक्षा घेतली. त्यावेळी व्यास, सुमन्तु, भरद्वाज, गौतम, असित, देवल, वसिष्ठ, च्यवन, वैशंपायन, द्रोणाचार्य, भीष्म, धृतराष्ट्र इत्यादी श्रेष्ठ व ज्येष्ठ उपस्थित होते. ऋत्विजांनी सोन्याच्या नांगराने यज्ञभूमी नांगरून युधिष्ठिरांना यज्ञदीक्षा दिली व विधिपूर्वक यज्ञ करवून घेतला. आतां कोणत्या श्रेष्ठ सदस्याची अग्रपूजा करावी या बाबत यज्ञसमितीच्या सदस्यात एकमत होईना. तेंव्हा माद्रीपुत्र सहदेवाने भगवान श्रीकृष्णांचे दिव्यत्व, शौर्य, समयसूचकता, सामर्थ्य, निरहंकारी वृत्ती इत्यादींचे प्रभावी वर्णन करून ते अग्रपूजेस कसे योग्य आहेत हे पटवून दिले. इतर यज्ञसमितीच्या सदस्यांनी लगेच अनुमोदन देऊन एकमताने सहदेवाला पाठींबा दिला. त्याप्रमाणे युधिष्ठिरांनी भगवान श्रीकृष्णांचे वेदमंत्रांच्या घोषात पूजन केले. त्यावेळी भगवान श्रीकृष्णांचा

होणारा जयजयकार शिशुपालला असह्य झाला व तो हात उंचावून आसनावरून उठून मोठमोठ्याने भगवान श्रीकृष्णांची अत्यंत अर्वाच्य शब्दात निंदा करू लागला. शिशुपाल म्हणाला, " बालबुद्धीने सहदेवाच्या बोलण्याला ज्ञानवृध्द, वयोवृध्दसुध्दा अनुमोदन देतात याचे मला मोठेच आश्चर्य वाटते. कारण हा कृष्ण यदुकुळातला वर्णाश्रमहीन मनुष्य आहे. शिवाय हा कृष्ण अत्यंत स्वैराचारी, दुराचारी असून याच्या सर्व वंशाला सत्पुरुषांनी बहिष्कृत केलेले आहे. त्या वंशातला हा कृष्ण अग्रपूजेला कसा काय पात्र होऊ शकतो? शास्त्राधार नसताना समुद्रात राहून पृथ्वीवर चोऱ्या करणारे हे लोक! त्यांची कसली अग्रपूजा? " तेंव्हा भगवान श्रीकृष्णांची निंदा असह्य होऊन पांडव, मत्स्य, कैकय, सृंजवंशी राजांनी शिशुपालास श्रीकृष्णांशी द्वान्द युध्दास प्रवृत्त केले. तेंव्हा न घाबरता शिशुपालाने ते स्वीकारले. श्रीकृष्णांनी सर्वांना थांबवून आपल्या सुदर्शन चक्राने शिशुपालाचे मस्तक धडा वेगळे केले. त्याच वेळी शिशुपालाची प्राणज्योत सर्वांसमक्ष भगवान श्रीकृष्णांमध्ये विलीन झाली. नंतर युधिष्ठिर महाराजांनी सर्व समारंभ योग्यरीतीने पार पाडला. अपार दान, दक्षिणा, भेटवस्तू इत्यादी देऊन सर्वांचा यथोचित सत्कार केला. सर्व राजे प्रशंसा करीत आपआपल्या नगरी निघून गेले. पण कलह प्रेमी दुर्योधन पांडवांच्या उत्कर्षाने संतप्त व व्यथित झाला." इथे परीक्षित राजाने दुर्योधन संतप्त होण्याचे कारण विचारले म्हणून शुकमुनी सांगू लागले, "राजन्! यज्ञाच्या व्यवस्थेमध्ये भीम भोजन प्रमुख, दुर्योधन खजिनदार, अर्जुन गुरुसेवा, भगवान श्रीकृष्ण अतिथींचे पादप्रक्षालन, द्रौपदी भोजन वाढणे, अशी कामे वाटून दिली होती. दुर्योधन स्वत:च खजिनदार असल्याने आलेले धन पाहून तो स्तंभित झाला व जळफळू लागला.

शिशुपाल भगवत्चरणी लीन झाल्यावर सगळयांनी गंगास्नान केले. त्यावेळी नौबती ढोल मृदुंग इत्यादी वाद्य गजरात तो सोहळा पार पडला. नंतर ऋत्विजांनी सम्राट युधिष्ठीर व द्रौपदी यांच्याकडून पत्नीसंयाज याग करवून घेतला. मग युधिष्ठीर व द्रौपदी यांनी अत्यंत उत्तम वस्त्रे अलंकार इत्यादी वैभाशाली दिमाखात पण विनयाने सर्व ऋत्विज, ब्राम्हण, राजे इत्यादी सर्व आलेल्या पाहुण्यांचा भरघोस उत्तमोत्तम भेटी वगैरे देऊन सत्कार केला. सगळे अत्यंत संतुष्ट होऊन पांडवांना आशीर्वाद देऊ लागले. युधिष्ठिरांच्या यज्ञाची प्रशंसा करीत सर्व जण आपल्या स्थानी निघून गेले. हा सर्व वैभव संपन्न सोहळा पाहून दुर्योधन मत्सराने पेटून उठला. त्यातच तो मयसभेत बसलेल्या युधिष्ठिराला भेटायला निघाला. तेंव्हा राजभवनात असलेल्या श्रीकृष्णांच्या अत्यंत सुंदर व हजारो राण्यांसह द्रौपदीला पाहून द्रौपदीची आसक्ती असलेल्या दुर्योधनाचा अधिकच जळफळाट झाला. त्याच तिरीमिरीत बाजूच्या सेवकांवर खेकसत तो मयसभेत प्रवेशाला व जमिनीला पाणी समजून वस्त्रे सावरून चालू लागला. मग जमीन असल्याचे समजल्यावर ओशाळला. पुढे चालताना वस्त्रे न सावरता चालू लागला व पुढे प्रत्यक्ष पाणी लागल्यावरही जमीन समजून चालत राहिला. त्यामुळे पाण्यात आपटला व फजित पावला. त्यावेळी भीमसेनासह अन्य मित्र राजे हसू लागले. श्रीकृष्णांच्या राण्यांसह द्रौपदीही हसू लागली. त्यामुळे लज्जित झालेला दुर्योधन आपला अपमान झाल्याच्या भावनेने संतापून तडक हस्तिनापूरला निघून गेला. धर्मराज खिन्न झाला. पण भगवान श्रीकृष्णांना हवे ते झाल्यामुळे ते अत्यंत प्रसन्न झाले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

## पुष्प १७८ वे (अध्याय ७६, ७७ व ७८ पूर्ण)

## शाल्वाचा उध्दार

शाल्व हा शिशुपालाचा खास मित्र होता. रुक्मिणीस्वयंवराचे वेळी तो शिशुपाला बरोबर होता. त्यावेळी जरासंधासह शाल्वालाही यादवांनी पराभूत करून पळवून लावले होते. त्यावेळी शाल्व 'मी पृथ्वीवरून यादवांचे नाव पुसून टाकींन.' अशी प्रतिज्ञा करून पशुपतीच्या तपाला बसला होता. निराहारी राहून केलेल्या कडक तपाने वर्षभराने भगवान शिव त्याला प्रसन्न झाले व हवा तो वर माग म्हणाले. शाल्वाने "देव, दानव, मानव, किन्नर, राक्षस, गंधर्व, नाग इत्यादी पैकी कोणालाही नष्ट करता न येणारे, यादावांसाठी भयानक असणारे व माझ्या इच्छेला येईल तिथे जाणारे विमान मला मिळावे!" असा वर मागितला.

भगवान शिवांनी तथास्तु म्हणून मय नामक दानवाला तसे विमान करून शाल्वला देण्यास सांगितले. शाल्वाला तसे विमान मिळताच शाल्व ते महाकाय विमान सैन्यासह घेऊन द्वारकेवर चालून गेला. सगळी द्वारका आपल्या सेनेने घेरून विमानातून द्वारकेचा विध्वंस करू लागला. त्यावेळी द्वारकेत असलेल्या प्रद्युम्न, सांब, चारुदेष्ण, अक्रूर, कृतवर्मा इत्यादींनी प्रखर प्रतिकार केला. प्रद्युम्नाचा विशेष प्रतिकार पाहून शाल्वाचा मंत्री द्युमान संतापला. द्युमानने आपली प्रचंड व तेजस्वी गदा प्रद्युम्नावर फेकली. त्या प्रहाराने प्रद्युम्न बेशुध्द पडला. तेंव्हा प्रसंगवधान राखून प्रद्युम्नाच्या सारथ्याने रथ रणभूमीच्या बाहेर नेला. शुद्धीवर आल्यावर आपण रणभूमीच्या बाहेर असल्याचे पाहून प्रद्युम्न सारथ्यावर संतापला व त्याला दोष देऊ लागला.

तेंव्हा सारथी म्हणाला, " हे राजकुमार! मी केले ते अगदी योग्य केले आहे! सारथ्यधर्मानुसार संकटकाळी रथ व रथीचे रक्षण करावे असे शास्त्र आहे. प्रतिस्पर्ध्याच्या गदा प्रहाराने आपण बेहोष झाल्यावर सारथ्यधर्मानुसार मला तसे करावे लागले आहे." हे ऐकून प्रद्युम्न चांगलाच भानावर आला व

त्याने आपला रथ द्युमानच्या समोर नेण्यास सांगितला. द्युमान समोर दिसताच प्रद्युम्नाने आठ तेजस्वी बाण सोडले. चार बाणांनी द्युमानच्या रथाचे चार घोडे ठार झाले. पांचव्या बाणाने सारथ्याचा वेध घेतला. सहाव्या बाणाने द्युमानचे धनुष्य तोडले. सातव्या बाणाने ध्वज उडवला व आठव्या बाणाने द्युमानचे मस्तक धडावेगळे केले. सात्यकी, सांब अक्रूर  इत्यादी वीर सौभविमानातील शाल्वाचे सैन्य वेचून वेचून मारीत होते. सत्तावीस दिवस युध्द चालू होते. तेवढ्या काळात इंद्रप्रस्थाला असलेल्या भगवान श्रीकृष्णांना हे वर्तमान कळले. व ते लगेच युधिष्ठिराचा निरोप घेऊन द्वारकेस आले. आल्या आल्या श्रीकृष्णांनी दारुकला आपला रथ शाल्वा समोर घेण्यास सांगितला. आत्ता पर्यंत शाल्वाची बहुतेक सेना नष्ट होत आली होती. श्रीकृष्णांना आपल्या कडे येताना पाहून शाल्वाने दारूकावर मोठी शक्ती सोडली. पण भगवान श्रीकृष्णांनी आपल्या शरसंधानाने ती निष्प्रभ केली. इतक्यात शाल्वाने श्रीकृष्णांच्या डाव्या हातावर एक प्रभावी बाण सोडला.

आणि एक अद्‌भुत घटना घडली. भगवान श्रीकृष्णांच्या हातातून त्यांचे शार्ङ्ग धनुष्य निसटले. आणि शाल्व एकदम मोठ्याने गर्जना करून म्हणाला, "अरे मुर्खा! तूं आमच्या देखतच आमचा भाऊ आणि मित्र असलेल्या शिशुपालाच्या भावी पत्नीला हिरावून नेलेस. तो बेसावध असताना भर सभेत त्याला मारलेस. तूं स्वत:ला अजिंक्य समजतोस काय? पण आजवर तूं माझ्या समोरच आलेला नव्हतास. तो आज आला आहेस. तर मी तुला माझ्या तीक्ष्ण बाणांनी नष्ट करतो."

तेंव्हा भगवान श्रीकृष्ण म्हणाले, " अरे निर्बुध्दा! मृत्यू समीप आला कीं भ्रमामुळे मनुष्य अशीच बडबड करतो. तुझ्या डोक्यावर मृत्यू घिरट्या घालू लागला आहे तो बघ!" असे म्हणून भगवान श्रीकृष्णांनी शाल्वाच्या खांद्यावर गदेने प्रहर केला. शाल्व चळचळा कापीत रक्त ओकू लागला. पण तो लगेच अदृश्य झाला. आणि थोड्याच वेळात एक मनुष्य भगवान श्रीकृष्णांकडे येऊन त्यांना नमस्कार करून म्हणाला, " मी देवकीमातेकडून निरोप घेऊन आलो आहे. हे प्रभो! कसाई जसे पशूला बांधून नेतो तसे शाल्वाने तुझ्या पित्याला बांधून नेले आहे."

दूत असे सांगत असतानाच शाल्व वसुदेवा सारख्या एका पुरुषाला श्रीकृष्णासमोर घेऊन आला व गर्जना करून म्हणाला, " हे मूर्खा! ज्या जन्मदात्यासाठी तूं जगतो आहेस त्यालाच मी ठार मारतो. असेल हिम्मत तर वाचव त्याचे प्राण!" असे म्हणून शाल्वाने तलवारीने त्याचे मस्तक छाटले. शाल्वाची ही अघोरी माया श्रीकृष्णांच्या लक्षात आली. पण अभद्र दर्शन नको म्हणून त्यांनी डोळे मिटून घेतले. तेवढ्यात शाल्व ते मस्तक घेऊन आपल्या सौभविमानात बसला. भगवान श्रीकृष्णांनी जेंव्हा डोळे उघडले तेंव्हा ते धड व शीर नाहीसे होऊन शाल्व विमानात बसल्याचे त्यांनी पहिले. मग क्षणाचाही विलंब न लावता भगवान श्रीकृष्णांनी शाल्वाला आपल्या बाणांनी घायाळ करून त्याचे कवच, धनुष्य, मस्तकमणी विमानासह छिन्नभिन्न केले. त्यामुळे शाल्व संतापून पदाती होऊन गदा युद्धाला श्रीकृष्णांसमोर आला. तेंव्हा श्रीकृष्णांनी गदेसह त्याचा हात आपल्या भाल्याने उखडून काढला. आणि सुदर्शन चक्राने त्याचे मस्तक धडावेगळे केले. त्याच वेळी आपल्या मित्राचा कळवळा येऊन दंतवक्र गदायुध्द करण्यासाठी श्रीकृष्णांवर चालून आला.

दंतवक्र चांगलाच आडदांड होता. त्याच्या संतापून चालण्यामुळे युद्धभूमी हादरू लागली. त्याला गदा घेऊन येताना पाहून श्रीकृष्णांनी आपल्या कौमुदी गदेसह रथातून खाली उडी मारली.

ते पाहून दंतवक्र आपली गदा श्रीकृष्णांचा वेध घेऊन सोडत ओरडला, " श्रीकृष्णा हा बघ तूं मेलास! आणि मी मित्रऋणातून मुक्त झालो! " दंतवक्राची गदा भगवान श्रीकृष्णांच्या मस्तकावर आदळली खरी पण भगवान श्रीकृष्ण जागचे रेसभरही हालले नाहीत! उलट त्यांनी आपल्या कौमुदी गदेचा दंतवक्राच्या छातीवर दणदणीत प्रहार केला. तो प्रहार इतका तीव्र होता कीं महाबलाढ्य दंतवक्र छाती फुटून रक्त ओकत भेलकांडत जमिनीवर अस्ताव्यस्त कोसळला. आणि आचके देत देत गतप्राण झाला. त्याची प्राणज्योत भगवान श्रीकृष्णात विलीन झाली. मग बाकीच्यांना निपटून भगवान श्रीकृष्ण द्वारकेत प्रवेशले.

पुढे कौरव पांडव युद्धाचा रंग दिसू लागला तेंव्हा तटस्थ राहण्याच्या उद्देशाने बलराम तीर्थयात्रेच्या निमित्ताने द्वारकेतून बाहेर पडले. तीर्थ यात्रा करीत करीत बलराम ब्राम्हणांसह यमुनाकाठी असलेल्या नैमिषारण्यात आले. तेथे दीर्घकालीन यज्ञ चालू होता. बलरामांना यज्ञस्थानी आलेले पाहून सर्व ऋत्विज व ब्राम्हण त्यांच्या स्वागतास उभे राहिले. पण त्यावेळी व्यासपिठावर बसलेले व्यासशिष्य रोमहर्षण आपले आसन न सोडता तसेच बसून राहिले. ते पाहून बलराम मनात विचार करू लागले कीं आपण इतक्या ब्राम्हणांसह इथे आलो असताना हा सूतवंशात जन्मलेला रोमहर्षण शिष्ठा सारखा उच्चासनावर बसून राहिला आहे. त्यामुळे हा अविविकी असून ह्या अधर्मामुळे मृत्युदंडास पात्र ठरला आहे. असा संकल्प करून हातातल्या दर्भाने त्यांनी रोमहर्षणमुनींवर प्रहार करून त्याला वर पाठवले. ते पाहून ऋत्विज बलरामांना म्हणाले " हे प्रभो! आम्हीच त्यांना ब्रम्हासन दिले होते. इतकेच नव्हे तर यज्ञ संपेपर्यंत शरीरकष्ट विरहीत आयुष्य बहाल केले होते. त्यामुळे अजाणता कां होईना आपल्या कडून ब्रम्हहत्याच घडली आहे. आम्ही आपणास प्रायश्चित्ताची आज्ञाही करू शकत नाही. त्यामुळे लोकांच्या समोर आदर्श निर्माण करण्या करिता आपणच स्वेच्छा प्रायश्चित्त घेऊन शुद्ध व्हा!"

बलराम म्हणाले, " जरूर! आपण सांगाल ते मी करण्यास तयार आहे." तेंव्हा ऋषींनी रोमहर्षण यांच्या पुत्राला दीर्घायुष्य, बल इत्यादी मागून घेतले व रोमहर्षण यांच्या जागी त्याची स्थापना केली. मग यज्ञसत्रात त्रास देणाऱ्या बल्वल नामक इल्वल दानवाच्या पुत्राला मारण्याची विनंती केली. त्यानंतर वर्षभर तीर्थ यात्रा करून शुद्ध होण्यास सांगितले. बलरामांनी ते मान्य केले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

## पुष्प १७९ वे (अध्याय ७९ व ८० पूर्ण)

## कृष्ण-सुदामा

ऋषींनी विनंती केल्यामुळे बलराम बल्वलाला मारण्यास यज्ञस्थानी थांबले. बल्वल पर्वकाळी प्रकट झाला. त्याने यज्ञाचा परिसर दुर्गंधीयुक्त पदार्थ टाकून अपवित्र करण्यास सुरुवात केली. तेंव्हा बलरामांनी आपल्या नांगर आणि मुसळ यांचे स्मरण केले. तत्क्षणी ती शस्त्रे त्यांच्या हाती आली. बलरामांनी बल्वलाला नांगराने आपल्याकडे खेचले. तो काळाकभिन्न व तप्त अग्नी सारख्या लाल दाढी मिशा असलेला भयानक बल्वल चवताळून गेला. पण बलरामांनी क्षणाचाही विलंब न लावता त्याच्या डोक्यात आपल्या मुसळाने प्रहार केला. तो प्रहार इतका प्रखर होता कीं त्या बलाढ्य बल्वलाचे मस्तक प्रचंड आवाज होऊन फुटले. बल्वल भयानक किंकाळी फोडून गतप्राण झाला. ऋषी मुनींनी बलरामांची स्तुती करून त्यांना पवित्र जलाचा अभिषेक केला. त्यानंतर ऋत्विजांचा निरोप घेऊन कांही ब्राम्हणांसह बलराम कौशिकीं नदीत स्नान करून फिरत फिरत परशुरामांचे दर्शन घेऊन तीर्थ यात्रा करीत करीत कुरुक्षेत्री आले. त्यावेळी कौरव पांडव युध्द समाप्ती होऊन दुर्योधन व भीम गदा युद्धाच्या तयारीत होते. बलरामांनी त्यांना तुल्यबळ म्हणून युध्दापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. पण तो व्यर्थ गेला. त्यामुळे युद्ध हेच त्याचे प्रारब्ध असे समजून बलराम द्वारकेस निघून गेले. द्वारकेला जाऊन उग्रसेन महाराजांची भेट घेऊन सर्व कुशल निवेदन करून यात्रा पूर्ण करण्यासाठी पुन्हा नैमिषारण्यात यज्ञस्थानी आले. त्यावेळी बलरामांनी सर्व प्रकारच्या वैरांचा व युद्धाचा त्याग केलेला होता. तेंव्हा ऋषींनी त्यांच्याकडून अनेक यज्ञ करवून घेतले. त्यानंतर ऋषींच्या विनंती वरून बलरामांनी त्यांना विशुध्द ज्ञानाचा उपदेश केला. स्वत:मध्ये विश्व पाहून स्वत:ला विश्वमय होण्याची अनुभूती त्यांना प्राप्त करवून दिली. बलरामांचे हे चरित्र स्मरण करणारा भगवंताला प्रिय होतो.

शुकमुनी पुढे सांगू लागले, "राजन्! सुदामा नावाचा एक शांतचित्त, जितेंद्रिय, ब्रम्हज्ञानी व विरक्त ब्राम्हण श्रीकृष्णांचा मित्र होता. तो व त्याची पत्नी विधिवशात् जे प्राप्त होईल त्यावर संतुष्ट असत. त्यांना कधी कधी काहीच न मिळाल्याने उपवासही घडत असत. त्यामुळे दोघेही कृश झालेले होते. शिरा अगदी टळटळीत दिसत असत. एक दिवस भुकेने अत्यंत व्याकूळ झालेली सुदाम्याची पतिव्रता पत्नी आपल्या पतीला म्हणाली "पतिदेव! लक्ष्मीपती भगवान श्रीकृष्ण आपले मित्र आहेत! ते ब्राम्हणभक्त व शरणागतवत्सल आहेत. शिवाय आपले मित्रही आहेत. आपण कुटुंब वत्सल व दरिद्री आहात. हे कळल्यावर ते आपणास धनवान करतील!" पत्नीच्या बोलण्यातला श्रीकृष्णभेटीचा भाग सुदामजींना अत्यंत महत्वाचा

वाटला व ते लगेच तयार झाले. व पत्नीला म्हणाले, " ठीक आहे! घरात खाद्यपदार्थांपैकी भेट देण्यास जे योग्य असेल ते दे!" तेंव्हा सुदाम्याच्या पत्नीने शेजारणी कडून चार मुठी पोहे मागून आणले आणि सुदामाजींच्या उपरण्यात बांधून दिले.

सुदामा उत्साहाने आपल्या जीर्ण वस्त्रानिशी उपरणे सांभाळीत दमून भागून द्वारकेस आला. कडक पहारे व बंदोबस्त असूनही त्याला कुठेही प्रत्यवाय न होता प्रवेश मिळत गेला. आणि तो भगवान श्रीकृष्णांच्या अंत:पुरात येउन पोहोचला. ज्या वैभवसंपन्न प्रासादात त्याने प्रवेश केला तो रुक्मिणीचा प्रासाद होता. भगवान श्रीकृष्ण त्यावेळी रुक्मिणीच्या पर्यंकावर बसले होते. त्यांनी लांबूनच सुदाम्याला येताना पहिले व ते ताबडतोब उठून धावतच सुदाम्याजवळ आले. श्रीकृष्णांनी सुदाम्याला दृढ आलिंगन दिले. आपल्या परमप्रिय मित्राच्या अंग स्पर्शाने भगवान श्रीकृष्णांच्या डोळयातून आनंदाश्रू वाहू लागले. श्रीकृष्णांनी सुदाम्याला आपल्या जवळ पर्यंकावर बसवून घेतले. मग स्वत:च जाऊन पूजा साहित्य घेऊन आले. सर्व जगाला पवित्र करणाऱ्या स्वत:च्या हातांनी भगवंताने सुदाम्याचे चरणक्षालन केले. ते चरणतीर्थ आपल्या मस्तकी धारण केले. आरती ओवाळली. गायीचे दान दिले. जीर्णवस्त्रे नेसलेल्या व कृशतेमुळे टळटळीत शिरा दिसणाऱ्या सुदाम्यावर रुक्मिणी चवऱ्या ढाळीत उभी होती.

श्रीकृष्ण सुदाम्या शेजारी बसून गुरुकुलातल्या स्मृतीं विषयी बोलू लागले. म्हणाले. " मित्र! तुला गुरुकुलातल्या गोष्टी आठवतात कां? एक दिवस गुरुमातेने मला लाकडे आणण्यास जंगलात जाण्यास सांगितले होते. त्यावेळी तूं ही माझ्याबरोबर आला होतास! कां! तर मी एकटाच जाणार होतो म्हणून. पण परतीच्यावेळी पावसाळा नसतानाही अचानक आभाळ भरून आले. धुवांधार पाऊस सुरु झाला. त्याच वेळी सूर्यास्तही झाला. पायवाट दिसेना. दिशाही कळेनाशा झाल्या. आपण दोघे एकमेकांचे हात हातात घेऊन भांबावल्या सारखे इकडे तिकडे भटकलो. सगळी रात्र अंगावर काढली. दुसरे दिवशी सकाळी आपले गुरुजी आपल्याला शोधीत आले. आणि आपल्या अवस्थेकडे पाहून काय म्हणाले आठवते कां? म्हणाले होते, अरे बाळांनो! तुम्ही आमच्या साठी भरपूर कष्ट घेतले आहेत. आपले शरीर सर्वांना फार प्रिय असते. परंतु तुम्ही त्या शरीराची पर्वा न करता आमच्या सेवेत मग्न राहिलात. गुरूंच्या ऋणातून मुक्त होण्याचा एकमेव मार्ग म्हणजे विशुध्द भावनेने स्वशरीर सद्गुरुसेवेत समर्पण करणे हा आहे. आणि तुम्ही तसे केले आहे. त्यामुळे मी संतुष्ट आहे. तुमची विद्या कधीही निष्फळ होणार नाही." मित्रा गुरुकुलात असताना अशा अनेक घटना घडल्यामुळेच गुरुदेवांनी आपल्याला असा आशिर्वाद दिला होता. गुरुकृपेमुळेच मनुष्य शांती, समाधान व पूर्णत्व प्राप्त करून घेतो." ह्यावर सुदामा म्हणाला, " हे जगद्गुरो! मनुष्याच्या रूपाने आपण गुरुकुलात आमच्या सारख्यांच्या बरोबर राहिल्यामुळे आपल्या दिव्य सहवासाचे भाग्य आम्हाला प्राप्त झाले. आता मला काहीही मिळवायचे शिल्लक राहिले नाही. आपणच साक्षात् वेद आहात! आपला हा परम थोरपणा कीं आपण आमच्याशी हा असा मानवी व्यवहार करता." इतके बोलून सद्गद झालेला सुदामा श्रीकृष्णाकडे पहात शांत बसून राहिला.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

## श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

## पुष्प १८० वे (अध्याय ८१ पूर्ण)

### सुदाम्यास ऐश्वर्य प्राप्ती

भगवान श्रीकृष्ण व सुदामा यांच्या अशा गप्पा ऐन रंगात आल्या असताना श्रीकृष्णांनी सुदाम्यास विचारले, " हे ब्रम्हन्! तूं माझ्यासाठी आपल्या घरून काय भेट आणली आहेस बरे? " तेंव्हा आपण आणलेल्या मुठभर पोह्यांची लाज वाटून सुदामा संकोचाने मान खाली घालून बसला. भगवान श्रीकृष्ण मनातल्या मनात म्हणाले ' हा ब्राम्हण खरोखरीच धन्य आहे! याने आज व या पूर्वीही धनाच्या इच्छेने माझे कधीच भजन केले नाही. केवळ आपल्या पत्नीला बरे वाटावे व आपल्याला भेटता यावे म्हणून हा इथे आला आहे. त्यामुळे देवांनाही दुर्लभ असे ऐश्वर्य मी याला देईन !' अशा विचारात भगवान श्रीकृष्ण असताना आणलेल्या पोह्यांच्या आठवणीने संकोचलेला सुदामा थोडे अंग चोरून बसला.

तेंव्हा त्याच्या उपरण्यातली पुरचुंडी हातात घेऊन श्रीकृष्णांनी " मित्रा! हे काय आहे?" असे म्हणत ती पुरचुंडी उघडली. आणि पोहे पाहून ते आनंदाने म्हणाले, " अरे! ही तर माझ्या अत्यंत आवडीची भेटवस्तू आहे. अरे, हे पोहे मला एकट्यालाच नाही तर सर्व जगाला तृप्त करतील. असे म्हणून श्रीकृष्णांनी मुठभर पोहे खाल्ले आणि दुसरी मुठ भरण्याच्या आत आदिमाता रुक्मिणीने त्यांचा हात धरला व हसत हसत म्हणाली " हे विश्वात्मन! आपल्याला संतुष्ट करून इहलोकीच काय पण परलोकीही समृध्द ऐश्वर्यप्राप्तीसाठी एवढे मुठभर पोहेच बास झाले!" भगवान श्रीकृष्ण अत्यंत गूढ हसले. त्या रात्री सुदामा स्वर्गसुखात असल्या सारखा भगवंताच्या महालात राहिला. दुसऱ्या दिवशी सकाळी स्नानादी झाल्यावर भगवान श्रीकृष्णांनी सुदाम्याचे पुन्हा पाद्य पूजन केले. मग सुदाम्या बरोबर काही अंतर चालून जाऊन सुदाम्याला निरोप दिला. सुदामा भगवान श्रीकृष्ण दर्शनाने तृप्त होऊन त्या विचारातच आपल्या घरी परत आला. पण त्याला आपले घर पूर्वीसारखे दिसेना! त्या ठिकाणी देवेन्द्राचा प्रासाद असावा असा सर्व परिसर निर्माण झाला होता. सुरेख उद्यान, सुंदर सरोवर, त्यात सुंदर हंस, उत्तम वस्त्रालंकार धारण करून अनेक दासींची चाललेली लगबग. इतक्यात देव-देवतांसारख्या दिसणाऱ्या सुंदर स्त्री पुरुषांनी सुदाम्याची स्तुती करून त्याचे स्वागत केले. आपला पती आल्याचे समजताच सुदाम्याची पत्नी दासींसह लक्ष्मीसारखी त्याच्या समोर आली. उत्कट प्रेमामुळे तिचे डोळे भरून आले होते. तिने पटकन आपले मस्तक पतीचरणी नमवून त्या अश्रूंचे सार्थक केले.

हे सर्व ऐश्वर्य पाहून सुदाम्याच्या डोक्यात प्रकाश पडला! त्याला रुक्मिणीमातेचे शब्द आठवले. " हे विश्वात्मन! आपल्याला संतुष्ट करून इहलोकीच नव्हे तर परलोकीही ऐश्वर्य प्राप्ती साठी मुठभर पोहेच पुरेसे आहेत! " त्यावेळी सुदाम्याला भगवान श्रीकृष्णांच्या त्या गूढ हास्याचे रहस्य उकलले. सुदामा मनातल्या मनात म्हणाला, मुठभर पोह्यांनी संतुष्ट होऊन मला अमाप ऐश्वर्य देणाऱ्या मित्राला मी कोणत्या शब्दात वानू? मला संपत्तीचा मोह नाही. आणि तो होऊही नये! पण हे कृष्णा जन्मोजन्मी मला तुझे प्रेम मिळून माझी सख्यभक्ति कायम राहावी म्हणून तुझा हा प्रसाद मी आनंदाने स्वीकारतो!" असा संकल्प करून सुदामा पूर्ण विरक्त राहून सर्व ऐश्वर्य भगवंताचे असल्याच्या जाणीवेत राहून संसार करू लागला. कृष्ण-सुदामा कथा श्रवणाने कृष्ण प्रेम उत्पन्न होऊन कर्मबंधापासून मुक्तता होते.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

पुष्प १८१ वे (अध्याय ८२, ८३ व ८४ पूर्ण)

## द्रौपदी व कृष्णपत्नींचा संवाद

एकदां खग्राससूर्य ग्रहणाच्या पर्वणीला द्वारकावासी स्यमंतपंचक क्षेत्रावर सपत्निक आले. तसेच इतरही ठिकाणचे खूप लोक आलेले होते. हस्तिनापूरचे कौरव व पांडवही आले होते. मग सगळे धार्मिक विधी करून ब्राम्हण भोजन वगैरे झाल्यावर सर्व यादव, वृष्णी, सात्वत इत्यादी सगळयांचे भोजन झाले. मग सुहृदांच्या भेटीगाठी सुरु झाल्या. नंदबाबा आपल्या सगळया गोप बांधवांसह तिथे आलेले होते. त्यामुळे देवकी-यशोदा यांची अगदी गळयात गळे घालून व डोळयात अश्रुपात होऊन मोठी हृद्य भेट झाली. तशीच यशोदा रोहीणी भेट, मग सगळयाच गोपींची आणि त्यांच्या ओळखीच्या सगळया द्वारकावासी स्त्रियांची एकमेकींच्या वक्षस्थळांना भिडून आवेगाने भेट होऊ लागली. त्यातच कुंती-वसुदेव भेट झाली. नंद यशोदेला श्रीकृष्ण बलराम यांना भेटून झालेल्या आनंदाचे काय वर्णन करावे?

भगवान श्रीकृष्णांना पाहिल्यावर गोपींची जी अवस्था झाली ती मोठी विलोभनीय होती. खूप दिवसांनी झालेल्या श्रीकृष्ण दर्शनामुळे त्या एकटक वेड्या सारख्या देहभान हरपून श्रीकृष्णांना पहात राहिल्या. योग्यांनाही दुर्लभ असा भाव साधून त्यांनी भगवान श्रीकृष्णाला आपल्या हृदयात कोंडून केंव्हाच आलिंगन दिले होते. त्यांचा तो निरपेक्ष भक्तीभाव जाणून भगवान श्रीकृष्णांनी त्यांना एकांतात गाढ आलिंगन दिले. आणि हसत हसत म्हणाले, " गोपिंनो मी खूप दिवस शत्रू दमनात व इतर कार्यात इतका मग्न होतो कीं मला तुम्हाला भेटताच आले नाही. पण मी भेटायला येत नाही म्हणून तुम्ही रागवून मला कृतघ्न समजू नका. कारण प्राण्यांच्या संयोग व वियोगाला भगवंतच कारणीभूत असतो. त्याला माझा तरी कसा अपवाद असणार? सुदैवाने तुम्हाला तुमच्याच अपूर्व भक्तीमुळे माझे प्रेम मिळालेलं आहे. तेच तुम्हाला माझी प्राप्ती करून देणारे आहे. तुम्ही हे ध्यानात ठेवा कीं पंचमहाभूते जशी सर्वव्याप्त असतात तसा मी सर्वव्याप्त असूनही आत्मतत्त्वाने सर्व जीवांना व्यापून असतो. आणि याच्याही पलीकडे अविनाशी सत्य असलेल्या माझ्यात सर्व विश्व प्रतीत होते." भगवान श्रीकृष्ण गोपींना हे आत्मज्ञान सांगत असताना गोपी सहजतेने म्हणाल्या, " हे प्राणनाथ! सर्वांतर्यामी असणाऱ्या आपल्याच चरणकमळांना आमच्या हृदयात

स्थापन करून आम्ही प्रापंचिक व्यवहार तुझा समजूनच करीत असतो. ती आमची दिव्यानुभूती तुझ्या कृपेने तशीच राहूदे एवढीच आमची प्रार्थना आहे. आम्ही तुझ्याच म्हणजे फक्त तुझ्याच आहोत."

गोपींना आत्मज्ञान दिल्यानंतर भगवान श्रीकृष्णांनी पांडवांचे कुशल विचारले. त्यावेळी पांडवांनी श्रीकृष्ण चरणी नतमस्तक होऊन आपला विशुद्ध भाव व्यक्त केला. त्याचवेळी भगवान श्रीकृष्णांच्या पट्टराण्या रुक्मिणी, जांबवती, सत्या, सत्यभामा, कालिंदी, शैब्या, लक्ष्मणा व रोहिणी द्रौपदीशी गुजगोष्टी करीत होत्या. त्यावेळी द्रौपदीने कुतूहलाने त्यांच्या स्वयंवराच्या कथा विचारल्या.

रुक्मिणीसह शैब्या पर्यंत सगळयांनी आपल्या कथा सांगितल्यावर लक्ष्मणा सांगू लागली कीं माझे चित्त भगवान श्रीकृष्णचरणी जडल्याचे माझ्या पित्याच्या लक्षात आले. त्याने माझ्या स्वयंवर प्रसंगी पाण्यात प्रतीबिम्बाच्या रूपाने दिसणाऱ्या मत्स्य-भेदाचा "पण" जाहीर केला. त्यासाठी एक विशेष धनुष्य व बाणही त्या ठिकाणी ठेवले. माझ्या स्वयंवर प्रसंगी हजारो शस्त्रास्त्रवेत्ते राजे तिथे आलेले होते. त्यातल्या अनेकांना तर ते धनुष्यही पेलता आले नाही! जरासंध, शिशुपाल, भीमसेन, दुर्योधन, कर्ण, अशा अनेक वीरांना पाण्यात दिसणारा मासा प्रत्यक्ष कोठे आहे हे न समजल्यामुळे वेध न घेताच परतावे लागले. इतकेच काय पण अर्जुनही अचूक वेध घेऊनही मत्स्यभेद करू शकला नाही. त्याचा बाण माशाला नुसता स्पर्श करून गेला. सगळयांचे प्रयत्न झाल्यावर भगवान श्रीकृष्णांनी अभिजित नक्षत्रावर सहजतेने तो मत्स्यभेद केला. त्यावेळी अनेक मंगल वाद्यांच्या गजरात मी भगवान श्रीकृष्णांच्या गळयात वरमाला घातली. पण अनेक मत्सरी व कामातुर राजे युद्धाला पुढे सरसावले. ते पाहून भगवंतांनी मला रथात घेतले व कुत्र्यासारखे मागे लागलेल्या त्या राजांना पराभूत करून परत पाठवले. त्यात कित्येक राजांचे हात तुटले, कुणाचे पाय तुटले, अनेक जण माना तुटून धारातीर्थी पडले. तर बाकी सगळे मागच्या मागे पळून गेले. अशा प्रकारे भगवंतांनी मला द्वारकेस त्यांच्या सेवेत आणले." त्यावेळी रोहिणी सोळा हजार स्त्रियांच्यावतीने म्हणाली, " भगवंत स्वत: पूर्ण काम असूनही केवळ आमच्या प्रार्थनेमुळे त्यांनी आमचे पाणिग्रहण केले. आम्ही सदैव त्याच्या चिंतनात मग्न असतो." अशा प्रकारे त्यांचे हितगुज चालू होते. भगवान श्रीकृष्णांच्या स्त्रियांना श्रीकृष्णांच्या बद्दल वाटणारे अलोट प्रेम पाहून कुंती, द्रौपदी, सुभद्रा आणि इतर अन्य सर्वच स्त्रिया मंत्रमुग्ध झाल्या.

अशाप्रकारे क्षेत्राच्या ठिकाणी जमलेल्या स्त्री-पुरुषांच्या आपसात गप्पा रंगलेल्या असतानाच व्यास, च्यवन, नारद, वसिष्ठ, अत्री, देवल, शतानंद, गौतम, भरद्वाज, सनकादी मुनींचे तिथे आगमन झाले. सगळया विश्ववंद्य मुनींचे आगमन झालेले पाहून भगवान श्रीकृष्ण व बलराम यांच्यासह सर्व राजांनी उठून त्यांचे स्वागत केले. त्यांचे विशेष पूजन करून भगवान श्रीकृष्ण म्हणाले, " आम्ही आज धन्य झालो. केवळ पाणी म्हणजे तीर्थ नव्हे! किंवा दगडाची मूर्ती म्हणजे देव नव्हे! तर संतच खरे तीर्थ व देव आहेत. देवांच्या अनंत कालच्या पूजनाने ते प्रसन्न होऊन एकदाच फळ देतात. पण संतपुरुषांच्या क्षणभराच्या सेवेने अज्ञान नाहीसे होते. व मनुष्याला खरे समाधान प्राप्त होते .त्यामुळे ज्ञानी पुरुषांना देव न समजणारा नरपशूच समजावा." भगवान श्रीकृष्णांचे हे गूढ भाषण ऐकून ऋषींसह सगळेच स्तब्ध झाले.

पण क्षणभरातच नीट विचार करून ऋषी म्हणाले, " हे भगवन्! आपण सर्वव्यापी असूनही एकदेशित्वाने व मानवी व्यवहाराने आम्हाला मोहित करता. पृथ्वी, वाळू, हिरे , मोती, सोने, रूपे इत्यादी विविध नामांनी आपणच साकारता व सृष्टीरचना करून तिचा संहारही करता. स्वत: पूर्ण ब्रम्ह असून खल निर्दालाना साठी विशुध्दरुपात प्रकट होऊन सनातन वैदिक धर्माचे रक्षण करता. आपले खरे स्वरूप तर कोणीच जाणू शकत नाही. स्वप्नात दिसणारे पदार्थ जसे खरे वाटतात तसे जागेपणी हे शरीर खरे वाटते. आणि मग मनुष्य स्वप्नतुल्य विषयाच्या ओढीने मोहित होतो. आपले मूळ स्वरूप विसरतो. हीच तर आपली माया आहे. पण अभेद भक्तीने आपल्या ठिकाणी आत्मसमर्पण करणाऱ्याचे हे मोहजाल आपणच नष्ट करता! त्यामुळे आपल्या दर्शनाने आज आम्ही धन्य झालो आहोत." अशा प्रकारे ऋषींनी भगवान श्रीकृष्णांची अत्यंत हृद्य स्तुती केली व आपल्या आश्रमास जाण्यास निघाले. तेंव्हा वसुदेवांनी कर्मवासना निवृत्ती व कर्मफळ त्याग यांचा मार्ग विचारला. तो मार्ग भगवान श्रीविष्णूंची यज्ञ द्वारे निष्काम आराधना करण्याने प्राप्त होतो. असे ऋषींनी सांगितल्याने वसुदेवांनी यज्ञदीक्षा घेतली.

मग निष्कामभक्तीने वसुदेवांनी अनेक यज्ञ केले. नंतर ऋत्विजांनी वसुदेवांकडून पत्नीसंयाज व अवभृथस्नान ही कर्मे करवून परशुराम तीर्थात स्नान करवून घेतले. वसुदेवांनी सर्व ऋत्विजांना भरघोस दक्षिणा देऊन संतुष्ट केले. आलेल्या सर्व ब्राम्हणांना व आप्त स्वकीयांना, राजांना इत्यादी सर्वांनाच भेटवस्तू देऊन संतुष्ट केले. नंद यशोदांचे विशेष कौतुक केले व आपण कंसाच्या बंदिवासात असताना बलराम व कृष्ण यांचा सांभाळ केल्या बद्दल विशेष कृतज्ञता व्यक्त केली.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

## पुष्प १८२ वे (अध्याय ८५ व ८६ पूर्ण)

## वसुदेवांना ज्ञानोपदेश

बलराम व कृष्ण हे साक्षात् परब्रम्ह असल्याचे ऋषींनी सांगितल्यामुळे अनेक यज्ञ करून परतल्यावर वसुदेव व देवकी त्या एकाच विचारात गढून गेले.

पूर्ण विश्वास उत्पन्न होऊन वसुदेव पुत्रांना म्हणाले, " हे श्रीकृष्णा, हे संकर्षणा! हे परमात्मन् मला प्राप्त झालेल्या या नरदेहाचे सार्थक व्हावे म्हणून आपण माझे या जगाशी बांधलेले मोहपाश नष्ट करावेत ही माझी आपणास प्रार्थना आहे. हे श्रीकृष्णा! आपण आपल्या जन्मा पूर्वीच मला दर्शन देऊन माझ्यापोटी खल निर्दालाना साठी अवतार घेत असल्याचे सांगितले होते. म्हणून मी आज आपणास शरण आलो आहे. माझ्या पोटी आपण जन्म घेतल्यामुळे मी आपणास माझे पुत्रच समजत आलो. पण आता ती योगमाया दूर करून मला आपल्या स्वरूपाचे कल्याणकारी ज्ञान द्या!" आपल्या पित्याचे हे उचित बोलणे ऐकून भगवान श्रीकृष्ण अत्यंत विनयाने म्हणाले, " बाबा! आपण अत्यंत योग्य व तर्क संगत बोलत आहात. पण हे यदुश्रेष्ठा ! आपण सर्वजण म्हणजेच संपूर्ण विश्व परब्रम्हस्वरूप मानले पाहिजे. स्वयंप्रकाश आत्मा एकच असून त्रिगुणामुळे उत्पन्न केलेल्या पंचमहाभूतांच्या माध्यमातून अनेकत्वाने प्रतीत होतो व एक असूनही उपाधी भेदामुळे अनेक भासतो." भगवान श्रीकृष्णांच्या या वचनाचा विचार करतां करतां वसुदेव एका विविक्षित अवस्थेत गेले. त्यांनी आपल्या अनेकत्वबुद्धीचा त्याग केला. तत्क्षणी ते आत्मबोधाने तृप्त होऊन आत्मानंद अनुभवू लागले.

बलराम व कृष्ण हे साक्षात् परब्रम्ह आहेत असे ऋषींनी सांगितल्यामुळे देवकीच्या मनांत आपल्या पहिल्या सहा पुत्रांना पहाण्याची प्रबळ इच्छा उतपन्न झाली. देवकी बलराम व कृष्णांना म्हणाली, " हे रामा, हे कृष्णा, आपण दोघे चराचराचे स्वामी असल्याचे मला कळले आहे. हे विश्वात्मन् मी आपणास शरण आहे. तुम्ही आपल्या गुरूंचा मृतपुत्र परत आणून दिल्याचे मला ज्ञात झाले आहे. आपण दोघेही योगेश्वरांचे ईश्वर आहात. मला माझ्या सहाही पुत्रांना आज पाहावेसे वाटत आहे. आपण तेवढी माझी इच्छा पूर्ण करा!" देवकी मातेचे हे उद्गार ऐकून भगवान श्रीकृष्ण व बलराम तत्क्षणी बळीराजाच्या सुतलात प्रवेशले. बलीने त्यांचे भव्य स्वागत केले. आगत स्वागत झाल्यावर भगवान श्रीकृष्ण बळीला म्हणाले, " स्वायंभूव मन्वंतरात मरीची व उर्जा यांचे सहा पुत्र देवलोकी असताना ब्रम्हदेव कामासक्त होऊन जेंव्हा आपल्या कन्येच्या मागे

लागला तेंव्हा त्याला हसले. म्हणून ब्रम्हदेवांनी त्यांना शाप देऊन असुर योनीत टाकले. ते हिरण्यकशिपुचे पुत्र झाले. पुढे त्यांनाच योगमायेने देवकीच्या गर्भात स्थापन केले. त्यांचा जन्म होताच त्यांना कंसाने मारले. ते सहा जण तुझ्यालोकी आहेत. त्यांची नावे समर, उद्गीथ, पिष्वंग, पतंग, क्षुद्रमृत व वृणी अशी आहेत. देवकी मातेचा शोक दूर करण्यासाठी ते तूं आम्हाला दे! देवकीला भेटून ते शापमुक्त होऊन माझ्या कृपेने परत त्यांच्या मूळस्थानी देवलोकी जातील." भगवंताच्या तोंडून हे शब्द बाहेर पडताच बलीने त्या सहा जणांना भगवंताच्या स्वाधीन केले. भगवान त्यांना घेऊन द्वारकेस देवकीमातेकडे आले. आपल्या पुत्रांना पाहून देवकीला परम आनंद झाला. तिचे पुत्रप्रेम अनावर झाले व ते स्तनातून क्षीररूपाने वाहू लागले. तेंव्हा तिने आपल्या सहा पुत्रांना स्तनपान दिले. भगवान श्रीकृष्णांनी ज्या स्तनांचे पान केले होते त्या स्तनांचे पान करण्यास मिळाल्यामुळे व भगवान श्रीकृष्णांचा त्यांना स्पर्श झाल्यामुळे ते निष्पाप झाले. त्यांना आत्मसाक्षात्कार झाला. त्या सहा जणांनी वसुदेव व देवकी, बलराम व श्रीकृष्ण यांना नमस्कार केला! मग भगवान श्रीकृष्णांच्या कृपेने ते सर्वांच्या समक्ष देवलोकी निघून गेले.

शुकमुनी पुढे सांगू लागले, "राजन्! अर्जुन एकदां तीर्थयात्रा करीत असताना प्रभासक्षेत्री आला. तिथे त्याला वसुदेव-देवकी व श्रीकृष्ण यांच्या मनाविरुद्ध बलराम सुभद्रेचा विवाह दुर्योधनाशी लावून देऊ इच्छितात असे समजले. तेंव्हा सुभद्रा आपल्याला मिळावी म्हणून अर्जुन त्रिदंडी संन्याशाचा वेश घेऊन द्वारकेस आला. त्या वेशात त्याला कोणी ओळखले नाही. बलरामांनी अर्जुनाला घरी बोलावून त्याचे विशेष आदरातिथ्य केले. त्यावेळी अर्जुनाची व सुभद्रेची नजरा नजर झाली. तिने लाजून अर्जुनाला प्रतिसाद दिला. अर्जुनाने तो संकेत मनात समजून घेतला व संधीची वाट पाहू लागला. सुभद्रा जत्रेसाठी बाहेर पडल्यावर अर्जुनाने वसुदेव-देवकी व भगवान श्रीकृष्ण यांच्या संमतीने रथातून सुभद्रेचे हरण केले. आपल्या सैनिकांचा पराभव करून अर्जुन सुभद्रेला पळवून घेऊन गेल्याचे बलरामांना समजताच ते संतापले. अर्जुनाशी युध्द करण्याच्या तयारीने निघाले. तेंव्हा भगवान श्रीकृष्ण त्यांची मनधरणी करू लागले. भगवान श्रीकृष्णांच्या मनधरणीस यश आले व बलरामांनी तो विवाह भरघोस वरदक्षिणा देऊन आनंदाने मान्य केला.

शुकमुनी पुढे सांगू लागले, " राजन्! विदेहाची राजधानी मिथिलेत श्रुतदेव नावाचा भगवान श्रीकृष्णांचा परमभक्त राहत होता. तो शांत, ज्ञानी व विरक्त असून विधीवशात् प्राप्त होणाऱ्या धनात अत्यंत समाधानाने राहत असे. तसेच त्या देशीचा बहुलाश्व नामक राजाही भगवान श्रीकृष्णांचा परमभक्त होता. भगवान श्रीकृष्णांनी एक दिवस त्यांच्या कडे जाण्याचे ठरवले. त्याप्रमाणे भगवान श्रीकृष्ण नारद, वामदेव, अत्री, वेदव्यास, मी, परशुराम, असित, अरुणी, कण्व, मैत्रेय, च्यवन इत्यादींना आपल्या रथात घेऊन मिथिलेस जाण्यास निघाले. भगवान श्रीकृष्ण आम्हा सर्वांसह मिथिलेत आल्याची बातमी वाऱ्यासारखी सगळी कडे पसरली व जागोजागी असंख्य नागरिक हातात पूजा साहित्य घेऊन भगवान श्रीकृष्णांना सामोरे गेले. त्याचवेळी राजा बहुलाश्व व श्रुतदेव ब्राम्हण दोघे एकाच वेळी त्यांच्या दर्शनास आले व दोघांनी एकाच वेळी आपल्या घरी येण्याची आम्हा सर्वांना प्रार्थना केली. त्यावेळी भगवान श्रीकृष्णांनी दोघांचेही आमंत्रण एकाच वेळी स्वीकारून दोघांच्या नकळत एकाच वेळी दोन्ही ठिकाणी गेले. दोन्ही ठिकाणी एकाच दिवशी व एकाचवेळी आम्हा सर्वांसह पूजन व भोजन झाले. भोजनानंतर राजा बहुलाश्व भगवान श्रीकृष्णांचे चरण आपल्या मांडीवर घेऊन हळुवारपणे चेपीत म्हणाला, " हे प्रभो! या सर्व ऋषींसह आपण इथे येऊन हा देश

पवित्र केला आहे. आपणास माझा वारंवार नमस्कार असो. आता या सर्व ऋषींसह काही दिवस इथे राहून आमचा निमिवंश पावन करावा अशी माझी नम्र प्रार्थना आहे." त्याच्या प्रार्थने प्रमाणे भगवान काही दिवस तिथे राहिले. त्याचवेळी इकडे श्रुतदेव ब्राम्हणही भगवंताचे पाय चेपीत म्हणाला, "हे प्रभो! स्वप्नावस्थेत मनुष्य जसा स्वत:च अनेक बनून त्या सर्वांत प्रवेश करतो आणि अविद्येने दुसरी क्षणभंगुर सृष्टी निर्माण करतो तद्वत् आपणही आपल्यातच ही सृष्टी निर्माण करून त्यात प्रविष्ट झालेला आहात. आपल्या ध्यान-पूजनादींनी जे भक्त सतत आपल्या चिंतनात मग्न होऊन अभेदाचा प्रयत्न करतात त्यांच्यातच आपण आत्मज्ञानाचा प्रकाश पाडता. हे प्रभो! आम्ही आपले सेवक आहोत! आम्हाला अविद्येमुळे काय करावे हे समजत नाही. त्यामुळे आम्ही काय करावे हे आपणच सांगावे!" भगवान श्रीकृष्ण श्रुतदेवाचा हात आपल्या हातात घेऊन हसत हसत म्हणाले, "हे ब्रम्हन्! हे सर्व ऋषी तुमच्यावर कृपा करण्यासाठीच इथे आले आहेत. ते आपल्या चरणधुळीने लोकांना पवित्र करीत माझ्याबरोबर संचार करतात. देवता, पुण्यक्षेत्रे, तीर्थे इत्यादी त्यांच्या पूजनामुळे हळू हळू व बऱ्याच दिवसांनी पवित्र करतात. पण संतपुरुष नुसत्या दृष्टीक्षेपाने पवित्र करीत असतात. ब्राम्हण सर्ववेदमय आहेत तर मी सर्वदेवमय आहे. सर्ववेदमय म्हणजे सर्व चराचर मीच असल्याचे ज्ञान असलेला. पण अजाण माणसे हे न समजता फक्त मूर्तीत पूज्यबुद्धी ठेवतात. म्हणून हे श्रुतदेवा, या ब्रम्हर्षींना माझे स्वरूप समज. त्यांच्या पूजनाने मी जितका संतुष्ट होतो तितका मी माझ्या ऐश्वर्यशाली पूजनाने संतुष्ट होत नाही." हे ऐकून श्रुतदेवाने तत्काळ भगवान श्रीकृष्णासह सर्व ऋषींचे एकात्मभावाने पूजन केले व त्यांच्या कृपेने भगवत्स्वरुपाला प्राप्त झाला. इकडे बहुलाश्वही भगवंताच्या त्याच उपदेशाने भगवत्स्वरुपाला प्राप्त झाला. भगवंत काही दिवस मिथिलेत राहून द्वारकेस परत आले. अमरकीर्ती भगवान श्रीकृष्णांचे हे चरित्र सर्व जगाचे पाप नाहीसे करणारे आहे. याचे श्रवण, मनन व कथन परमकल्याणस्वरूप लोकाची प्राप्ती करून देणारे आहे.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

## ।।श्रीगुरु:शरणं।।

## श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

## पुष्प १८३ वे (अध्याय ८७ व ८८ पूर्ण)

## वेदस्तुती

परीक्षित राजाने विचारले, " हे शुकमुने, परब्रम्ह हे कार्य व कारण यांच्या पलीकडील असून निर्गुण आहे. त्याचे वाणीने व शब्दाने वर्णन करता येत नाही. मनाने व बुद्धीने आकलन होत नाही. आणि सर्व श्रुतींचा विषय तर त्रिगुण हाच आहे. अशा स्थितीत श्रुती निर्गुण परब्रम्हाचे प्रतिपादन कसे करतात?" शुकमुनी म्हणाले, "राजन्! भगवंतांनी जीवाला धर्म, अर्थ, काम व मोक्ष यांच्या प्राप्तीसाठी बुद्धी, इंद्रिये, प्राण व मन यांची योजना केलेली आहे. ब्रम्ह प्रतिपादनाचे ज्ञान उपनिषदांनी केले आहे. व ते आद्यऋषी सनकादि मुनींनी स्वीकारले आहे. जो कोणी ते श्रद्धापूर्वक श्रवण करतो, मनन करतो तो सर्व उपाधींपासून मुक्त होऊन परमकल्याण स्वरूपाला प्राप्त होतो. पूर्वी एकदा नारद व नारायण यांचा असाच संवाद झाला होता. त्यावेळी नारायणांनी जे सांगितले तेच श्रवण कर! "ह्या प्रश्नाचा निर्णय व्हावा म्हणून कलापग्रामी भरलेल्या ऋषींच्या सभेत सनक, सनंदन, सनत व सनातन या सर्वांनी सनंदन यांना वक्ता करून या प्रश्नावर निर्णायक भाष्य करण्यास विनवले. तेंव्हा सनंदन म्हणाले, "झोपलेल्या सम्राटाला जागे करण्यासाठी त्याचे भाट जसे सम्राटाच्या पराक्रमाचे सुस्वर गायनाने वर्णन करून त्याला जाग आणतात, तसेंच परमात्मा स्वनिर्मित विश्वाला स्वत:तच लीन करून सर्वशक्तिंनिशी झोपी जातो. तेंव्हा प्रलयाच्या शेवटी श्रुती परमात्म्याच्या सर्वशक्तीमानतेचे वर्णन करून परमात्म्याला जाग आणतात. श्रुती म्हणतात, "हे अजिंक्य प्रभो! आपला जयजयकार असो! आपण सर्व ऐश्वर्यांने परिपूर्ण आहात. घट बनवण्यासाठी माती हे कारण असते व घट नष्ट झाल्यावर परत जसा मातीच होतो तद्वत् आपल्यात कोणताच बदल न घडता व कमी जास्तपणा न होता हे चराचर विश्व प्रतीत होते व आपल्यातच विलीन होते. हे मायाधीपते, विवेकी लोक आपल्या कथामृत पानाने मुक्त होतात. तर आत्मज्ञानी आपल्या परमपदाला प्राप्त होतात. हा आपलाच विलास आहे! हे भगवंता! कळण्यास अत्यंत कठीण अशा आत्मज्ञानाच्या संक्रमणासाठी अवतार धारण करणाऱ्या आपल्या चरित्रामृताचे प्राशन त्रिविध ताप हरण करणारे आहे. इतकेच नव्हे तर आपले चरितामृतप्राशन जीवाला इतके निरपेक्ष बनवते कीं त्याला मोक्षाची सुध्दा अपेक्षा राहात नाही. हे अनादि अनंता! संपूर्ण चराचर म्हणजे आपणच आहात या भावनेने क्षणोक्षणी व्यवहार करणारा भक्त मृत्युच्याही

मस्तकावर पाय ठेवतो. पण केवळ आपली विद्वत्ता पाजळणारा भक्त फक्त शब्दज्ञानी होतो. हे अजन्मा प्रभो! आपणच सद्गुरुंच्या रूपाने साधकांच्या हितासाठी अविरत जागे असता. असे असूनही जे सद्गुरूंना शरण जात नाहीत व साधना करीत राहतात त्यांना स्वत:चे मन न आवरता आल्यामुळे ते आपल्याला अंतरतात. हे भगवंता! आपला थांग तर लागूच शकणार नाही. पण आपले रूपही शब्द-वर्णनाच्या पलीकडील आहे. त्यामुळे आम्ही श्रुती जेंव्हा तुमच्या रूपा विषयी तुम्ही सगुण आहात कां? असे विचारतो तेंव्हा आम्हीच नाही असे म्हणतो. मग निर्गुण आहात कां? असे विचारतो आणि आम्हीच नाही असे म्हणतो. ह्याचाच अर्थ आपल्या कोणत्याही वर्णनाला आम्ही "हे नाही! हे नाही" म्हणजे "न इति। न इति।" असेच म्हणत राहतो. व शेवटी मौन धारण करतो." सनंदनमुनींनी नेमके पणाने श्रुतींचे सार सांगताच सर्वच ऋषींना व श्रवण करणाऱ्यांना आत्मबोध झाला." ही गोष्ट नारदांना सांगून नारायण म्हणाले, " नारदा! तूं सुध्दा वासना भस्म करणारी ही ब्रम्हविद्या धारण कर!" इतके सांगून शुकमुनी म्हणाले, " राजन्! मन, वाणी व बुद्धी यांच्या पलीकडील निर्गुण ब्रम्ह आपल्या मनात कसा प्रवेश करते हे मी तुला सांगितले. तेंव्हा श्रीहरीचे सगुणातले हे निर्गुणाकडे नेणारे चिंतन फार महत्वाचे आहे.

त्यानंतर परीक्षित राजाने एक मौलिक प्रश्न शुकमुनींना विचारला, कीं, "भगवान शिवाचे भक्त समृध्द व धनवान असतात तसे भगवान श्रीविष्णूंचे सहसा आढळत नाहीत ते कां? " शुकमुनी म्हणाले, " त्याचे कारण भगवान शिव हे वैकारिक, तैजस व तामस अहंकाराचे अधिष्ठाते आहेत. या त्रिविध अहंकारापासून पंचमहाभूते, दहा इंद्रिये व मन अशा सोळा कला उत्पन्न झालेल्या आहेत. म्हणून त्यांच्या अधिष्ठात्या देवांपैकी कोणाचीही उपासना लवकर फलद्रूप होते व ऐश्वर्यादी सौख्ये प्राप्त होतात. भगवान विष्णू हे गुणातीत व प्रकृती पुरुष यांच्या पर असून सर्वांतर्यामी साक्षीरूपाने असल्यामुळे त्यांच्या उपासनेने जीव गुणातीत होऊ लागतो. अश्वमेध यज्ञानंतर युधिष्ठीरांनी असाच प्रश्न भगवान श्रीकृष्णांना विचारला होता.

तेंव्हा भगवान श्रीकृष्णांनी सांगितले कीं मी ज्याच्यावर कृपा करतो त्याचे मी हळूहळू धन काढून घेतो. तेंव्हा धन मिळवण्याच्या प्रयत्नात तो कंटाळून माझा परमभक्त होतो. मग मी त्याच्यावर कृपा करतो. त्यामुळे माझी भक्ती तशी कठीण असल्यामुळे लोक इतर देवतांची उपासना करून आपले इप्सित प्राप्त करून घेतात. व त्या देवतेला विसरतात. इतकेच नाही तर उन्मत्तही होतात. जसा वृकासूर शिवोपासना करून झाला तसा. वृकासूर हा स्वभावाने अति दुष्ट होता. एकदा त्याची व नारदांची भेट झाली त्यावेळी त्याने कोणाची उपासना लवकर फलद्रूप होते हे विचारून नारदांच्या सल्ल्यानुसार शिवोपासनेला आरंभ केला. सहा दिवस त्याने अत्यंत कडक व्रत केले व अग्नीला शिवमुख मानून आपल्या मांसाच्या आहुती देण्यास सुरुवात केली. पण शिव प्रसन्न झाले नाहीत म्हणून त्याने आपले मस्तक अर्पण करण्याचे ठरवले व त्याप्रमाणे शस्त्र वर उचलले. तेंव्हा शिवांनी त्याचा हात वरचे वर धरला व हवा तो वर माग म्हणाले. वृकासुराने "मी ज्याच्या डोक्यावर हात ठेवीन त्याला मृत्यू आला पाहिजे!" असा वर मागितला भगवान शिवांनी तसा वर त्याला दिला. वृकासुराला फार आनंद झाला. त्याला पार्वती मिळवण्याची इच्छा झाली. व त्यासाठी तो शिवांच्या मस्तकावर हात ठेवायला गेला. शिव पळत सुटले. वृकासूर त्यांचा पाठलाग करू लागला. भगवान शिव नारायणाचे स्मरण करीत सरळ वैकुंठात आले. त्यांचे संकट जाणून नारायण त्वरित बटूचे रूप घेऊन

वृकासुरासमोर आले. व धावत येणाऱ्या वृकासुराला नमस्कार केला. तेंव्हा वृकासूर थोडा थबकला. नारायणांच्या त्या मोहक बालरूपावर मोहित होऊन वृकासूर थांबला. तेंव्हा बालबटूरूप नारायण म्हणाले, " आपण खूपच दमलेले दिसता आहात. हे घ्या! पाणी प्या! " इत्यादी गोड बोलून नारायणांनी त्या वृत्रासुराला धावण्याचे कारण विचारले. तेंव्हा आडपडदा न ठेवता वृत्रासुराने सर्व सांगून टाकले. तेंव्हा नारायण हसून म्हणाले, "तसे असेल तर आम्ही त्या वरदानावर जराही विश्वास ठेवीत नाही. कारण प्रजापती दक्षाच्या शापाने ज्याला पिशाच्चयत्व प्राप्त झाले आहे त्याच्यावर कितपत विश्वास ठेवायचा? पण तसे जर असेल तर स्वत:च कां नाही खात्री करून घेत? आपण आपल्या डोक्यावर हात ठेऊन कधी मरतो कां? जर तसा तूं मेला नाहीस तर तो शिव खोटारडा म्हणून त्याला मारून टाक. म्हणजे तो परत असा कोणालाच वर देऊ शकणार नाही." भगवान नारायणांच्या बोलण्यावर तो वृकासूर इतका भाळला कीं त्याने लगेच स्वत:च्या डोक्यावर हात ठेवला. तत्क्षणी मस्तक फुटून तो मरण पावला." भगवान शिवांचे हे संकटमुक्ती करणारे नारायणलीला चरित्र संसार बंधनातून मुक्त करणारे आहे.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

## पुष्प १८४ वे (अध्याय ८९ पूर्ण)

## भृगुंची त्रिदेव परीक्षा

शुकमुनी पुढे सांगू लागले, "राजन्! एकदा पूर्वी सरस्वती नदीच्या तीरावर यज्ञासाठी अनेक ऋषी जमले असताना ब्रम्हा, विष्णू व शिवशंकर यांच्यात श्रेष्ठ कोण याचा निवाडा करण्यासाठी भृगु ऋषींची निवड करण्यात आली. त्याप्रमाणे निवाडा करण्यासाठी भृगु प्रथम आले ब्रम्हदेवांकडे. ब्रम्हदेवांच्या सभेत प्रवेश करून भृगुंनी ब्रम्हदेवांना साधा नमस्कारही न केल्यामुळे ब्रम्हदेवांना राग आला, पण आपलाच पुत्र आहे अशा भावनेने ते गप्प बसले. ते पाहून भृगु निराश झाले व कैलासाकडे निघाले. आपल्या भावाला आपल्याकडे येताना पाहून शिवांना फार आनंद झाला व ते भृगुला आलिंगन देण्याच्या आविर्भावात दोन्ही भुजा पसरून त्यांच्याकडे येऊ लागले. ते पाहून भगवान शिवांना थोपवण्यासाठी भृगु म्हणाले, "थांब! थांब! मला आलिंगन देऊ नकोस! कारण तूं मर्यादा सोडून वागणारा आहेस." ते ऐकून भगवान शिवाचे डोळे क्रोधाने लाल झाले. ते त्रिशुळाने भृगुला मारायला निघाले, तेंव्हा मृडानीने त्यांना शांत केले. मग भृगु कैलासातून वैकुंठात आले व लक्ष्मीच्या अंकावर डोळे मिटून शांत पडलेल्या भगवान श्रीविष्णुंच्या वक्षस्थलावर लाथ मारली. भक्तवत्सल भगवान श्रीविष्णूंनी तत्काळ लक्ष्मीसह उठून भृगुंना प्रणाम करीत म्हटले, " ब्रम्हन्! आपले स्वागत असो! आपण आल्याचे मला कळलेच नाही. त्यामुळे मी आपले स्वागत करू शकलो नाही. मला त्या बद्दल क्षमा करा." असे म्हणून भगवान श्रीविष्णू भृगुंचे चरण चुरू लागले. आणि पुढे म्हणाले, "तीर्थांना पावन करणाऱ्या आपल्या चरणकमलांनी आपण हा वैकुंठलोक पवित्र केला आहे व आपल्या चरणकमलांनी पवित्र झालेले माझे वक्षस्थळ लक्ष्मीचे निवासस्थान होण्यास योग्य झाले आहे. म्हणून ती नेहमी त्या निष्पापस्थळावर निवास करील." भगवंताचे हे निष्कपट बोलणे ऐकून भृगुंचे अष्टसात्विक भाव जागे झाले. भगवंताला साष्टांग नमस्कार करून ते यज्ञस्थानी परत आले. भृगुंनी आपला अनुभव सविस्तर कथन केला. तेंव्हापासून ब्रम्हवेत्तेऋषी भगवान श्रीविष्णूंना श्रेष्ठ मानू लागले. कारण

शांती, अभय, ज्ञान, वैराग्य, समदर्शन, अष्टऐश्वर्य व चित्तशुद्धी यांची प्राप्ती भगवान विष्णूंना शरण जाण्याने होते. शांत, समचित्त, निस्पृह आणि सर्वांना अभय देणारे तेच एकमेव परमप्राप्तव्य स्थान असल्याचे सर्व धर्मशास्त्रे प्रतिपादन करतात." इथे थोडे थांबून शुकमुनी म्हणाले, "राजन्! लोकांच्या मनातील सर्व संशय नष्ट होऊन लोकांनी नि:संशयपणे भगवान श्रीविष्णुंची भक्ती करीत राहावी म्हणून ऋषींनी ही युक्ती केली. इतकेच नाही तर स्वत: तशी भक्ती करून परमपद प्राप्त करून आदर्शही निर्माण केला आहे."

शुकमुनी पुढे सांगू लागले, "राजन्! द्वारकेत एकदां असे घडले कीं एका ब्राम्हणस्त्रीने एका पुत्राला जन्म दिला. पण तो पुत्र जन्माला आल्यावर लगेच मरण पावला. तेंव्हा आपल्या मृत पुत्राचे प्रेत घेऊन तो ब्राम्हण राजवाड्याच्या दरवाजाशी आला. आणि म्हणू लागला, "ब्राम्हणद्रोही, धूर्त, लोभी आणि विषयी राजांच्या कर्मदोषाने माझ्या पुत्राचा मृत्यू झाला आहे. हिंसा करणाऱ्या, दुष्ट व अजितेन्द्रीय राजाची सेवा केल्याने असे दु:ख प्राप्त होते असे शास्त्र म्हणते." अशा प्रकारे भरपूर तोंडसुख घेऊन तो ब्राम्हण आपल्या पुत्राचे प्रेत राजवाड्याच्या दरवाजाशी ठेऊन निघून गेला. असे आठ वेळा घडले. नवव्या वेळी तो असे बडबडून व प्रेत तिथे ठेऊन जाऊ लागला. त्यावेळी तिथे असलेला अर्जुन त्याला म्हणाला, "द्वारकेत कदाचित् मज सारखा धनुर्धारी क्षत्रीय नसावा म्हणून असे घडत असेल. पण आता तूं निश्चिंत हो! मी तुझ्या संतानाचे रक्षण करीन! आणि जर माझ्या कडून तसे झाले नाही तर मी अग्निप्रवेश करीन." तेंव्हा तो ब्राम्हण म्हणाला, " इथे बलराम, कृष्ण, प्रद्युम्न इत्यादिंसारखे मोठ मोठे धनुर्धर असताना माझ्या संतानाचे रक्षण होऊ शकले नाही तिथे तुम्ही ते कसे करणार आहात? मला तुमचा हा निव्वळ पोरकटपणा वाटतो. आमचा या म्हणण्यावर विश्वास नाही!" तेंव्हा अर्जुन म्हणाला, "हे ब्रम्हन्! मी बलराम, श्रीकृष्ण, प्रद्युम्न नाही. हे जरी खरे असले तरी मी गांडीवधारी अर्जुन आहे! युध्दात मी भगवान शिवांनाही संतुष्ट केले आहे. मी तुमचे संतान निश्चित सुरक्षित ठेवीन या बद्दल खात्री बाळगा!" अर्जुनाच्या या बोलण्यावर खुश होऊन तो घरी गेला. पुढे जेंव्हा दहाव्या वेळी त्याची पत्नी प्रसूत होण्याची वेळ आली तेंव्हा त्याने अर्जुनाला पाचारण केले. अर्जुनाने त्वरित त्या ब्राम्हणाच्या घरी जाऊन शिवस्मरण करून आपल्या गांडीव धनुष्याच्या सहाय्याने दिव्य मंत्रांनी अभिमंत्रित केलेल्या बाणांनी प्रसूतीगृहा भोवती अभेद्य कवच निर्माण केले. ब्राम्हण स्त्री प्रसूत झाली. तिने पुत्राला जन्म दिला. पण तो पुत्र भूमीस्पर्श होऊन रडू लागताच आकाशात जाऊन दिसेनासा झाला. ब्राम्हण भगवन श्रीकृष्णां समोरच अर्जुनाची निंदा करू लागला. तेंव्हा अर्जुन आपल्या योगसामर्थ्याने संयमनी नगरी, इंद्रलोक, चंद्रलोक, वरुणलोक इत्यादी सर्व ठिकाणी जाउन ब्राम्हणाच्या पुत्राचा शोध घेऊन पुत्र न मिळाल्याने हात हालवीत परत आला. तेंव्हा अर्जुनाने अग्नी प्रवेशाची तयारी केली. ते पाहून भगवान श्रीकृष्ण त्याला म्हणाले, "अर्जुना! थांब! या ब्राम्हणाची सगळी मुले मी तुला दाखवतो! अरे आज आपली निंदा करणारेच उद्या आपली कीर्ती प्रस्थापित करतील. चल, माझ्या दिव्यरथात बैस! " अर्जुन भगवंताच्या रथात बसताच त्यांनी मनोगतीने लोकालोक पर्वत ओलांडला. तेंव्हा घोर अंध:कार झाला. त्या घोर अंध:काराने रथाचे घोडे बावचळले. व सैरावैरा धावू लागले. त्यांना सुरळीत मार्ग समजावा म्हणून भगवान श्रीकृष्णांनी आपले सुदर्शनचक्र पुढे केले व मग ते घोडे त्या चक्राच्या मागे धावू लागले. थोड्याच वेळात ते

डोळे दिपवणाऱ्या प्रकाश असलेल्या एका महासागरा जवळ आले. त्यात एक प्रचंड मोठे व दिव्य भवन स्थिरतेने उभे असलेले दिसले. त्याच अद्‌भुत भवनात रथ शिरला. समोरच पांढऱ्याशुभ्र शरीराच्या व माना निळया असलेल्या दिव्य शेषावर भगवान पुरुषोत्तम विराजमान झालेले दिसले. आपलेच रूप असलेल्या शेषशायी भगवंताला भगवान श्रीकृष्णांनी वंदन केले. भयचकित झालेल्या अर्जुनानेही वंदन केले. तेंव्हा मोहक स्मित करून भगवान म्हणाले, "तुम्हा दोघांना पहाण्यासाठी ब्राम्हणाची मुले मी माझ्याकडे आणली आहेत. तुम्ही दोघे धर्मकार्यासाठी अवतार धारण केला आहे तेंव्हा ते कार्य करून लवकर माझ्याकडे या! तुम्ही दोघे नर-नारायण आहात." अर्जुनाने भगवंताच्या आज्ञेचा स्वीकार करून साष्टांग नमस्कार केला व दिलेली सर्व मुले घेऊन ते दोघे परत त्या ब्राम्हणाकडे आले. मुले त्याच्या स्वाधीन केली. भगवान श्रीकृष्णांचे हे अमोघ सामर्थ्य पाहून अर्जुन मनोमन समजला कीं यच्चयावत् जीवांचे स्वामी भगवान श्रीकृष्णच आहेत.

हरये नमः। हरये नमः। हरये नमः।

## ।।श्रीगुरु:शरणं।।

## श्रीमद्भागवत- दहावा स्कंध

## पुष्प १८५ वे (अध्याय ९० पूर्ण)

# भगवान श्रीकृष्णांचा लीला विहार

शुकमुनी पुढे सांगू लागले, " राजन्! भगवान श्रीकृष्णांची द्वारका नगरी अतिरम्य होती. आठ पदरी प्रशस्त राजमार्ग नेहमी सुवर्णरथांनी गजबजलेले असत. रस्त्याच्या कडेला भरपूर सुरेख अशी वनश्री बहरलेली असे. वने, उपवने, उद्याने इत्यादींची अगदी रेलचेल होती. उत्तमोत्तम पोशाख केलेले धिप्पाड यादववीर, हत्ती, घोडे, यांची सतत वर्दळ चालू असे. सुंदर प्रासाद तोरणे लावून सजवलेले असत. प्रत्येक प्रासादासमोर रम्य उद्यान. सर्वत्र समृद्धी ओतप्रोत भरलेली दिसत असे. अशा रम्य द्वारकेत भगवान श्रीकृष्ण आपल्या सोळा हजार एकशे आठ राण्यांबरोबर तितकी रूपे धारण करून रहात होते. भगवान श्रीकृष्णांच्या सहवासात त्या इतक्या कृष्णमय झालेल्या होत्या कीं त्यांना श्रीकृष्णां शिवाय दुसरे काही सुचत नसे. भगवान श्रीकृष्ण जवळ नसले कीं त्या चराचराला श्रीकृष्णांचे वेड असल्याच्या भावनेने सगळयांशी संवाद करीत असत.

समुद्राची गर्जना व लाटा पाहून म्हणत, "आमच्या प्राणवल्लभाने तुझे धैर्य, गांभीर्य इत्यादी गुण हिरावून घेतले म्हणून तुझी ही अशी अवस्था झालेली दिसतेय! तुलाही आमच्यासारखीच झोप लागत नाही असे दिसते!" किंवा कृष्ण पक्षातल्या चंद्राला पाहून म्हणत, " अरे! आमच्या प्राणवल्लभाच्या गोड गोड गप्पांचे आम्हाला विस्मरण झाले कीं आम्ही मूक होऊन जातो. तसे तूं ही त्यांच्या विरहाने क्षीण होत आहेस कां?"

मलयपर्वतावरचा चंदन गंधित वायुला त्या म्हणत, " अरे मलयगिरीवरच्या वायो! श्रीकृष्णांच्या नेत्रकटाक्षाने आधीच घायाळ झालेल्या आमच्या मनात कामदेवाला पाठवून कां बरे अधिक घायाळ करीत आहेस?"

जेंव्हा श्रीकृष्ण विरहात त्या सरोवरा जवळ येत तेंव्हा सरोवरातले राजहंस खाण्याच्या मिषाने त्यांच्या जवळ येत. तेंव्हा त्या हंसांना म्हणत, "ये ! अरे हंसा ये! तुझे खूप खूप स्वागत असो! हे दूध पी! आणि

सांग आमचे शामशुंदर कुठे आहेत? काय करतात? सांग, सांग त्यांच्या विषयी सारे काही तुला ज्ञात असते कारण तूं आमच्या प्राणवल्लभांचा आवडता दूत आहेस नां! म्हणून आम्ही तुला विचारतो. जा, त्यांना घेऊनच ये! जा, लवकर जा, अरे ते आमची पर्वा करीत नाहीत पण आम्हाला त्यांच्या शिवाय चैन पडत नाही! पण एक कर त्यांच्या बरोबर त्या लक्ष्मीला आणू नकोस. अरे, त्यांना काय वाटते ती एकटीच त्यांच्यावर प्रेम करते?" अशा परमप्रेमभावाने तर त्या राण्यांना परमपद प्राप्त झाले.

भगवान श्रीकृष्णांनी सोळाहजार एकशे आठ राण्यांबरोबर एकाच वेळी वेदोक्तधर्माचरण करून संसार केला. प्रत्येकीला दहा दहा पुत्र होते. ते सर्व पराक्रमी होते. पट्टराण्यांच्या मुलांपैकी अठरा मुले महारथी होते. त्यांचे यश सर्वत्र पसरले होते. राजन्! यदुवंशातील मुलांना शिक्षण देण्यासाठी तीन कोटी अठ्ठावीस लक्ष आचार्य होते. यावरून कल्पना कर कीं यदुवंश केवढा मोठा होता. त्यातही यदुवंशांतील विविध कुळांची संख्याच एकशे आठ होती.

प्राचीन काळी देव-दानव युद्धात जे दानव मारले गेले होते त्यातल्या अनेक दानवांनी मानव योनीत येऊन जनतेला त्रास द्यायला सुरुवात केली होती. म्हणून भगवंताच्या आज्ञेने देवांनी यदुवंशांत अवतार घेतला होता. त्यामुळे ही कुळे वाढत गेली. सगळ्यात विशेष म्हणजे साक्षात् परब्रम्हानेच भगवान श्रीकृष्णांच्या रूपाने देवकीच्या उदरी अवतार धारण केला. त्यामुळे भगवान श्रीकृष्णलीला चरित्ररुपी परमतीर्था पुढे गंगाजलाचा महिमा आपोआपच कमी झाला. भगवान श्रीकृष्णांचे नाव एकदा जरी उच्चारले तरी सर्व अमंगलाचा नाश होतो. सर्व कुलाचे धर्म भगवान श्रीकृष्णांनीच स्थापन केले आहेत. प्रकृतीच्या पलीकडे असलेल्या परमात्म्याने स्वस्थापित धर्म रक्षणासाठी श्रीकृष्णरूपी दिव्य लीलाशरीर धारण केले. त्याला अनुरूप अशा अनेक अद्भुत घटनांचा अभिनय केला. त्यांच्या कोणत्याही कर्माचे स्मरण जिवाला कर्मबंधनातून मुक्त करणारे आहे. यदुश्रेष्ठ श्रीकृष्णांच्या चरणकमळांच्या सेवेचा अधिकार प्राप्त करून घेऊ इच्छिणाऱ्या कोणीही त्यांच्या लीलाचरित्राचे स्मरण करावे. क्षणोक्षणी लीला श्रवण करणाऱ्या जीवाची भक्ती वाढत जाते. तीच भक्ती त्याला भगवंताच्या परमधमाला नेऊन पोहोचवते.

हरये नमः। हरये नमः। हरये नमः।

इथे श्रीमद्भागवतातला दहावा स्कंध पूर्ण झाला. या स्कंधात एकूण ९० अध्याय व ३९५६ श्लोक आहेत. त्या सर्वांचा पुष्प १३० ते पुष्प १८४ हा साररूप अनुवाद आहे

# स्कंध अकरावा

## ।।श्रीगुरु:शरणं।।

## श्रीमद्भागवत-अकरावा स्कंध

## पुष्प १८६ वे (अध्याय १ व २ पूर्ण)

## यदुकुळास शाप व निमी जायन्त्य संवाद

भगवान श्रीकृष्णांनी व इतर यादवांच्या मदतीने खलनिर्दालन करून पृथ्वीचा भार हलका केला खरा. पण यदुकुलातील देवलोकातून जन्म घेतलेल्या यादवांचा श्रीमद पृथ्वीवरील लोकांना तापदायकच होणार होता. हा विचार मनात येऊन भगवान श्रीकृष्णांनी यदुकुलाच्या संहाराचा संकल्प आपल्या मनात केला. जर आपण हा संहार केला नाही तर पुन्हा आपल्यालाच जन्म घेऊन यांचा संहार करावा लागणार. कारण हे यादव कोणालाच आवरणार नाहीत. बांबू जसे एकमेकावर घासून उत्पन्न होणाऱ्या अग्नीत भस्म होतात तसे हे सर्व यादव आपापसात लढवून नाहीसे केले पाहिजेत. सगळे यादव नाहीसे झाले कीं मग आपण निजधामाला जायचे! भगवन श्रीकृष्णांचा असा संकल्प होताच तो अज्ञातातून कार्यान्वित झाला. वसुदेवांच्या घरी अवतीर्ण झालेल्या भगवान श्रीकृष्णांच्या प्रेरणेने विश्वामित्र, असित, कण्व, भृगु, अंगिरा, कश्यप, वामदेव, अत्री वसिष्ठ नारद असे श्रेष्ठ श्रेष्ठ व शापानुग्रह समर्थ ऋषी पिंडारक क्षेत्रात आले. तेंव्हा काही वात्रट यदुकुमारांनी संबाला स्त्री वेश देऊन गर्भवतीचे नाटक केले. मग तिला त्या ऋषींच्या समोर उभे करून विचारले, " ही गर्भवती आहे. हिची प्रसूतीची वेळ भरत आलेली आहे. तिला मुलगा होईल कीं मुलगी? यदुकुमारांनी केलेली ही थट्टा सहन न होऊन ऋषींनी शाप दिला कीं हिला यदुकुलाचा संहार करणारे मुसळ होईल. हे ऐकून यदुकुमार चांगलेच घाबरले. त्यांनी ताबडतोब सांबाच्या पोटावरील कपडे काढले. तो खरोखरच त्यातून एक लोहमुसळ बाहेर पडले. सगळेच यदुकुमार घाबऱ्याघुबऱ्याने यादवसभेत बसलेल्या उग्रसेन महाराजांकडे आले व घडलेली मुसळाची गोष्ट विदित केली. उग्रसेन महाराज हे जाणून होते कीं ब्राम्हण शाप व्यर्थ जाणार नाही पण तरी निकराचा प्रयत्न करावयाचा म्हणून त्यांनी त्या मुसळाची भुकटी करून समुद्रात फेकून देण्याची आज्ञा दिली. त्यातला एक भुकटी न होणारा तुकडा तसाच समुद्रात फेकून दिला. चुरा समुद्रकिनारी लव्हाळ्याच्या स्वरूपात उगवला. व तो तुकडा एका माशाने गिळला. तो मासा एका कोळ्याने पकडला. त्याच्या पोटात मिळालेला लोह तुकडा कोळ्याने एका जरा नामक व्याधाला दिला. व्याधाने तो आपल्या बाणासाठी वापरला.

नारदमुनी भगवान श्रीकृष्णांचा सहवास वारंवार मिळावा म्हणून द्वारकेस येत असत. असेच नारद एकदा वसुदेवांकडे आले असताना वसुदेवांनी त्यांचे पुजन करून म्हटले, "प्रभो आपले येणे हे नेहमीच आमच्या कल्याणासाठी असते. म्हणून मी आपणाकडून भागवत धर्म म्हणजे काय हे जाणून घेऊ इच्छितो! मी पूर्वी मुक्ती देणाऱ्या भगवंताची आराधना करून माझ्या पोटी पुत्र रूपाने यावे अशी भगवंताच्या मायेने मोहित होऊन प्रार्थना केली होती. पण हे नारदा आता आपण मला त्रितापातून मुक्त होण्याचे साधन सांगा!"

तेंव्हा नारद म्हणाले, "भागवतधर्माचरण हे त्रिविध तापातून मुक्त होण्याचे साधन आहे. पूर्वी निमी राजाच्या यज्ञस्थानी कवी नारायण, हरी नारायण, अंतरिक्ष नारायण, प्रबुध्द नारायण, पिप्पलायन नारायण, आविर्होत्र नारायण, द्रुमिल नारायण, चमस नारायण व करभाजन नारायण हे नऊ नारायण आले होते. त्यावेळी निमी राजाने हाच प्रश्न त्यांना विचारला होता. तेंव्हा कवी नारायण म्हणाले, भागवत धर्म हा त्रिविध तापापासून मुक्त करणारा आहे. भागवत धर्म म्हणजे निष्काम भक्तियोग. नित्य नैमित्तिक कर्मे व इतर सर्व सद्हेतूने केलेली कर्मे निरपेक्षतेने भगवंताला अर्पण करणे हे भागवत धर्माचे खरे रहस्य आहे. त्यासाठी "कायेन वाचा मनसेन्द्रियैर्वा बुध्याऽऽत्मना वानुसृतस्वभावात् । करोति यद्यत्सकलं परस्मै नारायणायेति समर्पयेत्तत् ।।११.२.३६॥ " (अर्थ :- शरीराने, वाणीने, मनाने, इंद्रियांनी, बुद्धीने अथवा आपल्या स्वभावानुसार जी जी कर्मे होतील वा केली जातील ती ती सर्व कर्मे नारायणांना समर्पण करावीत.) हे निमी राजा, जेंव्हा ही वृत्ती आपण आपल्या अंगी मुरवून घेतो तेंव्हा स्वस्वरूपाच्या विस्मृतीमुळे निर्माण झालेल्या द्वैताभासाने आपण ज्या संसाराला सत्य मानून सुरुवात केलेली असते तो द्वैताभास हळू हळू नाहीसा होऊ लागतो. पण त्यासाठी मनात जे संकल्प विकल्प निर्माण होतात त्यांच्यात न गुरफटता हरीस्मरण करण्याची संवय जडवून घ्यावी. कारण संकल्प विकल्प निर्माण होतच राहणार. संकल्प विकल्पांकडे दुर्लक्ष करून हरीनाम घेणे आपल्या क्रियास्वातंत्र्याचा भाग आहे. त्यासाठी सतत हरिकथा श्रवण कराव्यात. सतत स्मरण करून भगवंताबद्दल प्रेम निर्माण करून घ्यावे. चराचर भगवत्मय असल्याच्या भावनेने वागण्याचा प्रयत्न करीत राहावा. जेवणाऱ्याला जसा प्रत्येक घासा बरोबर तृप्तीचा अनुभव, जीवनशक्ती प्राप्त होण्याचा अनुभव व भूक नाहीशी होण्याची अनुभूती प्राप्त होऊन त्रिविध फायदे अनुभवता येतात, तसेच फायदे नामस्मरणाने अनुभवता येतात. ते त्रिविध फायदे असे कीं चराचरात भगवंत असल्याची जाणीव उत्पन्न होणे, प्रपंचाचे स्वप्नवत् असलेले अस्तित्व समजणे व संसारासक्ती नष्ट होणे. ह्या त्रिविध ताप हरण करणाऱ्या गोष्टींची अनुभूती येते. प्रथम साधकाला स्वरूपाचे ज्ञान होते. मग अंत:करणात नैष्कर्म्य (वैराग्य) निर्माण होते. त्यात भगवद्भक्ति तीव्र होऊन भागवत धर्म साधला जातो. मग त्याला परम शांतीचा अनुभव येतो." राजा निमीने विचारले, " हे प्रभो! भागवत व भागवतधर्म म्हणजे नक्की काय? भागवताचरणी मनुष्य कसा वागतो?" तेंव्हा हरीनारायण म्हणाले, " भागवत धर्माचे आचरण करणारा मनुष्य भगवंत चराचरात आत्मरूपाने भरलेला आहे अश्या दृढ भावनेने वागत असतो. तो उत्तम भागवत! मूर्तीपुजनाने भगवंतावर प्रेम करणारा, भगवंताच्या भक्तांशी सख्य करणारा, दु:खी व अज्ञानी जीवांवर कृपा करणारा पण भगवंताचा द्वेष करणाऱ्यांची उपेक्षा करणारा मध्यमप्रतीचा भागवत. श्रद्धेने पूजा करणारा पण अन्य कुणावर प्रेम न करणारा कनिष्ठ भागवत. इंद्रियांचे स्वाभाविक विषय सेवन करताना आवड-निवड न ठेवता व त्या विषयांचा भोग पुन्हा प्राप्त होण्याची इच्छा न करता ती भगवंतची माया आहे असे समजून व प्रापंचिक उपाधींनी त्रस्त न होता हरीस्मरणात राहणारा तो उत्तम भागवत."

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-अकरावा स्कंध

## पुष्प १८७ वे (अध्याय ३ पूर्ण)

## मायाब्रम्ह विवरण

विदेहाने मायेचे स्वरूप विचारले म्हणून अंतरिक्ष नारायण सांगू लागले, " राजन्! आदी पुरुष जेंव्हा चित्शक्तीने चराचराचा आत्मा होऊन पंचमहाभूते, त्यांच्या तन्मात्रा, विषयभोग, मोक्ष इत्यादी श्रेष्ठ व कनिष्ठ प्रकारची सृष्टी निर्माण करून त्यात आत्मरूपाने प्रवेश करतो त्याला माया असे म्हणतात. मुलभूत उपभोग घेणारा जरी आत्मा असला तरी अहं-ममतेमुळे जीव विषयात आसक्त होतो. आत्मा नाही. त्यामुळे जीवाला शुभाशुभ कर्माचे फळ त्याच्या स्वत:च्या संकल्प विकाल्पामुळे भोगावे लगते. देहाभिमानी जीव आत्मतत्त्वातून प्रकाशित झालेल्या इंद्रियांच्या द्वारे विषयभोग घेतो व पंचमहाभूतांपासून उतपन्न झालेल्या जडदेहाला आपले स्वरूप समजून त्यात आसक्त होतो. व जन्म मृतुच्या चक्रात प्रलयकाला पर्यंत फिरत राहतो. प्रलय समयी विराट पुरुष अव्यक्तात विलीन होताना, पृथ्वीचा गुण गंध हा जलातून शोषून घेतो. त्यामुळे पृथ्वी जलात विरघळू लागते. मग जलाचा रस हा गंध शोषून जल तेजात विलीन होते. तेजाचा रुप हा गुण आकर्षिला गेला कीं तेज वायूत विलीन होते. मग वायूचा स्पर्श हा गुण शोषून वायू आकाशात विलीन होते. आकाशाचा गुण शब्द हा काळनामक शक्तीकडून शोषला जातो व आकाश रुद्रात म्हणजेच तामस अहंकारात विलीन होते. वैकारिक, तैजस व तामस हे तीन उच्चस्तरीय त्रिगुण आहेत. सत्व, रज व तम हे ब्रम्हदेवाच्या सृष्टीतले रुपांतरीत त्रिगुण आपल्या अनुभवास येतात. इंद्रिये व बुद्धी तैजस अहंकारात विलीन होतात. तेंव्हा तन्मात्रांसह म्हणजेच देवांसह मन वैकारिक अहंकारात विलीन होते. मग तीनही अहंकार महत्तत्त्वात विलीन होतात. महत्तत्त्व प्रकृतीत व प्रकृती विराटरुपी पुरुषात व विराट पुरुष परब्रम्हात विलीन होतो. या सर्व प्रकाराला माया असे संबोधले जाते." हे ऐकून रजा निमीने विचार करून प्रश्न केला, "हे प्रभो! मानवी मनाची चंचलता लक्षात घेतल्यास भगवंताची ही माया तरुन जाणे फारच कठीण असल्यामुळे ती तरुन जाण्याचा सोपा मार्ग कोणता?" तेंव्हा प्रबुध्द नारायण म्हणाले, "स्त्री-पुरुष संबंधा मुळे बांधले गेलेले जीव सुखप्राप्ती व दु:ख निवृत्ती यांच्या साठी कर्मे करीत असतात. पण त्यांच्या मनासारखे काही घडत नाही. म्हणून असा विचार करावा कीं कर्म करण्यामुळे जडातले नाशवंत व क्षणोक्षणी बदलणारे सुख अथवा दु:ख हे मिळतच राहणार! जीवाला सतत स्वत:च्या व आपल्या आप्तांच्या मृत्यूचे भय निर्माण झालेले असते. आणि तरीही जीवांची एकमेकात स्पर्धा असते. म्हणून परम कल्याणाचा मार्ग म्हणजे शब्दज्ञानी, ब्रम्हानुभवी व शांतचित्त अशा सद्गुरूंना शरण जाणे हा आहे. ब्रम्हजिज्ञासूने अशा

सद्गुरूंना शरण जाऊन त्यांच्या कडून भागवतधर्म जाणून घ्यावा. त्यासाठी त्यांनाच आपला आत्मा व देव मानून त्यांची निष्कपट व निरपेक्ष सेवा करावी. त्या सेवेने भागवतधर्म प्राप्त होतो. तो असा, प्रापंचिक आसक्ती नाहीशी होते, सत्संगाची तळमळ उत्पन्न होते, सर्वाभूती दया निर्माण होते. विनय, तप, पावित्र्य, सहनशक्ती (तितिक्षा), अतत्त्वार्थी मौन, स्वाध्याय, सरलता (आर्जव), ब्रम्हचर्य, अहिंसा, निर्द्वंद्व वृत्ती, समदर्शन, चराचर व्याप्त ईश्वराविषयी दृढ धारणा, विधीवशात् होणाऱ्या प्राप्तीत संतुष्टता हे प्राप्त होऊन ब्रम्हभाव जागा राहतो. त्या भावातच सत्यभाषण, मनोनिग्रह, भगवत्कथा श्रवण, मनन करीत करीत सर्व कर्मे भगवंताला अर्पण करावीत. म्हणजे आपण केलेले प्रत्येक कर्म भगवंतासाठी असून आपले त्यात काहीच नाही व त्या कर्मापासून कोणतीच अपेक्षा नसणे. हे अर्पण केल्याचे लक्षण समज. परमेश्वर हा एकच आपला रक्षणकर्ता असल्याचा दृढ निश्चय करून त्याचे प्रेम उत्पन्न करून घ्यावे. मग भगवंताच्या विरह दु:खाने व्याकूळ व्हावे. विविध करुणाष्टके त्यातल्या अर्थाच्या अनुसंधानाने म्हणत ते दु:ख व्यक्त करावे. मग हळू हळू प्रेमभक्ती उदयाला येते. त्यालाच नारायण परायण होणे असे म्हणतात. त्यामुळे जी माया तरून जाण्यास कठीण वाटते तिच्या कचाट्यातून भगवान नारायण आपणास सोडवतो हे लक्षात ठेवावे." हे ऐकून निमी राजाने नारायणाचे स्वरूप विचारले.

तेंव्हा पिप्पलायन नारायण सांगू लागले, " राजन्! नारायण हे स्वत:च उत्पत्ती,स्थिती व लय यांचे कारण असून स्वत: कारण रहित आहेत. जागृती, स्वप्न, सुषुप्ती व समाधी अशा शरीराच्या कोणत्याही अवस्थेत साक्षीरूपाने व शरीरासह प्राण व इंद्रियांसह अंत:करण चैतन्यमय ठेवणाऱ्या अव्यक्त शक्तीला नारायण म्हणतात. नारायणाला जाणण्यास मन बुद्धी, वाणी यांच्यापैकी कोणीच समर्थ नाही. नेत्रांना न दिसणाऱ्या नारायणाचे वर्णन त्यामुळेच वेदही " न इति । न इति ।" असे निषेधात्मक पद्धतीने मुलस्वरूप दाखवण्याचा प्रयत्न करीत असतात. कारण मूळ आहे ते नारायण स्वरूप आहे हे पण ते निषेधात्मक पाध्द्धातीने सांगणे भाग पडते म्हणून सांगितले जाते. एरव्ही सांगताच येत नाही. सृष्टी नव्हती तेंव्हा एकटे नारायणच होते. तेच मुळतत्त्व! पुढे सृष्टी निर्माण करण्यासाठी त्याच नारायणाच्या वैकारिक, तैजस व तामस (सत्व, रज व तम) अशा त्रिगुणात्मक व्यवस्थेला प्रकृती म्हणून संज्ञा दिली गेली. ज्ञानप्रधानही नारायणच असल्यामुळे त्यालाच महत्तत्त्व म्हटले आहे. व क्रिया प्रधानही नारायणच असल्यामुळे त्यालाच सूत्रात्मा म्हणतात. तसेंच जीवोपाधी मुळे अहंकार म्हटले आहे. थोडक्यात म्हणजे सगळया शक्ती म्हणजे नारायण व तेच परब्रम्ह. आत्मा नारायण स्वरूप असल्यामुळे त्याला जन्म मृत्यू नाही. तो कधीच कमी अथवा जास्त होत नाही. वायू जसा श्वासावाटे शरीरात गेल्यावर पांचप्राणात विभागाला जातो व त्यालाच मुखात व नाकात असताना प्राण, कंठात उदान, सर्वांगात व्यान, नाभिस्थानी समान व मूलाधारात अपान वायू असे संबोधले जाते. तसाच आत्मा एकच असून जीवसमूह, इंद्रियसमूह इत्यादींच्यामुळे अज्ञानाने तो अनेक भासतो. अंडज, जारज, स्वेदज व उद्भिज अशा सर्वांच्या शरीरात एकच प्राणशक्ती असते. सुषुप्तीत अहंकार निद्रिस्त असतो त्यावेळी ती निद्रा देणारा कूटस्थ आत्माच असतो. त्यामुळेच जागा झाल्यावर जीव

"मी सुखाने झोपलो होतो" असे म्हणतो. निष्काम भगवद्भक्तिने नैष्कर्म्यता प्राप्त होऊन चित्तशुद्धी होते. मग चित्तशुद्धीमुळे आत्मतत्त्वाचा साक्षात्कार होतो."

हे ऐकून निमी राजा म्हणाला, " पूर्वी माझ्या लहानपणी मझ्या वडिलांच्याकडे जेंव्हा सनकादि मुनी आले होते तेंव्हा मी त्याना नैष्कर्म अवस्था प्राप्त होण्यासाठी उपदेश मागितला होता. पण ते सर्वज्ञ असूनही त्यांनी मला तो दिला नाही, तो कां ? हे आपण मला सांगा व आता आपण तो उपदेश द्या!" तेंव्हा अविर्होत्र नारायण म्हणाले, "राजन्! वेदाधारे जाणली काणारी कर्मे लौकिक व्यवहारातून जाणता येत नाहीत. अपौरुषेय वेदांचे तात्पर्य भल्या भल्या विद्वानांनाही जाणता येत नाही. ते लहान वयात तुझे वेदाध्ययन झालेले नसताना कसे समजणार? म्हणून तुला सांगितले नाही. वेदांचा काम्य साधनेचा अर्थ व गर्भित अर्थ वेगळे असतात. सर्वसाधारण जीवाची प्रवृत्ती आळसामुळे कर्म न करण्याची असते. त्यामुळे त्याला फळाचे प्रलोभन दाखवून कर्म प्रवृत्त केले जाते. आणि त्या प्रमाणे त्याला फळ मिळत गेले कीं जीव कर्मासक्त होऊ लागतो. म्हणून वेदोक्त कर्म करून फळाची इच्छा न ठेवता ते ईश्वरार्पण करण्याने नैष्कर्म्य प्राप्त होते. वेदोक्त कर्म करून साधलेल्या नैष्कर्म्य अवस्थेमुळे ज्ञान प्राप्ती होते. म्हणून वैदिक व तांत्रिक अशा दोन्ही पध्दतीने भगवंताची आराधना करावी. म्हणजे "मी व माझे" या भावनेचा लोप होतो. त्यासाठी आपल्या सदगुरूंकडून षोडशोपचार पूजाविधी समजून घ्यावा व मूर्ती पूजेच्या अधारे आपल्या अंत:करणात भगवंताचे अधिष्ठान निर्माण करून घ्यावे. व हृदयात श्रीहरीची स्थापना करून आंतर्बाह्य ब्रम्ह व्यापकतेची धारणा दृढ करावी.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-अकरावा स्कंध

## पुष्प १८८ वे (अध्याय ४, ५ व ६ पूर्ण)

## भगवंताचे अवतार व पूजा विधी

राजा निमीने भगवान श्रीहरीचे अवतार जाणून घेण्याची इच्छा प्रदर्शित केल्यामुळे द्रुमिल नारायण सांगू लागले, " राजन्! श्रीहरीचे अवतार, गुण व लीला अनंत असल्यामुळे मी ज्ञानप्राप्तीच्या दृष्टीने थोडक्यात सांगतो. पंचमहाभूते निर्माण करून विश्वव्यापी विराट स्वरूप धारण करणाऱ्या आदिदेव नारायणांनी "पुरुष" रूपाने त्यांत प्रवेश केला तो श्रीहरीचा पहिला अवतार. नंतर उत्पत्ती, स्थिती व लय यातल्या उत्पत्ती व्यवस्थेसाठी रजोगुणातून दुसरा अवतार ब्रम्हदेवाचा. स्थिती व्यवस्थेसाठी सत्व गुणातून तिसरा अवतार विष्णूंचा. लय अथवा संहार या व्यवस्थेसाठी तमोगुणातून चवथा अवतार श्रीशंकरांचा. दक्षप्रजापतीची कन्या मूर्ती ही धर्माची पत्नी . तिच्या पोटी श्रीहरी नर-नारायण या रुपात अवतरले. नर-नारायण तपोमग्न झाले. तेंव्हा त्यांच्या तपो प्रभावाने आपले इंद्रपद धोक्यात येईल या भयाने अस्वस्थ झालेल्या इंद्राने त्यांच्या तपोभंगासाठी कामदेवाला अप्सरांच्या परिवारासह पाठवले. पण नर-नारायणांच्या आश्रमात येताच आश्रमातल्या पावित्र्यामुळे त्या सर्वांना आपल्या अविवेकी कृत्याचे भय वाटू लागले. त्यांनी तिथून काढता पाय घ्यायचे ठरवले. त्यांची ती केविलवाणी अवस्था पाहून नर-नारायण त्यांना म्हणाले, " हे कामदेवा, हे देवांगनांनो तुम्ही भिऊ नका, आमचे आदरातिथ्य स्वीकारून इथेच राहा. आमचा आश्रम सुना सुना करून जाऊ नका!"

नर-नारायणांच्या या निष्कपट भाषणामुळे कामदेव आपल्या परिवारासह हात जोडून लाजून म्हणाले, "हे प्रभो! आपण माये पलीकडील निर्विकारी आदीनारायण आहात. आपणास शरण येणारे आपले भक्त सुध्दा रसनेंद्रिय व जननेन्द्रीयांचे आवेग ओलांडून परमपदाला प्राप्त होतात! तिथे आम्ही काय?" इत्यादी त्यांची स्तुती चालू असतानाच नर-नारायणांनी आपल्या योग सामर्थ्याने देवांगनांपेक्षा अनेकपट सुंदर, सुगंधी व सतेज स्त्रिया निर्माण केल्या. त्या इतक्या सुंदर व मोहक होत्या कीं कामदेवासह सर्व देवाङ्गनाही त्यांच्यावर मोहित झाल्या. तेंव्हा लाजेने माना खाली घातलेल्या कामदेवास नर-नारायण म्हणाले, " या स्त्रियांपैकी कोणतीही एक तुम्ही आपल्या बरोबर घेऊन जाऊ शकता. ती तुमच्या स्वर्गाचे भूषणच ठरेल."

नर-नारायाणांची आज्ञा प्रमाण मानून कामदेवांनी उर्वशीची निवड केली. आणि निष्प्रभ होऊन इंद्राकडे परतले. अशा प्रकारे आपल्या स्वरूपापासून न ढळता भगवान श्रीहरींनी अनेक अवतार धारण केले. त्यातले प्रमुख असे हंस, दत्तात्रेय, सनकादिकमुनी, आमचे वडील ऋषभदेव, हयग्रीव, वराह, कूर्म, नरसिंह, वामन, परशुराम, श्रीराम, श्रीकृष्ण-बलराम, बुध्द, कल्की असे अनेक अवतार घेतले आहेत व अजूनही घेणार आहेत. हे ऐकून राजाने भात्कीहीनाची गती काय होते? असे विचारले.

तेंव्हा चमस नारायण म्हणाले, " विश्वात मैथुन, मद्य, मांस, यांच्या सेवनाची नैसर्गिक प्रवृत्ती लक्षात घेऊन त्या प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी वेदांनी धर्माधिष्ठीत काही व्यवस्था केली. पण त्यातला गुढार्थ न समजून ती व्यवस्था आपली तृप्ती व्हावी या साठी वापरली जाऊ लागली. व परणामी जीव अतृप्तच राहू लगला. त्यामुळे व्यवहार व व्यावसायिक ज्ञानाला सर्वस्व मानणारे अध्यात्मज्ञानाकडे पाठ फिरवू लागले. परिणामी स्वत:चे अध:पतन करून घेऊ लागले. भगवंताला विन्मुख होऊन गृह, दारा, पुत्र इत्यादिकात आसक्त होणारे नरकात जाऊन पडतात." निमी राजाने पुढचा प्रश्न केला कीं भगवंताचा पूजा विधी काय असतो?

त्याचे उत्तर करभाजन नारायण देऊ लागले, " राजन्! दोन प्रकारे पूजन केले जाते. वैदिक पद्धतीने व तांत्रिक पद्धतीने. दोन्हीही तितक्याच फळदायी आहेत. तथापि कली युगात "हरीनामस्मरण" हा अत्यंत प्रभावी मार्ग आहे त्यातही मानस पूजा फार महत्वाची आहे. त्यात आपल्याला जे जे हवे असते ते ते भगवंताला अर्पण करण्याची संवय लाऊन घ्यवी. त्याने परम कल्याण साधता येते." इतके सांगून झाल्यावर नारद वासुदेवांना म्हणाले, " वसुदेवा! असा हा भगवतधर्म ऐकून निमी राजा त्याच धर्माचरणाने मुक्त झाला." हे ऐकून वसुदेव व देवकी यांनी भागवतधर्म आचरण्यास सुरुवात केली.

शुकमुनी पुढे सांगू लागले, " राजन्! त्यानंतर थोड्याच दिवसांनी ब्रम्हदेव सनकादी ऋषी, प्रजापती व इतर काही देव बरोबर घेऊन द्वारकेस निघाले. ते पाहून भगवान शिवशंकर आपल्या गणांसह निघाले. इंद्रही मरुद्गणासह निघाला. मग इतरही देव निघाले म्हणजे बारा आदित्य, अकरा रुद्र, विश्वेदेव, सिद्ध, साध्य, गंधर्व, अप्सरा, नाग, चारण, गुह्यक, विद्याधर, किन्नर, पितर असे सगळेच निघाले. भगवान ब्रम्हदेव सगळयांच्या पुढे होते. द्वारकेस येऊन ते भगवान श्रीकृष्णांना म्हणाले, " देवाधिदेवा! आमचा आपणास अखंड नमस्कार असो! आपण निर्विकार असूनही विश्व निर्माण करता. पालन करता व संहारही करता. आणि तरीही आपण अखंड स्वरूपभूत परमानंदात असता. प्रभो सोळा हजार एकशे आठ स्त्रियासुध्दा आपणास यत्किंचितही विचलित करू शकल्या नाहीत. त्या आपला जयजयकार असो!" इत्यादी प्रकारे विविध देवांची विविध प्रकारची स्तुती झाल्यावर ब्रम्हदेव म्हणाले, "हे वैकुंठनाथा! आपणास योग्य वाटत असल्यास आपण आपल्या धामाला परतावे व आमचा सांभाळ करावा." तेंव्हा भगवान श्रीकृष्ण म्हणाले, "ब्रम्हदेवा, तुमचे काम जरी झालेले असले तरी मला लगेच निघता येणार नाही. कारण आता हे यदुकुळ

पराक्रम, शौर्य, सम्पत्ती ह्या त्रिमदाने उन्मत्त होऊ लागले आहे. मी अद्याप त्यांना रोखून धरले आहे. नुकताच त्यांना ब्राम्हणाचा शाप झालेला आहे. त्या शापा प्रमाणे ते नष्ट झाले कीं मी स्वधामी जाईन."

हे ऐकून ब्रम्हदेवांसह सर्व जण भगवान श्रीकृष्णांना साष्टांग नमस्कार करून स्वधामी परतले. द्वारकेत हळू हळू लहान-मोठे अपशकून होऊ लागले. त्यामुळे ज्येष्ठ यादवांनी श्रीकृष्णांना सल्ला विचारला. तेंव्हा भगवान श्रीकृष्णांनी प्रभासक्षेत्री जाऊन पितृतर्पण, ऋषीतर्पण इत्यादी करून ब्राम्हणभोजन, दानधर्म इत्यादी विधी करण्यास सांगितले. यादवांनी त्याप्रमाणे लगेच निघण्याची तयारी केली.

उद्धवाला हा वृत्तांत समजताच उद्धव भगवान श्रीकृष्णांना एकांतात भेटला. उद्धवाने भगवंतचे मनोगत जाणून अंत:करण पूर्वक प्रार्थना केली कीं हे प्रभो! आजवर सर्व प्रसंगात मी आपल्या बरोबर असतो. आपण माझा आत्मा आहात. मी आपला वियोग कसा बरे सहन करू? त्यामुळे आपल्या सहवासाशिवाय मला आपली दुस्तर माया कशी तरुन जाता येईल बरे? माझ्यावर असा अनुग्रह करा कीं मी आपली ही दुस्तर माया तरुन जाऊ शकेन.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-अकरावा स्कंध

## पुष्प १८९ वे (अध्याय ७ पूर्ण)

## अवधूतोपाख्यान

भगवान श्रीकृष्ण उद्धवाला म्हणाले, " उद्धवा! तुला जे हवे आहे तेच मी करणार आहे. ब्रम्हदेव, इंद्र वगैरेंना मी त्यांच्या लोकी यावेसे वाटते पण मी त्यांचे काम केले आहे. आता मी फक्त ब्राम्हणाच्या शापामुळे यदुकुळ नष्ट होण्याची वाट पहात आहे. मी द्वारका सोडल्यावर समुद्र द्वारका पोटात घेईल. माझ्या निर्याणा नंतर लगेच कलीयुग पृथ्वीवर अवतरेल. कलीयुगात अधर्माची वृद्धी होईल. तरी तूं आता सगळे स्नेहपाश तोडून अनन्यत्वाने तुझे चित्त माझ्या ठायी एकाग्र कर. अनेकत्वाच्या भ्रमामुळे गुण-दोष दिसू लागतात. त्यामुळेच विधी-निषेधात्मक कर्म मार्ग निर्माण होऊन मनुष्य त्यात अडकतो. संपूर्ण दृश्य व अदृश्य विश्व परमात्म स्वरूपात पहाण्याची संवय करून घेतली कीं मग शब्दज्ञान व अनुभव यांच्या माध्यमातून तुला आत्मानंद अनुभवता येईल."

उद्धव म्हणाला, " भगवंता! देह संगामुळे 'मी व माझे' या अनंतकालच्या मिथ्या कल्पनेने प्रपंचात बुडून गेलेल्या मला ह्या जन्म-मृत्यूच्या फेऱ्यातून बाहेर पडण्याचा सोपा मार्ग सांगा. मी आपणास शरण आलो आहे."

भगवान श्रीकृष्ण म्हणाले, " उध्दवा! विश्वातले सर्व व्यवहारकुशल व चतुर लोक अशुभ वासनांपासून स्वत:च स्वत:चा उद्धार करून घेतात. आपणच आपला गुरु होऊन प्रत्यक्ष व अनुमान यांच्या द्वारे स्वकल्याण साधावे. सृष्टीत मी अपार शरीरे निर्माण केली आहेत. त्या सर्वात माझा आवडता जर कोणी असेल तर तो मनुष्यप्राणी. कारण मनुष्यालाच फक्त चित्ताच्या एकाग्रतेने माझ्या सर्वव्यापित्वाचा अनुभव घेता येतो. आत्मानात्म विवेक करण्याची बुद्धी फक्त मानवात आहे. उध्दवा! तुला मी एक प्राचीन इतिहास सांगतो तो ऐक, त्याने तुला नक्कीच धर्माचे मर्म समजेल. धर्माचे मर्म जाणणाऱ्या यदुने एका त्रिकालदर्शी, तरुण, तेजस्वी अवधूत ब्राम्हणाला निर्भय आणि निर्मम अवस्थेत स्वैर विहार करताना पाहले. तेंव्हा मोठ्या कुतूहलाने यदुने त्यांना त्यांच्या आत्मसंतुष्टतेचे रहस्य विचारले. त्यावेळी त्या अवधूताने सांगितले कीं मी स्वबुद्धीने अनेक गुरूंच्या आश्रयाने प्राप्त करून घेतलेल्या ज्ञानामुळे मुक्त होऊन आत्मसंतुष्टतेने विहार करीत आहे. तूं ही त्या गुरूंची नावे ऐक. म्हणजे तुलाही तसेच ज्ञान प्राप्त होईल. माझ्या गुरूंची नावे अशी ,

"पृथ्वी वायुराकाशमापोऽग्निश्चन्द्रमारविः । कापोतोऽजगरसिंधुः पतंगोमधुकृद्गजः ॥३३॥

मधुहा हरिणो मीनःपिंगलाकुररोऽर्भकः । कुमारी शरकृतसर्पउर्णनाभिःसुपेश्कृत् ॥३४॥"

अर्थात पृथ्वी, वायू, आकाश, जल, अग्नी, चंद्र, सूर्य, कपोत, अजगर, समुद्र, पतंग, मधमाशी, हत्ती, मधुहा (भ्रमर), हरिण, मासा, पिंगळा(वेश्या), टिटवी, बालक, कुमारी, बाण तयार करणारा, सर्प, कोळी व कुंभारमाशी. असे माझे चोवीस गुरु आहेत. त्यांच्या आचरणा वरून मी विविध प्रकाची शिकवण आत्मसात केली आहे. त्यामुळे ज्ञानप्राप्ती साठी ह्यातील काही गुरु नक्की कसे वागायचे हे शिकवणारे आहेत व काही गुरु त्याज्य गोष्टी शिकवणारे आहेत. आता कसे ते श्रवण कर. पृथ्वीपासून मला अनाक्रोष क्षमाशीलतेचे ज्ञान प्राप्त झाले. कारण पृथ्वीवर तुम्ही काहीही केले तरी ती सहन करते. दुसरा गुरु वायू! सर्वत्र संचार करूनही सुगंध व दुर्गंध कशानेच लिप्त होत नाही. सर्वांच्या शरीरात सारखेपणाने रहातो. त्याच्यापासून अलिप्तता व समदर्शन हे ज्ञान प्राप्त झाले. तिसरा गुरु आकाश. आकाशापासून अमर्यादमृदुत्व व सर्वसमावेशकत्वाचे ज्ञान प्राप्त झाले. चवथा गुरु पाणी. पाण्यापासून शुद्धता, पावित्र्य व अभेदवृत्तीचे ज्ञान प्राप्त झाले. पाचवा गुरु अग्नी. अग्नीपासून तेजस्विता, अपरिग्रह, रसनेन्द्रियावर विजय हे ज्ञान प्राप्त झाले. सहावा गुरु चन्द्र. चंद्र शुक्ल पक्षात वाढतो व कृष्ण पक्षात कमी कमी होत जातो असे आपल्याला दिसते. पण प्रत्यक्षात चंद्रात काहीच फरक होत नसतो. तद्वत बाल्य, तारुण्य व वार्धक्य ह्या नश्वर शरीराच्या अवस्था आहेत आत्म्याच्या नाहीत. हे ज्ञान चंद्रा कडून प्राप्त झाले. सातवा गुरु सूर्य. सूर्याकडून अनासक्त परोपकार व उपाधीमुळे होणारी भेदप्रतीती हे ज्ञान प्राप्त झाले. उपाधीमुळे भेदप्रतीती म्हणजे एकाच सूर्याची विविध ठिकाणी विविध प्रतिबिंबे त्या उपाधीमुळे वेगळी वेगळी दिसतात तद्वतच आत्मतत्त्व एकच असून गुणसंगाने म्हणजेच उपाधीमुळे भेदमय दिसते. आठवा गुरु कपोत. कपोत म्हणजे कबुतर. त्या कपोताचे घरटे ज्या झाडावर होते त्या झाडाखाली पारध्यांनी जाळे टाकून कपोताच्या पिल्लांना पकडले. इतक्यात त्यांची आई तिथे आली. पिल्लांच्या कळवल्याने ती पण जाळयात अडकली. तेवढ्यातच कापोतही तिथे आला व कापोतीला व पिल्लांना सोडवायला जाउन स्वतःच त्यात अडकला! हे सर्व आसक्ती मुळे घडले. आसक्तीमुळे आपला घात होऊ नये म्हणून मी अनासक्तीचे ज्ञान कपोतापासून घेतले व अनासक्त झालो.

हरये नमः। हरये नमः। हरये नमः।

।।श्रीगुरु:शरणं।।

## श्रीमद्भागवत-अकरावा स्कंध

## पुष्प १९० वे (अध्याय ८ व ९ पूर्ण)

### उर्वरित गुरूंची कथा

अवधूत पुढे सांगू लागले, " राजन्! नववा गुरु अजगर. कोणत्याही चवीच्या आहारी न जाता विधिवशात् मिळेल त्यात समाधान मानण्याचे ज्ञान मला अजगराकडून प्राप्त झाले. दहावा गुरु समुद्र. बाहेर अथांग व आत गंभीर. बाह्य संगाने न क्षोभणारा. तद्वत् आपणही बाह्य विषयांनी क्षोभू नये व परमात्म्याच्या चिंतनात गंभीर राहावे. अकरावा गुरु पतंग. दीपाच्या सौंदर्यावर मोहित होऊन दीपावर झेप घेऊन आपला प्राण गमावतो. तसे फसव्या मायेच्या स्त्री सौंदर्यावर आसक्त न होण्याचे ज्ञान मला पतंगा कडून मिळाले. बारावा गुरु भ्रमर(मधुकृद्). फुलांना जराही न दुखावता मध गोळा करतो. तद्वत् एकावरच भार न टाकता माधुकरी मागून उपजीविका करण्याचे ज्ञान मला भ्रमरा कडून प्राप्त झाले. तेरावा गुरु हत्ती. लाकडाच्या हत्तीणीवर भुलून खड्ड्यात पडून पराधीन होतो. तद्वत् स्त्री मोहाने येणारी पराधीनता टाळावी हे ज्ञान मला हत्ती कडून मिळाले. चवदवा गुरु मधमाशी. संग्रह न करण्याचे ज्ञान मला प्राप्त झाले. कारण मधमाशा मधाचा संग्रह करतात व मधमाशांना मारून शेवटी तो मध भिल्लच लुटून नेतात. पंधरावा गुरु हरीण. पारध्याच्या नादलुब्ध गीताला भुलून हरीण पकडले जाते. म्हणून विकारोत्तेजक गोष्टींपासून दूर राहण्याचे ज्ञान मला प्राप्त झाले. सोळावा गुरु मासा. अमिषाच्या लोभाने गळाला अडकून प्राण गमावतो. म्हणून रसना जिंकून आत्मोन्नती साधण्याचे ज्ञान मला प्राप्त झाले. सतरावी गुरु पिंगळावेश्या. देहविक्रीस तयार होऊन गिऱ्हाईक न मिळाल्याने वैफल्य ग्रस्ततेत तिला निर्वेदबुद्धी प्राप्त झाली. त्यात तिला जे गीत सुचले त्याचा अर्थ असा कीं विटाळापासून तयार झालेल्या या अमंगल देहाचे विकार जरी क्षणो क्षणी बदलत असले तरी आत्मा मात्र सदा स्थिर व मंगलमय असतो. आणि तोच माझा खरा नियंता पती आहे. त्यामुळे परपुरुषापासून मी सौख्याची अभिलाषा करणे किती मूर्खपाणाचे आहे! त्यामुळे आता मला विधीवशात् जे प्राप्त होईल त्यात मी समाधान मानीन अश्या दृढ निश्चयाने ती शांत झोपी गेली. त्यामुळे तिच्यापासून मी आत्मतत्त्वात स्थिर राहाण्याचा बोध घेतला. अवधूत पुढे म्हणाले, यदु! आवडत्या वस्तूच्या साठ्यामुळे मनुष्याला दु:ख प्राप्त होते. हे मी अठरावा गुरु कुरर पक्षा कडून शिकलो. कुरार पक्षाच्या चोचीत मांसाचा तुकडा होता तोवर इतर पक्षी त्याच्यावर तुटून पडत होते. पण तो तुकडा टाकून देताच तो सुखी झाला! एकोणिसावा गुरु एक बालक. कसलीच काळजी नसलेला व आपल्यातच रममाण झालेला. त्याच्याकडून मी आत्मानंदात राहण्यास शिकलो. विसावा गुरु एक कुमारी. तिच्यापासून एकांत सेवनाचा बोध मी घेतला.

तो असा कीं त्या कुमारीला मागणी घालायला परगांवचे पाहुणे आले होते. कुमारीचे आई वडील घरी नव्हते. भोजनाची व्यवस्था करणे आले. म्हणून ती कुमारी भात कांडू लागली. पण कंकणाचा आवाज होऊ लागला. म्हणून तिने फक्त एकच कंकण ठेवले व बाकीची काढून ठेवली. त्यावेळी साळी कांडताना होणारा आवाज बंद झाला. त्यापासून मी हा बोध घेतला कीं अनेक जण असले तर गडबड गोंधळ होतो व दोघे असले तरी गप्पा गोष्टी होतातच. म्हणून साधकाने एकांत सेवन करावा. एकविसावा गुरु शरकृत् (बाण तयार करणारा कारागीर). बाण तयार करीत असताना त्यात तो इतका तल्लीन झाला होता कीं त्याच्या समोरून वाजत गाजत राजाची मिरवणूक गेली तरी तो जराही विचलित न होता आपल्या कार्यात व्यग्र राहिला. त्याच्याकडून मी आत्मानंदात असेच तल्लीन राहण्याचा बोध घेतला. माझा बाविसावा गुरु सर्प. स्वत:चे घर नसलेला पण सदैव सावध राहून गुप्तपणे वावरणारा प्राणी. त्याच्यापासून देहाच्या क्षणभंगुरत्वाची जाणीव ठेवून गृहादीसंग्रहाच्या फंदात न पडता सदैव नामस्मरणात सावध राहून साधना करावी हा बोध मी घेतला. तेविसावा गुरु कोळी (उर्णनाभी). स्वत:च्या बेंबीतून तंतूं काढून स्वत:चे विश्व निर्माण करतो. त्यात इतरांना अडकवतो पण स्वत: मात्र अडकत नाही. परमेश्वरही तसाच मायासूत्राने विश्व निर्माण करतो व अज्ञानी जीवांना अडकवतो. पण स्वत: कधीच अडकत नाही. हे ज्ञान मी त्याच्यापासून घेतले. चोविसावा गुरु कुंभारमाशी. आपल्या घरात जो कीटक आणून बंदिस्त करून ठेवते तो कीटक भयाने त्या कुंभारणीच्या चिंतनात मग्न होतो. त्यामुळे तो स्वत:च कुंभारमाशी बनतो. त्याच्यापासून हे ज्ञान प्राप्त झाले कीं सतत ईशचिंतन केल्यास आपणही ईश्वराला मिळणार.

राजा यदु, ज्या गुरूंकडून मी जे शिकलो ते मी तुला सांगितले. पण स्वदेहाकडूनही खूप काही शिकलो. अनेक स्त्रिया असलेल्या पुरुषाची जशी ओढाताण होते, तशीच ओढाताण माझा देह म्हणणाऱ्या जीवाची इंद्रियांच्या विविध प्रकारच्या विषयांच्या ओढीमुळे होते. ते ध्यानात घेऊन मी विवेक वैराग्य धारण करण्याचे स्वत:च्या देहा कडून शिकलो. स्वत:ला जन्म-मृत्यूच्या फेऱ्यातून सोडवण्याचा तो एकमेव मार्ग आहे. भगवान श्रीकृष्ण उध्दवाला म्हणाले, "उद्धवा! अवधुतांच्या या उपदेशानुसार यदुने अहंकार रहित अनासक्ती प्राप्त करून घेतली व तो मुक्त झाला. "

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-अकरावा स्कंध

## पुष्प १९१ वे (अध्याय १० व ११ पूर्ण)

## बध्द मुक्त भक्त लक्षणे

“उध्दवा! साधकाने मला शरण येऊन निष्काम भावाने स्वधर्माचरण करावे.

फलासक्तीने केलेल्या कर्माने अंती दु:ख प्राप्त होते. इंद्रियांच्या माध्यमातून जाणवणारी भेदबुद्धी स्वप्नवत् असते याचे भान सदैव ठेवावे. आत्मज्ञानासाठी प्रयत्नशील होऊन नित्यनैमित्तिक कर्मे करताना पाप-पुण्याची विवंचना करू नये. माझ्या भक्ताने सत्य, अहिंसा, ब्रम्हचर्य, अपरिग्रह यांचे प्रामाणिक पालन करावे. सद्गुरूंना माझे स्वरूप समजून त्यांची सेवा करावी. मत्सर, दंभ, अभिमान, 'मी व माझे' या सर्वांचा त्याग करावा. कोणाबद्दलही दोष दृष्टी ठेवू नये. अतात्त्वार्थी भाषण करू नये. स्वयंप्रकाशी आत्मा स्थूल-सूक्ष्म देहांच्या पेक्षाही सूक्ष्म असून साक्षीरूपाने विद्यमान असतो. उद्धवा अनेक कर्म जाणारे तज्ञ कर्म करीत असतात पण ते सुखी असतातच असे नाही. आणि अनेक जण कर्म न जाणणारे मूर्ख व न करणारे असतात. ते मात्र सुखी असल्याचे दिसते. ही प्रकृतिमय व्यस्तता लक्षात घेऊन कर्मामुळे सौख्य प्राप्त होईल हा विचार मनात आणूच नये. इह आणि पर हे दोन्ही सारख्याच प्रमाणात सदोष आहेत हे लक्षात ठेव. संपूर्ण विश्वात ब्रम्हदेवापासून ते सूक्ष्म जीवाणू पर्यंत माझे भय आहे. संपूर्ण विश्व त्रिगुणाने व्याप्त असल्याने सतत कार्यान्वित राहते. केलेल्या कर्माची अहं-ममता सुटली कीं जीव मुक्त होतो. महत्वाची गोष्ट अशी कीं काल, कर्म, स्वभाव, आत्मा, वेद, धर्म इत्यादी जे जे काही आहे ते सर्व मीच आहे."

हे सर्व श्रवण करून उध्दवाने विचारले, " हे प्रभो! देहेन्द्रीयादी गुणांनी केलेल्या कर्माची फळे भोगणारा आत्माच असल्यामुळे तो बध्द किंवा मुक्त कसा होतो? बध्द किंवा मुक्त कोणत्या लक्षणांनी ओळखला जातो?" भगवान श्रीकृष्ण म्हणाले, "उध्दवा ! बध्द-मुक्त हे शब्द आत्मतत्त्वाला लागत नाहीत. आत्म्याला बंध अथवा मोक्ष नसतो. गुणाच्या उपाधीमुळे जीवाला बद्धता व मुक्तता प्राप्त होते. सुख-दु:ख-भय व देह प्राप्ती या सर्वांना माया कारणीभूत आहे. स्वप्न हा जसा जागेपणी नाहीसा होणारा बुद्धीचा भ्रम आहे तसाच संसार हा बुद्धीचा अज्ञानामुळे निर्माण झालेला भ्रम आहे. तो ज्ञानप्राप्तीने नाहीसा होतो. विद्या व अविद्या या माझ्याच शक्ती आहेत. बध्द व मुक्त यातील भेद असा आहे कीं जीवाचा ईश्वर मुक्त आहे. पण

जीव ही दशा आहे व बध्द आहे. जीवाला क्रिया स्वातंत्र्य आहे. पण त्या क्रियेचे अपेक्षित फळ मिळणे त्याच्या अधीन नाही. ते प्रकृतीच्या आधीन आहे. जीव व ईश्वर हे समानधर्मी असूनही जीव हा 'मी व माझे' या धारणेने अज्ञानी भोक्ता आहे. तर शिव म्हणजेच ईश्वर हा ज्ञानी नियंता आहे. तहान, भूक, झोप, जागृती, मल-मूत्र विसर्जन इत्यादी इंद्रियांचे आवेग जीवाला नव्हे तर शिवाला म्हणजे नियंत्याला कळतात. जीव हा देहाशी तादात्म्य पावतो. म्हणून सुख-दु:खाचा भोक्ता होतो. नियंता फक्त साक्षी असतो. म्हणून ज्ञान प्राप्ती साठी नियंत्याशी तादात्म्य पावावे. त्यासाठी स्वकर्तृत्वाचा अभिमान बाजूस ठेवून सर्व कर्म ईश्वरार्पण करावे. म्हणून स्वत:ला कर्ता समजणारा बध्द असतो. मुक्त म्हणजे ज्ञानी. तो सुध्दा इतरांसारखाच वागताना दिसतो. पण त्या त्याच्या इंद्रियांच्या स्वाभाविक निरहंकारी, निरपेक्ष, निष्काम क्रिया असतात. थोडक्यात म्हणजे द्वंद्व विरहीत जीवन माझ्या स्मरणात माझ्या इच्छेने घडेल तसे घालवीत असतो. त्याचे वैराग्य प्रखर असते. तो अत्यंत निस्पृह असतो. शब्दज्ञान झालेल्याला जर ब्रम्हानुभूती आलेली नसेल तर ते ज्ञान वांझोटे असते. म्हणजे त्या ज्ञानाने तो मुक्त होत नाही. त्यासाठी माझे उत्पत्ती,स्थिती व लय ह्या पवित्र कार्याचे स्मरण ठेवून ते अंत:करणात ठसावून घ्यावे. म्हणजे मग अंत:करणात माझे अधिष्ठान निर्माण होते. मग आत्मचिंतनात अनेकत्वाचा भास दुर्लक्षित करून मन माझ्या ठिकाणी एकाग्र करावे. अशाप्रकारे माझ्यात रममाण होऊन धर्माचरणाने माझी भक्ती करावी." इथे उद्धवांनी भक्ती कशी करावी हे विचारले.

भगवान श्रीकृष्ण म्हणाले, " माझा भक्त हा कोणाशीशी वैर न ठेवणारा असतो. समदर्शी व परोकारी असतो. आत्मचिंतनात मग्न असतो. इतरांचा सन्मान करतो पण स्वत:मात्र मान सन्मानाची अपेक्षाच करीत नसतो. व्रत वैकल्ये करून मला अर्पण करून सर्व देव देवतांच्या ठिकाणी मला पहाण्याचा सराव करणे म्हणजे माझी भक्ती करणे आहे. सगुणमूर्ती पूजा ही माझी भक्ती आहे. पण ती पूजा लौकिकासाठी नसेल तर. उध्दवा, सत्संग व भक्तियोग या दोन साधनां व्यतिरिक्त भवसागर पार करण्या साठी दुसरा मार्ग नाही. तूं माझा परम भक्त असल्यामुळे मी तुला माझे हृद्गत सांगणार आहे."

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

## ।।श्रीगुरु:शरणं।।

## श्रीमद्भागवत-अकरावा स्कंध

## पुष्प १९२ वे (अध्याय १२ व १३ पूर्ण)

### सत्संग व हंसोपदेश

भगवान श्रीकृष्ण पुढे म्हणाले, " उध्दवा, सत्संगामुळे इह-भोगांची आसक्ती नष्ट होते. त्या योगे जीव सहजतेने मला प्राप्त होतो. तसा तो तितक्या सहजतेने धर्माचरणादीनी, व्रतानुष्ठानांनी, याग इत्यादींनी प्राप्त होत नाही. असुर, वैश्य, स्त्री असे कोणीही असले तरी सत्संगाने ते लगेच उद्धरले जातात. असुरांमध्ये वृत्रासुर, प्रल्हाद, बळी, बाणासुर असे कितीतरी जण आहेत. पशूंमध्ये गजेंद्र, पक्षांमध्ये जटायू, वैश्यांमध्ये तुलाधार, स्त्रियांमध्ये कुब्जा दासी व गोपी, या सर्वांना सत्संगाने मुक्ती प्राप्त झालेली आहे. ना तर वेदाध्ययन वा ना काही तप! माझ्या विषयी प्रेम जडलेला कोणताही जीव उद्धरला जातो."

इथे उद्धवाने आपल्या मनातला गोंधळ दूर करण्यासाठी विचारले, " भगवंता, मी आपणास शरण येऊ कीं स्वधर्माचरण करू?"

भगवान म्हणाले, " उद्धवा, अव्यक्त परमात्मा प्रत्येकच शरीरात प्रविष्ट असतो. तो कसा प्रकट होतो ते ऐक! मग तुला कळेल कीं मला शरण कां यावयाचे! अनन्य भावाने मला शरण आल्यावर परमात्मा अनाहत घोषाच्या स्वरूपात परावाणीसह मूलाधारात प्रवेश करतो. तोच मग मनोमय सूक्ष्मरूप धारण करतो. व मणिपूरचक्रात पश्यंति वाणीच्या रुपात प्रविष्ट होतो. मग विशुध्दचक्रात नादरुपी मध्यमा वाणीच्या रूपाने प्रवेश करतो. मग तोच मुखावाटे स्थूलरूपाने वैखरीवाणीच्या रूपाने प्रकट होतो. ह्याला प्रकटीकरणाची उत्क्रांती असे म्हणतात. उद्धवा, हीच उत्क्रांती तुला वेगळया प्रकारे समजाऊन सांगतो. आकाशात जसा उष्म्याच्या रूपाने अग्नी व्यापलेला असतो तसाच तो लाकडातही व्यापलेला असतो. पण त्याच्या त्या व्याप्तीला कोणी अग्नी म्हणत नाहीत वा जाणतही नाहीत. पण दोन लाकडांच्या घर्षणाने व वायूच्या उपकारक सहाय्याने अव्यक्त अग्नी स्फुलिंग रूपाने प्रकट होतो व आहुतीच्या खाद्याने ज्वालारूप होतो. तसेच मलाही वाणीचे व्यक्तरूप प्राप्त होते. प्रकट झालेला अग्नी जसा स्फुल्लिंग, निखारा, ज्वाला, इत्यादी विविध स्वरूपाच्या उपाधींमुळे विविध नामानि जाणला जातो तसाच उपाधीमुळे मी अनेकत्वाने

जाणला जातो. तात्पर्य हे कीं संपूर्ण विश्व हा एक अखंड ब्रम्हाचा अविष्कार आहे. गुरुकडून त्याचे रूप जाणून घेणाऱ्याला वेदांचे तात्पर्य समजते. उध्दवा सत्व, रज व तम हे तीन गुण बुद्धीचे आहेत आत्म्याचे नाही. सत्वगुणाने रज व तम या दोन गुणांचा नाश करून मग शुध्द सत्वगुणाने सत्वगुणाचाही नाश करावा. सात्विक अन्न सेवनाने सत्व गुणाची वाढ होते. व वाढलेल्या सत्वगुणाने माझी भक्ती बळावते."

उद्धव म्हणाला, "प्रभो! विषय हे संकटाचे घर असल्याचे सगळेच म्हणतात पण तरी ते भोगत असतात ते कसे?" भगवान श्रीकृष्ण म्हणाले, " देहा विषयी 'मी' या दृढ भावनेमुळे मन रजोगुणी बनते. मग संकल्प विकल्प सुरु होतात. व भोगलेल्या विषयचिंतनात ते पुन्हा भोगण्याची इच्छा उत्पन्न होते. मग कळून सवरून मोहामुळे तेच तेच विषय जीवाकडून भोगले जातात. ज्ञानी माणसाची बुद्धी सुध्दा रजोगुण व तमोगुण यांच्या प्रभावाने विषयांकडे खेचली जाते. पण तो मन आवरून सत्व गुणात रहातो. म्हणून साधकाने नेहमीच सावध राहावे. ज्ञानी मनुष्य उत्पन्न होणाऱ्या विकारांकडे दुर्लक्ष करून माझ्या स्मरणात राहातो. सनकादिकांना हाच योग मी पूर्वी सांगितला होता. सनकादिकांनी एकदा ब्रम्हदेवांना योगाची सूक्ष्म व अंतिम गती विचारली होती. तसेंच स्वभावत: विषयाकडे आसक्त असलेल्या चित्तात विषय हे वासनेच्या रूपाने शिल्लक राहतात. तर मग मुमुक्षु व साधक संसारीकांनी भवसागर कसा तरुन जावयाचा? त्यावेळी ब्रम्हदेव कर्मासक्त असल्याने सनकादिमुनींच्या प्रश्नाचे मर्म त्यांना समजले नाही. म्हणून त्यांनी माझे स्मरण केले. तेंव्हा मी हंसरूप धारण करून त्यांच्यासमोर प्रकट झालो. त्यावेळी ब्रम्हदेवांना पुढे करून सनकादीमुनी माझ्या समोर आले. व मला नमस्कार करून विचारू लागले, "आपण कोण?"

तेंव्हा त्यांची तत्त्वजिज्ञासा जाणून मी म्हणालो, " हे विप्रवर! आपला 'आपण कोण?' प्रश्न जर अत्म्याविषयी असेल तर आत्म्या सारखे दुसरे काहीच नसल्यामुळे निर्विशेष आत्म्याविषयी मी कसे व काय बोलू? वास्तविक पंचमहाभूतात्मक तत्त्व सर्व विश्वाला व्यापून सर्व प्राणीमात्रांत ते सारखेपणाने आहे. व आपला 'आपण कोण?' हा प्रश्न भेदात्मक आहे. त्यामुळे तो एक अर्थशून्य वाग्विलास आहे. कारण मन, वाणी, दृष्टी, स्पर्श, चव इत्यादींनी जे जाणले जाते ते अभेदमय "मी" नामक आत्मतत्त्वातून जाणले जाते. हे तुम्ही निश्चित समजा. तुमचा प्रश्न चित्ता विषयीचा आहे. चित्त विषयाकार होते व विषय वासनेच्या रूपाने चित्तात रहातात. गुणांमुळे विषय निर्माण होतात. चित्तात गुणांचा प्रवेश व गुणात चित्ताचा प्रवेश. अशा अभूतपूर्व संयोगाने माझा अंश असलेला जीव देह धारण करतो. त्यामुळे चित्ताचा व गुणाचा परस्पर संबंध देहाशी असतो जीवाशी वा आत्म्याशी नाही. जीव अखंडत्वाने आत्म्याशीच तादात्म्य पावलेला असतो. पण विषय सेवनामुळे चित्त विषयात प्रविष्ट होते आणि मग चित्तातून विषय निर्माण होतात. म्हणून दोन्हीकडे दुर्लक्ष करून परमात्म्यावर लक्ष केंद्रित करावे. जागृती, स्वप्न, सुषुप्ती या अनुक्रमे सत्व, रज, तम या गुणातून निर्माण झालेल्या बुद्धीच्या वृत्ती आहेत. जीव हा साक्षी आहे. वृत्ती बंधनामुळे आत्मा जीव रूपाने तिन्ही अवस्थांमध्ये बध्द होतो. म्हणून साधकाने तुर्यावस्थेत परमात्म्याच्या स्मरणात राहून हे बंधन स्वप्रयत्नाने तोडावे लागते. म्हणजे मग चित्त व विषय यांचा परस्पर संबंध तुटतो. "मी व माझे " या अहंकाराने बंध निर्माण होतो. व आत्म्याच्या सच्चिदानंदस्वरूपाचा लोप होतो. म्हणून वैराग्ययुक्त अंत:करणाने तुर्यावस्थेत येऊन परमात्म्याच्या स्मरणात राहावे. साधकाने जन्मजन्मांतरीच्या संवयीमुळे उत्पन्न झालेला अनेकत्वाचा

भ्रम विचार पूर्वक व सतत चिंतन करून आत्मानात्म विवेकाच्या विचारातून युक्ती युक्तीने नाहीसा करावा. म्हणजे मग जागृतीतले व्यवहार स्वप्नवत् वाटू लागतात. ते तुर्येचे तारुण्य समजावे. विश्वात आत्म्याखेरीज काहीच सत्य नसल्यामुळे दृश्य आपोआपच मिथ्या होते. कारण सर्वच अवस्थांचा साक्षी आत्माच असतो. बाल्य, तारुण्य, वृद्धाप्य, जागृती, स्वप्न, सुषुप्ती या सर्व अवस्थांचा साक्षी आत्माच असल्यामुळे मी झोपलो होतो, मी स्वप्न पहिले, मी जागा आहे असे सांगता येते. तसेंच जगाचा होणारा भास हा आत्म्यामुळेच होतो. म्हणून साधकाने निरीच्छ होऊन सर्व लौकिक व्यवहार करावेत. जे उचित आणि योग्यवेळी प्राप्त होईल ते कर्म परमात्म्याला समर्पित भावनेने करावे. सर्वच प्राण्यांचे देह प्रारब्धाधीन असतात. म्हणून प्रारब्ध भोग संपण्याची वाट पहात देहाने केलेली कर्मे ईश्वरार्पण करीत गेल्यास नवीन प्रारब्ध निर्माण होत नाही. मग देह सोडल्यावर पुन्हा देह प्राप्त होत नाही. हे सनकादी मुनींनो संख्ययोगाचे हे गुह्य ज्ञान मी तुम्हाला सांगितले आहे. आतां 'आपण कोण?' या आपल्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर ऐका. मी यज्ञस्वरूप परब्रम्ह! ब्रम्हदेवाने तुमच्या प्रश्नाला उत्तर देण्यासाठी माझे स्मरण केल्यामुळे मी दूध व पाणी वेगळे करण्याची युक्ती असलेल्या हंसाच्या रुपात इथे प्रकट झालो."

इतके सांगून भगवान श्रीकृष्ण उद्धवाला म्हणाले, " उद्धवा! माझ्या या उपदेशाने सनकादिकांचा संदेह दूर झाला. नि:संदेह होऊन माझे पूजन करून ते स्वस्थानी गेले."

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-अकरावा स्कंध

## पुष्प १९३ वे (अध्याय १४ व १५ पूर्ण)

## भक्तियोग, ध्यान व सिद्धी

"अनेक मार्गांपैकी आत्म कल्याणाचा सुलभ मार्ग कोणता?" असा प्रश्न उद्धवाने भगवान श्रीकृष्णांना विचारल्यामुळे भगवान श्रीकृष्ण म्हणाले, "उद्धवा! आत्मकल्याणाचा उत्कृष्ट मार्ग म्हणजे अपरिग्रही, इंद्रिय निग्रही, शांत, समचित्त व माझ्या स्मरणात विधिवशात् होण्याऱ्या प्राप्तीवर संतुष्ट राहून माझी भक्ती करणे हा आहे. त्यामुळे निरपेक्ष, समदर्शी, शांत, निर्वैर व सतत माझ्या स्मरणात असणाऱ्या भक्ताची चरणधूळ मी स्वत:च्या मस्तकी धारण करतो. त्यामुळे मला स्वत:लाच पवित्रता प्राप्त झाल्यासारखे वाटते. माझ्या भक्तांना विषय त्रास देत नाहीत असे नाही. पण त्यांची भक्ती जस जशी वाढत जाते तसे तसे त्यांचे विषयांचे त्रास कमी कमी होत नाहीसे होतात. आणि मग धगधगत्या अग्नीप्रमाणे माझी भक्ती त्यांच्या सर्व पापांची राख रांगोळी करते. उद्धवा! माझ्या अनन्य भक्तीने मी जितक्या सहजतेने प्राप्त होतो तेवढा मी योग, तप, याग, दान, धर्माचरण, स्वाध्याय इत्यादी मार्गांनी होत नाही. माझी भक्ती चारही वर्णांना सारखेपणाने पावन करणारी आहे. या उलट धर्मनिष्ठ असून जर तो माझा भक्त नसेल तर तो काही पवित्र होत नाही. माझ्या भक्तीने शरीर पुलकित होणे, वाचा सद्गद होणे, माझ्या विरहाने दु:ख होऊन रडू येणे, नामस्मरणाच्या आनंदात माझा सहवास मिळाल्याच्या कल्पनेने आनंदाने हसू येणे इत्यादी भाव उत्पन्न होत नसतील तर ती भक्ती आशयरहित होते. म्हणजे ते फक्त सुकृत होते. त्या भक्तीने अंत:करण शुद्ध होत नाही व ती भक्ती माझ्या प्राप्तीसाठी या जन्मात उपयोगी पडत नाही. माझ्या पावनलीला कथांच्या श्रवणाने चित्तातला मल जसा जसा धुतला जातो तसा तसा माझा भक्त सर्वत्र मला पाहू लागतो. विषयाच्या स्मरणाने चित्त जसे विषयात रममाण होते तसेंच ते माझ्या स्मरणाने माझ्यात गुंतून जाते. स्त्रीसंगामुळे दु:ख प्राप्त होते. म्हणून साधकाने माझ्या ध्यानात व चिंतनात मग्न असावे. जरुरी पुरता व्यवहार करावा. "

इथे उद्धवाने ध्यान व चिंतन कशा प्रकारे करावे असे विचारले म्हणून भगवान श्रीकृष्ण सांगू लागले, " समतल भूमीवर दर्भासन, दर्भासनावर धूतवस्त्र टाकून त्यावर आसनस्थ व्हावे. मग प्राणायामाचा सराव करावा. मग आपल्या हृदयात प्रफुल्लीत व तेजस्वी कमळ उमलल्याची धारणा करावी. कमळाच्या मध्यभागी पिवळ्याधमक तेजस्वी परागतंतुवर माझी तेजस्वी पाऊले पहावीत. मग माझ्या चतुर्भुज

स्वरूपाचे ध्यान करावे. तेजस्वी मुख, प्रमाणबध्द व सुंदर कंठ, सुंदर व लांब सडक हात, पुष्ट गाल, मुखावर प्रसन्न हास्य, मकरकुंडलांनी तळपणारे कान, सुवर्णासम पितांबर परिधान केले असल्याचे पहावे. मग भरदार व रेखीव वक्षस्थळावर श्रीवत्स व श्री निकेतन असल्याचे पहावे. हातात शंख, चक्र, गदा व पद्म धारण केले असल्याचे पहावे. गळयात लांबसडक टवटवीत सुगंधी वनमाला, कंठात कौस्तुभमणी, चरणात नुपूर अशी संपूर्ण मूर्ती पहावी. मग माझ्या मुखावर लक्ष केंद्रित करावे. मग हळू हळू मुखावरच्या हास्यावर लक्ष केंद्रित करावे. मग हास्यातल्या निर्गुण आनंदावर लक्ष केंद्रित करावे. मग त्या निर्गुण आनंदमय परब्रम्हात मनाचा लय साधावा. मनात काहीच न आणता फक्त माझ्या चिंतनात निर्विकल्प समाधी अनुभवावी. याच समाधीत ज्योतीत ज्योत मिळावी तद्वत जीवाशिवाचे ऐक्य अनुभवास येते. मग द्रव्य, ज्ञान, क्रया इत्यादी एक मोठा भ्रम असल्याचे अनुभवास येते. उद्धवा! अशा प्रकारे इंद्रिये मन प्राण या सर्वांना योगबलाने स्ववश करून घेतल्यावर सर्व सिद्धी प्राप्त होतात. आणि तशा अठरा सिद्धी आहेत. त्यातल्या मुख्य आठ माझ्या ठिकाणी असतात. उरलेल्या दहा सत्वगुणाच्या विकासाने साधकाला प्राप्त होतात. माझ्या प्रमुख अष्टसिध्दिंपैकी अणिमा महिमा व लघिमा या तीन सिद्धी शरीराशी संबंधित आहेत. प्राप्ती इंद्रियांची सिद्धी आहे. प्राकाम्य इह पर पदार्थांचा अनुभव देणारी सिद्धी आहे. ईशिता ही मायेच्या कार्यावर नियंत्रण ठेवणारी सिद्धी आहे. वशिता ही इंद्रियांना स्ववश ठेवून विषय भोगाता येणारी सिद्धी आहे. यत्काम ही सर्व कामना नष्ट करणारी सिद्धी आहे. ह्या माझ्या आठ निर्गुण सिद्धी आहेत.

उरलेल्या दहा सत्वगुणातून प्राप्त होणाऱ्या असल्यामुळे त्या गुण प्रधान आहेत. १.श्वेता नावाच्या सिद्धीने इंद्रियजन्य आवेग आवरता येतात. २. दूरश्रवण सिद्धीने ब्रम्हांडातील कोणतीही नादरूपवाणी ऐकू येते. ३. दूरदर्शन सिद्धीने दूरची वस्तू दिसते. ४. मनोजव सिद्धीने मनोवेगाने कुठेही जाता येते. ५. रूपसिद्धीने कोणतेही रूप धारण करता येते. ६. परकाया-प्रवेश या सिद्धीने दुसऱ्याच्या शरीरात प्रवेश करता येतो. ७. इच्छामरण या सिद्धीने कोणत्याही लोकात प्रवेश करता येतो. ८. सुरक्रीडा या सिद्धीने देवांगनांचा उपभोग घेत येतो. ९. संकल्प सिद्धीने सत्संकल्प फळास येतो. १०. आज्ञासिद्धीने अशा योग्याच्या आज्ञे बाहेर कोणीही जाऊ शकत नाही. या दहा सिध्दींखेरीज आणखी पांच सिद्धी आहेत. त्या अश्या १. त्रिकाळज्ञानसिद्धी. त्रिकाळाचे ज्ञान देणारी. २. अद्वंद्वसिद्धी. म्हणजे शीतोष्णादी द्वंद्वाचा त्रास न होणे. इत्यादी. ३. परचित्तज्ञभिज्ञता. म्हणजे दुसऱ्याचे मनोगत जाणणे. ४. प्रतिष्टंभ. विषादी अपायकारक पदार्थांचा देहावर परिणाम होत नाही. ५. अपराजितता. अपयशाचे भय असत नाही. उद्धवा अशा प्रकारच्या अनेक सिद्धी विविध प्रकारे माझे ध्यान करणाऱ्या, मनन करणाऱ्या, चिंतन करणाऱ्या सत्वगुणी सद्भाक्ताला प्राप्त होतात. पण "मला सिद्धी प्राप्त झाली" असे जेंव्हा माझा भक्त स्वत:ला माझ्यापासून वेगळा समजून सिद्धींचा अभिमानी होतो तेंव्हा त्याच सिद्धी अध्यात्ममार्गाच्या अडथळा होतात. म्हणून निष्काम भक्तीला विशेष महत्व आहे.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-अकरावा स्कंध

## पुष्प १९४ वे (अध्याय १६ व १७ पूर्ण)

## ईश्वराच्या विभूती व धर्म विवरण

उद्धवाने भगवंताला विनंती केली कीं "हे प्रभो! अज्ञानी लोकांना तुझे अखंडत्व समजत नाही. म्हणून ज्ञानी लोकांनी ज्या ज्या स्वरूपात तुझी उपासना करून जन्म सार्थक केला त्या विभूती मला सांग!"

भगवान श्रीकृष्ण म्हणाले, " उद्धवा! तत्त्वजिज्ञासेने मांडलेला तुझा हा प्रस्ताव तुझी अध्यात्मिक श्रेष्ठता सिद्ध करणारा आहे. त्यात देहाभिमान नाही. पूर्वी अर्जुनाने हाच प्रश्न स्वत:ला जेता समजून विचारला होता.त्यावेळी मी त्याची समजूत घालून त्याचे अज्ञान दूर केले होते. उद्धवा या चरचराचा स्वामी, आत्मा, उपकारक मित्र, नियंता असे सर्व मीच आहे. ध्वनी, वायू, प्रकाश, विद्युत्, प्रवृत्ती, मन, वेद, ओंकार हे सर्व मीच आहे. गरुड, मारुती, वायू, नारद इत्यादींचा वेग मीच आहे. इंद्र, अकरा रुद्रांमधला शिवशंकर, अष्टवसूंमधला अग्नी, बारा आदित्यातला विष्णू, ब्रम्हर्षितला भृगु, राजर्षितला मनू, देवर्षितला नारद, यज्ञोपयोगी कामधेनू, सिद्धश्रेष्ठातील कपिल, पक्षीश्रेष्ठातील गरुड, प्रजापतीमधला दक्ष, पितरांमधला आर्यमा, दैत्यांमधाला प्रल्हाद, नक्षत्रांचा व वनस्पतींचा जीवनदाता चंद्र, यक्षश्रेष्ठ कुबेर, गजेंद्रातला ऐरावत, वरुण, सूर्य, मनुष्यांमधला राजा, ह्या सर्व माझ्याच विभूती आहेत. उच्चै:श्रवा, सुवर्ण, यम, वासुकी, अनंतनाग, सिंह, चातुर्वर्ण्यातला प्रथमवर्ण, चारी आश्रमातला संन्यासाश्रम, गंगानदी, समुद्र, धनुष्य, मेरुपर्वत, हिमालय, पिंपळ, औषधींमधला यव, या सर्व माझ्याच विभूती आहेत. वायू, अग्नी, जल, सूर्य, व वाणी या सर्वांमधली शुद्धता मी आहे. थोडक्यात म्हणजे ज्या ज्या ठिकाणी जे जे श्रेष्ठत्व आहे ते ते सर्व मीच आहे. पंचमहाभूतांच्या तन्मात्रा, जीव, प्रकृती, गुण, अहंकार, महत्तत्त्व माझ्याच विभूती आहेत. तात्पर्य काय कीं माझ्या शिवाय कशालाच अस्तित्व नाही. उद्धवा! माझ्या विभूती अमर्याद आहेत. जे योगी सद्‌बुद्धीने वाणी, मन, जप,तप,कर्म, इत्यादी सर्व मला अर्पण करतात, युक्तीने अनन्यभक्ती करतात, माझ्यातच स्वत:ला व स्वकर्माला पहातात ते कृतकृत्य होतात.

उद्धव म्हणाला, " हे कमलनयना! अनन्यभक्ती हे धर्मलक्षण मला समजले. पण ही भक्ती उत्पन्न होण्यासाठी धर्माचरण कसे करावे हे पण सांग! कारण आताच्या परीस्थित धर्म जवळ जवळ लोप पावला आहे. त्यातून आपण पृथ्वी सोडून गेल्यावर धर्म कोण समजावून सांगणार?"

भगवान श्रीकृष्ण म्हणाले, "उद्धवा! ते खरे आहे. पण मी तुला थोडक्यात धर्म विवरण करून सांगतो. कल्पारंभी म्हणजे सत्ययुगात एकच वर्ण होता. त्यावेळी जन्मत:च सर्वजण कृतकृत्य असत म्हणून त्याला कृतयुग असे म्हणत. त्याकाळी फक्त एकच वेद होता. तप दया पावित्र्य व सत्य हे धर्माचे चार चरण निर्माण करून मी स्वत:च धर्मरूप बैलाचे रूप घेऊन वावरत होतो. त्रेतायुगात मी एक वेद तीन भागात विभागाला व ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद असे तीन वेद निर्माण केले. मग चार वर्ण प्रकट केले. ब्रम्हचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास हे चार आश्रम निर्माण केले. शम, दम, तप, पावित्र्य, संतोष, क्षमाशीलता, सरलता, दया, माझी भक्ती, सत्य हे ब्राम्हणाचे स्वाभाविक धर्म आहेत. तेज, बल, धैर्य, वीरता, सहनशीलता, औदार्य, उद्यमशिलता, ब्राम्हणभक्ती आणि ऐश्वर्य हे क्षत्रियाचे स्वाभाविक धर्म आहेत. आस्तिक्य, दानशूरत्व, अदंभ, ब्राम्हणसेवा, धनसंपादनात सातत्य व अधिकाधिकाची योजना हे वैश्याचे स्वाभाविक धर्म आहेत. गो-ब्राम्हण व देवतांच्या निष्कपट सेवेने जे प्राप्त होईल त्यांत संतुष्टता हा शूद्राचा स्वाभाविक धर्म आहे. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या सर्वांसाठी अहींसा, सत्य, शम, अक्रोध व सर्व प्राणीमात्रांच्या कल्याणा विषयी तत्परता हे सर्वसाधारण धर्म आहेत. ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य यांच्यासाठी गर्भाधानादी संस्कार विशेष आहेत. त्यांनी व्रतबंधानंतर ब्रम्हचर्य पालन करून गुरूगृही विद्यार्जन करावे. नंतर गुरुंच्या संमतीने समावर्तन संस्कार करावा. मग गृहस्थाश्रमात प्रवेश करावयाचा असल्यास आपल्यापेक्षा लहान व समवर्णाची अथवा खालच्या वर्णाची पण कुलीन कन्या पत्नी म्हणून स्वीकारावी. गृहस्थाश्रम स्वीकारल्यावर गृहस्थाने कधीही गृहासक्त होऊ नये. स्वधर्माचरणाने भगवद्भक्तीत रहावे. गृहस्थाश्रामातल्या आसक्तीने "मी व माझे " ही भावना बळावते व त्यामुळेच मनुष्य कर्मबंधात अडकतो.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

## ।।श्रीगुरु:शरणं।।

## श्रीमद्भागवत-अकरावा स्कंध

## पुष्प १९५ वे (अध्याय १८ व १९ पूर्ण)

## धर्म, ज्ञान, भक्ती, यम व नियम

उद्धवा! माझ्या प्राप्तीसाठी संन्यास ग्रहण करणाऱ्या प्रामाणिक व अव्यभिचारी विरक्त पुरुषांच्या संन्यास ग्रहणात स्त्री-पुत्रादीकांच्या माध्यमातून देव विघ्न आणतात हे लक्षात असू द्यावे. कारण देवांना ती स्वत:ची अवहेलना वाटते. आम्हाला डावलून हा परमपदाकडे चालल्याचे त्यांना जबरदस्त वैषम्य वाटते.

संन्याशाने दंड, कमंडलू खेरीज इतर संग्रह करू नये. "दृष्टिपूतं न्यसेत् पादं वस्त्रपूतं पिबेत् जलम् । सत्यपूतां वदेद् वाचं मन:पूतं समाचरेत् ॥१६॥" ( किडा मुंगी इत्यादी पाया खाली येऊ नये म्हणून पाऊल टाकताना पाहून टाकावे. पाणी पिताने ते वस्त्राने गाळून पवित्र पाणी प्यावे. बोलताना सत्य बोलावे. व सद्सद्विवेक बुद्धी जागी ठेवून मनाने पवित्र विचार स्वीकारून वागावे.) असे आचरण असावे. काम, क्रोध, स्पृहा, मोह, लोभ, मद, मत्सर, अहंकार, बल, दर्प, परिग्रह या सर्वांचा मनातून त्याग झालेला असावा. मौन, काम्यकर्माचा त्याग व प्राणायाम हे तीन दंड धारण करणारा त्रिदंडी संन्यासी असतो. नुसता बांबूचा दंड धारण करून संन्यासी होता येत नाही. संन्याशाने फक्त सात घरी भिक्षा मागावी. मग संतुष्टतेने गावा बाहेर जलाशयावर यावे. हात पाय धुवून मग अन्न प्रोक्षण करावे. नंतर शास्त्राप्रमाणे भिक्षेचे विभाग करून ज्याचे त्याला अर्पण करून मग उर्वरित भिक्षा आपण माझ्या चिंतनात मौनाने सेवन करावी. संन्याशाने नेहेमी एकट्याने फिरावे. आत्मचिंतनात तल्लीन होऊन सर्वत्र परमात्म दर्शन घेत राहावे. दृश्यजगत् माया आहे हे पक्के समजून घ्यावे व अनासक्त होऊन आत्मस्वरूपी लीन व्हावे. ज्ञाननिष्ठ व निरपेक्ष भक्तीने आश्रमांच्या चिन्हांचा त्याग करून विधी निषेध रहित होऊन स्वच्छंद विहार करीत माझे चिंतन करावे. वाद विवाद करू नयेत. पाखंड माजवू नये. कुतर्क करू नयेत. कोणालाही आपला त्रास होणार नाही असे वर्तन करावे. मानापानादी द्वंद्वात सांपडू नये. अपमान सहन करावेत. देह प्रारब्धाधीन आहे अशी दृढ धारणा करावी. यदृच्छेने मिळेल त्यात समाधान मानावे. ज्ञान व वैराग्य नसताना केवळ उदर भरणासाठी संन्यास घेणारा इह-पर दोन्ही लोकांना मुकतो हे लक्षात ठेवावे. भगवान श्रीकृष्ण पुढे म्हणाले, " उद्धवा! नुसत्या तर्कानुमानावर अवलंबून न राहाता उपनिषदादी ज्ञानानुसार आत्मसाक्षात्कार करून घ्यावा. म्हणजे मग विश्व ही माझी माया आहे हे समजते व ज्ञानासह सर्व कर्म मला अर्पण करता येते. अशा ज्ञानी भक्ताला

माझ्याशिवाय दुसरे काही दिसत नाही. ज्ञानप्राप्तीने जे काम होते ते जप, दान, तप, तीर्थयात्रा इत्यादींनी होत नाही. उद्धवा याचे कारण असे आहे कीं जे पूर्वी नव्हते, आजही नाही व उद्याही असणार नाही अशा स्वत:चे समजणाऱ्या शरीराशी तुझा काय संबंध आहे? अरे देव, इंद्रिये, देवता, यांचा समुदाय असलेले हे शरीर ही केवळ माझी माया आहे. "हे ऐकून उध्दव म्हणाला, "प्रभो आपण मला आपल्या अमृतमय वाणीने कृपया भक्तियोग समजावून सांगा!" भगवान श्रीकृष्ण म्हणाले, "उद्धवा पूर्वी युध्द संपल्यानंतर युधिष्ठिर आप्त स्वकीयांच्या वधामुळे शोकाकुल झाला होता. तेंव्हा त्याने शरपंजरी पडलेल्या भीष्मांना हाच प्रश्न विचारला होता. त्यावेळी भीष्मांनी जे सांगितले होते तेच मी तुला अत्ता सांगतो. ते साधन ज्ञान, विज्ञान, वैराग्य, श्रद्धा व भक्ती यांनी परिपूर्ण आहे. उद्धवा ज्या ज्ञानाने प्रकृती-पुरुष, महत्तत्त्व, अहंकार, पंचतन्मात्रा, पंचज्ञानेंद्रिये, पंचकर्मेंद्रिये, पंचमहाभूते, तीन गुण व मन अशा अठ्ठावीस तत्त्वात एकच परमतत्त्व व्यापून आहे. तेच सर्वांमध्ये व्यापलेले असून कार्यरतही आहे. हे जाणणे म्हणजेच मला जाणणे होय! आणि जेंव्हा हीच अठ्ठावीस तत्त्वे (म्हणजेच कार्यप्रवृत्ती) मनांत येऊ न देता  मला अनुभवणे म्हणजेच साक्षात्कार होणे. आदी व अंती अनुक्रमे कार्यान्वित होऊन जे उरते ते सत्. वेद, प्रत्यक्षानुभूती, महावाक्ये व अनुमान या चार प्रमाणांनी दृश्य प्रपंचाचे अस्तित्व, नश्वरत्व व मित्थ्यत्व सिद्ध होते. म्हणून विवेकी मनुष्य भेदबुद्धीचा त्याग करतो. असो!

उद्धवा! भक्तीयोगाचे स्वरूप मी तुला पूर्वी सांगितले आहे. तरी पण  त्या  श्रेष्ठ साधनाचे श्रेष्ठत्व पुन्हां एकदा ऐक! सर्वात महत्वाचे म्हणजे माझ्या अमृतमय कथा पूर्ण श्रद्धेने श्रवण कराव्यात. त्याचे मनन करावे. माझ्या गुणांचे व नामांचे संकीर्तन करीत रहावे. निष्ठेने पूजन करावे. सर्वत्र मला पहाण्यास शिकावे. आपले मन मला अर्पण करावे. सर्व कामना सोडून द्याव्या! विविध स्तोत्रांनी माझी स्तुती करावी. उद्धवा ज्यामुळे माझी भक्ती उत्पन्न होते त्याला तूं धर्म समज. ब्रम्ह व आत्मा यांचे ऐक्य अनुभवणे म्हणजे ज्ञान. विषयाभिलाषेपासून अलिप्त रहाणे हे वैराग्य. यम नियमांचे पालन हे महत्वाचे आहे. उध्दव म्हणाला, " प्रभो! यम म्हणजे काय? नियम म्हणजे काय? शम, दम, तितिक्षा, धैर्य, दान, तप, शौर्य, सत्य, ऋत, त्याग, कल्याणमय धन, भाग्य, व लाभ म्हणजे काय? विद्या, लज्जा, श्रेष्ठत्व, सुख-दु:ख, हे नक्की काय आहे? पंडित कोण? मूर्ख कोण? सन्मार्ग व कुमार्ग म्हणजे काय? स्वर्ग व नरक म्हणजे काय? बंधू कोण? घर म्हणजे काय? धनवान कोणाला म्हणावे? निर्धन कोण? ईश्वर कोणाला म्हणतात? हे सर्व मला समजून सांगा!" भगवान म्हणाले, " १.अहिंसा, २.सत्य, ३.प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष चोरी न करणे, ४.  अनासक्ती, ५.मर्यादा पालन, ६.भोग्यवस्तूंचा संग्रह न करणे, ७.श्रेष्ठांच्या शब्दावर विश्वास ठेवणे, ८.ब्रम्हचर्य, ९.अतत्वार्थी मौन, १०.चित्ताची स्थिरता, ११.अनाक्रोष क्षमा, १२.सर्वांना अभय." हे बारा यम आहेत. तसेच १.शरीरशुद्धी, २.चित्त व मन शुद्धी, ३.जप, ४.तप, ५.आश्रमविहित हवन, ६.धर्मादर. ७.आतिथ्य, ८.भगवद्पूजन, ९.तीर्थयात्रा, १०.आत्मज्ञानाचा प्रयत्न, ११. संतुष्टता, १२.गुरुसेवा. हे बारा नियम आहेत. 'शम' म्हणजे

ईश्वरनिष्ठा. ‘दम' म्हणजे इंद्रिय निग्रह. 'तितिक्षा' म्हणजे अनाक्रोष सहनशीलता. 'धैर्य' म्हणजे जिंव्हा व जननेन्द्रीय जिंकणे. 'दान'म्हणजे सर्वांना अभय देणे. 'तप' म्हणजे कामना त्याग. 'शौर्य' म्हणजे वासनांवर विजय. 'ऋत'म्हणजे मधुर पण सत्य भाषण. 'पावित्र्य' म्हणजे कार्मासक्तीचा त्याग. 'संन्यास' म्हणजे सर्वस्वाचा त्याग. धर्म हेच 'धन'. परमेश्वर हाच 'यज्ञ'. आत्मज्ञानोपदेश हीच 'दक्षिणा'. प्राणायाम हेच श्रेष्ठ 'बल'. ईश्वराचे ऐश्वर्य हेच 'भग'. ईश्वरभक्ती हाच 'लाभ'. आत्मज्ञान ही खरी 'विद्या'. पाप करण्याची घृणा ही 'लज्जा'. सुख-दु:खाच्या पलीकडे जाणे हे खरे 'सुख'. विषयांची कामना हे 'दु:ख'. बंध व मोक्षाचे तत्त्व जाणणे हे 'पांडित्य'. देहाला मी समजणारा तो 'मूर्ख'. माझी प्राप्ती करून देणारा तो खरा 'मार्ग'. चित्ताची बहिर्मुखता हा 'कुमार्ग'. सत्वगुणाची वृद्धी हा 'स्वर्ग'. तमोगुणाची वृद्धी हा 'नरक'. गुरु हा खरा 'बंधू'. शरीर हेच 'घर'. गुणसंपन्न तो 'धनवान'. असंतुष्ट तो 'दरिद्री' (निर्धन). चित्तवृत्ती विषयासक्त नसलेला तो 'ईश्वर'. उद्धवा! गुणदोषांची असंख्य लक्षणे आहेत. पण सारांश इतकाच कीं इतरांचे गुण-दोष पहाणे हाच सर्वात मोठा दोष आहे. आणि गुणदोष न पाहता ईश्वराच्या स्मरणात समतेने वागणे हाच मोठा गुण आहे.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-अकरावा स्कंध

## पुष्प १९६ वे (अध्याय २० व २१ पूर्ण)

## कर्म-ज्ञान व भक्ती योग

उद्धव म्हणाला, " प्रभो! अभेदाने आत्मस्वरूप जाणायचे खरे! पण वेदांनीच गुण-दोष रूप भेद करून विधी-निषेध प्रतिपादन केले आहेत. ते भेदबुद्धी शिवाय पाळणे कसे शक्य आहे? शिवाय वेदांनीच भेदबुद्धीचा निषेधही केलेला आहे. त्यामुळे माझा गोंधळच झाला आहे. तो कृपया दूर करा!" भगवान म्हणाले, " उद्धवा! मी स्वत:च ज्ञान, कर्म व भक्ती योगाचा उपदेश केलेला आहे. या व्यतिरिक्त दुसरा कोणता उपायही नाही. कर्म करून कर्मासह फलत्यागी हे ज्ञानाचे अधिकारी होतात. पण सर्वांनाच ते जमत नाही. कारण त्यांची फलासक्ती नष्ट झालेली नसते. अशा आसक्तांसाठी विधी निषेधात्मक कर्मयोग आवश्यक आहे. म्हणून कर्ममार्गाचे भेदात्मक वर्णन वेदांनी प्रतिपादन केले आहे. आसक्तही नाही व विरक्तही नाही अशांच्यासाठी भक्तियोगचे प्रतिपादन आहे. भक्तीयोगात माझ्या स्मरणात कर्म करून ती कर्मे मला अर्पण करण्याने हळू हळू वैराग्य प्राप्त होते. अहं-ममतेमुळे प्रमाद घडतात. उद्धवा! इतर देह भक्तियोगा साठी अनुपयुक्त आहेत. नरदेह त्यासाठी मोठे घबाड आहे. पण भक्ती व आत्मानात्म विवेक यांच्या खेरीज ते घबाड हाती लागत नाही. स्वर्ग व नर्क या ठिकाणचे देह हे भोगदेह आहेत. नरदेहातच फक्त निषिद्ध कर्मत्याग व कर्मफळत्याग यांनी विरक्ती प्राप्त होते. त्यामुळे मन स्थिर होते. कर्म केल्याशिवाय त्याग कसला करायचा हेच समजत नाही. शिवाय नियत कर्म केल्याशिवाय उपजीविका नीट होऊ शकत नाही. कारण कर्म केल्यावर त्याचे फळ हे मिळतच असते. त्यामुळेच जीवन सुखी होते व त्याग कसला करावयाचा हे समजते. मनाचे भाव जाणून कर्माने काही प्रमाणात ते सुखावून मन ताब्यात घेण्याला कर्मयोग म्हटले आहे. मन भगवंताच्या ठिकाणी स्थिर झाले म्हणजे कर्मयोग साधला असे समजावे. व्यवहारभेद निर्दोष पाळता यावा म्हणून तर वेदांनी विधी निषेध प्रतिपादन करून यम-नियम सांगितले आहेत. माझ्या निष्काम भजनामुळे मी साधकाच्या हृदयात प्रवेश करून हळू हळू त्याला विरक्त करतो. तेंव्हा त्याचे अज्ञान दूर होऊन कर्म वासना क्षीण होतात. व ते मला प्राप्त होतात. त्यामुळे उध्दवा तूं गुणदोषांची व्यवस्था समजून घे! धर्मनिष्ठा हा गुण आहे. धर्मविरोधी वर्तन हा दोष आहे. तसेच पदार्थांची योग्यायोग्यता ठरवण्यासाठी पदार्थांच्या गुणदोषांचे प्रतिपादन आवश्यक आहे. त्यामुळे निर्माण झालेला भेद व्यवहारासाठी आवश्यक आहे. भूमी जरी एकच असली तरी स्थान भेदाने ती पवित्र वा अपवित्र मानली जाते. स्त्रीसंग हा यतींच्या साठी जरी दोष असला तरी विधीपूर्वक आचरण करणाऱ्या गृहस्थांसाठी तो गुण आहे. पदार्थांपासून मिळणाऱ्या नश्वर

विषयांपासून निवृत्ती साधण्यासाठी धर्म आहे. विषयांची आसक्ती ही पदार्थ प्राप्तीची इच्छा उत्पन्न करते. मग त्या प्राप्तीत ज्या गोष्टींनी बाधा निर्माण होते त्या गोष्टींचा कलहात्मक द्वेष निर्माण होतो. मग कार्याकार्याची शास्त्रसंमत विचारशक्ती लोप पावते. त्यामुळे अध:पतन होते. ते टाळण्यासाठी वेदांनी फलश्रुती प्रतिपादन केलेली आहे. फ़लश्रुतिच्या लालचेने केलेले कर्मसुध्दा मला आवडते. कारण कर्माचरणाचा मनुष्याला स्वभावत:च कंटाळा असतो. मांसाहाराच्या हिंसक वृत्तीला आळा बसावा म्हणून मी यज्ञाची योजना करून दिली. पण वेदवाणीचा तो अभिप्राय मनावर न घेता स्वत:च्या इच्छातृप्तीसाठी यज्ञाची योजना होऊ लागली. उद्धवा! श्रुतीत्रयांचा अभ्यास करून यज्ञद्वारा स्वर्गभोगाची इच्छा करणाऱ्यांना माझ्या विषयी काहींच आस्था नसते. वेदांना शब्दब्रम्ह म्हणतात. ते परा, पश्यंती, मध्यमा या वाणींच्या रूपात प्राण, मन आणि इंद्रियमय असून अथांग व गूढ आहेत. ह्याच तीन वाणी, 'घोष, ध्वनी व नाद' यांच्या रूपाने विविध वर्णात मी वैखरी वाणी प्रकट करीत असतो. वैखरी वाणी प्रथम ओंकाराच्या रूपाने "घोष, ध्वनी व नाद" यांनी प्रकट झाली. मग छंदमय झाली. मग भाषामय झाली. अनेक छंद व अनेक भाषांनी समृध्द झाली. अशी ही अनंत व अनाकलनीय व सर्वव्यापी वेदवाणी आहे. वेदवाणीनेच कर्म, ज्ञान व भक्ती प्रतिपादन केली आहे. वेदवाणी अप्रत्यक्ष रीतीने माझेच अस्तित्व सांगत असल्यामुळे वेदांचे मनोगत माझ्या शिवाय कोणीही जाणू शकत नाही. वेद प्रथम माझ्या मायेने निर्माण झालेल्या विश्वाला गृहीत धरून ब्रम्ह व आत्मा यांचे प्रतिपादन करीत असतात. हेच वेदांचे सार आहे.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-अकरावा स्कंध

## पुष्प १९७ वे (अध्याय २२ व २३ पूर्ण)

## श्रीकृष्ण बोध व भिक्षुगीता

उध्दव म्हणाला, "प्रभो! आपण नऊ, अकरा, पांच, तीन अशी अठ्ठावीस तत्त्वे सांगितलीत. (संदर्भ: पुष्प १९४) पण काही ऋषी २६, काही २५, ७, किंवा ४, ९, १७, १३, इतकी सांगतात. तर या गोंधळात टाकणाऱ्या विविधतेचे कारण काय?"

भगवान म्हणाले, "उद्धवा, माझ्या मायेच्या आधारे सगळेच खरे आहे व सगळेच मिथ्याही आहे. हा वाद अव्याहत चालूच राहणार. कारण गुणभेदाने उभा राहिलेला हा प्रपंच मायामय व मिथ्या आहे. शिवाय सगळी तत्त्वे एकमेकात मिसळणारी आहेत. त्यामुळे खरे खोटे काय व कसे करणार? कारण प्रत्येक ऋषी सांगताना वेदाधारे सुसंगत प्रतिपादन करीत असतो. जसे सव्वीस तत्त्वे सांगणारा त्रिगुणांना स्वतंत्र न मानता त्यांचा अंतर्भाव प्रकृतीत करतो. मग प्रकृतीची २४ तत्त्वे व 'ईश्वर आणि जीव' अशी सव्वीस तत्त्वे प्रतिपादन करतो. तर जीवाशिवाचा अभेद मानणारा २५ तत्त्वे प्रतिपादन करतो. सतरा तत्त्वांचे विवरण करणारा, पंचमहाभूते, पंचकर्मेंद्रिये, पंचज्ञानेंद्रिये, मन व आत्मा असे प्रतिपादन करतो. सोळा तत्त्वे प्रतिपादन करणारे पंचमहाभूते, पंचसूक्ष्मभूते, पंच इंद्रिये व सोळावे मन. अशा अनेक प्रकारे खंडन व मंडन करता येते. हे सर्व मायामय असल्यामुळे अयोग्य असे काहीच असत नाही."

तेंव्हा उध्दव म्हणाला, " हे भगवंता, पुरुष व प्रकृती ही दोन्ही स्वरूपाने भिन्न असली तरी एकमेकांच्या आश्रयाने राहणारी असल्यामुळे त्यांचे भेदमय वा अभेदमय स्वरूप आपण मला समजावून सांगा!" भगवान म्हणाले, " प्रकृती व पुरुष यांच्या स्वरूपात फार मोठा भेद आहे. प्रकृती त्रिगुणी असल्यामुळे तिच्यात उत्पत्ती, स्थिती व लय हे विकार आहेत. प्रकृतीच्या गुणक्षोभाने जीवांत भेदबुद्धी उत्पन्न होते. व प्रकृती त्या जीवासाठी त्रिविध ताप निर्माण करते. या त्रिविध तापांच्या विकारातूनच पांच विषयांची निर्मिती होते. आणि या त्रिविध तापांच्या निर्मितीला जरी प्रकृती कारण असली तरी आदीकारण हा आत्मा म्हणजेच पुरुष साक्षी असतो. आत्मा पूर्ण ज्ञानस्वरूप असून प्रकृतीच्या त्रिगुणी अहंकारामुळे

स्वरूपाचा विसर पडून जिवाला भ्रांती उत्पन्न होते कीं मी आहे किंवा नाही! त्यामुळेच आत्मस्वरूपापासून च्युत झालेल्या लोकांच्या बुद्धीतून हा वाद नाहीसा होत नाही." उध्दव म्हणाला, " बहुतेकांना आत्मज्ञान नसते. व जीव जन्म मृत्युच्या फेऱ्यात सांपडतो असे म्हणतात ते कसे?" भगवान श्रीकृष्ण म्हणाले, " मानवी मन हे कर्मसंस्काराचा समूह आहे. त्या कर्म संस्कारानुसार ते जन्म मृत्यू भोगते. इंद्रीयाधीनतेने हे घडत असते. म्हणून तूं इंद्रीयाधीन होऊ नकोस. जन्म-मृत्युच्या बंधनातून सुटण्याची इच्छा करणाऱ्याने हे ध्यानात ठेवूनच व्यवहार करावा. त्या व्यवहारात अज्ञानी माणसाने तिरस्कार केला, अपमान केला, मारले, बंधनात टाकले किंवा चरितार्थाचे साधन हिसकावून घेतले, अंगावर थुंकले, मुतले, असे काहीही केले तरी आपण आत्मचिंतनात स्थिर राहून स्वत:चा उद्धार करून घ्यावा." हे ऐकून उद्धव म्हणाला, "हे प्रभो! मायाबळ अनावर असल्यामुळे व्यवहारकुशल पण अज्ञानी लोकांनी केलेला असा अमर्याद छळ शांत राहून कसा सहन करावा हे मला सांगा!"

भगवान श्रीकृष्ण सांगू लागले, “उद्धवा! तसा छळ सहन करणे कठीण आहे हे खरे आहे. पण या संबंधात सामर्थ्य देणारी एक भिक्षुगीता ऐक. पूर्वी अवंती नगरात एक अत्यंत कंजूष पण धनाढ्य ब्राम्हण रहात होता. तो स्वत:च्या बायका मुलांनाही कंजुषपणामुळे अप्रिय झाला होता. धर्मकर्म न करण्यामुळे इहलोकीच्या पांचही देवता त्याच्यावर रुष्ट झाल्या. त्यायोगे त्याचे काही धन त्याच्या भाऊबंदांनी, पत्नी-मुलांनी व नोकर चाकरांनी पळवले. काही धन राजाने कराच्या रूपाने वसूल केले. काही चोरी गेले. अशाप्रकारे त्याच्या सर्व धनाची विल्हेवाट लागली आणि तो पूर्ण निर्धन झाला. तेंव्हा तो विचार करू लागला कीं मी इतक्या कष्टाने मिळवलेले धन धर्म साधन न केल्यामुळेच नष्ट झाले आहे. मी स्वत: कधी त्या धनाचा उपभोग घेतला नाही कीं इतरांनाही घेऊ दिला नाही. या कृपणतेचे हे फळ आहे. ह्या कृपणतेमुळे मला जिवंतपणीही सुख नाही व मेल्यावर नरकप्राप्ती तर ठरलेलीच! संपत्ती मिळवतानाही कष्ट आणि आता गेल्यावर गेल्याचे कष्ट. तारुण्यात मी भरपूर कष्ट करून धन मिळवले खरे पण धर्माचरण न केल्यामुळे ते व्यर्थ झाले आहे. आतां वृध्दापकाळात मी धर्महीन व बलहीन झालो आहे. मृत्यूतर मला टाळता येणार नाही. पण वैराग्य धारण करून मी अधोगती तर नक्कीच टाळू शकतो. कादाचित् भगवंताने त्या साठीच माझ्यावर ही निर्धनता आणली असावी. तसे असेल तर भगवंताने माझ्यावर हा फार मोठा अनुग्रहच केला असे म्हणावे लागेल. आता उर्वरित आयुष्य मी हरिनामात निष्काम भक्तीने चित्तशुद्धी साठी वेचीन. त्यासाठी भगवंताने मजवर कृपा करावी. अहो! खट्वांगाने केवळ ईशकृपेने एका घटकेत ब्रम्हलोक प्राप्त करून घेतला होता. उद्धवा! मनाशी असा विचार करून त्या ब्राम्हणाने सर्वसंग परित्याग करून भिक्षु होऊन देह प्रारब्धावर सोडून दिला. तो सदैव माझ्या भजनात राहू लागला. कोणाच्या लक्षात येणार नाही अशा बेताने एकाकी वृत्तीने गावात भिक्षा मागण्यास येऊ लागला. पण काही दुष्ट लोक त्याला विपरीत त्रास देऊ लागले. विविध प्रकारे त्याचा तिरस्कार करून त्याचा दंड कमंडलू पळवून नेत. व परत दिल्या सारखे करून हिसकून घेत. नदीकाठी भिक्षा सेवनास बसला कीं डोक्यावर मुतत. छडीने बडवून काढीत. त्याच्या अंगावर थुंकत. तो काहीच बोलत नसे. म्हणून अद्वातद्वा बोलून त्याचा पाणउतारा करीत. ते सर्व सहन करून तो न बोलता शांत रहात असे. पण लोकांना तेही सहन होत नसे. ते त्याला ताडन करीत दोराने बांधून पशूवत् ओढीत आणि म्हणत अहो हा पक्का चोर आहे. बायकोने व मुलांनी हाकलून दिल्यामुळे हा मौन धारण करून

संधीची वाट पाहात आहे. हे त्याचे बकध्यान आहे. इत्यादी बोलून त्याच्यावर अपान वायू सोडीत. पण तसला सर्व असह्य ताप सहन करून तो भिक्षु पराकाष्ठेचा शांत राहिला. त्याचे सात्विक धैर्य पराकोटीला पोहोचले. त्यावेळी मनाशी विचार करताना तो एक गीत गाऊ लागला. तेच हे भिक्षुगीत! तो सत्वशील भिक्षू म्हणू लागला,

"जीवाच्या सुख-दु:खाचे कारण हे लोक, देवता, शरीर, पूर्वसंचित, काल इत्यादी काहीही नसून सुख-दु:खात्मक जन्ममरणाचे चक्र फिरवण्यास मनच कारण आहे. अतिबलवान मनांत भोगेच्छा अनावर झाल्या कीं विषय सत्य वाटू लागतात. त्रिगुणात्मक व्यवहार मनाखेरीज उद्भवत नाही. आत्मा स्वयंप्रकाशी, ज्ञानमय व अकर्ता असला तरी मन आपलेच मानून जीवदशेचा सखा बनून साक्षीरूपाने रहातो हे ही खरेच आहे. कारण विषय सेवनाचे ज्ञान मनाला आत्म्याशिवाय होऊच शकत नाही. मनोनिग्रहा साठीच नित्य-नैमित्तिक कर्म, दान-धर्म इत्यादी  सर्व काही आहे हे नक्की! पण निग्रहाने शांत झालेल्या मनाला त्याचा काहीच उपयोग नाही. व ज्याचे मन विषयातच गुंतले आहे त्यालाही त्याचा काही उपयोग नाही. आपले मन हे दुसऱ्याच्या स्वाधीन कधीच नसते. मनोदेव अंकित झालेला मनुष्य देवांचाही देव होतो. हा "मी" व हा "दुसरा" असा भेद बाळगणारे अज्ञानी जीव भवसागरात गटांगळ्या खात रहातात. माझ्या दु:खाला दुसरे लोक कारणीभूत आहेत असे म्हणावे तर आत्म्याचा विचारच संभवत नाही. कारण कर्तृत्व-भोक्तृत्व हे देहाचे विकार आहेत व देह हा भूमीचा विकार आहे. म्हणजे आपल्याच दातांनी जीभ चावली तर रागवायचे कुणावर? देवतांमुळे दु:ख होते म्हटले तरी आत्म्याशी संबंध रहात नाही. आणि विकार तर देहाचे आहेत मग स्वत:च्या देहावर काय रागावणार? आणि आत्मा काही सुख-दु:खाचे कारण होऊ शकत नाही, कारण आत्म्याशिवाय दुसरी वस्तूच जर अस्तित्वात नाही तर सुखही नाही आणि दु:खही नाही. ग्रहामुळे दु:ख होते म्हणावे तर ग्रहपीडा ही जन्म असलेल्या देहाला होईल आत्म्याला नाही कारण आत्मा अजन्मा आहे. म्हणजे ग्रहाशीही काही संबंध जोडता येत नाही. कर्मामुळे सुख-दु:खाचा उद्भव होतो म्हणावे तर कर्म जडदेहाच्या मागे लागलेले आहे. म्हणजे चिद्रूप आत्म्याचा त्याच्याशी काही संबंध नाही. काळामुळे दु:ख प्राप्त होते म्हणावे तर काल स्वत:च ब्रम्ह आहे. तो कुणालाच सुख-दु:ख देत नाही! कारण बर्फाने बर्फाला थंडी वाजत नाही किंवा अग्नी अग्नीला ताप करू शकत नाही. म्हणजेच कालाच्या ठिकाणी द्वंद्व संभवत नाही. मग रागावणार तरी कुणावर? थोडक्यात म्हणजे लोक, देव-देवता, आत्मा, ग्रह, कर्म अथवा काल यांच्या पैकी कोणीही सुख-दु:खाला कारण नसून मनच कारण आहे. पूर्वीच्या आत्मज्ञानी सत्पुरुषांनी निष्काम भक्तियोगाने परमेश्वराला शरण जाऊन भवसागर पार करण्याचा मार्ग आचरून दाखवला आहे. त्याच मार्गाने जाऊन मीही हा भवसागर निष्काम भक्तीने तरुन जाईन." असे म्हणून तो भिक्षू विवेक वैराग्य धारण करून भगवद्भजनात पृथ्वी पर्यटन करू लागला.

उद्धवा ! त्या भिक्षूने सगळा छळ सोसून ही गीता गाईली आहे. त्यामुळे मनुष्याला सुखदु:ख देणारा त्याच्या मनाशिवाय कोणीच असू शकत नाही. संसार तर मुळातच नासका आहे. शत्रू, मित्र, आप्त, स्वकीय, नोकर, चाकर, धन, धान्य इत्यादी जडवस्तू हे सर्व नाशवंतच नाही कां? त्यामुळे ते दु:खाला कारण

नसतातच. म्हणून उद्धवा, तूं मन व बुद्धी माझ्या ठिकाणी स्थिर करून हाच योग आचरणात आण. हीच गीता श्रवण, पठन, मनन करून जो स्वत: आचरणात आणून इतरांना सांगतो ते सुध्दा द्वंद्व मुक्त होतात.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

॥श्रीगुरु:शरणं॥

श्रीमद्भागवत-अकरावा स्कंध

पुष्प १९८ वे (अध्याय २४ व २५ पूर्ण)

## सांख्यशास्त्र, गुणकार्ये व आहार शुद्धी

उद्धवा! सांख्यशास्त्र समजून घेतल्याने सुखदु:खादी विकल्प नाहीसे होतात. सृष्टीच्या उत्पत्तीपूर्वी दृश्य, द्रष्टा असे काहीच नव्हते. त्यामुळे विकल्प असण्याचे काही कारण नव्हते. कृतयुगात सर्वजण आत्मानात्म विवेकाने परिपूर्ण असल्यामुळे भेददृष्टी नव्हती. त्रेतायुगाच्या सुरुवातीस भेददृष्टी निर्माण झाली. व पुरुष व प्रकृती यांची क्रीडा सुरु झाली. प्रकृती कार्य व कारण अशी दोन रूपे धारण करते. पुरुष नेहमीच ज्ञान व चैतन्य यांच्या रूपाने साक्षित्वाने असतो. त्रिगुण हे प्रकृतीचे कार्य आहे. अत्यंत सूक्ष्म असा वैकारिक, तैजस व तामस अहंकार उत्पन्न होणे हा पुरुषाच्या ज्ञानशक्तीच्या संयोगाचा परिणाम आहे. वैकारिक अहंकारापासून विराटपुरुषाची दहा इंद्रिये व मन उत्पन्न झाले. व त्या इंद्रियांच्या अकरा देवता उत्पन्न झाल्या. मग तैजस अहंकारापासून पांच ज्ञानेन्द्रीये व पांच कर्मेंद्रिये उत्पन्न झाली. तामस अहंकारापासून पंचमहाभूते व शब्दादी विषय हे तन्मात्ररुपी जडत्व उत्पन्न झाले. मग ह्या सर्वांना मी अंड्यातल्या जळात बंदिस्त केले. ते अंडे म्हणजेच ब्रम्हांड. त्या जळात मी विराटरूपाने प्रकट झालो. माझ्या नाभीपासून मी तमोगुणी विश्वरचनाघर कमळ उत्पन्न केले. त्या कमलात रजोगुणी ब्रम्हा उत्पन्न केला. माझ्या प्रेरणेने कार्यान्वित होऊन ब्रम्हदेवाने स्वर्लोक, भुवर्लोक व भूलोक अशी त्रिभुवने निर्माण केली. मग त्यांच्या देवतांची निर्मिती केली. स्वर्कोकी देवता राहतात. भुवर्लोकात भुते रहातात. भूलोकी मर्त्य मानव रहातात. भूलोकाच्या अधोभागी वितल, अतल, सुतल, तलातल, महातल, रसातळ व सर्वात खाली पाताळ अशी सात पाताळे आहेत. आणि भूलोकाच्या वर भू:लोक, भुव:लोक, स्व:लोक, मह:लोक, जन:लोक, तप:लोक व सर्वात वर सत्यलोक असे उत्तरोत्तर श्रेष्ठ असलेले सप्तलोक आहेत. असे हे चवदाभुवनांचे विश्व मीच कालरूपाने निर्माण केले आहे. व विशिष्ट कर्माने त्यांची प्राप्तीही निश्चित केलेली आहे. ब्रम्हदेव निमित्तमात्र आहे. विश्वातल्या सर्व गोष्टी सूक्ष्मापासून ते जडापर्यंत प्रकृती-पुरुष यांच्या संयोगाने उत्पन्न होतात. भेदबुद्धीचा व्यवहार प्रकृतीच्या विकाराने सुरु होतो. पुरुष हा त्या व्यवहाराचा साक्षीरूप आधार असतो. प्रकृती-पुरुष यांचा आधार असणारे सत्य मी असतो. माझी कृपा म्हणजेच ईक्षण असे पर्यंतच सृष्टीचे व्यवहार चालू रहातात. उत्पत्ती, स्थिती व लय घडवणारा विराटपुरुष मीच आहे. ज्यावेळी मी लय करतो त्यावेळी

यच्चयावत् विश्व अव्यक्त काळात विलीन होते. व काल, विराटपुरुष ईश्वरात विलीन होतो. विराटरुपी पुरुष (म्हणजेच ईश्वर) निर्गुण परब्रम्हात विलीन होतो. उद्धवा! माझ्या अखंड भक्तीने व अभेदमय चिंतनाने सगळे संशय नष्ट होऊन जिवाला ह्या प्रकारचे सांख्यदर्शन घडते. म्हणजे तो जीव माझ्यात स्थिरावतो. उध्दवा! माझी अखंड भक्ती प्राप्त होण्यासाठी प्रवृत्ती सात्विक असावी लागते. त्यासाठी सात्विक प्रवृत्तीच्या भक्ताची लक्षणे ऐक! शम (मन:संयम), दम (म्हणजे इंद्रिय निग्रह), तितिक्षा (म्हणजे अनाक्रोष क्षमा), आत्मानात्म विवेक, तपाचरण, सख्यभक्ती, दया, माझे स्मरण, संतोष, औदार्य, निस्पृहता, आस्तिक्य, शिष्टसंमत सभ्यता, ऱ्ही (पापाची लाज), आत्मस्तुतीचा कंटाळा, आत्मसंतुष्टता, एकांताची आवड, ही सर्व सात्विक प्रवृत्तीची लक्षणे आहेत. या खेरीज रजोगुणी व तमोगुणी प्रवृत्तीही असतातच. या तीन गुणाचे कमी अधिक प्रमाणात मिश्रण होऊन अनेकविध प्रवृत्ती निर्माण होतात. 'मी व माझे' ही बुद्धी सामान्यत: प्रत्येकच जीवात असते. ह्या ममत्वबुद्धीच्या जोरावर सगळे लौकिक व्यवहार चालू असतात. सत्व, रज, तम हे प्रकृतीचे गुण आहेत. माझे नाहीत. सत्वगुणाने ज्ञानप्राप्ती होते. रजोगुणाने विषयासक्ती व तमोगुणाने मोहादी अज्ञान प्राप्त होते. सत्वगुणात जागृती, रजोगुणात स्वप्नावस्था व तमोगुणात गाढनिद्रा असते. त्यामुळे आत्मतत्त्व 'तुरीय' अवस्थेत मानले जाते. सत्वगुणातल्या देहपाताने श्रेष्ठलोक, रजोगुणातल्या देहपाताने भूलोक व तमोगुणातल्या देहपाताने अधोगती प्राप्त होते. व निर्गुण अवस्थेत देहपात झाल्यास माझी प्राप्ती होते. नि:संग धर्म-कर्म सात्विक, फळासक्त धर्म-कर्म राजस व स्वैराचारी कर्म तामस असते. श्रद्धाही अशाच भिन्न भिन्न स्वरूपाच्या असतात. माझ्या ठिकाणी निष्काम बुद्धी ठेवणे म्हणजे निर्गुण श्रद्धा. विविधप्रकारचे आहारही तसेंच आहेत. शरीराला हितकर, पोषक, स्वछ, ताजे, पवित्र व सहजतेने प्राप्त होणारे अन्न म्हणजे सात्विक आहार. जिव्हालौल्यासाठी प्रयासपूर्वक मिळवलेले अन्न म्हणजे राजस आहार व आरोग्यास बाधक तो तामस आहार. ईश्वरार्पण भावनेने सेवन केलेले अन्न निर्गुण होय. सुखाचेही तसेंच प्रकार आहेत. आत्मचिंतनात मिळणारे सुख सात्विक,पंचविषयांपासून मिळणारे सुख राजस व मोहाने मिळवलेले सुख म्हणजे तामस. माझ्या भक्तीत केलेले माझे चिंतन हे निर्गुणसुख असते. प्रकृती-पुरुष यांच्या अधिष्ठानावर विद्यमान होणारी दृश्ये त्रिगुणापासून उत्पन्न होणारी असतात. ती कधीच स्थिर नसतात म्हणून त्यांना भास म्हणतात. ती स्वप्नावस्था! कारण स्वप्न जसे जागे झाल्यावर संपते तसेच आत्मज्ञान झाल्यावर दिसणारे, ऐकूयेणारे व बुद्धीने ग्रहण होणारे मिथ्या असल्याची जाणीव उत्पन्न होऊन ते त्रिगुणात्मक असल्याचे समजते. त्रिगुणांनी बंध निर्माण होतात. जन्म-मृत्यूचे चक्र चालू राहते. गुण हे चित्तापासून विकार पावत असल्यामुळे चित्त भक्तीने मत्परायण करून जिंकता येते. त्यासाठी मनाचा निर्धार करून अन्त:करणापासून माझे स्मरण करावे. मत्परायण होऊन चित्तशुद्धीने गुणसंहार करावा. म्हणजे तो निर्गुण भक्त मला प्राप्त होतो.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

॥श्रीगुरु:शरणं॥

श्रीमद्भागवत-अकरावा स्कंध

पुष्प १९९ वे (अध्याय २६ व २७ पूर्ण)

## ऐल गीता व पूजा प्रकार

मनुष्यदेहातच मुक्ती प्राप्त होते म्हणून माझ्या अखंड सेवेने व भक्तीने ती प्राप्त करून घ्यावी. त्यासाठी कुसंगती टाळावी. शिश्नोदरा पलिकडे ज्यास काही साध्य नाही अशा नास्तिकांच्या वाऱ्यासही उभे राहू नये! या बाबत ऐल नामक राजाने म्हणजेच पुरुरव्याने गाईलेले एक गीत आहे. तीच ऐल गीता म्हणून प्रसिध्द आहे. ह्या ऐल राजाला कर्म धर्म संयोगाने खूप काळ उर्वशी नामक अप्सरेचा सहवास प्राप्त झाला. भरपूर सहवास प्राप्त होऊनही राजाचे काही समाधान झाले नाही. ऐलराजा तिच्या सहवास सुखात असतानाच ती राजाला सोडून देवलोकी परत जाण्यास निघाली. तेंव्हा ऐलराजा विवस्त्र अवस्थेत तिच्या मागे धावत सुटला व न जाण्यासाठी तिची मनधरणी करू लागला. पण उर्वशी देवांगना असल्यामुळे तिला राजाशी काहीच कर्तव्य नव्हते. ती निघून गेली. काही वेळाने भानावर आलेल्या राजाला आपल्या मोहाची लाज वाटून तो मनाशी म्हणू लागला, " अरेरे माझ्या सारख्या सम्राट चक्रवर्ती व ऐश्वर्य संपन्न राजाला कस्पटासमान मानणाऱ्या य:कश्चित स्त्रीसौंदर्याच्या मोहामुळे मी तिचा क्रीडामृग बनून वेड्यासारखा विवस्त्र अवस्थेत तिच्या मागून धावत सुटलो. गाढवीच्या लाथा खाऊन तिच्या मागे धांवणाऱ्या गाढवासारखा मी उर्वशीच्या मागे माझ्या सामर्थ्याचा, सम्राटपदाचा, चक्रवर्तीपदाचा विसर पडून धांवत सुटलो! स्त्री लम्पटतेमुळे माणसाचे तप, सामर्थ्य, प्रज्ञा, वैराग्य, वेदाभ्यास, इत्यादी सर्व व्यर्थ होते. मी स्वत: चक्रवर्तीराजा असूनही गाढवा सारखा उर्वशीच्या मागे धांवत सुटलो. माझा धिक्कार असो. अग्नीला आहुती दिल्याने तो वाढतच जातो. तसा उर्वशीच्या अधरामृत पानाने माझा काम वाढतच होता. उर्वशीने अनेकवार मला सावध करूनही मी सावध झालोच नाही. इंद्रियवश झालेल्या माझा मोह नष्ट झालाच नाही. खरे तर यात उर्वशीचा काहीच दोष नाही. कारण वर वर वैभवशाली दिसणाऱ्या नरकाच्या पोताडीवर माझ्या सारख्या सम्राटाने आसक्त होण्याने हे घडले आहे. स्त्रीदेहा विषयीची ही आसक्तीच माझ्या या अध:पतनास कारणीभूत आहे. एका परमेश्वरा खेरीज मला विषयमुक्त करणारा कोण आहे? तोच एक समर्थ आहे. खरे तर

या देहात भरले तरी काय आहे? तर हाडे, रक्त, रेत, मांस, विष्ठा, मुत्र, लाळ, थुंकीं, कफ, पित्त इत्यादी सगळे अमंगल पदार्थ. आणि आसल्याच अमंगल पदार्थांच्या सौंदर्यवान वेष्टनावर लुब्ध होऊन त्या मुखकमलाला आलिंगन देऊन अधरामृतपान म्हणणाऱ्या माझ्यात आणि विष्ठा-मूत्रात लोळणाऱ्या किड्यात काय फरक आहे? विषय पाहिला नाही किंवा ऐकलाच नाही म्हणजे मनात विकारच उत्पन्न होत नाहीत. त्या साठी कुसंग व विषयसंग टाळून मनोनिग्रहाने इंद्रिये घट्ट बांधावीत. हरीनामात हा संकल्प करून व हरीला प्रामाणिकपणाने शरण जाऊनच हे शक्य होणारे आहे. त्यासाठी मन शांत करून हरीनाम घेत रहावे हेच उत्तम." उद्धवा! या प्रमाणे सुंदर गीत गाऊन ऐलराजाने उर्वशीलोकाचा त्याग केला. माझे चिद्रूप जाणले. ह्या व अशा प्रकरच्या कथांचे निष्ठापूर्वक मनन करून त्यात तल्लीन होणाऱ्या निष्ठावान भक्तांना माझी पराभक्ती प्राप्त होते. भगवंताचे हे बोलणे ऐकून उद्धवाने पराभक्तीसाठी पूजाविधी विचारले. भगवान श्रीकृष्ण सांगू लागले, " उद्धवा! पूजाविधी अनंत आहेत. पण संक्षेपाने काही सांगतो. माझी पूजा वैदिक, तांत्रिक व मिश्र अशा तिन्ही प्रकारे करता येते. प्रथम शरीरशुद्धी व चित्तशुद्धी करून मग पूजन करावे. अंत:करणात माझी मूर्ती स्थिरावलेली नसेल तर सगुण मूर्तीची स्थापना करून माझी पूजा करावी. त्यातही मूर्ती धातूंची, मातीची, पाषाणाची, लाकडाची, चित्ररुपी कागदाची, वाळूची, रत्नाची अशी चालेल. पण उत्तम म्हणजे मनोमय. मूर्तीपूजेचे दोन प्रकार आहेत. एक चल व दुसरी अचल. धातूंच्या व पाषाणांच्या मूर्तींना स्नान घालावे पण बाकीच्या मूर्तीपूजनास प्रोक्षणाने स्नान घालावे. वस्त्रालंकार आपल्या भावाप्रमाणे जरूर करावेत. उध्दवा जसा भाव माझ्या बाबत असेल तसे त्याचे फळ असते हे लक्षात ठेव. स्तोत्रे, मंत्र, प्रार्थना आवश्य कराव्यात.

षोडशोपचार पूजन मला प्रिय आहे. पूजकाने पूर्वोत्तर मुख करून बसावे. पूजनाला सुरुवात करण्यापूर्वी "ॐ नमो भगवते वासुदेवाय।" हा जप मन:पूर्वक कमीत कमी अकरा वेळा तरी करावा. मग स्वत:च्या शरीरशुद्धीसाठी षडंगन्यास करावेत. स्वत:चे झाल्यावर प्रतिमेचेही करावेत. न्यासानंतर गंध, निर्माल्य काढून मूर्ती स्वच्छ करावी. मग कलश पूजन, शंख पूजन, घण्टा पूजन, दीप पूजन करावे. नंतर कलशातल्या पवित्र जलाने स्वत:सह पूजा द्रव्यावर प्रोक्षण करून शुद्धी करावी. मग माझ्या सगुण पण सुक्षमातीसूक्ष्म चैतन्यस्वरूपाचे ध्यान करावे. ध्यान झाल्यावर आपला देह भगवंताने व्यापलेला असल्याची धारणा करून १. आवाहन, २. आसन, ३. पाद्य, ४. अर्घ्य, ५. आचमन, ६. स्नान, स्नान प्रथम शुद्धोदक, दुसरे दुधाचे, तिसरे दह्याचे, चवथे तुपाचे, पांचवे मधाचे, सहावे साखरेचे व ह्या पंचामृत स्नानात प्रत्येक स्नानाचे मध्ये शुद्धोदक स्नान घालावे. मग उर्वरित पंचामृताचा नैवेद्य दाखवावा. मग हस्तप्रक्षालन, मुखप्रक्षालन करोद्वर्तन करून तांबुल समर्पण करावा, पुष्प अर्पण करावे. त्यानंतर पुरुषसुक्त, स्त्रीसूक्त, अथर्वशीर्ष इत्यादींनी अभिषेक करावा. अभिषेक झाल्यावर शांतीमंत्र म्हणावा. मग गंधोदक, मांगलिकस्नान, उष्णोदकस्नान, शंखोदकस्नान व शुद्धोदक स्नान घालावे. ७. वस्त्र समर्पण करावे, ८. याद्योपवित, ९. चंदन-हळदी-कुंकू-अक्षता अर्पण कराव्यात, १०. पुष्पे, तुलसीदल, बिल्वपत्र, दुर्वांकुर इत्यादी अर्पण करावे, ११. धूप, १२. दीप, १३. नैवेद्य दाखवावा, १४. तांबुल समर्पण करावा, १५. आरती

ओवाळावी, १६. मंत्रपुष्पांजली अर्पण करावी. अशी षोडशोपचार पूजा करावी. त्यानंतर क्षमा याचना करावी. साष्टांग नमस्कार करावा. स्तुतीपर गीते गावीत. ज्या समयी जे जे पूजा साहित्य मिळेल त्यात मनापासून व समाधानाने पूजन करावे. मी सर्वात्मा असल्यामुळे माझे वास्तव्य सर्वकाळी सर्वत्र असते. हे नेहेमीच ध्यानात ठेवावे. तरीपण माझ्या वास्तव्याची विशेष जाणीव रहाण्यासाठी उत्कृष्ट कलाकुसर केलेली मंदिरे बांधून त्याचा परिसर बागेने व सुगंधी फुलझाडांनी सुशोभित करावा. असंभाव्य वैभव वाढवावे. निष्काम भावाने भक्ती करण्यास प्रेरणा देणाऱ्यास व साहाय्य करणाऱ्यास तेच फळ प्राप्त होते जे प्रत्यक्ष निष्काम भक्ती व कर्म करणाऱ्याला होते.

हरये नमः। हरये नमः। हरये नमः।

॥श्रीगुरु:शरणं॥

# श्रीमद्भागवत-अकरावा स्कंध

## पुष्प २०० वे (अध्याय २८ व २९ पूर्ण)

## ज्ञान व भक्ती योग विवरण

उद्धवा! प्रकृती व पुरुष यांच्यापासून उत्पन्न झालेले विश्व भागवद्रूपच आहे. असे सतत स्मरण ठेवूनच वागावे. दुसऱ्यांच्या स्वभाव व कर्माची निंदा-स्तुती मनातही आणू नये. कारण त्यामुळे तैजस अहंकार प्रभावी होतो. व जीवाचा मुख्य स्वार्थ असलेल्या ज्ञानाचा लोप होतो. जागृती म्हणजे विश्व भगवद्रूप असल्याची जाणीव. त्यापासून विश्व वेगळे अनुभवणे म्हणजे स्वप्नावस्था. द्वैत तैजस अहंकाराने उत्पन्न होते. त्यामुळे जीव अज्ञानवश होतो. परमार्थत: द्वैत नाही. उद्धवा! हे समजून घेणे खूप अवघड आहे. कारण जन्मजन्मांतरीच्या संवयीमुळे संसार सत्य वाटत आलेला आहे. पण संसारात तुम्ही मृगजळाचा अनुभव घेता तेंव्हा त्यात पाणी नसूनही प्रतिबिंब दिसते. तसेच विश्वोत्पत्तीचे आहे. मिथ्या संसार सत्य वाटू लागतो. जीवाला येणारे शरीरपण व मनादी उपाधी भासात्मक असूनही भय निर्माण करतातच नां? सर्व शक्तीमान् ईश्वररुपी आत्मा म्हणजेच मी हे सर्व विश्व निर्माण करतो, पालन करतो व संहारही करतो. थोडक्यात म्हणजे या विश्वाचे उपादान कारण (म्हणजेच प्रत्यक्ष कारण) मीच आहे. त्यामुळे माझे वर्णन अथवा विवरण करणे शब्दांच्या आवाक्यातले नाही. आत्म्यासारखे काहीच नसल्यामुळे ते तुलनेने समजावून सांगता येत नाही. म्हणून साधकाने प्रत्याक्षानुभूतीच्या सहाय्याने हे सर्वविश्व असत् समजून नि:संग होऊन राहावे." हे ऐकून उध्दव म्हणाला, " हे प्रभो! आत्म्याला संसार असत नाही व जडदेहालाही तो असत नाही. मग देह जड असूनही त्याला सुखदु:खाचे भान कां व्हावे? हा काय चमत्कार आहे?"

भगवान श्रीकृष्ण म्हणाले, " उद्धवा! तैजस व तामस अहंकारांच्या मिश्रणातून उत्पन्न झालेल्या शरीर व आत्मा यांच्या संयोगाने जीवांना तो आभास होतो. जड शरीराला अथवा आत्म्याला नाही. शरीर स्वत:चे समजणे हा त्या अहंकाराचा परिपाक आहे. जागृती, स्वप्न आणि सुषुप्ती भोगणारे मन असते. मन हे

वायुरूप असून सर्व शरीरभर फिरत असते. जागृती, स्वप्न आणि सुषुप्ती हे सत्व, रज व तम या गुणाचा परिपाक आहे. सत्व, रज व तम हे वैकारिक, तैजस व तामस या तीन गुणांचे अवक्रांत रूप आहे असे समज. हे तीन गुण व कारण म्हणजे अध्यात्म. कार्य म्हणजे अधिभूत व कर्ता म्हणजे आधिदैव. असे गुणत्रयाचे परिपाक असलेले विश्व शब्दब्रम्ह प्रकाशित करते. थोडक्यात म्हणजे स्वत:च्या नसलेल्या गोष्टी स्वत:च्या मानल्यामुळे सुखदु:खादींचा अनुभव घ्यावा लागतो. त्यामुळे आत्मानात्म विवेक हा एकच मार्ग असा आहे कीं ज्यामुळे हे ज्ञान होऊन सुखदु:खादी विकार त्यांना वश न होता अनुभवता येतात. कारण देहाभिमानाचा "मी कर्ता" हा अहंकार लोप पावलेला असतो. तीच अनुभूती. मला शरण येऊन वेदवाणीच्या चिंतन मननानेच आत्मस्वरूपाचे दर्शन घडते. जो वर नामरूपात्मक विश्व ही स्वप्नावस्था वाटत नाही तोवर माझे नामस्मरण व माझे स्मरण, मनन, चिंतन सोडू नये. निश्चयात्मक बुद्धीने व विचारांनी मला शरण येणाऱ्या एकनिष्ठ भक्तांना हा ज्ञानयोग हळूहळू साधता येतो. देहात राहून आत्मस्वरूप जाणणे ही मुक्ती आहे व ती नित्य आहे. ज्ञानयोगाच्या एकनिष्ठ शरणागतीसाठी सहज उपाय सांगण्याची विनंती उद्धवाने केल्यामुळे भगवान श्रीकृष्ण खुश होऊन सांगू लागले, " उध्दवा! फार छान विनंती केलीस. अत्यंत सहज व सोपा मार्ग म्हणजे भागवतधर्म! आणि भागवतधर्म म्हणजे नित्यनैमित्तिक कर्मासह केलेले कोणतेही कर्म मला अर्पण करणे व केलेली कोणतीही सेवा माझ्या साठी असल्याची जाणीव ठेवून माझ्या स्मरणात वागणे. आतां हे सांगायला एकदम सोपे आहे व वागायलाही सोपे आहे पण त्यासाठी आत्मानात्म विवेक आवश्यक आहे. माझी निष्काम सेवा करणे म्हणजे भागवतधर्म. भागवतधर्माच्या आचरणासाठी निरपेक्षता, माझे मनन, निर्वैरता, शांती आणि समदर्शन हे अंगी मुरवावे लागते. मन, चित्त, वाणी, अंत:करण, श्रवण, स्पर्श, दृश्य, इत्यादी सर्व माझ्यासाठी करण्याची कला अवगत करून घेणे म्हणजे भागवतधर्म. एकट्याने किंवा अनेकांना बरोबर घेऊन जयंत्या, पर्व, इत्यादी महोत्साव अंत:करणात प्रेम व भक्ती ठेवून वैभवात साजरे करावेत. उद्धवा! मी आंतर्बाह्य व्यापून उरलो आहे अशी जाणीव सतत ठेवून प्रत्येक जीवाशी निर्मत्सर, निर्वैर, निरपेक्ष राहून वर्तन करावे. माझ्या कथांच्या अनुसंधानात सतत रहावे. सवर्ण, अंत्यज, साव, चोर, गुणी, दुर्गुणी, शहाणा, मूर्ख, सुष्ट, दुष्ट, इत्यादी सर्वांच्या ठिकाणी समभाव ठेवून व ते माझे स्वरूप मानून तारतम्याने पण सहृदयतेने व्यवहार करावा. गाय, कुत्रा, मांजर, घोडा वगैरे प्राण्यांच्या ठिकाणी सुध्दा माझे स्वरूप मानून व्यवहारभेद पाळून तारतम्याने त्या त्या प्राण्यांच्या सौख्याचा सहृदयतेने विचार करून व्यवहार करावा. कोणाशीही व्यवहार करताना, बोलताना, वागताना माझ्या अस्तित्वाची जाणीव ठेवावी. तशी भावना जगती ठेवणे ही माझी सर्वोत्कृष्ट भक्ती आहे. उद्धवा, देवांनाही दुर्लभ असा ब्रम्हज्ञानात्मक भक्तीचा स्पष्ट व नि:संदिग्ध उपदेश मी तुला केला आहे. ह्या उपदेशाच्या मननाने तुझ्या सर्व शंकांचे आपोआप निरसन होत राहील. ह्या उपदेशाच्या मननानेच माझे अनुसंधान राहून तुला निश्चित ब्रम्हप्राप्ती होईल. पण हे ज्ञान रहस्य नास्तिक, भोंदू, अभक्त इत्यादिना सांगू नकोस. माझे भक्त, सदाचारी, आस्तिक, पवित्राचरणी इत्यादिंना जरूर सांग. मग ते कोणीही असोत अंत्यज, स्त्रिया असे कोणीही असोत. त्यांना आस्था असेल तर जरूर सांग. उद्धवा! आतां तूं बद्रिकाश्रमात जा! तिथे माझ्या चरणापासून निघालेली गंगा अलकनंदा या नावाने प्रवाही झालेली आहे. तिच्यात स्नान करून पवित्र होऊन नि:संग होऊन तपस्वी वृत्तीने

भागवतधर्माचरण करीत राहा. म्हणजे मलाच येऊन मिळशील." भगवंताची ही आज्ञा शिरसावन्द्य मानून उद्धवाने श्रीकृष्णांना तीन प्रदक्षिणा केल्या. सद्गद अंत:करणाने श्रीकृष्णांच्या पायावर मस्तक ठेवले. त्यांच्या चरणावर पुन्हा पुन्हा मस्तक घासून त्याने आपला आवेग व्यक्त केला. मग मनाला आवर घालून तो मोठ्या कष्टाने द्वारका सोडून निघाला. अंत:करणात श्रीकृष्णांना धारण करूनच बद्रिकाश्रमात आला व भागवतधर्माचरण करून मुक्त झाला. "इतके सांगून शुकमुनी म्हणाले, "राजन्! उद्धवच्या निमित्ताने हे ज्ञानामृत सर्वच भगवद्भक्तांना प्राप्त झाले आहे. श्रद्धेने मनन चिंतन करणारा व त्याप्रमाणे वागणारा कोणीही मुक्त होईल. वेदांचा प्राण असणारे हे ज्ञानामृत देणाऱ्या भगवान श्रीकृष्णांना माझा वारंवार नमस्कार असो. "

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

॥श्रीगुरु:शरणं॥

श्रीमद्भागवत-अकरावा स्कंध

पुष्प २०१ वे (अध्याय ३० व ३१ पूर्ण)

## यादवांचा संहार व श्रीकृष्ण निर्याण

उद्धव द्वारका सोडून गेल्यावर थोड्याच दिवसात द्वारकेत अनेक उत्पात घडू लागले. तेंव्हा भगवान श्रीकृष्णांनी सुधर्मसभेत यादवांनी द्वारका सोडून प्रभासक्षेत्री जाण्याचा व धर्मकार्य करण्याचा प्रस्ताव मांडला. भगवान श्रीकृष्णांच्या या प्रस्तावाला सर्व यादवांनी अमुमोदन दिले. सगळयांनी लगेच आपल्या कुटुंबासह द्वारका सोडून शंखोध्दारला गमन केले. बायकामुलांना तिथेच ठेवून सर्व यादव प्रभासक्षेत्री धर्मकार्य करण्यास आले. स्नान, प्रायश्चित्त इत्यादी सगळे धार्मिक विधी प्रभासच्या समुद्र किनारी सुरळीत पार पडले. यादवांना त्याचा फार आनंद झाला. व तो साजरा करण्यासाठी त्यांनी "मैरेयक" नामक मद्य प्राशन करण्यास प्रारंभ केला. त्या मादक पेयाच्या प्राशनाने धुंद झाल्यावर त्यांची आपापसात थट्टा सुरु झाली. मग थट्टेचे पर्यवसान उखाळया पाखाळया काढण्यात होऊन आपसात भांडणाला सुरुवात झाली. भांडणाची तीव्रता वाढू लागली व त्याचे पर्यवसान युद्धात झाले. ते इतके उन्मत्त व मूढ झाले कीं पिता-पुत्र, चुलते-पुतणे, भाऊ-भाऊ, मामा-भाचे, आजा-नातू, असे कोणीच कोणाला मानेनासे झाले व एकमेकांवर तुटून पडू लागले. कुलनाश घडू लागला. शस्त्रास्त्रे संपल्यावर मुसळाच्या चूर्णापासून उगवलेल्या लव्हाळयाचा उपयोग करू लागले. तेंव्हा ती लव्हाळी वज्रासारखी कठोर बनून यादवांचा जीव घेऊ लागली. ब्राम्हणाचा शाप खरा ठरला. बलराम श्रीकृष्णांनी त्यांना आवरण्याचा प्रयत्न केला. तेंव्हा यादव त्यांच्याशीच युद्ध करू लागले. मग बलराम कृष्णांनी, त्याच लव्हाळयांनी सगळयाच यादवांना सद्गती दिली. सगळे यदुकुळ नष्ट झाले. तेंव्हा आपले कार्य संपल्याचे जाणून बलराम आपल्या मूळस्वरूपात विलीन झाले. ते पाहून भगवान श्रीकृष्ण जवळच्याच एका अश्वत्था खाली डावा पाय उजव्या मांडीवर घेऊन ध्यानस्थ बसले. त्यावेळी जरा नामक व्याध त्याच मुसळाच्या तुकड्यापासून बनवलेल्या बाणाने शिकार करण्यास त्या वनात आला होता. त्याला भगवान श्रीकृष्णांचा तळपाय म्हणजे हरीण वाटले व त्याने वेध घेऊन बाण सोडला. पाठोपाठ बाणाच्या दिशेने धावत आला. भगवान श्रीकृष्णांच्या पायाला बाण लागलेला पाहून अतीव दु:खी झाला. अपराधासाठी देहदंड मागू लागला. भगवान श्रीकृष्ण हसून म्हणाले, " अरे! माझ्याच इच्छेने जे घडले आहे त्या बद्दल तुला प्रायश्चित कसले. माझे कार्य केल्यामुळे तुला मी सदेह स्वर्गात

पाठवणार आहे. तूं स्वस्थ मनाने स्वर्गारोहण कर." त्या व्याधाने लगेच भगवान श्रीकृष्णांना प्रदक्षिणा केली. साष्टांग नमस्कार केला. तेवढ्यात विमान आले. त्यात बसून तो सदेह स्वर्गास गेला.

तेवढ्यात दारूक भगवान श्रीकृष्णांचा शोध घेत तिथे आला. तेज:पुंज चतुर्भुज भगवंताला पाहून रथातून उडी मारून त्यांच्या जवळ आला. त्यांच्या चरणावर लोळण घेत म्हणाला, "हे प्रभो मी अत्यंत अस्वस्थ झालो आहे! हे काय घडते आहे हे मला कळत नाही." असे म्हणून दारूक प्रार्थना करीत असताना भगवंताचा गरुडचिन्हांकित रथ सर्व आयुधांसह आकाशमार्गाने नाहीसा झाला. त्यावेळी दिग्मूढ झालेल्या दारूकास भगवान श्रीकृष्ण म्हणाले, " दारूका! तूं आता द्वारकेस जा! तेथील सर्व यादवांना सांग कीं सगळे यादव आपसात भयानक युद्ध करून धारातीर्थी पडले आहेत. त्यामुळे आता बलराम-कृष्णांसह कोणीही परत येणार नाही. द्वारका आता समुद्र पोटात घेईल. त्यामुळे द्वारकेचा त्याग करून सगळयांनी अर्जुना बरोबर इंद्रप्रस्थाला जावे. दारूका तूं शोक करू नकोस. माझ्या उपदेशाचे अनुष्ठान कर व मुक्त हो ! " भगवान श्रीकृष्णांची आज्ञा शिरसावंद्य मानून जड अंत:कारणाने दारूक द्वारकेस आला. भगवान श्रीकृष्णांनी दारूकाला पाठवून दिल्यावर निर्याणाचा संकल्प करतांच त्यांचे निर्याण दर्शन घेण्यासाठी आकाशात ब्रम्हदेव, उमेसह भगवान शिवशंकर, इंद्रादी प्रमुख देव, सर्व प्रजापती, अर्यमादी पितर, सिद्ध, चारण, विद्याधर, नाग, महोरग इत्यादी सर्वांच्या विमानांची दाटी झाली. विमानातून त्यांनी पुष्प वर्षाव केला. गंधर्व कृष्णलीलामृत गाऊ लागले. त्या तालावर अप्सरा नृत्य करू लागल्या. भगवान श्रीकृष्णांनी एकदा या आपल्याच विभूतींकडे एक दृष्टीक्षेप टाकला. मग शांतपणे डोळे मिटून घेतले. भगवंताच्या या सगळया विभूती त्यांच्याकडे पाहात असतानाच सर्वांच्या नेत्राना सुखावणारा आपला दिव्यदेह क्षणातच योगाग्नी वगैरे प्रकट न करताच नाहीसा केला. स्वर्गात दुंदुभी वाजू लागल्या. भगवान श्रीकृष्णांच्या पाठोपाठ सत्य, धृती, क्षमा, कीर्ती व लक्ष्मी ही भगवंताची ऐश्वार्येही भूलोक सोडून निघून गेली. भगवान श्रीकृष्णांचे हे निर्याण ब्रम्हदेवांसह सर्वांनाच आश्चर्यात टाकणारे होते. (कारण भगवान श्रीकृष्णांचा देह पंचमहाभूतांचा नव्हताच.) आकाशात वीज चमकते व नाहीशी होते. ती कुठून येते व जाते हे जसे मर्त्य मानवाला समजत नाही. तद्वत हा श्रीकृष्ण निर्याणाचा प्रकार झाला. सर्व देव आश्चर्य व्यक्त करीत आपापल्या स्थानी निघून गेले. राजन्! देहधारी मर्त्य लोकात अवतीर्ण होऊन भगवान श्रीकृष्णांनी केलेली लीला म्हणजे मायेचा अनाकलनीय कलाविष्कारच म्हणावा लागेल. रंगभूमीवर विविध रूपे धारण करून वावरणारा नट जसा मूळस्वरूपात जसाच्या तसा असतो तसेंच भगवंताचे हे लीला प्रकरण म्हणावे लागेल. गुरुसांदीपनीचा मृत पुत्र आणून देणे, ब्रम्हास्त्राने मृत झालेल्या तुला पुनर्जीवीत करणे. अंतकाच्याही अंतकाचा पराभव करणे आणि जरा नामक व्याधाला सदेह स्वर्गात पाठवणे. अशाप्रकारची अनाकलनीय कृत्ये करणाऱ्या भगवान श्रीकृष्णांना स्वत:चे संरक्षण करता येत नव्हते असे संभवनीय नाही. भगवान श्रीकृष्णांची ही प्रात:स्मरणीय निर्याण कथा जो भक्तिपूर्वक सकाळी स्मरेल त्याला सर्वश्रेष्ठ वैकुंठपद प्राप्त होईल."

इतके सांगून शुकमुनी पुढे सांगू लागले, " राजन्! श्रीकृष्ण विरहाने पोळलेला दारूक द्वारकेला आला. त्याने वसुदेव, उग्रसेन इत्यादी सर्व यादवांना बलराम-श्रीकृष्ण निर्याणासह यदुकुल संहाराचे वृत्त निवेदन केले. तेंव्हा ते सार्वजण मूर्च्छित झाले. शुद्धीवर येताच सर्वांनी प्रभासक्षेत्री धाव घेतली. तेथील

विदारक दृश्य पाहून देवकी, रोहिणी, वसुदेव इत्यादिकांचा शोकातिरेकाने देहपात झाला. बलराम, वसुदेव व श्रीकृष्ण यांच्या स्त्रियांनी त्वरित अग्नीप्रवेश केला. शोकग्रस्त व कृष्णविरह व्याकुळ अर्जुनाने भगवद्गीतेचे स्मरण करून स्वत:चे सांत्वन करून घेतले. मग सर्व यादवबंधूंचे उत्तरकार्य करून अर्जुन उर्वरित बायका मुलांसह इंद्रप्रस्थास आला. तिथे व्रजाला राज्याभिषेक करून हस्तिनापूर येथे आला. इकडे सागराने भगवान श्रीकृष्णांचे निवास्थान सोडून बाकी सर्व द्वारकानगरी परत आपल्या पोटात घेतली. भगवान श्रीकृष्णांचे निर्याण झाल्याचे समजताच युधिष्ठिराने तुला राज्याभिषेक कला. मग सर्व पांडव महाप्रयाणासाठी उत्तरेकडे मार्गस्थ झाले. भगवान श्रीकृष्णांची ही लीला कथा सतत स्मरण व मनन करणारा पापमुक्त होतो. अंती त्याला परममुक्ती प्राप्त होते.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

इथे श्रीमद्भागवतातलाअकरावा स्कंध पूर्ण झाला. या स्कंधात एकूण ३१ अध्याय व १३६७ श्लोक आहेत. त्या सर्वांचा पुष्प १८६ ते पुष्प २०१ हा साररूप अनुवाद आहे

# स्कंध बारावा

॥श्रीगुरु:शरणं॥

# श्रीमद्भागवत-बारावा स्कंध

# पुष्प २०२ वे (अध्याय १, २ व ३)

## वंश वर्णन व कलियुग

परीक्षित राजाने पुढे कोणत्या वंशाचे राजे होतील हे विचारले म्हणून शुकमुनी सांगू लागले, " राजन्! मगधावर राज्य करणाऱ्या बृहद्रथ राजाच्या वंशात शेवटचा राजा पुरांजय होईल. त्याचा प्रधान स्वामीघात करून आपल्या पुत्राला राजा करील. त्याचा वंश १३८ वर्षे चालेल. नंतर शिशुनाग नावाचा राजा राज्यावर येईल. त्याचा वंश ३६८ वर्षे राज्यभोग घेईल. या वंशातला शेवटचा राजा महानंदी असेल. या महानंदिला त्याच्या शूद्र स्त्रीपासून नंद नामक महाबलवान पुत्र होईल. तो संपूर्ण पृथ्वीचा सार्वभौम राजा होईल. त्याचा वंश १०० वर्षे राज्यभोग घेईल. पुढे चाणक्य नावाचा ब्राम्हण या राजवंशाचा समूळ नाश करून त्या जागी चंद्रगुप्त मौर्याची योजना करील. त्याच्या आठ पिढ्या राज्योपभोग घेतील. आठव्या पिढीतल्या बृहद्रथ राजाला त्याचा सेनापती पुष्पमित्र ठार मारील व स्वत: राजा होईल. ह्या पुष्पमित्राचा शुंग वंश ९ पिढ्या राज्य करील व दहाव्या पिढीतल्या देवभूती नामक स्त्रीलंपट राजाला कण्व वंशातला अत्यंत बुद्धिमान वसुदेव नामक अमात्य ठार करील व स्वत: राज्यावर बसेल. त्याचा वंश ३४५ वर्षे चालेल. कण्व वंशातला शेवटचा राजा सुशर्मा असेल. त्याचाच एक बलवान सेवक सुशर्माचा घात करून राजा होईल. त्याचाही घात होईल व त्याचा भाऊ कृष्ण राज्यावर येईल. त्याच्या तीस पिढ्या राज्य करतील. नंतर अभीर वंशाचे सात राजे होतील. मग गर्दभवंशाचे दहा राजे होतील. त्यानंतर कंक वंशाचे सोळा राजे होतील. नंतर यवन व तुर्कांचे राज्य येईल. त्या नंतर गरुंड (म्हणजे इंग्रज) राजे होतील. पुढे पुढे अधर्म वाढीस लागेल. नावाचेच राजे रहातील. ते म्लेंच्छा सारखेच आचरण करतील व भूमी संस्कार हीन लोकांच्या स्वामित्वाखाली जाईल. राजन्! त्यानंतर कलीच्या प्रभावाने दिवसेंदिवस धर्म, पावित्र्य, क्षमा, दया, मानवी आयुष्य, बल, प्रज्ञा इत्यादी क्षीण होत जाईल. द्रव्य हेच मनुष्याचे कुल, शील, सद्गुण इत्यादींचे प्रमाण मानले जाईल. स्त्री-पुरुष विवाह केवळ एक गरज म्हणून होऊ लागतील. आचारहीनता वाढतच जाईल. फटकळपणा, बाष्कळपणा म्हणजेच पांडित्य मानतील. द्रव्यक्षीणता असणाऱ्याला न्याय मिळणे कठीण होईल. दंभाला साधुत्व समजतील. धिटाईने खोटे बोलणाऱ्याचे खोटे 'सत्य मानले' जाईल. अशा अनेक सदोष पध्दतीने जग भरून जाईल. जो जास्तीत जास्त लोभी, दांभिक, बलिष्ठ, निर्दय, खोटे बोलणारा व खोटेपणाने वागणारा असेल आशा मनुष्याला राज्यप्राप्ती होईल. कर-भाराने प्रजा त्रस्त होईल. राजे स्वत:च प्रजेची लूट करू लागतील. कलियुगाच्या अखेरीस भगवान श्रीविष्णू विष्णुयश नामक

ग्रामाधिकाऱ्याच्या पोटी कल्कीचा अवतार धारण करतील. सर्व दुष्टांचा नाश करतील. भगवंताच्या ह्या अवताराने त्यावेळी सर्वत्र पावित्र्य व मांगल्याचा उदय होईल. प्रजेची अंत:करणे निर्मल होतील. बलवान व सद्गुणी संतती निर्माण होऊ लागेल. भगवंताच्या ह्या अवतारातच कृतयुगाला सुरुवात होईल. त्यावेळी शंतनूचा भाऊ देवापी व इक्ष्वाकू वंशातील मरू हे दोघे कलाप ग्रामातून भूतलावर येतील आणि पूर्वी प्रमाणे धर्म स्थापना करतील."

इतके सांगून शुकमुनी पुढे म्हणाले, " राजन्! हा इतिहास काय सांगतो? अनेक राजे आले आणि गेले. येतील आणि जातील. प्रत्येकाला पृथ्वीचे राज्य आपल्या मुलाच्या हाती रहावे असेच वाटले. त्याप्रमाणे चिंता करीत ते जगले व मेले. इतिहासात त्यांची स्मृती तेवढी कथारूपाने शिल्लक राहिली आहे! राजन्! हे राजे पृथ्वी जिंकण्याची पराकाष्ठा करू लागले कीं पृथ्वी हसते. कारण आपल्या क्षणभंगुर आयुष्याचा विचार त्यांच्या मनात येतच नाही. स्वत:ची इंद्रिये जिंकून सम्राट होता येते हे त्यांना समजतच नाही. पृथ्वी जिंकणे हे कवडीमोलाचे आहे. त्यापेक्षा वासनामुक्तीचे फळ लाख मोलाचे आहे हेच त्यांना समजत नाही. थोरांच्या सर्व कथा ऐकून तूं स्वत: विरक्ती बाणवून घे! मी हा जो वाग्विलास केला तो विवेक वैराग्य धारण करण्यासाठी. यात आलेले भगवंताचे गुणवर्णन पाप नाशक आहे. भगवद्भक्ति दृढ होऊन ती वाढावी म्हणून हे गुणवर्णन वारंवार वाचावे." हे ऐकून परीक्षित राजाने कलीचा दोष नाहीसा होण्याचा सुलभ मार्ग विचारला. तसेंच चारी युगांची वैशिष्ट्ये विचारली. म्हणून शुकमुनी सांगू लागले, " राजन्! कृत युगात धर्म 'सत्य, तप, पावित्र्य व दया' या चार चरणांवर उभा असतो. त्यामुळे लोक अभेद्वृत्तीने रहाणारे असतात. त्रेता युगात भेदबुद्धीचा प्रभाव पडतो. धर्माचा एक चरण नाहीसा होतो. कार्मासक्ती व फलासक्ती वाढते. द्वापारयुगात धर्म दोन पायावर उभा असतो. लोक वेदाध्यायी, कुटुंबवत्सल व धनवान होतात. धर्म, अर्थ व काम या तीन पुरुषार्थाच्या मागे लागतात. कलियुगात धर्म फक्त एकाच पायावर उभा असतो. लोक अर्थ व काम यांच्याच मागे लागतात. धर्माचा लोप होऊ लागतो. कलीचा दोष नाहीसा करण्याचा सहज व सोपा मार्ग म्हणजे हरी-स्मरण. अंत:करण पूर्वक काया वाचा मने यांसह श्रीकृष्ण स्मरणभक्तीने मनुष्य कालीच्या दोषातून सुटून भगवंताला प्राप्त होतो. "

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

॥श्रीगुरु:शरणं॥

# श्रीमद्भागवत-बारावा स्कंध

## पुष्प २०३ वे (अध्याय ४, ५ व ६ )

## ब्रम्होपदेश व सर्पसत्र

राजन्! चार युगांची मानवी वर्षे ४३२०००० (त्रेचाळीस लक्ष वीस हजार) आहेत. चार युगांचे एक हजार फेरे झाले कीं ब्रम्हदेवाचा एक दिवस होतो. त्याला कल्प असे म्हणतात. एका कल्पांत चवदा मनु व चवदा इंद्र होतात. हा कल्प संपला कीं ब्रम्हदेवांची तेवढीच रात्र होते. त्यारात्रीलाच प्रलय म्हणतात. या प्रमाणे नित्य, नैमित्तिक, प्राकृतिक व आत्यंतिक असे एका पेक्षा एक मोठे प्रलय कालस्वरूपी ईश्वराच्या सामर्थ्याने घडत असतात. त्यामुळे काळाचे व ईश्वराचे वर्णन करणे अशक्य आहे. त्या विश्वनियंत्या ईश्वराच्या लीलाकथा मी तुला थोडक्यात सांगितल्या आहेत. पूर्ण लीला तर ब्रम्हदेवही सांगू शकणार नाहीत. तथापि भवसागर तरुन जाण्यास एवढ्या पुरेशा आहेत. ही भागवतरुपी पुरण संहिता भगवान नारायणांनी प्रथम नारदांना सांगितली. नारदांनी माझ्या पित्याला म्हणजेच कृष्णद्वैपायन व्यासांना सांगितली. आणि आतां यानंतर नैमिषारण्यात जेंव्हा शौनकादिमुनि दीर्घकालीन यज्ञसत्र सुरु करतील तेंव्हा ते सूताला प्रश्न करतील व मग सूतमुनी ही संहिता तिथे सांगतील. राजन्! आपण आतां मरणार ही अविवेकी बुद्धी तूं सोडून दे! तूं स्वत:ला परीक्षित राजा समजत असल्यामुळे हा अविवेक तुझ्यात निर्माण झालेला आहे. स्वप्नात आपण जसे आपले मरण पहातो व जागे झाल्यावर ते खोटे असल्याचे समजतो तसेच तूं आत्मानात्म विवेकाने ह्या भवसागराच्या स्वप्नातून जागा हो. जीवासाठी शरीर, इंद्रिये व त्यांची कार्ये मनामुळे उत्पन्न होतात. मनाची उत्पत्ती मायेमुळे होते. मनाच्या देहोपाधीमुळे संसार भासमान होतो. तेच जागेपणीचे स्वप्न असते. देहोपाधीपासून अलिप्त राहून साक्षीरूपाने सर्व पहाणारा व जाणणारा वेगळाच असतो. तो अविनाशी, सर्वगामी, सर्वसाक्षी, सर्वव्यापी व सर्वांतरयामी असतो. त्याच्याशी तादात्म्यता साधल्यावर तुला तक्षक दंश करू शकणार नाही. तुझ्या देहाला दंश करील पण देह तुझा नसल्याच्या जाणीवेतून तूं आधीच त्याचा त्याग केलेला असशील. व देहातीत होऊन तूं स्वत:च तुझा नसलेला पण आजवर तुझा समजत असलेला देह भस्म होताना पहाशील. शुकमहाराजांचा हा ब्रम्होपदेश आत्मसात करून राजा परीक्षित कृतार्थ झाला. शुकमहाराजांना साष्टांग नमस्कार करून म्हणाला, " प्रभो! आतां मी तक्षकापासून येणाऱ्या मृत्यूभयातून पूर्ण मुक्त झालो आहे. आपण मला पूर्ण निर्भय केले असून परमात्म्याशी तद्रूप केले आहे. आतां आपल्याच अनुज्ञेने मी देहमुक्त होऊ इच्छित आहे. त्यामुळे मला अनुज्ञा द्या!" असे म्हणून राजा

परीक्षिताने शुकमुनीचे यथा योग्य पूजन केले. राजाची पूजा स्वीकारून भगवान शुकमुनी राजाला अनुज्ञा देऊन स्वस्थानी निघून गेले. राजा परीक्षितने निश्चलतेने प्राणांचे संचालन थांबवले. देहममतेचा त्याग करून मुक्त झाला. इकडे शमिकऋषींच्या पुत्राच्या शापामुळे प्रेरणा मिळालेला तक्षक परीक्षित राजाला दंश करण्यास निघाला. त्याचवेळी कश्यप नावाचा एक विष उतरवणारा निष्णात पंडित राजा परिक्षिताला वाचवण्यास निघाला होता. त्याची व तक्षकाची वाटेतच गाठ पडली. तक्षकाने ब्राम्हणाचे रुप घेऊन त्याला अमाप द्रव्य देऊन वाटेतूनच परत पाठवला. पण तक्षक येण्यापुर्वीच परीक्षित राजाने देहत्याग केलेला होता. त्यामुळे तक्षकाच्या दंशामुळे राजाचा देह भस्म झाला खरा पण राजाला अतिउत्तम गती मिळालेली पाहून स्वर्गातल्या देवानी दुंदुभी वाजवल्या. पुढे परीक्षित पुत्र जनमेजय राज्यावर आला. आपल्या पित्याला तक्षकाने दंश केल्याचे समजल्यावर जनमेजयाने तक्षकाचा बळी देण्यासाठी सर्पसत्र सुरु केले. त्यावेळी आपल्या वंशाचा भयानक संहार होऊन आपलाही संहार होणार ह्या भयाने तक्षक इंद्राला शरण गेला. तेंव्हा जनमेजयाने इंद्रासह तक्षकाची आहुती देण्याची ऋत्विजांना प्रार्थना केली. ऋत्विजांनी त्याप्रमाणे मंत्रोच्चार करताच इंद्र व तक्षक जागचे ढळले. ते पाहून इंद्रगुरु बृहस्पती जनमेजयाच्या यज्ञस्थानी आले. त्यांनी जनमेजयाला उपदेश करून सर्पसत्र थांबवले. इंद्र व तक्षक यांचे प्राण वाचवले." इतके सर्व सांगून सूतमुनी पुढे म्हणाले, " हे शौनकमुने! भगवान विष्णुंची अतर्क्य माया अशी कीं बृहस्पतीच्या उपदेशाने जनमेजयाने सर्पसत्र थांबवले. मनुष्य याच मायेमुळे मोहित होतो. सर्प सत्र सुरु करणे हाही मोहच व थांबवणे हाही मोहच. फक्त आत्मज्ञानी या मायेपासून मुक्त असतात. मुनीहो! 'मी व माझे' असे मोहमय विचार आत्मज्ञानी पुरुषाच्या अंत:करणात नसतात. म्हणून तर आत्मज्ञानी कृष्णद्वैपायन व्यासांच्या भागवताच्या श्रवणाने कोणत्याही जीवाला ज्ञान प्राप्ती होऊ शकते. त्यांना माझा वारंवार नमस्कार असो. हे ऐकून शौनक म्हणाले, "हे सूता! भगवान श्रीवेदव्यासांनी वेदांचे चार भाग कसे केले? व ते कोणत्या ख्यातनाम शिष्यांना कसे दिले?" सूतमुनी सांगू लागले, "हे शौनकमुने! 'अ,उ,म,' हे ओंकाराचे तीन वर्ण! ह्या तीन वर्णांचे सत्व, रज व तम हे तीन गुण, ऋक, यजु:, साम हे तीन वेद, भू:, भुव:, स्व: ह्या तीन व्याहृती. जागृती, स्वप्न, सुषुप्ती ह्या तीन अवस्था अथवा वृत्ती. ह्या सर्वांना हे तीन वर्ण धारण करतात. त्यामुळेच वेद अनंत आहेत. ते सगळे शिकणे अशक्य आहे. तथापि ब्रम्हवेत्या ब्रम्हदेवांनी आपल्या पुत्रांना त्यातील काही वेद शिकवला. मग परंपरेने चालत आलेले ते वेद कृष्णद्वैपायन व्यासांना द्वापार युगात प्राप्त झाले. व्यासांना अंतर्यामी मिळालेल्या प्रेरणेतून कलियुगातल्या अल्पायुषी प्रजेच्या कल्याणासाठी त्यांनी ऋक, यजु, साम या वेदांच्या राशीतून विविक्षित मंत्र वेगळे केले. मग त्यांच्या ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद अशा चार संहिता तयार केल्या. त्या अनुक्रमे पैल, वैशंपायन, जैमिनी व सुमन्तू यांना शिकविल्या. ते त्या त्या वेदांचे पहिले आचार्य. पुढे जसे जसे या आचार्यांचे शिष्य प्रशिष्य होत गेले तसे तसे त्यांनी वेदाभ्यासाचे जतन व्हावे या उद्देश्याने विविध शाखा केल्या व आपल्या शिष्यांना शिकविल्या. तसेंच यजुर्वेद संहितेचा पहिला आचार्य वैशम्पायन यालाही बरेच शिष्य होते. त्यात याज्ञवल्क्य नावाचा एक तेजस्वी शिष्य होता. तो गुरुसेवा परायण होता. त्याने आपल्या गुरूंचे ब्रम्हहत्येच्या पातकाचे प्रायश्चित्त गुरुसेवेच्या भावनेने घेण्याची व गुरूंना पापमुक्त करण्याची तयारी दर्शवली. पण वैशंपायन यांना ते औध्दत्य वाटले.

वैशंपायनांनी याज्ञवल्क्याला आपण शिकवलेल्या विद्येचा त्याग करण्यास सांगितला. याज्ञवल्क्यांनी योगमार्गाने ती तिथेच ओकून टाकली. ती प्रभावी विद्या पाहून तेथे उपस्थित असलेल्या इतर शिष्यांना ती विद्या घेण्याचा मोह झाला. व त्यांनी तितर पक्षाच्या रूपाने त्या विद्येचे ग्रहण केले. त्यामुळे ती तैत्तरीय संहिता म्हणून मान्यता पावली. पण याज्ञवल्क्यांनी मानवीगुरूचा अश्याप्रकारचा उपद्रव नको म्हणून अंत:प्रेरणेने भगवान श्रीसूर्यनारायणांची उपासना केली. याज्ञवल्क्यांची प्रामाणिक आत्मार्पणाची व विद्या-प्राप्तीची तळमळ जाणून भगवान श्रीसूर्यनारायण प्रसन्न झाले. भगवान श्रीसूर्यनारायणांनी वाजीचे रुप धारण केले व याज्ञवल्क्यांना शुक्लयजुर्वेद प्रदान केला. त्यामुळे याज्ञवल्क्य सामर्थ्यशाली ऋषी झाले. त्यांनी शुक्लयजुर्वेदाच्या पंधरा शाखा केल्या. त्या वाजसनी शुक्लयजुर्वेदाच्या शाखा म्हणून प्रसिध्द झाल्या. सामवेदाचे पहिले आचार्य जैमिनी. त्यांनी आपल्या सामवेदाच्या एकहजार शाखा केल्या व त्या विविध शिष्यांना शिकवल्या. अथर्व वेदाचा आचार्य सुमन्तु! त्याने आपल्या वेदाच्या दोन शाखा करून त्या दोघांना शिकविल्या.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

॥श्रीगुरु:शरणं॥

श्रीमद्भागवत-बारावा स्कंध

पुष्प २०४ वे (अध्याय ७, ८ व ९)

## १८ पुराणे व मार्कंडेय पुराण

हे शौनक मुने ! माझा पिता रोमहर्षण हे पहिले पुराणवेत्ते. त्यांनी सहा शिष्य तयार केले. मी त्यांच्या कडूनच या संहिता शिकून त्यांचा सखोल अभ्यास केला. तज्ञांनी पुराणाची दहा विशेष लक्षणे ठरविली आहेत. सर्ग, विसर्ग, वृत्ती, रक्षा, मन्वंतरे, वंश, वंशानुचरिते, संस्था, हेतू, आश्रय या दहा लक्षणांनी युक्त असलेल्या वाङ्मयाला 'पुराण' अशी संज्ञा आहे. या दहा लक्षणांचा थोडक्यात अर्थ असा. १. सर्ग म्हणजे त्रिगुणात विषमावस्थाने उत्पन्न होणारे महत्तत्त्व. आणि त्यापासून उत्पन्न होणारी सूक्ष्म सृष्टी. २. विसर्ग म्हणजे सर्गोत्पत्तीवर ईश्वरी कृपा होऊन वासना समूह उत्पन्न होऊन विश्वरचना होते. ३. वृत्ती म्हणजे उपजीविकेसाठी निर्माण झालेली कर्मे. ४. रक्षा म्हणजे विश्वाच्या स्थिरतेसाठी अव्यक्तातून होणारे ईश्वरीय कार्य. ५. मन्वंतर म्हणजे एका मनूच्या भोगण्याचा कालावधी. ६. वंश म्हणजे ब्रम्हदेवापासून उत्पन्न होणारी संतती. ७. वंशानुचरिते अथवा ईशानुचरिते म्हणजे या संततीतल्या ईश्वरी अवतार चरित्र कथा. ८. संस्था म्हणजे नित्य, नैमित्तिक, प्राकृतिक व आत्यंतिक प्रलय. ९. हेतू म्हणजे आत्मबोध, आत्मशोध, आत्मज्ञान इत्यादींसाठी वेदा-धारे केलेले विवेचन. १०. आश्रय म्हणजे आत्म-ज्ञानाच्या विवेचनातून ब्रम्हसाक्षात्कार होऊन ईश्वराचा आश्रय मिळणे. अशा दहा लक्षणांनी युक्त अशी १८ पुराणे आहेत. १. ब्रम्हपुराण, २. पद्मपुराण, ३. विष्णुपुराण, ४. शिवपुराण, ५. लिंगपुराण, ६. गरुडपुराण, ७. नारदपुराण, ८. भागवतपुराण, ९. अग्नीपुराण, १०. वराहपुराण, ११. स्कंधपुराण, १२. मत्स्यपुराण, १३. कूर्मपुराण, १४. वामनपुराण, १५. मार्कंडेयपुराण, १६. भविष्यपुराण, १७. ब्रम्हवैवर्तपुराण, १८. ब्रम्हांडपुराण.

मार्कंडेय पुराण असल्याचे ऐकून शौनक म्हणाले, "हे सूतमुने! मार्कंडेयमुनी हे आमचे पूर्वज असून ते याच कल्पातले आहेत. ते चिरंजीव असल्याचेही आम्हास ज्ञात आहे. माझा प्रश्न असा कीं या कल्पात अद्याप प्रलय झालेला नाही. असे असताना मार्कंडेयमुनींना जलप्रलयात वटपत्रावर बालमुकुंदाचे दर्शन झाले असे सांगतात तर ते कसे? हे सूतमुने आपणास सर्व पुराणांचे परतत्त्वस्पर्शी ज्ञान आहे. त्यामुळे ह्या मार्कंडेय पुराणातील हे रहस्य आम्हास सांगून आमचे अज्ञान दूर करा!" सूतमुनी सांगू लागले, " हे शौनका! मार्कंडेय हे

अत्यंत श्रेष्ठ तपस्वी होते. त्यांची निस्पृहता, निरपेक्षता, निर्वैरता, शांती, समदर्शन इत्यादी पाहून ब्रम्हदेवादी देवांनाही आश्चर्य वाटू लागले. त्यांना दीर्घायुष्य इतके लाभले कीं सहा मन्वंतरे निघून गेली. तरी त्यांचे तप सुरूच होते. सातव्या मन्वंतरातल्या इंद्राला त्यांच्या तपाचे भय वाटून त्याने मदनाला अप्सरांच्या समुहासह मार्कंडेयमुनीच्या तपाचा भंग करण्यास पाठवले.

पण मार्कंडेयांच्या तपाच्या तेजाला घाबरून मदन अप्सरांसह पळून गेला. यातले वैशिष्ट्य असे कीं मार्कंडेयमुनी इतके निस्पृह व निरहंकारी झाले होते कीं आपण शांत राहिलो किंवा मदनाचा पराभव केला इत्यादी कोणत्याच भावना त्यांच्या मनात आल्या नाहीत. परिणामी साक्षात् भगवंतालाच त्यांच्यावर कृपा करण्याची इच्छा झाली व भगवंत नर-नारायणाच्या रुपात त्यांच्या समोर प्रकट झाला. शौनका! सहा मन्वंतरा इतक्या वयोवृध्द मार्कंडेयमुनिंनी तत्काळ त्यांना साष्टांग नमस्कार केला. विनयाने उभे राहून त्यांची हात जोडून स्तुती केली. व स्तुतीच्या समारोपात म्हणाले, " आपले स्वरूप जाणण्याच्या प्रयत्नात ब्रम्हदेवां सारखे ज्ञानीही देहादी उपाधींनी मोह पावतात. अशा आपल्या या महापुरुष स्वरूपाला माझे त्रिवार वंदन असो." तेंव्हा भगवान नारायण संतुष्ट होऊन म्हणाले, " ब्रम्हर्षीश्रेष्ठ मार्कंडेया! तुझ्या आत्मचिंतनरुपी अनन्यभक्तीने आम्ही तुझ्यावर प्रसन्न झालो आहोत. वरदात्यांमध्ये आम्ही अग्रणी आहोत. त्यामुळे तूं कोणताही संकोच न करता हवा तो वर मागून घे!" तेंव्हा पराकोटीचे निरपेक्ष झालेल्या मार्कंडेयमुनिंनी त्यावेळी भगवंता जवळ भगवंताची माया म्हणजे काय? हे अनुभवण्याची इच्छा व्यक्त केली. भगवान नारायण संतुष्टतेने "तथास्तु" म्हणून अंतर्धान पावले. मार्कंडेयमुनी पुन्हा आपल्या आत्मचिंतनात दंग झाले. बराच काळ गेला. आणि एक दिवस प्रचंड वारा सुटला. आकाशात ढग भरून आले. मुसळधार पाऊस सुरु झाला. आकाश दिसेना. सर्वत्र अंधार पसरला. पायाखाली जमीन नसताना मार्कंडेय पाण्यात उभे. त्यांना जलचर खायला येत तेंव्हा ते बेशुद्ध होत व परत शुद्धीवर आल्यावर सुखरूप असाल्याच्या आनंदात पाण्यावर येत. किती कालावधी गेला ते ही समजेना. कारण दिसत तर काहीच नव्हते. भूकही लागलेली होती. पण खाणार काय? काहीच करता येत नव्हते. शरीरस्वास्थ्य मात्र व्यवस्थित होते. तरी पण ते त्रस्त झाले होते. पण करू काहीच शकत नव्हते. इतक्यात त्यांना एक सुंदर वटवृक्ष दिसला. त्या वटवृक्षाच्या एका वटपत्रावर उजव्या पायाचा अंगठा मुखात घालून पहुडलेल्या तेजस्वी बालमुकुंदाचे दर्शन झाले. ते त्या बालकाच्या जवळ आले. आणि काय घडते हे कळण्याच्या आतच त्या बालकाच्या श्वासा वाटे त्याच्या पोटात गेले. पहातात तो काय? त्या बालकाच्या पोटात सर्व विश्व दिसू लागले. स्वत:चा आश्रमही दिसू लागला. त्यांनी आश्रमात जाण्यचा संकल्प करताच त्या बालकाच्या श्वासावाटे बाहेर फेकले गेले. परत जलप्रलयाच्या पाण्यात वटपत्रावर निजलेल्या मोहक बालका जवळ आले. त्यावेळी त्या बालमुकुंदाने आपल्या अमृतमय प्रेमहास्याने मार्कंडेयांच्या कडे दृष्टीक्षेप टाकला. त्यावेळी सर्व श्रमपरिहार होऊन मार्कंडेय शांत झाले. शांत होऊन त्या बालकास घ्यावयाला गेले. इतक्यात सर्व नाहीसे होऊन मार्कंडेयमुनी पूर्वी जिथे बसले होते तिथे त्या स्थितीत परत आले. परत पूर्वीसारखे आपल्या आश्रमाचे स्वरूप पाहून आश्चर्याने स्तंभित झाले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

॥श्रीगुरु:शरणं॥

श्रीमद्भागवत-बारावा स्कंध

पुष्प २०५ वे (अध्याय १०,११,१२ व १३)

## मार्कंडेयांची शिवस्तुती, भागवत महात्म्य व समारोप

भगवंताच्या माया दर्शनाने स्तंभित झालेले मार्कंडेय भगवंताचे स्मरण करीत निर्विकल्प समाधीत शांत झाले. त्यावेळी आकाश मार्गाने मृडानीसह चालेल्या भगवान शिवांना मार्कंडेयांना भेटण्याची इच्छा झाली. तेंव्हा मृडानी म्हणाली, " हे भगवन्! ह्या ब्रम्हनिष्ठ ब्राम्हणाला त्याच्या तपाचे फळ आपण आवश्य द्यावे असे मला वाटते!" तेंव्हा भगवान शिव म्हणाले, "देवी ! हा ब्रम्हर्षी पूर्ण निरिच्छ आहे! आणि अशा परम निरपेक्ष भक्ताशी दोन शब्द बोलावेसे वाटतात म्हणून मला त्याच्या कडे जावेसे वाटत आहे!" असे म्हणून भगवान शिव मार्कंडेयांच्या समोर उभे राहिले. आणि मार्कंडेय हे निर्विकल्प समाधीत असल्याचे जाणून योगमार्गाने मार्कंडेयांच्या हृदयाकाशात प्रकट झाले. आपल्या हृदयात प्रकट झालेल्या शिवांना पाहून मार्कंडेयांनी डोळे उघडले. आणि समोर भगवान शिव-पार्वतीला पाहून लगेच नतमस्तक झाले. मार्कंडेयांनी त्या दोघांची षोडशोपचार पूजा केली. व विनयाने म्हणाले, "हे नित्यतृप्त भगवंता मी आपणास काय देऊ शकणार? म्हणून फक्त अंत:करण  पूर्वक नमस्कार करतो!" भगवान शिव म्हणाले. " तुला हवा तो वर तूं मागून घे!"

मार्कंडेय म्हणाले, " हे प्रभो! आपली क्रीडा देहधाऱ्यांना समजणे अशक्यच आहे. तथापि आपल्या अनाकलनीय विश्वव्यापक गुरुतत्त्वरुपी परब्रम्हाला नमस्कार करून असा वर मागतो कीं आपल्या ठिकाणी व आपल्या भक्तांच्या ठिकाणी माझे निश्चल प्रेम व भक्ती राहो!" भगवान शिव अत्यंत प्रसन्न होऊन म्हणाले, " ते तर राहिलच. पण तुझी पवित्र कीर्ती सर्वत्र पसरेल व तुला कल्पांता पर्यंत कसलाही उपद्रव होणार नाही. भूत, भविष्य व वर्तमान असे त्रिकाळ ज्ञानासह वैराग्ययुक्त ब्रम्हज्ञानाने पुराणांचा आचार्य म्हणून ख्यातनाम पावशील.”

हे सर्व विवेचन ऐकून शौनकांनी तंत्रपूजेचे रहस्य विचारले. सूतमुनी म्हणाले, "प्रकृतीच्या नऊ तत्त्वांपासून विराटपुरुषाची उत्पत्ती झाल्याचे प्रतिपादन वेदांनी केले आहे. त्या विराट पुरुषाच्या ठिकाणी

सप्त भुवने व सप्त पाताळे यांची कल्पना केलेली आहे. त्या अतुलनीय रूपाशी तादात्म्यता साधता यावी या हेतूने सगुण तंत्र पूजेची योजना शिष्ट लोकांनी करून दिली आहे. भगवान श्रीकृष्ण अथवा भगवान श्रीविष्णुंच्या गळयातला कौस्तुभमणी म्हणजे आत्मतेज समजावे. श्रीवत्स म्हणजे आत्मतेजाची सर्वगामी व्याप्ती. वनमाला ही त्रिगुणी माया. पितांबर म्हणजे वेद. यज्ञोपवीत म्हणजे त्रिवर्णात्मक ओंकार. मकर कुंडले म्हणजे सांख्यशास्त्र समजावे. मुकुट म्हणजे शाश्वत ब्रम्हपद. अशा धारणा कराव्यात. गुरुपदेश म्हणजे तंत्र पूजनाचा अधिकार. वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न व अनिरुध्द ही त्या सगुण मूर्तीची चार रूपे म्हणजे चतुर्व्युह उपासना. चित्ताच्या ठिकाणी 'वासुदेव', सर्व प्रकारच्या अहंकारांच्या ठिकाणी 'संकर्षण', बुद्धीचे अधिदैवत 'प्रद्युम्न' व मनाचा अध्ष्ठाता 'अनिरुद्ध'. (हे सर्व पुष्प ३५ मध्ये कपिल मुनींनी देवहुतिला सविस्तर सांगितलेले आहे.) ह्या चतुर्व्युह उपासनेने भगवंताच्या विश्व तैजस, प्राज्ञ व तुरीय या अवस्थांमधून अर्थ , इंद्रिय, विषय व ज्ञान यांच्या योगाने ईश्वराचे सर्व-व्यापित्व जाणता येते. थोडक्यांत म्हणजे अंगे, उपांगे, आयुधे व भूषणे यांच्यासह चतुर्भुजरूप ध्यानासाठी स्मरत जावे. वेदांचे उत्पत्ती स्थान असलेले परब्रम्ह विष्णू, रुद्र, व ब्रम्हा या नावांनी त्या त्या कार्यासाठी संबोधले जातात. सर्वान्तिर्यामी परब्रम्हाच्या प्राथमिक उपासने साठी या विविध नामाचा उपयोग केला जातो. भक्तांना त्यांचे संरक्षण मिळत रहाते. त्यानंतर भक्त हळू हळू परब्रम्ह भावनेत येऊ लागतो. भगवान श्रीविष्णुंच्या अनादी मायेने निर्मिलेला सर्व प्राण्यांचा आत्मा भगवान श्रीसूर्यनारायण हा सर्वांचे नियमन करीत असतो. लोक व्यवहार सुरळीत चालण्यासाठी कालाचे ज्ञान त्याच्या मुळेच प्राप्त होते. सूर्या समोर त्याच्या रथात बसलेले साठ हजार वालखिल्य ऋषी वेदाधारे सूर्यस्तुति करीत असतात. त्या सर्वांसह माझा भगवान श्रीसूर्यनारायणांना नमस्कार असो. शौनकादी मुनींनो! अश्या ह्या थोर भक्तीरूप धर्माला माझे पुन्हां पुन्हां वंदन असो. श्रीमद्भागवतात पातकांचा नाश करणाऱ्या भक्त कैवारी नारायण, श्रीहरी, श्रीकृष्ण, यांचे प्रत्यक्ष गुणवर्णन केलेले आहे. त्या लीलांचे स्मरण मोक्ष दायक आहे. परमेश्वराच्या नामस्मरणाचे सामर्थ्य अतिशय अद्‌भुत आहे. नुसते 'हरये नाम:' असे म्हटले तरी मनुष्य पाप मुक्त होतो. कलीच्या अनेक दोषांचा नाश करणाऱ्या विश्वकर्त्या श्रीहरीचे नामस्मरण व गुणवर्णन करून भागवत संहिता सांगणाऱ्या व्यासपुत्र श्रीशुकमुनींना माझा वारंवार नमस्कार असो. सूतमुनी पुढे म्हणाले, " सामवेदाच्या माध्यमातून ब्रम्हदेवादि देव त्याची स्तुती करतात त्या भगवंताला माझा नमस्कार असो. मंदराचलपर्वत पाठीवर फिरत असताना शांत झोप घेत असलेल्या कुर्मावतारी भगवंताच्या श्वासोच्छवासा मुळे समुद्राला त्या काळापासून सुरु झालेली भरती ओहोटी आज तागायत तशीच अनुभवास येते. ते भगवंताचे श्वासोच्छवास आपले रक्षण करोत. माझा त्यांना नमस्कार असो. शौनकादीमुनीहो! मी आता पुराणांची नावे, श्लोकसंख्या, हेतू, दानपध्दती, दानफल, महात्म्य इत्यादी कथन करतो. १. ब्रम्हपुराण श्लोक दहाहजार, २.पद्मपुराण श्लोक पंचावन हजार, ३. विष्णूपुराण श्लोक तेवीस हजार, ४.शिवपुराण श्लोक चोवीसहजार, ५. श्रीमद्भागवतपुराण श्लोक अठराहजार, ६. नारदपुराण श्लोक पंचवीसहजार, ७. मार्कंडेयपुराण श्लोक नऊहजार, ८. अग्नीपुराण श्लोक पंधराहजार चारशे, ९. भविष्यपुराण श्लोक चौदाहजारपांचशे, १०. ब्रम्हवैवर्तपुराण श्लोक अठराहजार, ११. लिंगपुराण श्लोक अकराहजार, १२. वराहपुराण श्लोक चोवीसहजार, १३. स्कंदपुराण श्लोक एक्याऐंशी हजार एकशे, १४. वामनपुराण श्लोक दहा

हजार, १५. कूर्मपुराण श्लोक सतरा हजार, १६. मत्स्यपुराण श्लोक चावदा हजार, १७. गरुडपुराण श्लोक एकोणीस हजार, १८. ब्रम्हांडपुराण श्लोक बारा हजार, अशी त्या त्या पुराणांची श्लोकसंख्या आहे. सर्व पुराणांची मिळून चारलक्ष श्लोक संख्या आहे. श्रीमद्भागवतात आदी, मध्य, अंत व वैराग्य यांच्या ज्ञानाची आख्यानात सुरेख गुंफण करून भगवंताने ते प्रथम ब्रम्हदेवाला सांगितले. भागवतात ब्रम्ह व आत्मा यांचे एकत्वाचे वैदिक रहस्य मोक्ष प्राप्ती साठी प्रतिपादन केले आहे. श्रीमद्भागवत हे सर्व पुरणाचा मुकुटमणी आहे. श्रीमद्भागवत कथामृताचे एकदा सेवन केले कीं मग इतर कोणत्याच कथामृतात रस वाटत नाही. श्रीमद्भागवत पुराण हे सर्व पुराणांमध्ये श्रेष्ठ असून ते अत्यंत निर्दोष आहे. वैष्णवांना प्रिय असलेल्या ह्या पुराणात मायेपासून अलिप्त असलेल्या परमहंसांच्या अद्वितीय ज्ञानाचे वर्णन आहे. ज्ञान, भक्ती व वैराग्य यांच्या सह नैष्कर्म्य होण्याचा मार्ग यांत दाखवला आहे. श्रीमद्भागवताचे श्रवण, पठाण, मनन करणारा मनुष्य खात्रीने मुक्त होतो. प्रथम ब्रम्हदेवांसाठी मग ब्रम्हदेवांच्या रूपाने नारद, नारदांच्या रूपाने व्यास, व्यासांच्यारूपाने शुकमहाराज, शुकमहाराजांच्या रूपाने राजा परीक्षित यांच्यासाठी श्रीमद्भागवतरुपी दिव्य ज्ञान प्रकाशित करणाऱ्या परमशुध्द, परमसत्य अविनाशी भगवंताचे आपण ध्यान करू या! मोक्षाभिलाषी ब्रम्हदेवांना उपदेश करणाऱ्या सर्वसाक्षी वासुदेवाला आमचा सदैव नमस्कार असो. संसारसर्पाने दंश केलेल्या राजा परीक्षिताला श्रीमद्भागवत ऐकवून मुक्त करणाऱ्या महाभागवत श्रीशुकमुनींना आमचा नमस्कार असो. नामसंकीर्तन व चरण स्मरण करताच सर्व पाप व दु:खे नाहीशी करणाऱ्या श्रीहरिला आमचा त्रिवार नमस्कार असो.

इथे श्रीमद्भागवतातला बारावा स्कंध पूर्ण झाला. या स्कंधात एकूण १३ अध्याय

व ५६६ श्लोक आहेत. त्या सर्वांचा पुष्प २०२ ते पुष्प २०५ हा साररूप अनुवाद आहे

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

त्वदीयं वस्तु गोविंद तुभ्यमेव समर्पये |

तेन त्वदङ्घ्रिकमले रतिं मे यच्छ शाश्वतीम् ||

श्रीमद्भागवतकथा इथे संपूर्ण होते.

इंटरनेटवर विनामूल्य ई बुकच्या स्वरूपात श्रीमद्भागवत वाचताना आपल्याला काय वाटले ते आम्हाला जाणून घ्यायला आवडेल. अशा उपक्रमांसाठी काही सूचना असल्यास कृपया कळवा. हा उपक्रम अधिकाधिक उत्तम होण्यासाठी आपल्या सहकार्याची गरज आहे.

लिहा : esahity@gmail.com

किंवा भेट द्या : www.esahity.com

# ई साहित्य प्रतिष्ठान

वाचन हा एक चांगला टाईमपास आहे. त्यात चांगला वेळ जातो. पण वाचन हा केवळ टाईमपास नाही. आणि "वेळ" हा "घालवण्या"साठी नाही. आपण वाचत असतो तेव्हा आपण घडतही असतो. पुस्तकांतले शब्द आपले छिन्नी हतोड्याचे काम चोख बजावत असतात. मनावर संस्कार होत असतात. त्यामुळे वाचन करणारा समाज आणि निव्वळ पोटार्थी समाज यांच्यात फ़रक असतो. दिसतो. जाणवतो.

त्यातूनही शब्द जर मातृभाषेतून असतील तर त्या छिन्नीला धार येते. हातोडी जोमदार होते. आणि मातृभाषा जर मराठीसारखी भरजरी, वैभवशाली आणि धारदार असेल तर मनावर होणारा परिणाम आणि संस्कार अधिकच गडद असतात. म्हणून मराठीत वाचन संस्कृती रुजवायची आहे. वाचनाची आवड जोपासायची आहे. वाचनाची वृत्ती, वाचनाचा छंद फ़ुलवायचा आहे. एकट्यादुकट्या व्यक्तीत नाही. मराठीच्या कोट्यवधी साक्षरांत मराठी वाचनाची गोडी निर्माण करणं आणि त्याचं छंदात रुपांतर करणं हे आमचं ध्येय आहे. आणि त्यासाठी माध्यम आहे इंटरनेट.

एक गोष्ट सत्य आहे. अगदी रुस्तमातला रुस्तम वाचक आपलं पहिलं पुस्तक विनामूल्य मिळवतो. कधी घरात पडलेलं. कधी शेजारून. कधी वाचनालयातून. मग जसजशी गोडी लागत जाईल तसतसं किंमतीची पर्वा न करता पुस्तक मिळवून वाचायला लागतो. पण ही गोडी पेरावी, रुजवावी, जोपासावी लागते. म्हणून आम्ही विनामूल्य पुस्तकं दर आठवड्याला निर्माण करून पाठवत असतो. या अभियानात आम्हाला लेखकांचं खुप पाठबळ आहे. अनेक चांगले चांगले लेखक आपली उत्तम दर्जाची पुस्तकं आम्हाला विनामूल्य उपलब्ध करून देतात. म्हणून तर आम्ही आपल्याला उत्कृष्ट पुस्तकं विनामूल्य देऊ शकतो. विनामूल्य आहे म्हणून काहिही साधंसुधं देत नाही. बाजारात पैसे देऊनही मिळणार नाहीत अशी भारी पुस्तकं आम्ही विनामूल्य देऊ शकतो ती केवळ आमच्या लेखकांच्या कृपेने.

ई साहित्य प्रतिष्ठान हे व्यासपीठ नवीन साहित्यिकांसाठी आणि वाचकांसाठी ई पुस्तकांचे दालन घेऊन उभे ठाकले आहे. लाखो वाचकांपर्यंत ही पुस्तके विनामूल्य वितरीत करायला सुरूवात केली आहे. चार वर्षांपुर्वी स्थापन झालेल्या ई साहित्य प्रतिष्ठानने आजवर आपल्या वाचकांना सुमारे चारशे, दर्जेदार, मराठी ई पुस्तके विनामूल्य दिली आहेत. चारशे नवीन साहित्यिकांना या व्यासपीठावरून सादर केले. इंटरनेटवर मराठी भाषेतील साहित्य लोकप्रिय करण्याची चळवळ हिरिरीने पुढे नेली. कविता, कथा कादंबऱ्या आणि गंभीर विषयांवरची पुस्तके प्रकाशित केली. दोन लाख रसिकांपर्यंत हे दर्जेदार साहित्य विनामूल्य पोचवले. चारशे गुणिले दोन लाख म्हणजे आठ कोटी पुस्तके ई साहित्य प्रतिष्ठान तर्फ़े वितरित झाली असे म्हणता येईल. तसे पाहिले तर हे एक भव्य काम सुरू आहे. नव्या प्रतिभा, नवे लेखक, नवीन निर्मिती. मराठीत एक नवा अध्याय लिहिला जात आहे.

आता आम्हाला वाचकांचं पाठबळ हवंय. ज्यांना पुस्तकं वाचायला आवडतात त्यांचे ई मेल पत्ते पाठवाच. पण जे साक्षर असून, मराठी असून काहीच वाचत नाहीत, किंवा 'मराठी' वाचत नाहीत अशांचे मेल पत्ते आवर्जून पाठवा. अशा दहा लोकांपैकी एकाला जरी मराठी वाचनाची आवड लावण्यात आपण यशस्वी झालो तरी ते एक पुढचे पाऊल असणार आहे. म्हणून ही कळकळीची विनंती आहे की आपल्या आजूबाजूच्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या. या पत्त्यांचा वापर फ़क्त आणि फ़क्त मराठी पुस्तके पाठवण्यासाठी केला जाईल. त्याचबरोबर दहा किंवा अधिक पत्ते पाठवणाऱ्यांना ई साहित्य प्रतिष्ठानचे VIP सभासद म्हणून नोंदले जाईल. ही सेवा पूर्णपणे निःशुल्क आहे.

आपल्या पत्राची वाट पहात आहोत.

धन्यवाद

आपले नम्र

टीम ई साहित्य प्रतिष्ठान

# श्रीकृष्णार्पणमस्तु